# मानवी जीवनातील गूढ रहस्ये

(भाग ७ )

स्वामी दत्तावधूत

ॐ वनिता बुक्स
मुंबई - ४०० ०१२.

☯ ॐ वनिता बुक्स

☯ **पुष्प चौदावे**

प्रथमावृत्ती : २००७

द्वितीयावृत्ती : २०११

तृतीयावृत्ती : २०१६

चतुर्थावृत्ती : २०१८

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

☯ **प्रकाशक**

**ॐ वनिता बुक्स**

बी २१३,

सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),

डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई ४०० ०१२.

दूरध्वनी : (०२२) २४१८७३३९.

☯ **मूल्य : रु. १८०/-**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | मनोगत | |
| १) | ब्रह्मज्ञानाची प्रभात | ७ |
| २) | खजिना | १७ |
| ३) | सूक्ष्मदेहातील गूढ रहस्ये | २९ |
| ४) | विराट पुरुष | ४२ |
| ५) | ॐकार रहस्य | ५८ |
| ६) | मानव ईश्वरच आहे | ६२ |
| ७) | परब्रह्म | ८९ |
| ८) | परमहंस | ९३ |
| ९) | द्रौपदी स्वयंवर | १०३ |
| १०) | गहनो कर्मणा गतिः | १०९ |
| ११) | अंते मति सः गतिः | १२५ |
| १२) | मंत्रसिद्धी | १३६ |
| १३) | ज्योति | १४० |

| | | |
|---|---|---|
| १४) | देव–दैत्य | १४९ |
| १५) | उत्तिष्ठत जाग्रत | १५५ |
| १६) | योगसिद्धी | १६१ |
| १७) | मी कोण ? | १८८ |
| १८) | जीवन–मुक्त | १९५ |
| १९) | प्रश्नोपनिषद | २०२ |
| २०) | मृत्यूपूर्वी व मृत्यूनंतर | २११ |
| २१) | मुक्ती | २४१ |
| | प्रकाशकाचे परिशिष्ठ | २४९ |

# मनोगत

**मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग ७** हे माझे पुस्तक शेवटचे ठरावे अशी माझी इच्छा आहे. गेली सोळा वर्षे जरी मी एकान्तवासात राहत असलो तरी, अधून मधून काही ठराविक लोकांना भेटणे चालूच आहे. शिवाय लेखनामध्येसुद्धा बराच काळ खर्च होतो. यामुळे साधनेसाठी पुरेसा वेळ मिळत नाही, म्हणून लेखनकार्य थांबविण्याचे ठरविले आहे. तसेच जनसंपर्कापासून दूर जाऊन पूर्णपणे एकान्तात साधना करण्याचे ठरविले आहे.

माझ्या पुस्तकांच्या वाचनाने अनेकांना दिव्य अनुभव आल्याचे अनेकांनी कळविले. केवळ पुस्तके वाचून ध्यानामध्ये दिव्य दर्शने झाली, पुस्तके पोथ्या वाचून रोग, व्याधी, बाधा दूर पळाल्या, पुस्तके वाचून अनेक वर्षे न झालेली कामे झाली, पुस्तके वाचून उद्योग-धंदा मिळाला, नोकरी लागली अशा असंख्य गोष्टी आम्हाला कळलेल्या आहेत. त्यातील काही गोष्टी प्रकाशकाचे परिशिष्ट या सदरामध्ये देण्याचे प्रकाशकाने ठरविले आहे.

मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ ते ४ ही पुस्तके सामान्य परंतु भक्तीमान वाचकांसाठी असून, भाग ५ ते ७ ही तीन पुस्तके ज्याला विहंगममार्ग मिळालेला आहे अशा साधकांना मार्गदर्शन करण्यासाठी लिहिलेली आहेत. त्यामुळे सामान्य वाचकांना भाग ५ ते ७ ही पुस्तके कठीण व कंटाळवाणी वाटण्याची शक्यता आहे. तरीपण पुन्हा पुन्हा वाचल्यास वाचकांना त्याची गोडी लागेल.

**माहूरगड** **स्वामी दत्तावधूत**

भरो शांतीने विश्व ।

व्हावे आध्यात्मिक विश्व ।

भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।

व्हावे अखिल विश्व हे ।।

– श्री स्वामी दत्तावधूत

# १. ब्रह्मज्ञानाची प्रभात

## अहं ब्रह्मास्मि

निज ज्ञानाची पहाट फुटू लागल्यानंतर साधकामध्ये क्रियाशक्ती प्रकट होते. **अहं ब्रह्मास्मि** हा भाव निर्माण होतो. आपण देव आहोत, ईश्वर आहोत असे वाटू लागते. अंगी प्रगट झालेली क्रियाशक्ती असंख्य चमत्कार करत असते. अर्थात हे मी जे काही लिहित आहे ते अत्यंत **सात्त्विक, सद्गुणी** व मोठ्या मनाच्या साधकांविषयी लिहित आहे, योग्यांविषयी लिहित आहे. योगी स्वतः चमत्कार करत नसतो परंतु वातावरणातील देव-देवता त्याच्या नावाने चमत्कार करत असतात.

**अहं ब्रह्मास्मि** म्हणजे ''**मी ईश्वर आहे**'' असा भाव मनात प्रकट होऊन तसा अनुभव साधक जरी घेत राहिला तरी येथे फसगत होण्याची दाट शक्यता असते, कारण अहं ब्रह्मास्मि या भावातील अहं म्हणजे '**मी**' बऱ्याच साधकांना धोका देतो.

साधक **अहं ब्रह्मास्मि** भावात मशगुल होतो, **क्रियाशक्ती** विविध प्रकारचे चमत्कार करू लागते, साधकाला जिकडून तिकडून मान मिळू लागतो व साधकाचा आध्यात्मिक प्रगतिचा पुढचा प्रवास थांबतो.

**अहं ब्रह्मास्मि** भावाचा उदय झाल्याबरोबर त्या भावाकडे दुर्लक्ष करून साधकाने लय योगाची साधना पुढे चालू ठेवल्यास या भावामुळे ज्या अडचणी व संकटे साधकावर कोसळतात त्या सर्वांपासून साधकाचे रक्षण होऊन साधक पुढील भावात प्रवेश करतो.

## तत्त्वमसि

**तत्त्वमसि** म्हणजे **तत् त्वम् असि म्हणजे ते तू आहेस !** अहं ब्रह्मास्मि या भावापेक्षा ही वरची पायरी आहे. या भावामध्ये प्रगती झाल्यावर साधकाला इतरांच्या आध्यात्मिक अवस्था कळू लागतात. आपल्यापेक्षा जास्त प्रगत आत्मे कोण हे त्याला समजते व त्याच्यातील अहं गळून पडतो. अहं गळून पडल्यानंतर त्याच्यामध्ये लीनता वाढते व त्याचा आनंदही अनेक पटीने वाढतो, त्याच्यामधील पावित्र्य वाढते, तो अंतर्बाह्य पवित्र होतो.

**अहं ब्रह्मास्मि** भावात राहत असतांना इतरांचे सुख-दुःख योग्याला जाणवते. उदाहरणार्थः- एखाद्या व्यक्तीचा डावा कान दुखत आहे, तर **अहं ब्रह्मास्मि** भावात राहणाऱ्या योग्याचा डावा कान दुखू लागतो व तो समजतो की, समोर बसलेल्या व्यक्तीचा डावा कान दुखत आहे.

समोर बसलेल्या व्यक्तीला जर थंडी वाजत असेल तर योग्याला त्याची जाणीव होते. समोर बसलेल्या व्यक्तीला जर एखाद्या वस्तूची (पैसे किंवा खाण्याचा पदार्थ किंवा अन्य काही) आवश्यकता असेल तर योग्याला त्याची जाणीव होते.

अशाप्रकारचे विविध अनुभव ''**अहं ब्रह्मास्मि**'' या भावात येतात. ''**तत्त्वमसि**'' या भावात प्रवेश केल्यानंतर अनुभवांमध्ये वाढ


होते. अंगी पवित्रता वाढते, देह अंतर्बाह्य पवित्र होतो. इतरांमधील अपवित्रता खेचून घेण्याचे व इतरांना पवित्रता प्रदान करण्याचे सामर्थ्य अंगी प्रकट होते. तसेच एखाद्या देवतेच्या मूर्तीमध्ये किंवा वस्तूमध्ये (धातु, पाषाण, लाकूड, जमीन, वृक्ष इत्यादी) शक्ती ठेवण्याचे सामर्थ्य अंगी प्रकट होते. हजारो ठिकाणी तो आपले सामर्थ्य ठेवतो व जगाच्या उद्धाराची व्यवस्था करतो. तसेच अनेक व्यक्तींना दैवीशक्ती देऊन तो लोकांना सन्मार्गाला लावू शकतो. इतरांची दुःखे कमी करण्याचा तो जास्तीत जास्त प्रयत्न करतो व इतरांना सुखी करण्याचा तो जास्तीत जास्त प्रयत्न करतो.

अशा सिद्धयोग्याचे जे ऐकतात त्यांच्या आयुष्याचे कल्याण होते. त्यांच्यावर ईश्वराची कृपा होते. परंतु अशा सिद्धयोग्यांचे जे ऐकत नाहीत त्यांना त्यांच्या कर्माप्रमाणे फळे भोगावी लागतात.

''**अहं ब्रह्मास्मि**'' व ''**तत्त्वमसि**'' या दोन्ही भावांमध्ये क्रियाशक्ती विविध प्रकारचे चमत्कार घडवितच असते, यामुळे योग्याची प्रसिद्धी होत असते. या प्रसिद्धीपासून जपून राहणे अतिशय आवश्यक असते. यासाठी योगी एकान्तवासात राहतात, जनसंपर्कापासून दूर राहतात व गुप्तपणे आपली साधना करतात.

## सर्वं खल्विदं ब्रह्म

सर्वं खल्विदं ब्रह्म म्हणजे सर्वत्र ब्रह्म भरलेले आहे, असा अनुभव घेणे. हा अनुभव अनेक प्रकाराने व्यक्त करता येतो. या अनुभवांची अभिव्यक्ती मी पुढे एक चित्र आणि तीन उदाहरणे देऊन करत आहे. यावरून वाचकांच्या लक्षात येईल की, या सृष्टीमध्ये परब्रह्माशिवाय दुसरे काहीही नाही. वनस्पती, प्राणी, पशू, मनुष्य, देवता,




परब्रह्माने सर्व विश्व व्यापलेले असून अनंत ब्रह्माण्ड या परब्रह्मात येतात. देवता, मनुष्य यांना परब्रह्माने व्यापलेले आहे.

सज्जन, दुर्जन, सुर, असुर सर्वांमध्ये एकच परब्रह्म भरलेले आहे.

**एक**

कल्पना करा की, एक मोठ्या आकाराची इलेक्ट्रीकची ट्यूब आहे. ही ट्यूब आतून पोकळ आहे. तिचा आकार इतका मोठा आहे की, त्याने ब्रह्माण्ड व्यापलेले आहे. या ट्यूबच्या आत कापूर भरलेला आहे. या ट्यूबला असंख्य माणसे लटकत असून ट्यूबच्या आतील कापराचा एक एक कण या माणसांच्या मस्तकामध्ये आहे. या कणावरती किंवा या अणुब्रह्मावरती महाकारणदेह, कारणदेह, सूक्ष्मदेह व स्थूलदेह अशी आवरणे आहेत.

आत्मज्ञानसंपन्न योग्याला ज्ञानदृष्टीने जेव्हा असे दिसते, तेव्हा त्याला कोणीही ''**परके**'' वाटत नाहीत. सर्व माणसे ब्रह्माची

अभिव्यक्ती आहेत असा अनुभव येतो. या अनुभवामुळे त्याची बुद्धी "**सम**" होते, म्हणजे सारखी होते. या अवस्थेला "**ब्राह्मी**" अवस्था असे म्हणतात.

**दोन**

निळ्याप्रकाशाचा समुद्र सर्वत्र दिसून येतो. हा निळाप्रकाश म्हणजेच परब्रह्म याचे ज्ञान होते. वृक्ष, वनस्पती, पशू , प्राणी, मनुष्य, नद्या, डोंगर, दऱ्या सर्व काही या निळ्याप्रकाशातच सामावलेले आहे असा अनुभव येतो आणि हृदयामधून "**सर्वं खल्विदं ब्रह्म**" "**सर्वं खल्विदं ब्रह्म**" "**चिदानंद रूपम्, शिवोऽहम् शिवोऽहम्**" असा ध्वनि ऐकू येऊ लागतो व या ब्रह्माण्डामध्ये परब्रह्माशिवाय काही नाही असा अनुभव येतो.

**तीन**

समुद्रामध्ये लहान-मोठे असंख्य मासे विहार करत असतात. या माश्यांच्या शरीरात ७५ टक्के पाणी असते. शरीराच्या आत पाणी, शरीराच्या बाहेर पाणी तरीसुद्धा मासा तहानलेलाच असतो. त्याप्रमाणे संपूर्ण ब्रह्माण्डामध्ये परब्रह्माशिवाय दुसरे काहीच नाही. शरीराच्या आत परब्रह्म, शरीराच्या बाहेर परब्रह्म ! असे असूनसुद्धा मनुष्य मात्र निरनिराळया वस्तूंमध्ये, स्त्री आणि धन यामध्ये आनंद शोधत भटकत राहतो.

वरीलप्रमाणे अनेक प्रकारांनी परब्रह्माचा अनुभव सिद्धयोग्यांना येत असतो.

**प्रज्ञानम् ब्रह्म**

वर फक्त तीन प्रकारांनी परब्रह्माचे अनुभव कसे येतात हे सांगितले आहे. परंतु शेकडो प्रकारांनी परब्रह्माचे अनुभव येतात.

श्वास आज्ञाचक्रातून सहस्त्रारचक्राकडे जाऊ लागला की खऱ्या अर्थाने सोऽहम् साधना सुरू होते. बराच काळ सोऽहम् साधना केल्यानंतर विचारांचा ओघ बंद पडतो, मन सुख-दुःखातीत होते. कल्पना प्रवाह, मनोराज्य थांबतात व ब्रह्माचे विविध अनुभव येऊ लागतात.

कुंडलिनी जागृत होते. सुषुम्ना मार्गाने वर वर चढू लागते. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञाचक्रापर्यंत कुंडलिनी पोहोचल्यानंतरच विहंगममार्ग सुरू होतो.

प्रत्येक चक्राचे वेगवेगळे अनुभव येतात. निरनिराळे सुगंध येतात, निरनिराळे ध्वनि ऐकू येतात, ध्यानामध्ये सत्पुरुष, ऋषी, देवता यांची दर्शने होतात. निरनिराळे रंग व प्रकाश दिसतात. अशाप्रकारची दृश्ये दिसू लागली की कुंडलिनी व चक्रे जागृत होत आहेत असे समजावे. बऱ्याच वेळा आपला सूक्ष्मदेह स्फटिक शिवलिंगाप्रमाणे स्वच्छ दिसतो. याला **आत्मदर्शन** असे म्हणतात. पुष्कळवेळा स्वतःची अनेक रूपे स्वतःच्या शरीरातून बाहेर पडतात व आपल्यासमोरच बसतात. यालाही **आत्मदर्शन** असे म्हणतात. याशिवाय आपल्याच देहामध्ये परमेश्वराची अनेक रूपे दिसू लागतात व आपण निर्गुण, निराकार आहोत असे **आत्मज्ञान** होते. यालाच **प्रज्ञानम् ब्रह्म** असे म्हणतात.

आज्ञाचक्रापर्यंतचा प्रवास पूर्ण झाल्यानंतर खऱ्या अर्थाने विहंगममार्ग म्हणजे आकाशमार्ग किंवा शून्यमार्ग सुरू होतो. या शून्यमार्गामध्ये **त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा, ब्रह्मरंध्र** असा प्रवास कुंडलिनी शक्ती करते. या सर्व प्रवासात मनाला अत्यंत आनंद होत असतो. एक प्रकारची धुंदावस्था मनाला प्राप्त होते. कधी

कधी या चिदाकाशात हंस उडताना दिसतात, कधी मोर दिसतात, कधी वीजांच्या रेषा दिसतात, मोत्यांची कणसे दिसतात अशी विविध दृश्येही चिदाकाशात दिसून येतात.

शून्याचे दोन भेद आहेत. शून्य व महाशून्य. शून्याला ब्रह्म म्हटले जाते, तर महाशून्याला परब्रह्म म्हटले जाते. येथे साधक सिद्ध होतो व त्याला **सहजावस्था** प्राप्त होते.

**सहजावस्था** म्हणजे सर्व प्रकारची कर्मे करतांना परब्रह्माशी तादात्म्यता असणे.

**अहं ब्रह्मास्मि व तत्त्वमसि** या दोन अवस्थांमध्ये क्रियाशक्तीचा अनुभव येतो.

**सर्वं खल्विदं ब्रह्म** या अवस्थेमध्ये इच्छाशक्तीचा अनुभव येतो.

**प्रज्ञानम् ब्रह्म** या अवस्थेमध्ये प्रारंभी ज्ञानशक्तीचा अनुभव येतो व अंती इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती परब्रह्मामध्ये लीन होतात व साधक निर्गुण होतो. निर्वाण अवस्था त्याला प्राप्त होते.

इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती या तीन शक्तींनाच महालक्ष्मी, महासरस्वती व महाकाली असे म्हटले जाते. या शक्तींनाच ब्रह्मा, विष्णू , महेश म्हणतात. परब्रह्माच्या प्रान्तामध्ये स्त्री, पुरुष असे भेद नसतात. सर्व आत्मे ज्योतिर्मय असतात, इच्छाधारी असतात, कामरूप असतात, त्यांना कुठलाही देह धारण करता येतो.

आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर एक अतिशय महत्त्वाची गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे, ''पृथ्वीतलावरील सामान्य माणसांची मन व

बुद्धी भ्रष्ट झालेली असतात. सूक्ष्मदेहही खूप खूप अपवित्र झालेला असतो परंतु अंतरआत्मा **आत्मसुखासाठी तडफडत असतो.** त्यामुळे श्रीमंतही तडफडत असतो, गरीबही तडफडत असतो. प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचलेले साधूही तडफडत असतात व सज्जनही तडफडत असतात. एकंदरीत सगळेच तडफडत असतात.''

या अध्यायामध्ये मी जे काही लिहिले आहे, त्या प्रत्येक वाक्यावर माझे अनुभव लिहायचे ठरविले तर हा अध्याय शंभर पानांचा होईल, म्हणून आत्म्यांची तडफड कशी होत असते, याविषयी एक छोटीशी गोष्ट सांगून हा अध्याय संपवितो.

एका व्यक्तीचे नाव खूप गाजत होते. लाखो लोक या व्यक्तीला देवासारखे मानत असत. त्याचे मन बुद्धीही आपण देव झालो या भ्रमात बुडालेली होती.

एक अतिसामान्य मनुष्य माझ्याकडे येत असे. एकदा तो आपल्या घरामध्ये ध्यान करत बसला असता त्याच्यासमोर वरील व्यक्तीचा आत्मा प्रकट झाला व म्हणाला (येथे मी व्यक्ती असे म्हटले आहे कारण ही एक संसारी व्यक्ती होती, साधूचा वेष धारण केलेली नव्हती.)

''तुम्ही लोक खूप भाग्यवान आहात. तुम्हाला स्वामी दत्तावधूतांसारखे योग्य मार्गदर्शन करणारे गुरु मिळाले. माझे जरी ६०-७० लाख भक्त असले तरी मी खूप अडकलेला आहे व यातून सुटायला मला कोट्यावधी वर्षे लागतील, पण काय करणार? मी पैसा व प्रसिद्धीच्या मागे लागलो व फसलो !''

यावरून ज्यांच्या कीर्तिचा सुगंध सर्वत्र दरवळत असतो, अशा व्यक्तींचे आत्मे कसे तडफडत असतात, हे सिद्ध होते.

माझ्याकडे येणाऱ्या त्या अतिसामान्य माणसाने वरील सर्व हकिकत सांगून मला विचारले -

आपण अडकलो आहोत, असे त्या आत्म्याने मला सांगितले. परंतु ती व्यक्ती सुधारण्याचा प्रयत्नसुद्धा करत नाही, त्याचे मागचे धंदे तसेच चालू आहेत.

यावर मी म्हणालो -

''सूक्ष्मशरीराला व्यावहारिक भाषेत जीवात्मा असे म्हणतात. या सूक्ष्मशरीरामध्ये मन, बुद्धी, चित्त, अहंकार असतात. पूर्वजन्मींच्या दुष्कर्मांनुसार हे सूक्ष्म शरीर काळेकुट्ट असते. या काळ्याकुट्ट शरीरामधील लोभी मन, भ्रष्ट बुद्धी माणसाला कधीही चांगले काम करू देत नाही, चांगला विचारही सुचू देत नाही. अशी मन, बुद्धी फक्त स्वार्थाचाच विचार करतात व बुद्धीचा दुरुपयोग करतात. अशा माणसांना आपण वाईट माणसे म्हणतो. हे जरी खरे असले तरी या सूक्ष्मशरीराच्या पलिकडे एक कारणशरीर असते व कारणशरीराच्या पलिकडे एक महाकारणशरीर असते. महाकारणशरीराला **शिवात्मा** असे म्हणतात. हा **शिवात्मा** सदैव पवित्र असतो. तुला जो दिसला तो त्या व्यक्तीचा **शिवात्मा !** या शिवात्म्याला कळत होते की, आपण अडकलेले आहोत, परंतु मन, बुद्धीला पैसा व प्रसिद्धी याशिवाय दुसरे काही सुचत नव्हते. त्यामुळे हा आत्मा आता विविध योनीतून लाखो वर्षे फिरत राहणार हेच खरे !''

मूळ आत्मा कसा तडफडत असतो याचे थोडक्यात वर्णन वर केले आहे. वस्तुतः प्रत्येक मानव अतृप्तच असतो. जोपर्यंत ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होत नाही तोपर्यंत मानव अतृप्त राहतो. ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झालेला योगी तृप्त होतो, त्याचे हृदय परमानंदाने भरून जाते. जीवनातील सर्व व्यवहार करतांना तो सहजसमाधी सुखाचा अनुभव घेत राहतो.

पृथ्वीतलावरील प्रत्येक मानवाने हे लक्षात घेतले पाहिजे की, आत्मसुख प्राप्त केल्याशिवाय मानवी जीवनाला काहीही अर्थ नाही. कितीही शिकलात, कितीही पैसा मिळविलात, तरीही मन तडफडतच राहणार यासाठी आत्मसुखाची कास धरली पाहिजे !

## २. खजिना

कल्पना करा की, एक खूप मोठे घर आहे. या घराचे छप्पर सोन्याचे आहे, भिंती सोन्याच्या आहेत, जमीन, खिडक्या, दरवाजेही सोन्याचे आहेत. परंतु या घरात राहणारा मालक आंधळा असल्याने दरिद्री आहे. त्याच्याकडे पैसा नाही, अन्न नाही व वस्त्रही नाही. त्या घरमालकाला हे माहीत नाही की, आपण कुबेरापेक्षाही श्रीमंत आहोत.

विशेष म्हणजे हे घर जिकडे मालक जाईल तिकडे त्याच्याबरोबर फिरणारे आहे. असे हे फिरते घर आहे. हे घर म्हणजे **मनुष्य देह** होय! आणि म्हणूनच आजपर्यंत पृथ्वीतलावर झालेल्या सर्व साधूसंतांनी नरजन्माची महती गायिलेली आहे. सॉक्रेटिस तर भर दिवसा हातात पेटलेला कंदील घेऊन फिरत असे. कारण जगातील लोक आंधळे आहेत त्यांना प्रकाश मिळावा म्हणून तो हातात कंदील घेऊन फिरत असे. कंदील म्हणजे नरदेह. काच म्हणजे सूक्ष्मशरीर व कंदीलाची ज्योत म्हणजे ईश्वर. या नरदेहात ईश्वर आहे असे त्याला म्हणावयाचे होते. **सत्कर्मे** करून म्हणजे ईश्वरभक्ती, दान व परोपकार करून जर या कंदीलाची काच तुम्ही स्वच्छ ठेवली तर, तेज, सुख-शांती व आनंद इत्यादी रूपांनी ईश्वरी प्रकाश बाहेर पडेल. असे त्याला म्हणावयाचे होते. परंतु सॉक्रेटिसच्या कंदीलाचा अर्थ कोणालाही कळला नाही. दुष्कर्मे करून पृथ्वीतलावरील

मानव या अपूर्व नरजन्माची वाताहात लावत आहेत. पूर्वीही तेच करत होते व आजही तेच करत आहेत. नरजन्माची महती न कळल्याने माणसे दुष्कर्मे करून, संकुचित बुद्धीने वागून स्वतःचेच प्रचंड नुकसान करत असतात.

नरदेहाला सर्व सुखाची खाण असे म्हटले जाते. या नरदेहात किती व काय काय अद्‌भुत गोष्टी भरलेल्या आहेत हे आता पाहू !

## चिंतामणी

मनुष्य सतत **चिंता** करत असतो. मनामध्ये हे करायचे आहे, ते करायचे आहे, असे म्हणत असतो. जेव्हा मनुष्य चिंता करण्याचे पूर्णपणे सोडून देतो व ईश्वराचे **चिंतन** करू लागतो, तेव्हा त्याचे सूक्ष्मशरीर हळूहळू शुद्ध होऊ लागते. शुद्ध होत असलेले सूक्ष्मशरीर पुन्हा अशुद्ध होऊ नये म्हणून खूपच दक्षता घ्यावी लागते. यासाठी जनसंपर्कापासून दूर एकान्तात राहावे लागते. सूक्ष्मशरीर स्फटिकाप्रमाणे शुद्ध, पारदर्शक व हिऱ्याप्रमाणे कठीण झाल्यानंतर आपण जसा संकल्प मनात करू तो तात्काळ सिद्ध होतो. आपल्याला हवी असणारी प्रत्येक गोष्ट इच्छा केल्यानंतर थोड्या वेळात समोर हजर होते. वातावरणातील अनेक सेवाभावी आत्मे व देवताही आपली सेवा करू लागतात. येथे साधकाला कसलीही अपेक्षा नसते. परंतु साधकाला काय हवे आहे याची चिंता वातावरणातील देव-देवता व पवित्र आत्मे करतात. या अवस्थेला चिंतामणी अवस्था असे म्हणतात.

आपल्या प्रत्येक इच्छेची पूर्तता करणारा चिंतामणी आपल्या चित्तातच आहे परंतु या चिंतामणीला प्राप्त करण्याचे सोडून मानव चिंता

करत बसतो. कारण चिंता करत बसणे हा मानवाचा स्वभाव असतो.

### कल्पवृक्ष

मनुष्य सतत काही ना काहीतरी **कल्पना** करत असतो. कल्पनेच्या राज्यात तो नेहमी गुंग झालेला असतो. कल्पना केल्याशिवाय तो एकही क्षण स्वस्थ बसत नाही. मनातले विचार व कल्पना त्याला सतत निरनिराळे उद्योग करावयास लावतात.

एखादा साधक जेव्हा **विचार आणि कल्पना** करण्याचे बंद करतो, तेव्हा त्याचे ''कारणशरीर'' शुद्ध होऊ लागते. कारणशरीरामध्ये अनेक जन्मांच्या इच्छा, वासना, सत्कर्मे व दुष्कर्मे यांची बीजे साठवलेली असतात. जोपर्यंत ही बीजे पूर्णपणे नष्ट होत नाहीत तोपर्यंत कारणशरीर शुद्ध होत नाही. जसजशी ही बीजे नष्ट होऊ लागतात तसतसे विचार, वासना व कल्पना यांचे जोर कमी होतात. जेव्हा **कारणशरीरातील** सर्व वाईट संस्कार नष्ट होतात, तेव्हा **कारणशरीर** शुद्ध होते, मन **निर्विकल्प** होते. **निर्विकल्प समाधी** लागते व साधक **ईश्वरस्वरूप** होतो.

येथे वाचक असे विचारतील की, विचार व कल्पना करणे सोडून दिल्यानंतर जीवनाचे सर्व व्यवहार थांबणार नाहीत काय?

याचे उत्तर असे आहे की, विचार व कल्पना करणे थांबविल्यानंतरसुद्धा जीवनाचे सर्व व्यवहार सुरळीत चालत राहतात. त्यात कोठेही अडथळा येत नाही.

''ज्याप्रमाणे आपण खुंटीवर टोपी अडकवून सर्व व्यवहार करतो, त्याप्रमाणे विचार व कल्पना यांचा आश्रय न करता जीवनातील सर्व व्यवहार यंत्रवत होत राहतात.''

''ज्याप्रमाणे हृदयाचे कार्य हृदय करत असते, जठराचे कार्य जठर करत असते, आतड्याचे कार्य आतडे करत असते, यात आपण काहीच करत नसतो. या सर्व गोष्टी यंत्रवत होत असतात. त्याप्रमाणे मन **निर्विकल्प** होऊन **अखंड सहजसमाधीत** राहणारा योगी सर्व प्रकारची कार्ये करून **करोनी अकर्ता । भोगोनी अभोक्ता ।**

अशा प्रकारे दिव्य अवस्थेचा अनुभव घेत असतो.''

मनाने कल्पना करणे सोडून दिल्यानंतर किंवा मन निर्विकल्प झाल्यानंतर साधकाची अवस्था कल्पवृक्षासारखी होते. इच्छा करण्याचा अवकाश वातावरणातील उच्च कोटीच्या देव-देवता तत्क्षणीच सर्व इच्छा पूर्ण करतात. पुष्कळवेळा वातावरणातील या देव-देवता अनेक प्रकारची रूपे घेऊन प्रकट होतात व साधकाची इच्छा पूर्ण करतात. अशा प्रकारे सर्व प्रकारच्या वैभवाचा खजिना आपल्या अंतरंगातच दडून राहिलेला आहे आणि माणूस मात्र विविध प्रकारच्या गरजांच्या पूर्तीसाठी रानोमाळ हिंडत असतो.

आपल्या अंतरंगात कशा प्रकारचा खजिना आहे याचे थोडक्यात दिग्दर्शन वर केले आहे. हाच मुद्दा एक-दोन उदाहरणावरून स्पष्ट करता येईल.

येथे एक सूत्र लक्षात ठेवावे ...

**कामना हिच कामधेनू आहे.**
**कल्पनाच कल्पवृक्ष आहे.**
**चिंतनच चिंतामणी आहे.**

रानोमाळ भटकणाऱ्या गाईचे दूध आपल्याला मिळत नाही.

कल्पनांच्या मागे सैरावैरा धावणाऱ्यांच्या इच्छा कधीही

साकार होत नाहीत.

चिंता करणाऱ्याला कधीही मनःशांतीचा लाभ होत नाही.

या सर्व गोष्टींवर विजय मिळवून जो **स्थितप्रज्ञ** होतो त्याला कामधेनू, कल्पवृक्ष, चिंतामणी या तिनही गोष्टी प्राप्त होतात. अर्थात ज्यांना खरे सत्पुरुष व्हायचे असते, असे योगी, कामधेनू, कल्पतरू, चिंतामणी या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करतात व आणखी पुढे जात राहतात. पुढे अनेक सिद्धी योग्याला प्राप्त होतात. या सिद्धी अनेक असून यांची वर्णने करण्यास अनेक पाने अपुरी पडतील. या सर्व सिद्धींकडे दुर्लक्ष करून योगी पुढे जात राहतो व शेवटी त्याला परमपद प्राप्त होते. तो परमेश्वरस्वरूप बनतो. त्याच्या शरीरामध्ये असंख्य देव-देवतांचा निवास होतो. तो अंतर्बाह्य परमेश्वरस्वरूप बनतो. इतकी अवस्था प्राप्त केल्यानंतरसुद्धा आपल्या जवळ असणाऱ्या सर्व खजिन्याला तो विसरून जातो व अतिसामान्य माणसाप्रमाणे सहजावस्थेत राहतो.

आत्मस्वरूपाचा खजिना ज्यांनी प्राप्त केला आहे असे लोक कसे राहतात, प्रसंगी देव-देवता त्यांची कशी सेवा करतात याची काही उदाहरणे पुढे देत आहे.

### नरसी मेहता

नरसी मेहता अत्यंत गरीब होते. झोपडीत राहत होते. दोन वेळची खाण्याची भ्रान्त होती. त्यांनी आपल्या मुलीचे लग्न राजपुत्राबरोबर होणार हे अंतर्ज्ञानाने ओळखले होते.

अंगावर फाटके-तुटके कपडे घालून ते राजाच्या दरबारात गेले व त्यांनी राजाच्या मुलाला आपल्या मुलीसाठी मागणी घातली.

राजा व राजाचे सर्व दरबारी लोक हसू लागले. राजाला काय बोलावे हे सुचेना. तेव्हा एक दरबारी म्हणाला–,

''राजाच्या मुलाबरोबर तू आपल्या मुलीचे लग्न करावयास निघाला आहेस परंतु 'राजा–राणीचे मानपान'–'त्यांच्या नातेवाईकांचे मानपान'–'सर्व दरबारी लोकांचे मानपान'–'वऱ्हाडाचे मानपान'–'वराची वरदक्षिणा', इत्यादी सर्व देण्याची पात्रता तुझ्यामध्ये आहे काय?''

यावर नरसी मेहतांनी उत्तर दिले, ''होय ! ''

''राजा–राणी, त्यांचे सर्व नातेवाईक, दरबारी लोक, त्यांचे सर्व नातेवाईक, तुमच्याकडील जेवढी माणसे असतील त्यांना काय काय पाहिजे, त्याची यादी करून द्या ! मी सर्वांच्या इच्छा पूर्ण करीन.''

फाटके कपडे घातलेल्या नरसी मेहताचे हे उद्‌गार ऐकून राजाला आश्चर्य वाटले. त्याने नरसी मेहताची खोड जिरवायची ठरविले.

राजाने एका कारकूनाला ताबडतोब दरबारात बसविले व ज्यांना जे जे हवे त्या सर्वांची यादी करावयास सांगितले.

नरसी मेहता म्हणाला, ''ज्याला जे हवे ते मागावे'' व कारकूनाला सांगितले, ''सर्वांची नीट यादी तयार कर !''

सोने, चांदी, हत्ती, घोडे, हिरे, माणिक, रेशमी वस्त्रे अशा प्रकारे हजारो वस्तूंची नांवे लिहून कारकून थकून गेला. नरसी मेहता किती गरीब आहे हे त्याला चांगले माहीत होते. राजासहित सर्व दरबारी नरसी मेहताची चेष्टा करत आहेत, हेही त्याला चांगले माहीत होते. हजारो माणसांची नांवे व त्यांच्या मागण्या लिहून तो अगदी मेटाकुटीला

आला होता. अनेक तासांनंतर हे लिखाणाचे काम संपले. खूप मोठी यादी तयार झाली. शेवटी नरसी मेहताने त्या कारकूनाला विचारले--

''तुला काय पाहिजे ! ते पण तू लिही !''

यावर तो वैतागलेला कारकून म्हणाला,

''एक मोठा दगड आणून माझ्या डोक्यात घाल !''

कारकूनाला नरसी मेहताच्या घरची सर्व परिस्थिती माहीत होती. यादी लिहितांना तो सारखा मनात म्हणत होता, ''सगळ्यांची करमणूक होत आहे, माझा मात्र लिहून लिहून जीव मेटाकुटीला आला आहे'' व म्हणून त्याने ''एखादा मोठा दगड आणून माझ्या डोक्यात घाल !'' असे सांगितले. परंतु त्याला कोठे माहीत होते की, तो कल्पवृक्षाखाली बसलेला आहे !

नरसी मेहता झोपडीत राहत होते, दारिद्र्यात राहत होते, आपले प्रारब्ध भोगत होते परंतु, ते **''कल्पवृक्ष होते !''**

दुसऱ्या दिवशी यादीतील हत्ती, घोड्यांसहित सर्व वस्तू घेऊन राजवाड्यासमोर अनेक माणसे आली. या माणसांच्या प्रमुखाने यादीतील प्रत्येकाचे नांव वाचून प्रत्येकाला त्याचे मानपान दिले. सर्वात शेवटी एक मोठा पेटारा आणला गेला. या पेटाऱ्यात खूप मोठा दगड होता. आलेल्या त्या माणसांच्या प्रमुखाने कारकूनाचे नाव पुकारले व कारकून पुढे येताच आपल्या सेवकांना कित्येक टन वजनाचा दगड कारकूनाच्या डोक्यावर ठेवण्यास सांगितले. तेव्हा कारकून गयावया करू लागला. कल्पवृक्षाच्या तळवटी बसून दगड मागितला म्हणून दुःख करू लागला. शेवटी नरसी मेहताने मध्यस्थी केली म्हणून तो दैवी शिक्षेपासून वाचला. शेवटी राजालाही कबूल केल्याप्रमाणे आपल्या मुलाचे लग्न

नरसी मेहताच्या मुलीबरोबर लावावे लागले.

या कथेवरून बराच बोध आपल्याला मिळतो.

नरसी मेहतांना अंतरंगातील खजिना प्राप्त झाला होता, तरीपण ते दारिद्र्यात राहत होते. आपल्या अंतरंगातील खजिन्याचा त्यांनी कधीही दुरूपयोग केला नाही. परंतु अंतरंगातील खजिना किती भव्य दिव्य असू शकतो याचे हे उत्तम उदाहरण आहे. मुलीच्या लग्नाच्या निमित्ताने राजा व त्याचे सर्व दरबारी यांचा उद्धार नरसी मेहता यांच्या हातून होणार होता म्हणूनच एवढा मोठा चमत्कार ईश्वरीशक्तीने केला.

अंतरंगातील खजिना प्राप्त झाल्यानंतर हत्ती, घोड्यापासून सोने, चांदी माणसांपर्यंत काहीही निर्माण करता येते, हेच यावरून सिद्ध होत नाही काय ?

सर्वच सिद्धपुरुषांना अंतरंगातील खजिना प्राप्त झालेला असतो, परंतु ते त्याचे प्रदर्शन कधीही करीत नाहीत. परंतु जर कधी अत्यंत गरज पडली तर त्या खजिन्यातील एक-दोन कण बाहेर येतील अशी व्यवस्था सिद्धपुरुष करून ठेवतात. अशा गरजेच्या वेळी त्यांना संकल्प अथवा प्रार्थनाही करावी लागत नाही. सर्व गोष्टी आपोआप घडून येत असतात. या विषयाची तीन उदाहरणे पुढे देत आहे.

**श्रीस्वामी समर्थ**

चार-पाचशे लोकांबरोबर अक्कलकोट स्वामी प्रवास करत होते. दुपारची वेळ होती. सगळ्यांना प्रचंड भूक लागलेली होती. इतक्यात,

माळरानात एके ठिकाणी खूप मोठा मांडव घातलेला लोकांनी

पाहिला. त्या मांडवातून एक म्हातारी बाई बाहेर आली व स्वामी समर्थांसहित सर्वांना जोरजोराने हाका मारून बोलावू लागली. सर्वजण तेथे गेले, त्या मांडवामध्ये सर्वांच्या जेवणाची व्यवस्था केलेली होती.

अशा प्रकारे अंतरंगातील खजिन्याने आपला चमत्कार दाखविला. वातावरणातील देव-देवता सिद्धपुरुषांची सेवा करण्यास तत्पर असतात.

## संत दामाजी पंत

दामाजी पंत हे मंगळवेढ्यास मामलेदार होते. दुष्काळात त्यांनी बादशहाचा खजिना गरीब जनतेला वाटून टाकला. बादशहाने खजिना घेऊन ताबडतोब दरबारात हजर व्हावे म्हणून हुकूम पाठविला व पाठोपाठ दोन शिपाई त्यांना धरून आणण्यास पाठविले.

इतक्यात दरबारात एक मनुष्य आला. त्याने आपले नाव विठू असे सांगितले व तुमच्या निरोपाप्रमाणे दामाजी पंतानी सर्व खजिना घेऊन मला पाठविले आहे असे सांगून बादशहाची सर्व रक्कम बादशहाला दिली.

बादशहाने ताबडतोब एक घोडेस्वार दामाजी पंतांकडे रवाना केला व रक्कम पोहोचल्याचे कळविले.

**माणसांचे अंतर्मन परमेश्वर स्वरूप असते. या अंतर्मनात अनेक दैवी शक्ती सुप्तरूपाने राहत असतात. या सुप्तशक्तींचा विकास घडविणे म्हणजे योग ! यासाठी विचार विजय, कल्पना विजय या गोष्टी साध्य करून मन निर्विकल्प बनवावे लागते. जसजसे मन निर्विचार, निर्विकल्प होत जाईल तसतसा अंतरंगातील खजिना दृग्गोचर होत जातो. वातावरणातील देवताही आपली काळजी घेऊ लागतात.**

## देव मामलेदार

देव मामलेदार यांना दामाजी पंत यांचा अवतार मानले जाते. त्यांनी इंग्रजांचा खजिना दुष्काळामध्ये गोर-गरिबांना वाटून टाकला. इंग्रज कलेक्टरने अचानक देवमामलेदारांच्या ऑफिसला भेट दिली व मला आत्ताच्या आत्ता खजिना चेक करायचा आहे म्हणून सांगितले.

इंग्रज कलेक्टरने स्वतःच्या हाताने तिजोरी उघडली. तिजोरी पैशाने पूर्ण भरलेली होती. कलेक्टरने हिशोब तपासले. हिशोबामध्ये जेवढी रक्कम तिजोरीत आहे असे दाखविले होते, बरोबर तेवढीच रक्कम तिजोरीत होती. एक पैसा जास्त नव्हता अथवा एक पैसा कमी नव्हता. हा चमत्कार कुठलीही प्रार्थना अथवा संकल्प न करता झालेला होता.

आपल्या अंतरंगात अनेक दैवीशक्तींचा खजिना असतोच पण त्याचबरोबर या अंतरंगाचे एक टोक ईश्वराशी जोडलेले असते हेही या कथांवरून सिद्ध होते. आपण फक्त आपल्या अंतरंगात प्रवेश प्राप्त करावयाचा असतो.

एकदा का अंतरंगाचा दरवाजा उघडला व त्यात आपल्याला प्रवेश प्राप्त झाला की, लोहचुंबकाप्रमाणे ईश्वरच आपल्याला खेचू लागतो व हळूहळू आपण ईश्वरात विलीन होऊन जातो.

## साधना

मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ ते ६ या पुस्तकांमध्ये मी ज्या काही साधना सांगितल्या आहेत, त्यातील कुठल्याही एक-दोन साधना करून अंतरंगातील खजिन्यामध्ये तुम्हाला डोकावता येईल. परंतु या खजिन्याचा दरवाजा उघडण्यासाठी काही गोष्टी तुमच्यामध्ये असणे आवश्यक असते, त्या गोष्टी कोठल्या हे थोडक्यात पाहू !

१) कधीही नकारात्मक (negative) विचार मनांत येता कामा नये.

२) अमूक एक गोष्ट मला शक्य होणार नाही असे वाटता कामा नये.

३) शांती, आनंद व उत्साह निर्माण करतील, असेच विचार मनात सतत घोळवावे.

४) सदैव परोपकार करत राहावे, इतरांना मदत करत राहावे.

५) प्रत्येक शरीरात अणूप्रमाण परमेश्वराचे अस्तित्व असते याची जाणीव ठेवून कोणाचाही शारीरिक अथवा मानसिक छळ करू नये. एखाद्याचा शारीरिक अथवा मानसिक छळ केला असता त्याची शिक्षा हजारो वर्षे भोगावी लागते याची जाणीव ठेवावी.

६) सर्वांना आनंद देत जगावे व आनंदासाठी जगावे.

७) स्वार्थी माणसाला परमेश्वराच्या दरबारात स्थान नाही, अशा माणसाला अंतरंगातील खजिन्याचे दर्शन होत नाही.

८) एखाद्या प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाची सेवा करून प्रथम प्रारब्ध शुद्ध करावे म्हणजे अंतरंगात प्रवेश प्राप्त करणे सुकर होते.

९) ईर्षा, मत्सर, द्वेष करणाऱ्या माणसाला कधीही अंतरंगात प्रवेश प्राप्त होत नाही.

१०) आत एक व बाहेर एक अशा पद्धतिने वागणाऱ्यांना, कंजूष, लबाड, ढोंगी अशा लोकांना अंतरंगातील खजिन्याचे दर्शन होत नाही.

११) संपूर्ण आयुष्यात तुम्ही एखाद्याला जरी फसविले असेल किंवा एखाद्या व्यक्तीचा जरी गैरफायदा घेतला असेल तरी अंतरंगातील खजिना प्राप्त होण्यास अनेक अडथळे निर्माण होतात.

१२) एखाद्या सत्पुरुषाची सेवा करून या जन्मींची व पूर्वजन्मातील कर्मांची शुद्धी करावी म्हणजे मार्ग सापडतो.

१३) ज्याचे चित्त पश्चात्तापाने, गुरुसेवेने, ईश्वरभक्तीने शुद्ध झाले आहे अशा माणसालाच अंतरंगात प्रवेश प्राप्त होतो व त्याचे जीवन परमानंदाने भरून जाते.

१४) **दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, मानवता** हे गुण अंगी बाणले असता परमेश्वराच्या साम्राज्यात प्रवेश प्राप्त होतो.

१५) साधना करतांना कसलीही अपेक्षा न करता साधना करावी म्हणजे दिव्य ज्ञानाची प्राप्ती होते.

१६) साधनेने देह शुद्ध झाल्यानंतर मन एकाग्र होऊ लागते. मनात धरलेल्या इच्छा पूर्ण होऊ लागतात. श्वास आज्ञाचक्रातून सहस्त्रारचक्राकडे जाऊ लागतो.

१७) ध्यानामध्ये देवी-देवतांची दर्शने होतात. चिदाकाशात प्रवेश प्राप्त होतो.

१८) आध्यात्मिक योग्यता जसजशी वाढत जाईल तसतसे विविध अधिकार प्राप्त होऊ लागतात. या अधिकाराच्या मर्यादेच्या कक्षेत राहूनच सर्व कार्य करावे लागते.

१९) ईश्वराला आवडेल असेच वागावे लागते. देह अहंता गेली आहे की नाही हे पाहण्यासाठी ईश्वर मनाविरुद्ध गोष्टी करावयास लावतो. अशावेळी आनंदाने ईश्वरसेवा म्हणून मनाविरुद्ध गोष्टी केल्यास देह अहंतेचा नाश होतो व अंगी देवत्व प्रकट होऊ लागते.

२०) प्रकाशमार्गाच्या साधना आपोआप समजू लागतात. इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती प्राप्त होतात. प्रकाशब्रह्माचा साक्षात्कार होतो.

२१) हळूहळू साधक परब्रह्माशी तादात्म्य पावतो व जीवनमुक्त होतो.

# ३. सूक्ष्मदेहातील गूढ रहस्ये

कल्पना करा की, कोठेतरी अरण्यामध्ये तुमचे घर आहे. जवळपास चार-पाच किलोमीटर परिसरात कोणाचीही वस्ती नाही. तुम्ही एकान्तात आनंदात राहत आहात, अशी बरीच वर्षे गेली, नंतर तुम्ही एक पॉवरफुल रेडिओ आणला.

आता तुम्हाला रेडिओवरील संगीताचा आनंद मिळू लागला. रेडिओवर हजारो स्टेशन्स होती. तुम्हाला पाहिजे ते स्टेशन लावून तुम्हाला हवे ते संगीत तुम्ही ऐकू लागला. शेकडो भाषातील हजारो संगीताचे प्रकार तुम्ही ऐकू लागला. अशीच काही वर्षे गेली.

एक दिवस तुम्ही एक पॉवरफुल टी.व्ही. सेट घेऊन आलात. या पॉवरफुल टी. व्ही. सेटबरोबर एक अत्यंत पॉवरफुल ॲन्टीना होता. हा ॲन्टीना घरावर बसवल्याबरोबर तुमच्या टी. व्ही. वर शेकडो कार्यक्रम दिसू लागले. कुठे हाणामारी चालली आहे, तर कुठे हॉरर शो चालू आहे. असे शेकडो कार्यक्रम तुम्ही घरबसल्या पाहू लागला. जगात कोठे काय चालले आहे हे तुम्ही घरबसल्या पाहू लागला.

येथे जमेची बाजू अशी आहे की, रेडिओ आणि टी.व्ही. यांचा वापर करतांना मनुष्य त्याला हवा असेल तेव्हाच रेडिओ किंवा टी.व्ही. लावतो व नको असेल तेव्हा बंद करतो. परंतु रेडिओ किंवा टी.व्ही.

लावण्याचे किंवा बंद करण्याचे स्वातंत्र्य जर त्याला नसेल तर हेच रेडिओ, टी.व्ही. दुःख देणारे साधन ठरतील.

विचार करा, आत्मा अमर आहे, त्याला मृत्यू नाही, तो झोप घेत नाही, त्याच्यासमोर चोवीस तास रेडिओ, टी.व्ही. जर चालू राहिले तर त्याची अवस्था काय होईल. नक्कीच त्याची अवस्था वेड्यासारखी होईल.

वरील सर्व मजकूर मी अशाकरिता लिहिला आहे की, भारतातील लाखो लोक गेल्या शेकडो वर्षांपासून अतिशय चुकीच्या पद्धतिने साधना, भक्ती करीत आहेत.

मानवी शरीर हे रेडिओ, टी.व्ही प्रमाणे अतिशय संवेदनशील यंत्र असून या देहामध्ये लाखो सेंटर्स अशी आहेत की, ती जागृत झाल्यानंतर मानवाला विविध प्रकारची दृश्ये दिसू लागतात, भ्रम निर्माण होतात. विविध प्रकारच्या सिद्धी मिळतात, पण हे सर्व अंती क्लेशकारक असते. कारण एकदा का, सेंटर्स जागृत झाली की, मग ती बंद करता येत नाहीत. कोणीतरी अधिकारी पुरुषच ती बंद करू शकतो. भारतातील असंख्य लोकांना तसेच साधूंनाही कशी भक्ती करावी किंवा कशी साधना करावी याचे काडीचेही ज्ञान नसते. काहीतरी वेडीवाकडी साधना करून ते स्वतःची व इतरांची अधोगती करत असतात.

मानवी देहात कशी सेंटर्स असतात व तेथे कोठल्या शक्ती वास करतात हे सोबतच्या चित्रात दाखविले आहे, ते नीट पाहून साधना करणाऱ्या लोकांनी योग्य ती सावधगिरी बाळगावी व आपल्या देहातील तामस शक्तींची केन्द्रे जागृत होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

मानवाच्या सूक्ष्म शरीरामध्ये **पिण्डी ते ब्रह्माण्डी** या न्यायाप्रमाणे पिशाच्चांपासून परमेश्वरापर्यंत कुठली सेंटर्स कुठे आहेत हे

सोबतच्या चित्रामध्ये दाखविले आहे. यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, मनुष्याला योग्य मार्गदर्शक भेटल्यास, तसेच माणसाने योग्य प्रयत्न केल्यास, कठोर शिस्तीचे व नियमांचे पालन केल्यास, तो परमेश्वरापर्यंत पोहोचू शकतो. प्रकाशमय मार्गाचे अनुसरण करून परमानंदमय अशा महाशून्यात विहार करू शकतो व असे न केल्यास ईर्षा, द्वेष, मत्सर, स्वार्थ इत्यादी दुष्प्रवृत्तींच्या आधीन होऊन राहिल्यास, पिशाच्चलोकात प्रवेश होतो आणि खून, दरोडे, गुंडगिरी, आतंकवाद अशी कृत्ये केल्यास माणसांचे रुपांतर सैतानामध्ये, राक्षसामध्ये होते व कोट्यावधी वर्षे अशी माणसे भयानक अंधःकारमय लोकात यातना भोगत राहतात.

येथे आणखी एक रहस्य सांगणे आवश्यक आहे,

''**मनुष्य आपल्या सत्कर्माने, प्रेम, परोपकार व ईश्वरभक्तीने, सतत आनंद, प्रसन्नता, शांती यांचेच चिंतन करून व प्रकाशमार्गी गुरुच्या आज्ञांचे पालन करून स्वतःच्या पूर्ण शरीराला प्रकाशमय, परब्रह्ममय, परमेश्वरमय बनवू शकतो.**''

''सतत कुढत राहून, सतत इतरांचे दोष पाहून, स्वार्थी विचार करून, ईर्षा, द्वेष, मत्सर करून, लांड्या लबाड्या करून, प्रकाशमार्गी सत्पुरुषांची निंदा करून, लोकांना उल्लू बनवून, ढोंगीपणा करून मनुष्य आपल्या सूक्ष्मशरीराला पायापासून डोक्यापर्यंत काजळासारखे काळे बनवून टाकतो व मृत्यूनंतर पिशाच्चलोकात निवास करतो.''

''गुंडगिरी, सूडाची भावना, दीर्घद्वेष, दीर्घमत्सर, खून, कपट, कारस्थाने, आतंकवाद, गुन्हेगारी प्रवृत्ती या गोष्टींनी मनुष्य जिवंत पिशाच्च किंवा जिवंत राक्षस बनतो व मृत्यूनंतर भयानक अंधःकारमय अशा लोकामध्ये लाखो वर्षे यातना भोगत राहतो. सत्तेचा दुरूपयोग करणारे व जनता जनार्दनाला पीडा देणारे सत्ताधारीही मृत्यूनंतर राक्षस लोकात

जातात.''

''स्मशान साधना करणारे साधू, अघोरी व कापालिक साधू, चेटूक विद्येने व पिशाच्चविद्येने इतरांचे वाईट करणारे साधू मृत्यूनंतर राक्षस लोकात जातात.''

हे लिहितांना कुठल्याही साधूला मी नांवे ठेवत नसून जे सत्य आहे ते लिहित आहे. अर्थात हेही लक्षात घेतले पाहिजे की, काही प्रकाशमार्गी ज्ञानी साधूसुद्धा लोकांचा उपद्रव टाळण्यासाठी स्मशानात राहतात किंवा वेड्यासारखे वागतात. त्यांच्याकरिता स्मशान व राजमहाल या दोन्ही गोष्टी सारख्याच असतात. त्यांना अद्वैतावस्था प्राप्त झालेली असते.

आजकालच्या साधू लोकांना साधना कशी करावी हेही समजत नाही. ते स्मशानात राहतात व वेड्यावाकड्या काहीतरी साधना करतात व मृत्यूनंतर राक्षस लोकात जातात. हे सर्व त्यांच्याकरिताच लिहिलेले आहे.

### भयानक अंधःकारमय लोक

सूक्ष्मशरीराच्या पायापासून गुडघ्यापर्यंतच्या भागामध्ये भयानक अंधःकारमय लोकांची सेंटर्स असतात. आतंकवाद, खून करणाऱ्यांपासून आसुरी साधना करणाऱ्यांपर्यंत सगळे लोक मृत्यूनंतर या लोकात राहतात.

वस्तुतः मनुष्य जन्म हा प्रगती करण्यासाठी आहे, उच्च लोकात जाण्यासाठी आहे परंतु अत्यंत वाईट कर्मे करणाऱ्यांची, या पाताळ लोकातील केन्द्रे जागृत झालेली असतात. त्यामुळे वातावरणातील राक्षसी आत्मे अशा लोकांच्या मानगुटीवर बसलेले असतात. यावर

विजय मिळविण्यासाठीच परमेश्वराने यांना मानव जन्म दिलेला असतो. परंतु मानव जन्माचा दुरूपयोग यांच्याकडून होतो व मृत्यूनंतर हे पुन्हा राक्षस लोकातच खेचले जातात. वस्तुतः स्वतःच्या अंतरंगात राहणाऱ्या राक्षसी प्रवृत्तींबरोबर विवेकाने युद्ध करून अंतरंगातील राक्षसांना मारून ईश्वरभक्तीने प्रगती साध्य करण्यासाठी ईश्वराने त्यांना मानवजन्म दिलेला असतो. परंतु हे लोक वाईट मार्गाने जातात व मृत्यूनंतर कोट्यावधी वर्षे यातना भोगत गडद अंधःकारमय लोकात राहतात.

आतंकवादी माणसापेक्षाही प्रेताचे मांस खाऊन चेटूक विद्या, अघोरी विद्या, कापालिक विद्या साध्य करणाऱ्यांची भयंकर दुर्गती होते, त्याविषयी काही न लिहिलेले बरे !

## पिशाच्च लोक

हा लोक अंधःकारमय असतो परंतु येथील अंधःकार राखाडी (Grey) रंगाचा असतो. मानवाच्या सूक्ष्मशरीरामध्ये गुडघ्यापासून मांड्यांपर्यंतच्या भागामध्ये याची सेंटर्स असतात. यातील सेंटर्स जागृत असल्यास मनुष्य ईर्षा, द्वेष, मत्सर, कपट, कारस्थान, लबाड्या, ढोंगीपणा, स्वार्थी, कंजूष, दुष्ट असा असतो. हजारातील नऊशे नव्याण्णव माणसे मृत्यूनंतर या लोकात खेचली जातात. पण जर काही ईश्वरभक्ती, दान, पुण्य केले असेल तर पुन्हा पुन्हा मनुष्य जन्म देऊन सुधारण्याची संधी त्यांना दिली जाते. संकुचित वृत्तीची माणसे, लबाड्या, फसवणूक करणारी माणसे, गुंड, मवाली, ठग, स्वार्थी माणसे, सर्व मृत्यूनंतर या लोकात येऊन राहतात.

जे सज्जन आहेत परंतु अहंकारी आहेत, डॉमिनेटींग स्वभावाचे आहेत, (हट्टी प्रवृत्तीचे, इतरांनी आपले ऐकावे असा आग्रह धरणारे, आपले तेच खरे करणारे) प्रकाशमार्गी गुरु मिळूनसुद्धा जे लोक त्याचे न

ऐकता त्याला आपल्या इच्छेप्रमाणे वागवू पाहणारे असतात अशा सर्व लोकांना मृत्यूनंतर या पिशाच्च लोकात यावे लागते व येथे त्यांना विविध प्रकारचे त्रास भोगावे लागतात. यांनी जर थोडे फार दान व ईश्वरभक्ती केली असेल, तर या पिशाच्च लोकातून त्यांची लवकर सुटका होते.

प्लॅन्चेट करणारे, कर्ण-पिशाच्च, शाकिनी, डाकिनी, हाकिनी, यक्षिणी, वेताळसिद्धी या सर्वांची सेंटर्स गुडघ्याच्या आसपास आहेत. या विद्या साध्य करणारे लोक मृत्यूनंतर अंधःकारमय अशा या पिशाच्च लोकात येऊन राहतात.

## अर्ध देवता लोक

प्रकाशमार्गी गुरु मिळूनही त्याने केलेला कल्याणकारी उपदेश न ऐकता त्याच्याशी आत एक व बाहेर एक अशा पद्धतिने वागल्यास **अर्ध देवता** या अवस्थेला आत्मा जातो.

प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाची भेट होऊन त्याच्यावर स्वार्थी बुद्धीने थोडेफार प्रेम करून नंतर त्याची निंदा केल्यास **क्षुद्र देवता** या अवस्थेला आत्मा जातो. असे लोक अहंकारी असतात व अहंकाराने आपल्या गुरुविषयी वेडे वाकडे विचार करतात.

एखाद्या प्रकाशमार्गी गुरुकडे तुम्ही जाऊ नका, असे सांगून लोकांना प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाकडे जाण्यापासून जे परावृत्त करतात, असे लोकही मृत्यूनंतर क्षुद्र देवता या अवस्थेला जाऊन पोहोचतात. क्षुद्र देवता ही अवस्था अत्यंत भयंकर असून यांचे डोळे रक्तासारखे लाल असतात. यांच्या डोळ्यासमोर सतत रक्तासारखा लाल रंग दिसत असतो व तो त्यांना भाजत असतो. असे आत्मे शिळांमध्ये किंवा कातळांमध्ये राहतात व खूप यातना भोगतात. शेकडो वर्षे अशा यातना भोगल्यानंतर एखाद्या सत्पुरुषाचा चरणस्पर्श त्यांना प्राप्त होतो. हा

चरणस्पर्श प्राप्त झाल्यानंतर शेकडो वर्षांनी त्यांचा उद्धार होतो.

अर्ध देवता या बहुत करून वृक्षांमध्ये निवास करतात. बऱ्याच वेळा साधकांना हे लोक मदत करून सत्पुरुषाच्या निंदेचे केलेले पाप धुण्याचा प्रयत्न करतात.

अधिकार नसतांना जे लोक दुसऱ्याला उपदेश करतात, आपण एखाद्या सत्पुरुषाचे किंवा देवाचे अवतार आहोत असे भासवितात, थोडीफार ईश्वरभक्ती असूनही जे आध्यात्मिक मार्गात प्रगती न करता रूढी व परंपरा यांना चिकटून राहतात, सज्जन असूनही प्रगतीचा विचार न करता बुद्धीचा दुरूपयोग करतात असे सर्व लोक अर्ध देवता किंवा क्षुद्र देवता या अवस्थेला मृत्यूनंतर जातात.

सूक्ष्मशरीरामध्ये कमरेच्या खालच्या प्रान्तामध्ये क्षुद्र देवता व अर्ध देवता यांची सेंटर्स असतात. ही सेंटर्स थोडीफार जागृत झाल्यास अर्ध देवता किंवा क्षुद्र देवता या अवस्थेला माणूस जातो. असे लोक सज्जन परंतु धूर्त, कावेबाज, आत एक बाहेर एक, स्वार्थी, स्वतःच्या स्वार्थासाठी साधूचा वापर करणारे असतात.

## देवतांचा प्रदेश

मूलाधार चक्रापासून प्रकाशमय मार्गाची सुरुवात होते. सूक्ष्म-शरीरामध्ये ओटीपोटापासून हा भाग सुरू होतो. देव या शब्दाचा अर्थच मुळी प्रकाश ! येथून ॐकाराची सुरुवात होते. हा प्रान्त गुलाबी रंगाचा असतो.

अत्यंत भक्तीमान, अत्यंत सज्जन, मनाने सरळ, सद्गुणी, पराकोटीचे सज्जन, परोपकारी, नामस्मरण करणारे, स्तोत्रांचे पाठ करणारे, जप करणारे अशा लोकांचा या प्रान्तात निवास असतो.

याच प्रान्तामध्ये सुरुवातीला गणपतीचे आधिपत्य असते, तर

या प्रान्ताच्या शेवटी ब्रह्मदेवाचे आधिपत्य असते, शरीरातील मूलाधार व स्वाधिष्ठान ही दोन चक्रे या प्रान्तात येतात. कुंडलिनी ही येथेच असते.

प्रेम, परोपकार, इतरांना मदत करण्याची वृत्ती, इतरांना आनंद देण्याचा स्वभाव असे लोक या प्रान्तात येऊन राहतात व परमानंदाचा अनुभव घेतात.

सात्त्विक वृत्तीने उपासना करणारे साधू, भक्तीमार्गी साधू, इतरांच्या कल्याणासाठी झटणारे साधू, एकान्तवासात राहून ध्यान करणारे साधू, तीर्थक्षेत्रात राहून सात्त्विक मार्गाने भक्ती करणारे साधक मृत्यूनंतर या लोकात येऊन राहतात. गणपती, ब्रह्मा, सरस्वती, गायत्री अशा अनेक देवता या प्रान्तात राहतात.

### सूर्यलोक

आपल्या नाभीप्रदेशापासून पोटापर्यंतच्या प्रान्ताला सूर्यलोक असे म्हणतात. हा प्रान्त सोनेरी पिवळ्या रंगाचा असून परमानंददायक आहे. नाभीस्थानी मणिपूरचक्र असून याला सूर्यचक्र असेही म्हणतात. अत्यंत सद्गुणी व भक्तिमान अशा लोकांचा या प्रान्तात मृत्यूनंतर प्रवेश होतो. ज्या सात्त्विक साधकांना भक्ती करतांना प्रकाशब्रह्माचा साक्षात्कार होतो असे साधक मृत्यूनंतर येथे राहतात.

या प्रान्तामध्ये, शेषशायी महाविष्णू-महालक्ष्मी, गरुड, हनुमंतासहित मणिपूरचक्राच्या पाठीमागच्या भागात राहतात. ही सर्व दैवी शक्तींची केन्द्रे असून येथे असंख्य विद्या प्राप्त होतात. काही साधक या विद्या प्राप्त करतात तर काही साधक ही केन्द्रे जागृत न करता पुढे प्रवास करतात.मणिपूरचक्राच्या ठिकाणी भगवान् विष्णू-लक्ष्मी व प्रखर तेजोमय सूर्यनारायण यांची केन्द्रे आहेत. येथे हजारो भक्तांचे कल्याण करण्याचे सामर्थ्य योग्यांना तसेच सद्भक्तांना प्राप्त होते. दया,

## ✻ चक्रे ✻

| क्र. | चक्राचे नांव | स्थान | देवता | पाकळ्या | बीजाक्षरे |
|---|---|---|---|---|---|
| १. | मूलाधार | शिवण | गजानन | चार | वं शं षं सं |
| २ | स्वाधिष्ठान | लिंग | हंसब्रह्मा | सहा | बं भं मं यं रं लं |
| ३ | मणिपूर | नाभि | विष्णू | दहा | डं ते फं |
| ४ | अनाहत | हृदय | महेश | बारा | कं ते ठं |
| ५ | विशुद्ध | कंठ | अष्टादश भुजादुर्गा | सोळा | अं ते अः |
| ६ | आज्ञा | भ्रूमध्य | अर्धनारी ईश्वर | दोन | हं क्षं |
| ७ | सहस्त्रार | मस्तक | परमेश्वर | असंख्य | असंख्य |

**ललना चक्र, मन:चक्र व सोमचक्र ही उपचक्रे असल्याने मुख्य चक्रांमध्ये त्यांचा समावेश केला जात नाही.**

क्षमा, शांती, करूणा, अहिंसा, प्रेम, परोपकार, इतरांना आनंद देण्याचा स्वभाव, अखंड ईश्वराचे नामस्मरण, सोऽहम् ध्यान करणाऱ्या माणसांचा या लोकात प्रवेश होतो. येथे प्रकाश ब्रह्माचा साक्षात्कार होतो व प्रचंड तेज साधकाच्या डोळ्याला दिसू लागते. ध्यानामध्ये चिदाकाशात प्रवेश होतो. जीवन परमानंददायी होते. मनात धरलेली प्रत्येक इच्छा पूर्ण होते.

## शिव-शक्ती लोक

हृदयाच्या आसपासच्या प्रदेशापासून छातीपर्यंतच्या प्रान्ताला शिव-शक्तीचा प्रान्त असे म्हणतात. हृदयामध्ये अनाहतचक्र असते. येथेच शिव-शक्तीचा निवास असतो. हा प्रान्त आकाशी निळ्या रंगाचा असतो. येथे नील ब्रह्माचा साक्षात्कार होतो. ध्यानामध्ये नीळा रंग साधकाला दिसू लागतो.

ध्यानमार्गामध्ये बरीच प्रगती झाल्यानंतरच अत्यंत प्रेमळ व नम्र अशा साधकांना येथे प्रवेश प्राप्त होतो. जन्मोजन्मींचे सर्व प्रारब्ध पूर्ण शुद्ध झाल्याशिवाय या प्रान्तात प्रवेश प्राप्त होत नाही.

पृथ्वीतलावर जी माणसे अत्यंत आनंदात व समाधानात राहून इतरांचे कल्याण करत असतात, एकही वाईट विचार ज्यांच्या मनात येत नाही, ज्यांचा देह स्फटिकाप्रमाणे अत्यंत शुद्ध आहे, इतरांच्या कल्याणासाठी जे झटत असतात, जे आकाशाचे ध्यान करतात, चिदाकाशामध्ये ज्यांचा प्रवेश झालेला आहे, ध्यानामध्ये ज्यांना काळ-वेळाचे भान राहत नाही, ध्यानामध्ये ज्यांना ऋषी, योगी, सिद्ध यांची दर्शने होतात, ज्यांना कानामध्ये अनाहतनाद ऐकू येतात, ॐकार नाद, शंख, घंटा, वीणा, बासरी असे नाद ऐकू येतात, ज्यांनी प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाची सेवा करून त्यांची कृपा प्राप्त केलेली आहे, आयुष्यात ज्यांनी कधीही

कोणालाही फसविलेले नाही अशा माणसांचा या लोकात प्रवेश होतो.

## शून्य लोक

छातीच्या वरच्या भागापासून हळूहळू शून्य लोकाची सुरुवात होते. कंठामध्ये विशुद्ध चक्र असते. येथे नवदुर्गा देवीचा निवास असतो. येथे साधकाला नऊ प्रकारच्या शक्ती प्राप्त होतात म्हणून या स्थानाला नवदुर्गादेवी असे म्हटले जाते. येथे नऊ मिति पूर्ण होतात व साधक शून्य लोकात प्रवेश करतो. येथे साधकाला **परमात्मा** ही स्टेज प्राप्त होते. आज्ञाचक्रामध्ये हे स्थान आहे.

गणपती लोकापासून शिव-शक्ती लोकापर्यंत प्रवास करणाऱ्या आत्म्याला **महात्मा** म्हटले जाते व नवदुर्गा ही स्टेज पार केल्यानंतर **परमात्मा** अवस्था प्राप्त होते. येथे साधक **जीवनमुक्त** होतो.

विशुद्ध चक्राच्या प्रान्तामध्ये अक्षरब्रह्माचा साक्षात्कार होतो. अनेक विद्या प्राप्त होतात. तेथून जवळच निरक्षर ब्रह्म असा प्रान्त लागतो व येथून शून्याचा प्रान्त सुरू होतो.

शून्याचा प्रान्त अत्यंत आल्हाददायक असतो. कोटी सूर्यांचा प्रकाश असतो,परंतु तो प्रकाश अत्यंत शीतल असतो.

परमहंस अवस्थेतील असंख्य योगी येथे भेटतात, येथे साधकाला परमहंस ही स्टेज प्राप्त होते, येथे साधक **जीवनमुक्त** होतो. येथे साधकाला **आत्मज्ञान** व **ब्रह्मज्ञान** होते.

## महाशून्य लोक

कूटस्थ (भ्रूमध्य) येथे शून्य लोक संपतो. येथे एक ज्योति असून त्या ज्योतिमध्ये अनेक रंग दिसून येतात. ही ज्योति निर्गुण, निराकार आहे. ही ज्योति जेव्हा पुरुषाच्या शरीरात असते तेव्हा मन-

बुद्धीला मी पुरुष आहे असे वाटते व जेव्हा स्त्रीच्या शरीरात असते तेव्हा मन-बुद्धीला मी स्त्री आहे असे वाटते. स्थूलशरीर व सूक्ष्मशरीरापर्यंत स्त्री-पुरुष हा भेद कायम राहतो.

या ज्योतिपर्यंत पोहोचल्यानंतर तो आत्मज्ञानी होतो, ब्रह्मज्ञानी होतो, शून्य होतो, स्वरुपाकार होतो, येथे स्त्री-पुरुष हा भेद मावळतो. **अयमात्मा ब्रह्म** या भावाचा उदय होतो.

**आनंदाचे डोही । आनंद तरंग ।।**

**आनंदचि अंग । आनंदाचे ।।**

अशी परमानंदमय अवस्था प्राप्त होते. पराकोटीची धुंदावस्था प्राप्त होते.

या धुंदावस्थेला पचवून साधक महाशून्यात प्रवेश करतो. येथे त्याला **महासिद्धावस्था** प्राप्त होते. **परब्रह्मावस्था** प्राप्त होते, सर्वातीत अवस्था प्राप्त होते. हा प्रान्त आज्ञाचक्रानंतर सुरू होतो व सहस्त्रारचक्रात संपतो. येथे निर्विकल्प समाधी, सहजसमाधी साध्य होते. योगी परमेश्वरस्वरूप होतो. देहधारी ईश्वर होतो. तो कोठेही असला तरी जगद्कल्याण करत राहतो. देव-देवता त्याची सेवा करतात.

**सारांश**

या अध्यायामध्ये मी जे काही लिहिले आहे ते सर्व यापूर्वीसुद्धा लिहिलेले आहे. तरीसुद्धा येथे पुन्हा लिहिण्याचे कारण असे की,

**''परमेश्वराने तुम्हाला मनुष्य जन्म दिलेला आहे. साधना करून सद्गुणांची जोपासना करून स्वतःची आध्यात्मिक प्रगती करून देव बनणार की, ईर्षा, द्वेष, मत्सर, करून सज्जनांची व**

**प्रकाशमार्गी सत्पुरुषांची निंदा करून पिशाच्च लोकात जाणार?''**

एखाद्या कॉम्प्युटरमध्ये लक्षावधी साईटस् असतात. काही साईटस् ज्ञान देणाऱ्या असतात, काही साईटस् मनोरंजन करणाऱ्या असतात, तर काही साईटस् माहिती देणाऱ्या असतात.

एकेक साईट म्हणजे एक एक विश्व असते. त्या विश्वातही पोट विश्वे असतात. एखाद्या **तटस्थ** माणसाप्रमाणे आपण सर्व पाहत असतो.

ही **स्थितप्रज्ञ** अवस्था प्रथम प्राप्त करावी लागते व नंतर आपल्या मानवी देहात असणाऱ्या लक्षावधी केंद्रांची माहिती घेता येते. त्यातून ज्ञान मिळविता येते. कोठेही न अडकता सर्व प्रकारची माहिती घेऊन, सर्व प्रकारचे ज्ञान मिळवून, सर्व प्रकारचे अनुभव घेऊन सर्वांच्या अतीत राहता येते. असा जो राहू शकतो त्याला सर्वोच्च अवस्था प्राप्त होते. ज्याचे वर्णन शब्दाने करता येत नाही.

सामान्य माणसाने पुढील प्रमाणे अभ्यास करावा,

''जर ईर्षा, द्वेष, मत्सर करत असाल, स्वार्थ, लोभ करत असाल, सज्जनांना नांवे ठेवण्याचे उद्योग करत असाल, आत एक बाहेर एक वागत असाल, फसवणूक करत असाल, तर आपल्या सूक्ष्म-शरीरातील पिशाच्च केन्द्रे जागृत आहेत असे समजावे व या सर्व दुर्गुणांचा त्याग करण्याचा प्रयत्न करावा.''

परोपकार, दान, ईश्वरभक्ती या गोष्टी करत असाल व इतरही अनेक सद्गुण तुमच्यामध्ये असतील तर तुमचा देवलोकात प्रवेश झालेला आहे असे खुशाल समजावे व जास्तीत जास्त साधना करून देवलोकातील वरचे टप्पे गाठावे.

# ४. विराट पुरुष

माणसाला चार देह असतात. हे चार देह पुढील प्रमाणे -

## स्थूलदेह

स्थूलदेह म्हणजे हाडामांसानी बनलेले माणसाचे शरीर ! या शरीरामध्ये पंचमहाभूते असतात. ही पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश.

**पृथ्वीतत्त्व** – माणसाच्या शरीरातील जो कठीण भाग आहे त्याला पृथ्वीतत्त्व म्हणतात.

उदाहरणार्थ - हातापायाची हाडे, डोक्याची कवटी वगैरे.

**आपतत्त्व** – शरीरातील द्रव पदार्थ, रक्त व द्रव-घन पदार्थ, मांस याला आपतत्त्व म्हणतात.

**तेजतत्त्व** – शरीरामध्ये जी उष्णता असते त्या उष्णतेला तेजतत्त्व म्हणतात. हे तेजतत्त्व वाढले की अंगात ताप येतो, तसेच या तेजतत्त्वामुळे भूक लागते.

**वायुतत्त्व** – आपल्या शरीराअंतर्गत जे वायु आहेत त्यांना वायुतत्त्व असे म्हटले जाते. या वायुतत्त्वामध्ये श्वसन, आकुंचन-प्रसरण,

धावन या क्रिया येतात. प्राण, अपान, व्यान, उदान, समान हे पाच मुख्य वायु असून यांची कार्ये पुढील प्रमाणे. प्राण श्वसनाचे कार्य करतो. अपान मलमूत्र विसर्जनाचे कार्य करतो. व्यान सर्व शरीरात व्यापून राहतो. उदान अन्नरसाचे विभाजन करतो. समान अन्नरस सर्व शरीरात पोहोचवितो. हे मुख्य पाच वायु असून यांना पंचप्राण असे म्हणतात.

याशिवाय पाच उपप्राण आहेत. त्यांची नावे– – नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय.

**नाग** – ढेकर निर्माण करतो.

**कूर्म** – डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप करतो.

**कृकल** – शिंक निर्माण करतो, उचकी निर्माण करतो.

**देवदत्त** – जांभई निर्माण करतो.

**धनंजय** – देह मृत झाला असता त्या देहात इतर पिशाच्च आत्म्याने शिरू नये म्हणून त्या देहाचे संरक्षण करत राहतो.

**आकाशतत्त्व** – शरीराअंतर्गत जी पोकळी आहे या पोकळीला आकाशतत्त्व असे म्हणतात. स्थूलदेहाचे वर्णन थोडक्यात हे असे आहे.

## सूक्ष्मदेह

सूक्ष्मदेहामध्ये मन, बुद्धी, चित्त, अहंकार या गोष्टी असतात. सत्कर्मे केलेली असतील, सद्गुण असतील, प्रकाशमार्गीय साधना केलेली असेल, तर सूक्ष्मदेह तेजस्वी असतो. ज्याचा सूक्ष्मदेह तेजस्वी असतो, त्याला देव किंवा महात्मा म्हटले जाते.

दुष्ट माणसांचे सूक्ष्मदेह डांबरासारखे काळे असतात. ज्याचा

सूक्ष्मदेह काळा असतो त्याला भूत, प्रेत, पिशाच्च असे म्हटले जाते.

सूक्ष्मदेह हा स्थूलदेहा एवढ्याच आकाराचा असतो.

## कारणदेह

कारणदेह हा माणसाच्या अंगठ्याएवढा असतो. या कारण-देहामध्ये जन्मोजन्मी केलेल्या सत्कर्मांची अथवा दुष्कर्मांची बीजे साठवलेली असतात.

सज्जन, संत, महात्मा, प्रकाशमार्गीय साधक या सर्वांचे हा रक्षण करतो. तर दुष्ट लोकांना हा युगानुयुगे यातना भोगावयास लावतो.

राज्यकर्ते, सत्ताधारी, अधिकारी, दुष्ट, दुर्जन अशा सर्वांना त्यांच्याच देहात राहणारा हा कारणदेह युगानुयुगे म्हणजे लाखो वर्षे विविध प्रकारच्या यातना भोगावयास लावतो म्हणून म्हणतात ईश्वर तुमच्याच अंतःकरणात राहून पाहत आहे. ''चांगले वागा !''

''कोणासही फसवू नये, कारण जसा तुमच्या शरीरात ईश्वर आहे, तसा त्याच्याही शरीरात ईश्वर आहे. अप्रत्यक्षरित्या आपण ईश्वरालाच फसवत असतो.''

## महाकारणदेह

महाकारण देह हा कधी नीलबिन्दूप्रमाणे दिसतो तर कधी मसुऱ्याच्या दाण्याएवढा प्रकाशमान निळ्या रंगाचा दिसतो. तर कधी गॅस लायटरमधील स्पार्क सारखा दिसतो. यालाच मानवी देहात राहणारा **ईश्वर** असे म्हणतात. हा सदैव पवित्रच असतो. कधीही अपवित्र होत नाही. हा विश्वव्यापी असतो. निर्गुण, निराकार असतो हेच आपले खरे स्वरूप !

आपल्या स्थूलदेहामध्ये चार देह कसे आहेत हे आपण पाहिले. **सूक्ष्मदेह** जो स्थूलदेहात राहून चांगली-वाईट कर्मे करतो व सुख-दुःख भोगतो याला **जीव किंवा जीवात्मा** असे म्हणतात व **महाकारणदेहाला आत्मा, परमात्मा, शिवात्मा, ईश्वर** असे म्हणतात.

आपल्या देहाच्या आत काय आहे यावर विचार केला तर असे आढळून येईल की -

''आपल्या देहामध्ये कोट्यावधी जीव जंतू असतात. प्रत्येक जीव जंतूचे स्वतंत्र कार्य असते. यावर विचार केला तर आपले शरीर म्हणजे एक ब्रह्मांड आहे असे वाटते.''

## विराट पुरुष

जसे आपल्या शरीरात ब्रह्माण्ड आहे असे वाटते तसेच **विराट** हा ईश्वराचा स्थूलदेह असून ईश्वराच्या या **विराट देहात** अनेक ब्रह्माण्डे सामावलेली आहेत. पृथ्वी, सूर्य, ग्रह, नक्षत्रे, असंख्य तारे या विराट देहात येतात. अनेक ग्रहमाला या विराट देहात येतात. थोडक्यात आपल्या स्थूल दृष्टीला तसेच दुर्बिणीतून आपण जे जे काही पाहू शकतो ज्याला त्रिमिती विश्व असे म्हणतात, त्या सर्व गोष्टी म्हणजे परमेश्वराचा विराट देह यालाच मी विराट पुरुष असे म्हटले आहे. ध्यान मार्गाने पाहिले असता एक विराट पुरुष हात पसरून (क्रॉस प्रमाणे) उभा आहे असे सर्व ब्रह्माण्डाच्या पलीकडे गेल्यावर दिसते.

ज्याप्रमाणे माणसाचे चार देह असतात त्याप्रमाणे ईश्वराचेही चार देह असतात.

**१) विराट २) हिरण्यगर्भ ३) अव्याकृत ४) मूलप्रकृति**

विराट देहालाच विराट पुरुष असे मी नांव दिले आहे. समुद्रात

ज्याप्रमाणे असंख्य लहान-मोठे मासे राहतात, त्याप्रमाणे ईश्वराच्या विराट देहामध्ये असंख्य ब्रह्माण्डे गुण्यागोविन्दाने नांदतात. आपले अनंत आकाश हा ईश्वराच्या देहातील एक छोटासा पोकळ भाग असून या पोकळ भागामध्ये असंख्य ग्रह, नक्षत्रे आहेत.

मीन रास व त्याच्या अंतर्गत येणारे सर्व ग्रह, नक्षत्र, तारे विराट पुरुषाच्या आज्ञाचक्राच्या स्थानी येतात.

वृश्चिक रास व त्याच्या अंतर्गत येणारे सर्व ग्रह, नक्षत्र, तारे विराट पुरुषाच्या चरणस्थानी येतात.

मकर व कर्क राशी त्याच्या पोटऱ्या व गुडघ्याच्या भागात येतात. या दोन्ही राशींच्या अंतर्गत येणारे सर्व ग्रह, नक्षत्र, तारे विराट पुरुषाच्या पायापासून गुडघ्यापर्यंतच्या भागात येतात.

वृषभ, मेष व सिंह या राशींच्या अंतर्गत येणारे सर्व ग्रह, नक्षत्र, तारे विराट पुरुषाच्या गुडघ्यापासून कमरेपर्यंतच्या भागात येतात.

तुला, कुंभ व कन्या या राशींच्या अंतर्गत येणारे सर्व ग्रह, नक्षत्र, तारे विराट पुरुषाच्या कमरेपासून छातीपर्यंतच्या भागात येतात.

धनु व मिथुन या दोन राशींच्या अंतर्गत येणारे सर्व ग्रह, नक्षत्र, तारे विराट पुरुषाच्या छातीपासून कपाळापर्यंतच्या भागात येतात.

विराट पुरुषाच्या पायापासून मांड्यापर्यंतच्या भागामध्ये **अंधःकारमय विश्व** असते.

विराट पुरुषाच्या कमरेपासून हळूहळू **प्रकाशमय विश्वाची** सुरुवात होते.

प्रकाशमय विश्वाच्या सुरुवातीला सोन्याप्रमाणे लखलखणारा

प्रचंड प्रकाश दिसून येतो. या प्रचंड प्रकाशाला गुलाबी रंगाची एक किनार असते. विराट पुरुषाच्या कमरेपासून नाभीप्रदेशापर्यंत ही गुलाबी कडा ठळकपणे दिसते. या गुलाबी कडेच्या खाली थोडा लाल व थोडा जांभळा रंग दिसून येतो. नाभीपासून खांद्यापर्यंत तेजस्वी सोनेरी रंग दिसतो व खांद्याच्या वरच्या भागामध्ये दुधाप्रमाणे शुभ्र धवल आकाश दिसते.

विराट पुरुषाचे पसरलेले दोन्ही हात शुभ्र धवल दुधाप्रमाणे दिसतात व तेजाने लखलखत असतात. या दोन्ही हातांमध्ये हजारो देव-देवता निवास करत असतात.

विराट पुरुषाच्या आज्ञाचक्राच्याजवळ तेजोमय परमेश्वर राहतो. विराट पुरुषाच्या हृदयाच्या भागामध्ये आत्मज्ञान व ब्रह्मज्ञान संपन्न असंख्य सिद्धपुरुषांचा निवास असतो. त्याच्या थोड्या वरच्या भागात अनेक ऋषी राहतात. विराट पुरुषाच्या छातीच्या खालच्या भागामध्ये अनेक उच्च कोटीच्या देव-देवता राहतात. ज्या संपूर्ण सृष्टीवर नियंत्रण करतात. देव-देवता म्हणजे अत्यंत प्रकाशमय आत्मे.

विराट पुरुषाच्या नाभी प्रदेशामध्ये पृथ्वीतलावरील तसेच इतर विश्वातील पराकोटीचे सज्जन, परोपकारी, प्रकाशमार्गी आत्मे राहतात. येथे **प्रकाशविश्व** संपते.

विराट पुरुषाच्या खालच्या भागाचे म्हणजे अंधःकारमय विश्वाचे वर्णन मी फारसे करत नाही. या प्रान्तामध्ये रूद्र, यक्ष, भैरव, राक्षस अशा भयंकर शक्तींचे साम्राज्य असते.

विराट पुरुषाचा देह कसा असतो याचे हे योगिक वर्णन आहे. याचा व ज्योतिष शास्त्राचा काहीही संबंध नाही. तसेच खगोल

शास्त्राचा, कालपुरुष कुंडलीचा व मी केलेल्या विराट पुरुषाच्या वर्णनाचा काहीही संबंध नाही. या विराट पुरुषालाच शेषशायी भगवान् महाविष्णू किंवा नारायण असेही म्हणतात.

## विराट

हा ईश्वराचा स्थूलदेह असून या देहात अनेक ब्रह्माण्डे असतात. याचे थोडक्यात वर्णन वर केले आहे. या देहाच्या आतच आपली पृथ्वी, आपली ग्रहमाला, आपल्याला माहीत असणारे व माहीत नसणारे कोट्यावधी तारे, धूमकेतू, आकाशगंगा या सर्व गोष्टी येतात.

## हिरण्यगर्भ

ईश्वराच्या सूक्ष्मशरीराला हिरण्यगर्भ असे म्हणतात. या हिरण्यगर्भामध्ये साकार होण्याची मूल इच्छा दडलेली असते. या हिरण्यगर्भामध्ये स्फोट होतो व विराट पुरुष आकाराला येतो. हिरण्यगर्भ म्हणजे सोन्याप्रमाणे चमकणारा कोट्यावधी सूर्य मालिकांना पोटात सामावून घेणारा अति प्रचंड तेजाचा गोळा.

## अव्याकृत

हिरण्यगर्भाच्या अंतरंगात राहणारी एक अति प्रचंड ज्योत ! या ज्योतिमध्ये पराकोटीचे आकर्षण असते. हिरण्यगर्भासहित सर्व ब्रह्माण्डाला गिळून टाकण्याचे सामर्थ्य असते. या ज्योतिलाच आदि पराशक्ती असे म्हणतात. कोणी कोणी याला गुणमाया असेही म्हणतात. ही पराज्योतिच सर्व ब्रह्माण्डाचे महाकारण आहे. मानवी देहातील महाकारणदेहाचा या आदि पराशक्तीशी म्हणजे दिव्य ज्योतिशी डायरेक्ट कॉन्टॅक्ट असतो. या पराशक्तीतून मानवाच्या

महाकारणदेहाला चैतन्य प्राप्त होते, सर्वज्ञत्त्व प्राप्त होते व ईश्वरत्त्व प्राप्त होते.

## मूलप्रकृति

दिव्य ज्योतिच्या पलिकडे म्हणजेच मूलप्रकृतिमध्ये फक्त पराशांती आहे. येथे कुठलीही स्पंदने नसतात. फक्त पराशांती असते. याला परमशून्याचा प्रान्त असे म्हणतात.

## विराट पुरुषाच्या जाणीवेचे पृथ्वीतलावरील जीवनावर होणारे परिणाम–

आपल्या शरीरामधील उष्णता मोजण्यासाठी आपण थर्मामिटर लावतो. या थर्मामिटरमध्ये पारा असतो. हा पारा कोणाच्या शरीरात किती तापमान आहे हे दाखवितो. तापमान चढले की पारा वर चढतो, तापमान उतरले की पारा खाली उतरतो.

विराट पुरुषाची **जाणीव** ही थर्मामिटरमधील पाऱ्याप्रमाणे समजावी. ही जाणीव जेथे असेल त्याप्रमाणे पृथ्वीतलावरील वातावरण असते. विराट पुरुषाची जाणीव कोठे आहे याचा अंदाज घेऊन पूर्ण पृथ्वीतलावरील वातावरण कसे असेल याविषयी अंदाज वर्तविता येतो. याशिवाय इतर काही नियम जर माहीत असतील तर पृथ्वीतलावरील भूतकाळातील व भविष्यकाळातील वातावरण कसे असेल हे अचूक सांगता येते.

हिन्दू धर्मातील कथेप्रमाणे द्वापारयुग संपून पाच हजार एकशे आठ वर्षे पूर्ण झाली आहेत. भयंकर ईर्षा, द्वेष, मत्सर, कपट, कारस्थान व महायुद्ध यांनी द्वापार युगाचा अंत झाला व घोर अंधःकारमय असे कलियुग सुरू झाले. मूठभर पुढाऱ्यांनी संपूर्ण जनतेचा ताबा घेतला व

जनतेमध्ये भयंकर चुकीच्या प्रथा सुरू केल्या. त्यामुळे समाजाची अतिशय दैन्यावस्था झाली व पृथ्वीतलावर घोर अंधःकार युग सुरू झाले.

विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा पायाच्या तळव्यापासून गुडघ्यापर्यंत असते तेव्हा, पृथ्वीतलावर घोर अंधःकाराचे युग सुरू होते. लोक ईश्वराला विसरून जातात. जिकडे तिकडे काळ्या विद्येचे (Black Magic) साम्राज्य सुरू होते. रेडे, बकरे यांचे बळी देणे, त्याद्वारे राक्षसी आत्म्यांना संतुष्ट करणे, असले प्रकार सर्वत्र होऊ लागतात. चेटूक विद्येद्वारा लोकांचे वाईट करणे, स्त्रियांवर अत्याचार करणे, चुकीच्या प्रथा, चुकीच्या परंपरा निर्माण करणे या सर्व गोष्टी विराट पुरुषाची जाणीव जेव्हा गुडघ्याच्या खालच्या भागात असते तेव्हा घडत असतात.

विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा गुडघ्याच्या वरच्या भागाकडे येऊ लागते, तेव्हा असंख्य प्रकारच्या विद्यांचा जोर पृथ्वीतलावर सुरू होतो. वनस्पती, पशु-पक्षी, अर्ध-देवता, भूत-भैरव इत्यादींपासून निरनिराळ्या विद्या समाजात प्रचलित होतात.

याकाळातसुद्धा काही प्रकाशमार्गी सिद्धपुरुष समाजाला योग्य दिशेने नेण्याचा प्रयत्न करतात, परंतु त्याचा फारसा उपयोग होत नाही. अशा सिद्धपुरुषांचा छळ समाज करतो. तरीपण असे सिद्धपुरुष अवतार घेतच राहतात व लोकांना ईश्वरभक्तीची गोडी लावतात.

विराट पुरुषाची **जाणीव** गुडघ्याच्या वर येऊ लागल्यानंतर पृथ्वीतलावर जिकडे तिकडे मंदिरे व प्रार्थनास्थळे निर्माण केली जातात व लोक थोडेफार भक्तीमार्गी होतात. काळ्या विद्येचा लोकांना तिटकारा येऊ लागतो.

विराट पुरुषाची जाणीव जेव्हा मांड्यांच्या भागात येते तेव्हा भक्तीमार्गाचा प्रचार व देवी-देवतांचा प्रचार संपूर्ण पृथ्वीभर होतो. या काळात लोक अतिशय मूढ असतात परंतु भक्तीमान असतात. या काळामध्ये असंख्य सिद्धपुरुष अवतार घेतात व समाजाला भक्तीमार्गी बनवितात. याच काळामध्ये असंख्य ग्रंथ देवी-देवतांच्या नांवाने लिहिले जातात. न पाहिलेल्या देवी-देवतांच्या नांवाने पुराणे, महापुराणे, महाकाव्ये लिहिली जातात. ही काव्ये लिहितांना फार मोठी भयंकर चूक सर्व लेखकांच्या हातून घडते, ती म्हणजे,

''आत्तापर्यंत असुर, राक्षस, काळ्याविद्या, पिशाच्च विद्या यांचेच संस्कार जवळजवळ दोन हजार वर्षे मानवी मनावर झालेले असतात. नरबळी, पशुबळी देणे सर्रास सुरू असते. हजारो माणसांना व पशुंना मारून त्यावर मंदिरे बांधण्याचे प्रकार बंद झालेले नसतात. चोर, डाकू, दरोडेखोर यांचेच सर्वत्र साम्राज्य असते. अशा काळामध्ये एखाद्या सज्जनाने जरी सात्त्विक देवतेचे वर्णन करायचे ठरविले, तरी हजारो वर्षांच्या मनावरील संस्कारामुळे तो जेव्हा ग्रंथ लिहावयास घेतो, तेव्हा त्याच्या ग्रंथ लेखनामध्ये चोर, डाकू, दरोडेखोर व असंख्य राक्षस यांचीच वर्णने जास्त असतात. सात्त्विक देवतेची स्तुती खूपच कमी असते. ईश्वरभक्ती, ईश्वरसेवा म्हणून अशा ग्रंथांचे घरोघर वाचन केले जाते. समाजातील स्त्री, पुरुष, मुले सर्वांना या कथा तोंडपाठ होतात, त्यांच्या रक्तात या कथा भिनतात. अदृश्य सृष्टीमध्ये आपल्या पृथ्वीला अगदी चिकटून असूर लोक, राक्षस लोक, पिशाच्च लोक आहेत. त्यामुळे या लोकातील दुष्ट आत्मे जन्म घेण्यासाठी सतत धडपडत असतात. पुराणातील कथांमधून सतत राक्षसांची व दुष्टांची वर्णने वाचून व ऐकून मानवी मनाचा याच लोकांशी कॉन्टॅक्ट होतो व

पृथ्वीतलावर वाईट माणसे, दुष्ट माणसे, राक्षसी आत्मे जन्माला येतात. समाजाला सात्त्विक बनविण्याचा विद्वानांचा प्रयत्न फसतो.''

**पृथ्वीवरील सर्व मानवांनी नेहमी एक गोष्ट सतत लक्षात ठेवावी. तुम्ही ज्याचे चिंतन कराल, तेच तुम्हाला प्राप्त होईल. आकाशाचे चिंतन करा, तुम्ही आकाश व्हाल ! तेजाचे चिंतन करा, तुम्ही तेज व्हाल ! दया, करुणा, प्रेम, मानवता, अहिंसा इत्यादी सद्‌गुणांचे चिंतन करा, तुम्ही देव व्हाल ! देव म्हणजे अत्यंत तेजस्वी प्रकाशमय आत्मा ! एकंदरीत तुम्ही ज्याचे चिंतन करत असता तेच तुम्हाला प्राप्त** होत असते. ''ध्याने ध्याने स्वरूपता !'' **आपण ज्याचे ध्यान करतो तेच स्वरूप आपल्याला प्राप्त होते, म्हणून नेहमी चांगल्या गोष्टींचे चिंतन करावे.**

**चिंती परा । ते येई घरा ।**

अदृश्य **सृष्टीचा । न्याय खरा ।।**

नेहमी दुसऱ्याचे चांगले व्हावे, दुसऱ्याचे भले व्हावे, सर्वांचे कल्याण व्हावे असेच चिंतन करावे. कारण जेव्हा आपण इतरांच्या वाईटाचा विचार करतो तेव्हा प्रथम आपले मन वाईट होत असते, आपले मन खराब होत असते. आपले मन कधीही खराब होणार नाही, याची सतत दक्षता घ्यावी.

आपण जर दुसऱ्याला डांबर लावायचे ठरविले तर, प्रथम आपले हात डांबराने भरतात, म्हणून कधीही दुसऱ्याच्या वाईटाचा विचार करू नये.

आपण जर दुसऱ्याला अत्तर लावायचे ठरविले तर, प्रथम आपल्या हाताला अत्तर लागते, म्हणून सतत दुसऱ्याच्या चांगल्याचा

विचार करावा म्हणजे आपलेही चांगले होते.

विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा मांडीच्या आसपास येते तेव्हा, समाजपुरुषाचे मन सात्त्विक होण्यासाठी धडपडत असते, परंतु समाजातील विद्वान, लेखक, पंडित, पुरोहित यांना काळाचे ज्ञान नसल्याने ते चुकतात व समाज पुन्हा रूढी, परंपरा व दुष्टता यांच्या गर्तेत सापडतो. या सर्व गोष्टींचे भयंकर दुष्परिणाम समाजालाच भोगावे लागतात. चुकलेल्या समाजावर असंख्य आक्रमणे होतात. समाजाने अनेक ग्रंथांच्याद्वारा दुष्टांचे व राक्षसांचे चिंतन केलेले असते. त्याचे दुष्परिणाम म्हणून परप्रान्तातील दुष्टांची आक्रमणे देशावर होऊ लागतात व हजारो वर्षे देश गुलामगिरीत लोटला जातो.

काळाचे भान न ठेवता ज्यांनी ग्रंथ लिहिले त्या ग्रंथकर्त्यांची घराणी उद्ध्वस्त होतात. ज्या भाषेमध्ये असे ग्रंथ लिहिले जातात ती भाषाही नष्टप्राय होते. जे राजे अशा ग्रंथांच्या प्रचाराला, प्रसाराला सहकार्य करतात, अशी राज्येही शिल्लक राहत नाहीत. या सर्व गोष्टींचे मूळ कारण एकच, आसुरी व राक्षसी वृत्तींचे केलेले चिंतन !

**यावरून एक गोष्ट चांगली लक्षात ठेवावी की चिंतन नेहमी आनंदाचे, प्रसन्नतेचे, शांतीचे, समाधानाचेच करावे ! कारण चिंतन म्हणजेच चिंतामणी ! कल्पना म्हणजेच कल्पवृक्ष !**

विराट पुरुषाची **जाणीव** कमरेच्या आसपास आल्यानंतर पृथ्वीतलावर **प्रकाशयुगाची** पहाट होते. वाईट गोष्टींचा नाश होऊ लागतो, चांगल्या गोष्टींचे संवर्धन होऊ लागते. लोकांच्या अंतःकरणात भक्ती वाढू लागते. लोकांचा आध्यात्माकडे ओढा वाढतो. विज्ञानाचा सर्वत्र प्रसार होतो. निरनिराळे शोध लागतात. जीवन सुखी व संपन्न होते. प्रकाशाचा मार्ग दाखविणारे काही सिद्धपुरुष

अवतार घेतात व समाजाला प्रकाशाचा मार्ग दाखवितात. प्रकाशाचा मार्ग दाखविणारी पुस्तके लिहिली जातात. ही प्रकाशयुगाची सुरुवात असते.

सात्त्विक देवी-देवतांचे भजन-पूजन लोक करू लागतात. तत्वज्ञानाचा प्रसार होतो. लोक ध्यान, धारणा करू लागतात.

विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा नाभीप्रदेशाच्या आसपास येते तेव्हा ध्यान मार्गाचा प्रचार व प्रसार संपूर्ण विश्वभर जोराने होतो. ध्यानामध्ये साधकांबरोबर देवी-देवता बोलू लागतात, अदृश्य सृष्टीतून मार्गदर्शन मिळू लागते.

विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा हृदयाच्या आसपास पोहोचते तेव्हा पृथ्वीतलावर हजारो योगी निर्माण होतात. हे हजारो योगी विराट पुरुषाच्या कमरेखालचा भाग स्वच्छ करण्याचे कार्य करतात, म्हणजे अंधःकारमय विश्वामध्ये खितपत पडलेल्या कोट्यावधी आत्म्यांना सद्‌गती देण्याचे काम करतात. यामुळे विराट पुरुषातील अंधःकारमय लोकही प्रकाशमान होऊ लागतो.


विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा कंठाच्या आसपास येते तेव्हा पृथ्वीतलावर सिद्ध, साधक, योगी, ऋषी असे असंख्य महात्मे निवास करत असतात. सामान्य माणसेही ध्यानयोगी असतात. सर्व जग पवित्र असते. सर्वत्र शांती असते. लोक अतिशय सद्‌गुणी असतात. सर्वजण निर्गुण ब्रह्माची उपासना करत असतात. विकार व वासना यांचे अस्तित्व नसते. फक्त परमानंदाचे साम्राज्य असते. जवळजवळ सर्वच माणसे योगी असतात. सर्वांनी काळावर विजय प्राप्त केलेला असतो. मनोवेगाने कोठेही जाण्याची कला लोकांना प्राप्त झालेली असते. हवा तो पदार्थ मनात चिंतन करताच निर्माण होत असतो.

एखाद्या स्त्रिला विशिष्ट प्रकारचा ड्रेस, साडी किंवा सोन्याचा अलंकार हवा, असे मनांत येता क्षणीच ती वस्तू प्राप्त होते. एखाद्या व्यक्तीने ठरविले मला आत्ता हजार मैल दूर एका विशिष्ट ठिकाणी जावयाचे आहे तर ती व्यक्ती दुसऱ्या क्षणी तेथे जाऊन पोहोचते. अशा प्रकारे केवळ संकल्पाने कुठलाही पदार्थ निर्माण करता येतो. कारण मन **चिंतामणी** झालेले असते.

विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा आज्ञाचक्रापर्यंत जाऊन पोहोचते, तेव्हा पृथ्वीतलावरील सर्व स्त्री, पुरुष ज्योतिर्मय होतात. स्त्री-पुरुष हा भेद नष्ट होतो. स्थूलदेह यापूर्वीच नष्ट झालेला असतो. परंतु इच्छेप्रमाणे स्थूलदेह धारण करता येतो, क्षणात अदृश्य होता येते, क्षणात प्रकट होता येते.

विराट पुरुषाची **जाणीव** जेव्हा ब्रह्मरंध्रात जाऊन पोहोचते तेव्हा पृथ्वीतलावरील सारेच स्त्री-पुरुष परमेश्वर स्वरूप झालेले असतात. सर्व विश्व परमेश्वरमय, प्रकाशमय, परमानंदमय झालेले असते.

# ॐकारमय मानव देह




**१.** ओठातील ॐ **२.** कानातील ॐ **३ व ५.** नितंबातील ॐ व त्या ॐमधून मेरूदंडातून सहस्त्रार चक्राकडे जाणारा ॐकारमय कुंडलिनीचा मार्ग **४.** भुवयातील ॐ

६.



७.



**६.** छाती व कमरेच्या भागातील ॐ

**७.** नाकातील ॐ, श्वास आत घेतांना व सोडतांना जो ध्वनि होतो तो ध्वनि म्हणजेच ॐ.

## ५. ॐकार रहस्य

ॐ यापैकी कुठल्याही प्रकाराने मोठ्या आकारात जर ॐ काढला तर गणपतीचा आकार आपल्याला स्पष्ट दिसून येतो. यावरून आपण सगळे भारतीय जी गणपतीची उपासना करतो, ही गणपतीची उपासना म्हणजे ॐ काराची उपासना. सर्व देव-देवताही ॐ मधूनच निर्माण झालेल्या आहेत.

मूलाधार चक्रामध्ये गणपती राहतो. हे मूलाधार चक्र आपल्या गुदद्वाराच्या थोडे वर असते.

एखाद्या लहान मुलाला उपडी झोपवून पहा, त्याच्या नितंबाचा आकार तुम्हाला उलट्या ॐ सारखा दिसेल.

आरशामध्ये नाकाचा आकार निरखून पहा. तुम्हाला नाकाचा आकारही ॐ सारखाच दिसेल.

मांडी घालून बसा आपण जणूकाही ॐवरच बसलो आहोत असा अनुभव येतो. पाठीच्या कण्यातून ॐची शेपटी वर डोक्यापर्यंत गेली आहे हे स्पष्टपणे जाणवते.

**ॐकारम् परब्रह्मम् । नित्यम् ध्यायन्ति योगिनः ।।**

ॐ कार हेच परब्रह्म असून या परब्रह्माचे योगी नित्य ध्यान करतात. ॐ मध्येच सर्व देव-देवतांचा निवास आहे. ॐ कारातून सर्व सृष्टी निर्माण झालेली आहे.

अशा प्रकारे मानवी देह हा ॐ पासूनच बनलेला आहे. मानवी देहात ॐ शिवाय दुसरे काहीही नाही. प्रकाशमार्गाची साधना केली असता या ॐ कार रूपी परब्रह्माचा अनुभव येतो.

माणसाच्या नाभीप्रदेशाचे अवलोकन केले तर तेथेही ॐ उलटा बसलेला आहे असे दिसून येईल.

माणसाच्या छातीच्या प्रदेशाकडे निरखून पाहिले असता तेथे तर ॐ उलटा व सुलटा दोन्ही आकारात बसलेला आहे असे दिसून येईल. भिवया व ओठांचे आकारही ॐ सारखेच आहेत.

अशा प्रकारे मानवाच्या देहात सर्वत्र ॐचे च अस्तित्व आहे. यावरून ॐ पासून सर्व सृष्टी निर्माण झाली, असे म्हणतात ते खरे आहे.

बायबल व कुराणामध्येही प्रथम 'शब्द' होता व शब्दापासून सर्व निर्माण झाले असे म्हटले आहे हा शब्द म्हणजेच ॐ !

कुठल्याही ध्वनिचे लक्षपूर्वक निरीक्षण केले असता ॐ हाच ध्वनि ऐकू येतो.

ॐ या ध्वनिवर मन एकाग्र केले असता ब्रह्म साक्षात्कार होतो.

मनाची एकाग्रता होत नाही. ही मनाची एकाग्रता साध्य करण्यासाठी श्वास घेतांना **सो** व सोडतांना **हम्** असे म्हणावे. प्रत्यक्षामध्ये श्वास घेतांना सो हा ध्वनि आपोआप होत असतो व श्वास सोडतांनाही हम् हा ध्वनि आपोआप होत असतो. या आपोआप

होणाऱ्या ध्वनिवर फक्त लक्ष केन्द्रीत करावयाचे असते. वर्ष दोन वर्षे अभ्यास केल्यानंतर हे जमू लागते. याला **अजपाजप** असेही म्हणतात.

पूर्वजन्मामध्ये जर योग साधना केलेली असेल तर ही साधना एक-दोन दिवसातसुद्धा जमू लागते. काही अति भाग्यवान साधकांना ही साधना तात्काळ जमते. मन लगेच एकाग्र होते. इतकेच नव्हे तर, मन तल्लीन होऊन ध्यान दृश्येही दिसू लागतात व थोडाफार अभ्यास केल्यानंतर चिदाकाशात प्रवेशही प्राप्त होतो.

ज्यांची पूर्वजन्मातील किंवा या जन्मातील कर्मे वाईट आहेत, ज्यांचे विचार वाईट आहेत, जे ईर्षा, द्वेष, मत्सर करतात, आत एक बाहेर एक असे वागतात, ज्यांचे प्रारब्ध अशुद्ध आहे, अशा लोकांना ही साधना प्रयत्न करूनही साध्य होत नाही.

अशा लोकांनी एखाद्या सिद्धपुरुषाची सेवा करून प्रथम आपले प्रारब्ध शुद्ध करावे. सिद्धपुरुषाची सेवा करत असतांनाच एखाद्या देवतेच्या स्तोत्राचे लाखो पाठ करून आपले मनही शुद्ध करावे व देवतेची कृपा संपादन करावी. योग्य वेळ आल्यानंतर सिद्धपुरुष सोऽहम् साधना कशी करावी हे शिकवितात.

एकदा एका व्यक्तीने एका प्रकाशमार्गी सत्पुरुषाला सोऽहम् साधना कशी करायची ते विचारले. या व्यक्तीच्या घराण्यामध्ये पिशाच्च शक्ती होती. परंतु सत्पुरुष दयाळू असल्याकारणाने त्यांनी त्याला सोऽहम् संबंधी थोडेफार मार्गदर्शन केले. तेव्हा त्या व्यक्तीने नेमका सोऽहम् स्वर कसा घ्यायचा व सोडायचा त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यास सांगितले. सत्पुरुष दयाळू असल्याकारणाने त्यांनी प्रात्यक्षिक दाखविण्याचा प्रयत्न केला. ''**परंतु ते त्या सत्पुरुषांना शक्य झाले नाही.**''

समोर बसलेली व्यक्ती अपात्र असल्याकारणाने आज्ञाचक्रातून श्वास घेणे त्यांना जमेनासे झाले.

सोऽहम् साधना म्हणजेच ॐ काराची साधना. या साधनेवर साधकाचे नियंत्रण नसते. किंबहुना आपण परब्रह्माच्या प्रान्तात प्रवेश केल्यानंतर खऱ्या अर्थाने ॐ काराची साधना सुरू होते. अपात्र व्यक्तींना तसेच ज्यांचे प्रारब्ध अशुद्ध आहे अशा व्यक्तींना ही साधना प्राप्त होत नाही हे सिद्ध होते. अगदी सतपुरुषाने ही साधना दयाळू बुद्धीने एखाद्याला द्यायची ठरविले तरी तो तसे करू शकत नाही हे वरील गोष्टीवरून सिद्ध होते.

या ॐमधूनच सारी ब्रम्हाण्डे निर्माण होतात. सर्व देवी-देवता निर्माण होतात. वृक्षाच्या मुळाला पाणी घातल्यानंतर ज्याप्रमाणे फांद्या व पाने संतुष्ट होतात, त्याप्रमाणे ॐकाराची उपासना केल्याने सर्व देवी-देवता संतुष्ट होतात. सर्व देवतांचे आशीर्वाद एका ॐकाराच्या उपासनेनेच प्राप्त होतात. असा हा ॐकार श्वासाच्या रूपाने सर्वांच्या अंतरंगात राहतो म्हणून तो सर्वांचा आहे व सर्व काही त्याच्यात सामावलेले आहे. ॐकाराचा महिमा हा असा आहे.

# ६. मानव ईश्वरच आहे

ज्ञान दृष्टीने पाहिले असता, या विश्वामध्ये परमेश्वराव्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. एकच ईश्वर अनंतरूपाने नटलेला आहे. हरिण तोच आहे व हरिणाला खाणारा वाघही तोच आहे. फक्त मनुष्यच ईश्वराची कल्पना करू शकतो आणि जेव्हा मनुष्य ईश्वराची कल्पना करतो तेव्हा प्रत्येक मनुष्य आपापल्या कल्पनेप्रमाणे ईश्वराला सजवितो, नटवितो.

एका मनुष्याने ईश्वराला,

**तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत ।।**

असे म्हणून त्याच्या काखेला झोळी लावली व चार कुत्रे त्याला भेट म्हणून दिले.

दुसऱ्या मनुष्याने विष्णूचे रूप निर्माण केले. तिसऱ्याने शंकराचे रूप निर्माण केले आणि कोणीतरी देवीचे रूप निर्माण केले.

अशा प्रकारे आपापल्या इच्छेप्रमाणे देवी-देवतांची रूपे निर्माण करण्यात आली व त्यावर कथा, उपकथा, महाकथा व पुराणे लिहिण्यात आली, परंतु ज्या मनाने या सर्व देवी-देवतांना निर्माण केले त्या मनाचा शोध मात्र कोणीही घेतला नाही व त्यामुळे मानवाला ईश्वर समजलाच नाही. ही झाली पृथ्वीतलावरील समस्त मानवांची कथा !

आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्यांना स्थूलदेह नाही व जे पापीही नाहीत, पुण्यवान आहेत परंतु ज्ञानी नाहीत असे पितृलोकातील आत्मेसुद्धा पितृलोकामध्ये मंदिर, मशिदी व चर्चेसमध्ये परमेश्वराची आराधना करतांना दिसून येतात.

ज्या साधू-संतांनी देवी-देवतांच्या उपासनेला समाजाला लावले ते सर्व साधू-संत आत्मज्ञानी होते. परंतु समाज अशिक्षित असल्या कारणाने ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता त्याच्याकडे नसल्याने समाजातील लाखो लोक गर्व, ताठा, अहंकार आणि अशुद्धता यांनी बरबटलेले असल्याकारणाने साधू-संतांनी ज्ञानमार्ग समाजाला न सांगता ईश्वराच्या विविध रूपांची भक्ती करण्यास लावले. आजही आपण सर्वजण ईश्वराच्या विविध रूपांची भक्ती करत आहोत आणि ही ईश्वराची विविध रूपे दर्शन सुद्धा देतात.

मी स्वतःसुद्धा दत्त, दुर्गादेवी, हनुमान व गणपती यांची अनेक वर्षे आराधना करून त्यांना प्रत्यक्ष पाहिले आहे, परंतु अशी कितीही दर्शने झाली तरी आत्मसाक्षात्कार झाल्याशिवाय पूर्णत्त्व प्राप्त होत नाही हेच खरे ! आणि एकदा का आत्मसाक्षात्कार झाला की आपली स्थिती आरशासारखी होते. आपण स्मरण करू त्या देवतेचे रूप आपल्याला प्राप्त होते. हे रूप त्रिमितीच्या पलिकडील असल्याकारणाने इतरांना दिसत नाही. आपल्या आत्मचक्षूंना ते मात्र सर्वार्थाने दिसून येते. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर खरी तृप्ती प्राप्त होते. काही मिळविण्याचे शिल्लक राहत नाही. ही अवस्था बुद्धीच्या पलिकडची असल्याकारणाने शब्दात बसवून सांगणे कठीण आहे. या अवस्थेचा अनुभवच घ्यावा लागतो. हा अनुभव कसा घ्यावा हे शाखाचंद्र न्यायाने येथे सांगणार आहे.

मनुष्य जेव्हा आपले मनुष्यत्त्व विसरतो तेव्हा उरते ते **ब्रह्म** !

ईश्वर जेव्हा आपले ईश्वरत्त्व विसरतो तेव्हा उरते ते **परब्रह्म** !

या चराचरामध्ये ईश्वराशिवाय किंवा परब्रह्माशिवाय काहीही नाही अशी पक्की धारणा करून या पृथ्वीतलावरील जीवन जगताना ईश्वर, देवी-देवता यांच्याकडून कसलीही अपेक्षा न करणे, ही या साधनेची पहिली पायरी होय !

कर्तेपणाची भावना समूळ नष्ट करणे व त्याऐवजी साक्षीभावाने राहणे, मनाला सतत एकाच अवस्थेमध्ये स्थिर ठेवून सर्व कामे करणे, प्रत्येक गोष्टीमध्ये ईश्वर पाहण्याचा प्रयत्न करणे, प्रत्येक मनुष्यामध्ये असणाऱ्या ईश्वराला ओळखणे, ही दुसरी पायरी होय !

सारे काही पूर्ण आहे. पूर्णामध्ये पूर्ण मिळविले असता पूर्णच होते व पूर्णातून पूर्ण वजा केले असता पूर्णच शिल्लक राहते. या धारणेचे सतत चिंतन करणे ही तिसरी पायरी होय !

लहानपणी अनेकवेळा शिवलीलामृत वाचले. या शिवलीला-मृतामध्ये पुढील प्रमाणे लिहिलेले आहे.

''एका झाडावर दोन पक्षी बसलेले आहेत. खालच्या फांदीवर बसलेल्या पक्षाला **जीव** म्हणतात व वरच्या फांदीवर बसलेल्या पक्षाला **शिव** म्हणतात. विशेष म्हणजे या वृक्षाला असंख्य प्रकारची फळे लागलेली आहेत. खालचा पक्षी (जीव) सर्व प्रकारची फळे भक्षण करीत आहे व वरचा पक्षी (शिव) कुठलेच फळ भक्षण न करता फक्त पाहत आहे.''

खालचा पक्षी अनेक प्रकारची फळे खात असल्याकारणाने सुख-दुःख भोगतो. वरचा पक्षी काहीही भक्षण करत नसल्याकारणाने

त्याला कसलेही सुख-दुःख नसते.

शिवलीलामृत हा ओवीबद्ध ग्रंथ असून वयाच्या सातव्या वर्षी प्रथम हा ग्रंथ मी वाचला. त्याच्यामध्ये एका झाडावर दोन पक्षी असे रूपक दिलेले आहे. जीव व शिव अशी नांवे त्यांना दिलेली नाहीत.

शिवलीलामृतातील वरील ओव्यांचा अर्थ न कळल्याने मी अनेक वृद्ध ईश्वरभक्तांना या ओव्यांचा अर्थ विचारला परंतु कोणीही माझे समाधान करू शकले नाही. एका विद्वानाने वरच्या फांदीवरचा पक्षी शिव व खालच्या फांदीवरचा पक्षी जीव असे सांगितले. परंतु तरीही मला काहीच अर्थबोध झाला नाही म्हणून तो विषय मी तेथेच सोडून दिला. मध्ये बरीच वर्षे निघून गेली.

वाचनाचे मला व्यसन असल्याकारणाने आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन चालूच होते. जवळजवळ दिडशे उपनिषदे वाचली. या उपनिषदांमध्ये एक मुंडकोपनिषद नावाचे उपनिषद होते. या उपनिषदामध्ये एक श्लोक होता.

**द्वा सुपर्णा सयुजा सखायां समानं वृक्षं परिषस्वजाते ।**
**तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्यनश्नन्नन्यो अभिचाकशिति ।।**

अर्थ - एका पिंपळाच्या वृक्षावर दोन पक्षी निवास करतात. एक फळे खातो, दुसरा फळे खात नाही.

हा श्लोक वाचल्यानंतर बऱ्याच वर्षांनी पुन्हा माझे डोके भणभणू लागले. बालपणी मनात विचार येत, फळे न खाणारा पक्षी मरून कसा जात नाही व फळे खाणारा पक्षी सुख-दुःख भोगतो म्हणजे काय ? '**मुन्डकोपनिषदा**'तील या श्लोकाने पुन्हा मनात विचारांचे काहूर माजविले आणि शेवटी एक दिवस ध्यान करीत असतांना सर्व गोष्टींचा उलगडा झाला.

माणसाच्या स्थूलशरीराला काहीच अर्थ नाही कारण हे स्थूलशरीर म्हणजे एक यंत्र आहे.

सूक्ष्मशरीराला **जीवात्मा** (Spirit)असे म्हणतात. हा जीवात्मा अनेक प्रकारच्या इच्छा करतो व या इच्छांच्या पूर्तीसाठी स्थूलशरीराच्या आश्रयाने प्रयत्न करतो. त्याला जितके मिळविता येईल तेवढे तो मिळवितो व जे काही मिळविले आहे ते भोगतो आणि उपभोगतो. यालाच उपनिषद कर्त्यांनी फळे खाणारा खालचा पक्षी असे म्हटले आहे. हा फळे खाणारा खालचा पक्षी म्हणजे माणसाचा देह धारण केलेला जीवात्मा ! किंवा मनुष्य ! मनुष्य बासुंदी खाण्याची इच्छा करतो. पोटभर बासुंदी खाण्याचे सुख उपभोगतो आणि दुसऱ्या दिवशी पोटदुखीने बेजार होतो व **दुःख** भोगतो.

मनुष्य चोरी करण्याची इच्छा करतो. दोन-चार चोऱ्या पचविण्याचे **सुख** उपभोगतो. नंतर पोलीस पकडतात, पोलिसांचा मार खाण्याचे **दुःख** भोगतो.

अशा प्रकारे **जीवात्मा** मनुष्यदेहाने जीवनरूपी वृक्षावर बसून सुख-दुःखाची फळे खातो.

जीवात्मा विविध प्रकारच्या इच्छा करतो. त्याच्या काही इच्छा पूर्ण होतात, काही इच्छा पूर्ण व्हायच्या शिल्लक राहतात. ज्या इच्छा शिल्लक राहिल्या आहेत, त्या पूर्ण करण्याकरिता तो पुन्हा पुन्हा जन्म घेतो व पुन्हा पुन्हा मरतो.

''पुन्हा पुन्हा जन्म घेतो याचा अर्थ मनुष्य शरीर धारण करून जन्माला येतो व पुन्हा पुन्हा मरतो, याचा अर्थ मनुष्य शरीर सोडून जातो म्हणजे मरतो. हा मृत्यूही जीवात्म्याच्या कर्मानुसार घात-पात, अपघात, रोग अथवा नैसर्गिक इत्यादी प्रकाराने होत असतो. हे झाले

जीवनरूपी पिंपळ वृक्षावर बसलेल्या खालच्या पक्ष्याचे वर्णन.''

जीवनरूपी पिंपळ वृक्षावर बसलेला वरचा पक्षी म्हणजे ईश्वर ! हा ईश्वर प्रत्येक माणसाच्या हृदयात राहत असतो. या ईश्वरामुळेच स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चारही देहांना चैतन्य प्राप्त होत असते. मनुष्यदेहामध्ये जीवात्मा ज्या इच्छा करतो त्या सर्व कारणदेहामध्ये रेकॉर्ड होत असतात. महाकारणदेह हा ईश्वरस्वरूप आहे. तेथपर्यंत कुठल्याही इच्छा आकांक्षा जात नाहीत.

तेथे फक्त, **'मी ईश्वर आहे,'** असे स्पंदन होत असते. या महाकारणदेहालाच दुसरा पक्षी शिव अथवा ईश्वर असे म्हटले आहे. हा महाकारणदेह म्हणजे **ईश्वरस्वरूपावस्था !** ही अवस्था प्रत्येक मनुष्या-जवळ असतेच फक्त या स्वरूपाला जाणून घेण्याची बुद्धी माणसाने करायची असते.

ईश्वरभक्ती करणे म्हणजे **स्वतःला जाणणे,** स्वतःला ओळखणे, स्वतःच्या आत्मस्वरूपापर्यंत पोहोचणे होय !

एका माळेमध्ये शेकडो मणी असतात, परंतु त्या शेकडो मण्यांना गुंफणारा दोरा एकच असतो. त्याप्रमाणे करोडो मानवांना, प्राणी, पशुंना ईश्वररूपी एकाच धाग्याने धारण केलेले आहे. यामुळे आपण प्रत्येक मानवाविषयी सतत चांगले विचार ठेवायचे असतात. एखादा मनुष्य आपल्याला आवडत नसल्यास आपण त्याच्यापासून चार पावले दूर राहावे व मनात म्हणावे ईश्वराचा अंश त्याच्यातही आहे. परंतु त्याची मन, बुद्धी बरोबर नाही. थोडक्यात

**सर्प विंचू नारायण । परी ते वंदावे दूरून ।।**

या सर्व विश्वामध्ये पूर्णपणे ईश्वरच भरून राहिलेला आहे. त्यामुळे जेव्हा आपण आपली बुद्धी ईश्वरमय करतो व कोणाचाही हेवा-

दावा करत नाही, सर्वांचे कल्याण व्हावे अशी धारणा करतो, तेव्हा ईश्वराचे आशीर्वाद आपल्याला मिळत असतात, म्हणून प्रत्येकाचे चांगले व्हावे, अशी इच्छा सदैव मनात धरावी. ईश्वराने सर्वांना चांगली बुद्धी द्यावी म्हणून प्रार्थना करावी. परंतु कोणाचाही द्वेष, मत्सर करू नये.

कोणाहीविषयी मनात कधीही कसलीही अढी ठेवू नये. सर्वांच्या विषयी मनात प्रेम असावे व परोपकारी वृत्ती असावी. या गोष्टींमुळे तपस्व्यांनाही न भेटणारा परमेश्वर आपल्या हृदयात प्रकट होतो.

### ईश्वराचे प्रकटीकरण

ज्याने अपार सेवा करून आपले जन्मोजन्मींचे प्रारब्ध शुद्ध केले आहे, ज्याची मन, बुद्धी, चित्त, अहंकार पूर्णपणे शुद्ध झालेली आहेत अशाच माणसाला परमेश्वराचा साक्षात्कार होतो. हा ईश्वर साक्षात्कार कसा होतो याच्या काही साधना पुढे देत आहे.

प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाची अत्यंत शुद्ध अंतःकरणाने सेवा करावी. अंतःकरण शुद्ध नसेल, अंतःकरणात कलुषित वृत्ती असतील तर आध्यात्मात प्रगती होण्यास अनेक जन्म घालवावे लागतात. परंतु अनेक जन्मानंतर का होईना ईश्वर साक्षात्कार नक्की होतो. परंतु प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाबरोबर लांड्या लबाड्या केल्यास, त्याला फसविल्यास जीवन शापित होण्याची शक्यता असते.

ज्या सद्भक्तामध्ये अनेक सद्गुण आहेत, जो सरळ मनाचा आहे, ज्याचे चित्त शुद्ध झालेले आहे, ज्याचे मन सदैव प्रसन्न राहते, ज्याच्या अंतःकरणात शंका कुशंका निर्माण होत नाहीत, जो दानी, परोपकारी व प्रेमळ आहे **अशा व्यक्तीच्या अंतःकरणात ईश्वर प्रकट होतो.**

ज्याच्या मनात विचारांचे तरंग उठत नाहीत, जो कसलीही इच्छा किंवा अपेक्षा करत नाही, जो सदैव विचाररहित अवस्थेत राहतो, ज्याच्या मनात फक्त ईश्वराचे चिंतन अखंडपणे चालू राहते, ज्याचे अंतःकरण सागरासारखे विशाल आहे, अशा अंतःकरणामध्ये ईश्वर प्रकट होतो.

मन निर्विचार झाल्यानंतर सूक्ष्मशरीर शुद्ध होते. किंबहुना सूक्ष्मशरीराचे अस्तित्वच नष्ट होऊन जाते. सूक्ष्मशरीर कारणशरीरात विलीन होते. यावेळी एका दिव्य आनंदाची प्राप्ती होते.

ज्याच्या मनात कुठल्याही कल्पना उठत नाहीत, जो कसलीही कल्पना करत नाही त्याला सहज समाधी अवस्था प्राप्त होते.

**जो वरी कल्पना गेली नाही। तोवरी ज्ञान ते अज्ञान पाही।।**

कारणदेहामध्ये कल्पनेचा उगम होतो. ईश्वराचा कारणदेह विविध प्रकारच्या कल्पना करतो, त्यामुळेच हे सर्व विश्व निर्माण झाले आहे. मनुष्याच्या कारणदेहामध्ये अनेक जन्मांच्या कर्मांचे संस्कार असतात, ही सर्व बीजे नष्ट झाल्याशिवाय ईश्वर पूर्णत्त्वाने प्रकट होत नाही. अखंड ईश्वर चिंतन करून सर्व कल्पना नष्ट कराव्या लागतात. सर्व कल्पना नष्ट झाल्यानंतर अंतःकरणामध्ये ज्ञानज्योति प्रकट होते. या ज्ञानज्योतिकडे सतत पाहत राहणे एवढेच काम उरते.

मनुष्य सदैव कल्पनेच्या साम्राज्यात बुडून राहत असतो. **''हे असे करावे''  ''ते तसे करावे'''' हे असे केले असता अधिक चांगले होईल ''  ''हे असे असावे.''**

अशाप्रकारच्या विविध कल्पनांनी माणसाला सदैव ग्रासलेले असते. मनुष्य लाखो वेळा जन्माला येतो, लाखो वेळा मरतो. ईश्वराच्या कृपेने प्राप्त झालेल्या मनुष्यदेहामध्ये मनुष्य जेव्हा आतंकवादासारख्या भयानक कल्पना करतो व या कल्पना तडीस नेतो, तेव्हा, अशा

माणसाला पुढे लाखो वर्षे मनुष्य जन्म मिळत नाही. परंतु त्या विषयाची चर्चा येथे नको.

**कल्पनेचा समूळ नाश झाला असता कारणशरीर शुद्ध होते** व कारणशरीर शुद्ध झाले असता पूर्णपणे ईश्वराचा साक्षात्कार होतो.

सूक्ष्मदेह व कारणदेह पूर्णपणे शुद्ध झाल्यानंतर खूप दिव्य अनुभव येतात. वातावरणातील देव-देवता, अदृश्य सृष्टीतील परोपकारी आत्मे, अशा महान आत्म्याच्या सेवेला सदैव तत्पर राहतात. त्याची प्रत्येक इच्छा ते पूर्ण करतात. अर्थात अशा योग्याला कुठलीही इच्छा नसते. परंतु अत्यंत सात्त्विक मनाचा जर कोणी सद्‌भक्त असेल व त्याने निःस्वार्थ बुद्धीने काही प्रार्थना केली तर, ती प्रार्थना वातावरणातील देव-देवता, परोपकारी आत्मे तात्काळ पूर्ण करतात. सिद्ध माहात्म्यांच्या सद्‌भक्तांना जे दिव्य अनुभव येतात त्याचे कारण हेच. भक्ताची भक्ती जितकी तीव्र असेल, अनुभव तितकेच तीव्र असतात. पण भक्त जर स्वार्थी व आत एक बाहेर एक असा असेल किंवा लबाड असेल तर त्याला फारसे अनुभव येत नाहीत.

कारणदेह जसजसा शुद्ध होऊ लागतो तसतशा ईश्वराच्या एकेक कला अंगी प्रकट होऊ लागतात. विविध प्रकारचे ज्ञान व सामर्थ्य अंगी प्रकट होऊ लागते. ज्ञानाचा स्वीकार करायचा असतो परंतु सर्व प्रकारचे सामर्थ्य ईश्वराच्या चरणी अर्पण करायचे असते. सामर्थ्याच्या प्रवाहात वाहत गेल्यास आपण अंतिम ध्येयापर्यंत पोहोचू शकत नाही. मी ईश्वर आहे हा अहंकार ईश्वराला मनुष्य बनवितो किंवा शिवाला जीव बनवितो. सामर्थ्यासहित प्रकट होणाऱ्या ईश्वराच्या सर्व ऐश्वर्याला तिलांजली द्यावी लागते. कारण मी ईश्वर आहे, माझ्या अंगी अफाट सामर्थ्य आहे, मी काहीही करू शकतो हा अहंकार ईश्वरस्वरूप

माहात्म्याचीही अधोगती करू शकतो व समाजातील स्वार्थी, धूर्त व लबाड माणसे या अधोगतीला कारण ठरतात.

कारणदेहाच्या शुद्धीनंतर प्राप्त झालेले सर्व सामर्थ्य ईश्वर चरणी अर्पण करून कारणदेहाला महाकारणदेहामध्ये विलीन करावे लागते. कारणदेह महाकारणदेहात विलीन होण्यापूर्वीच विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त होत असते. हे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर यातील सात्त्विक भाग समाजासमोर ठेवावयाचा असतो. ज्ञानातील राजस व तामस भाग कधीही समाजासमोर आणायचा नसतो. (भारतातील काही प्राचीन माहात्म्यांनी ईश्वरीय ज्ञानातील राजस, तामस भाग समाजासमोर आणल्याने भारतीय समाजाची प्रचंड अधोगती झाली. परंतु हा सर्व विषय ईश्वराची लीला असे म्हणून आपण सोडून देऊ !) यासाठी फक्त सात्त्विक ज्ञान ग्रहण करून राजस व तामस ज्ञानाचा स्वीकार करावयाचा नसतो.

**परब्रह्म तादात्म्यता**

कारणदेह जेव्हा महाकारणदेहात विलीन होतो तेव्हा परब्रह्माशी तादात्म्यता प्राप्त होते. योगी निर्गुण निराकार होतो. चराचराला व्यापून राहतो. माझ्यामध्ये सर्व विश्व सामावलेले आहे, असा अनुभव त्याला येतो. सर्व विश्वात मीच एक व्यापून राहिलेला आहे, असा अनुभव येतो.

अशा प्रकारे परब्रह्माशी तादात्म्यता प्राप्त झाल्यानंतर कर्मबंधने गळून पडतात, शरीर यंत्रवत काम करू लागते. योग्याला निर्गुण, निराकार अशी अवस्था प्राप्त होते. असा योगी हा देवांचाही देव असतो. यालाच ईश्वर म्हटले जाते.

**सर्वातीत पदालंबी । पूर्णेन्दू शशीराशयः ।**
**यत् तिष्टते सदा योगी । सः एव परमेश्वरः ।।**

पौर्णिमेचा पूर्ण चंद्र ज्याप्रमाणे सर्वांपासून दूर राहून सर्व जगाला

शीतल प्रकाश देत असतो, त्याप्रमाणे पूर्णावस्थेला पोहोचलेला योगी सर्वांपासून दूर राहून सर्वांच्या मनाला शीतलता प्रदान करतो, अशा सर्वातीत अवस्थेत राहणाऱ्या योग्याला परमेश्वर म्हणतात.

अशा परमेश्वर अवस्थेचे योगी आजही हिमालय, सह्याद्री, सातपुडा, गिरनार, कौशिक, अबू, अरूणाचलम, निलगिरी, विंध्य इत्यादी पर्वतांमध्ये राहत असून काही योगी आल्पस पर्वतात व उत्तर ध्रुवातही राहत आहेत. यांच्या चैतन्यमय देहांमधून कधी कधी दिव्य स्पंदने बाहेर पडतात व या स्पंदनांमुळे ईश्वराची भक्ती करणाऱ्या मानवांना आनंद, शांती व इच्छापूर्तीचा अनुभव येतो.

**ईश्वर मानव झाला**

ईश्वर मानव कसा झाला हे शब्दात सांगणे अतिशय कठीण आहे, तरीपण, जेवढ्या सोप्या भाषेमध्ये समजावून सांगता येईल, तेवढ्या सोप्या भाषेमध्ये समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. हे कितपत जमेल हे ईश्वरालाच ठाऊक !

माणसाला खेळणे आवडते. अनेक प्रकारचे खेळ माणूस खेळत असतो. खेळण्यातून त्याला आनंद मिळतो. एका खेळाचा कंटाळा आला की, तो दुसरा खेळ खेळतो परंतु खेळण्याचे तो सोडत नाही. वय वाढले, काही खेळण्याची ताकद अंगात राहिली नाही, तर तो पत्ते खेळतो. ऐंशीहून अधिक वय असलेल्या व्यक्ती एकट्यानेच पत्ते खेळतात, हे मी पाहिलेले आहे. यावरून मानवाला खेळण्यातच आनंद वाटतो, हे सिद्ध होते.

खेळणे या वृत्तीचा मूळ उगम ईश्वरात आहे.

ईश्वर मानवरूप धारण करून स्वतःला विसरून कसे सुख– दुःख भोगतो व पुन्हा स्व–रूपात कसा विलीन होतो हे सोप्या भाषेत सांगण्यासाठी

मी खेळाचे उदाहरण देत आहे. कारण संपूर्ण विश्व हा ईश्वराचा खेळच आहे. हा खेळ समजावून घेण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.

सुमारे तीनशे वर्षांपूर्वी कोणाच्यातरी डोक्यामध्ये क्रिकेट या खेळाची कल्पना स्फुरली. आज क्रिकेट खेळ किती विश्वव्यापी झाला आहे, हे आपण पाहतच आहोत. परंतु मूळात हा खेळ मनोरंजनासाठी कोणीतरी निर्माण केला.

मनोरंजनाच्या या खेळाचे आज असंख्य नियम आहेत. चुकीचे वागल्यास खेळाडूंना शिक्षा होतात, दंडही होतो, खेळातून काढून टाकले जाते. हा मनोरंजनाचा खेळ नियमांचा व सुख-दुःखाचा खेळ झालेला आहे. यात हेवे-दावे व भांडणतंटेही अलिकडे निर्माण होत असतात व नियमांच्या आधाराप्रमाणे त्याचे न्यायनिवाडेही होत असतात. क्रिकेटचा खेळ हे एक उदाहरण दिले आहे. परंतु सगळेच खेळ व खेळाडू हे नियमांनी व शिस्तीने बांधलेले असतात. यातून थोडेफार सुख-दुःख निर्माण होते परंतु खऱ्या आनंदाचे प्रमाण खूपच कमी असते.

एकटेपणाचा ईश्वराला कंटाळा आला. खेळ खेळण्यासाठी त्याने अनेक रूपे धारण केली. ही सर्व ईश्वराची अनेक रूपे असल्याकारणाने खेळात आनंद निर्माण होईना ! कारण सगळेच सर्वज्ञ, सगळेच परमानंदमय कोणालाच कसलेच सुख-दुःख नाही, कारण मनाचे अस्तित्वच नव्हते. सारेच ज्योतिर्मय परब्रह्म. कोणी स्त्री नाही, कोणी पुरुष नाही, सर्वत्र ज्योतिच ज्योति ! ईश्वराला यातही आनंद वाटेना ! म्हणून ईश्वराच्या सर्व रूपांनी एकत्र येऊन विचार केला, येथे एकाचा विचार तोच सर्वांचा विचार होता. त्यामुळे वेगळेपणाचा काहीही आनंद नव्हता.

येथे ईश्वराने ठरविले की, प्रथम ईश्वरत्त्वाचा विसर स्वतःला

पडावा, परंतु ईश्वरत्त्व हरवू नये, यासाठी त्याने तीन रूपे तयार केली. महाकारणदेह हे ईश्वराचे रूप सदैव तटस्थ (neutral) राहील. त्याला कुठलेही पाप-पुण्य लागणार नाही व ईश्वरत्त्वाचा व परमानंदाचा ठेवा या महाकारणदेहात राहील. ईश्वराचे हे कोट्यावधी महाकारणदेह धाग्यामध्ये ओवलेल्या मण्यांप्रमाणे परब्रह्मात गुंफलेले असतील. एखाद्या हारामध्ये हजारो फुले असतात त्याप्रमाणे पृथ्वीतलावरील सर्व माणसांचे महाकारणदेह परब्रह्मरूपी धाग्यामध्ये गुंफलेले असतात. कारणदेह हे ईश्वराचे दुसरे रूप ! या कारणदेहाने वाट्टेल त्या कल्पना कराव्यात अशी योजना ईश्वराने केली. कारणदेहाने कल्पना करण्यास सुरुवात केली. त्याच्या कल्पनेप्रमाणे प्रत्येक गोष्ट घडून येऊ लागली. खेळामध्ये अधिक मजा यावी म्हणून, कारणदेहाने सूक्ष्मशरीराची कल्पना केली. त्याप्रमाणे सूक्ष्मशरीर तयार झाले. या सूक्ष्मशरीरात निरनिराळे विचार निर्माण होऊ लागले. शेवटी कारणदेहाने स्थूलशरीराची कल्पना केली त्याप्रमाणे स्थूलदेह निर्माण झाला. एखाद्या माणसाने एकावर एक चार पांघरुणे घ्यावीत, त्याप्रमाणे परमेश्वराने स्वतःवर चार पांघरुणे ओढवून घेतली. चौथे पांघरूण स्थूलदेहाचे. असा बराच काळ गेल्यानंतर सूक्ष्मशरीरामध्ये काही फेरबदल करून स्त्री व पुरुष यांची सूक्ष्मशरीरे निर्माण करण्यात आली व तेव्हापासून स्त्री व पुरुष यांच्या संयोगाने प्रजोत्पादन सुरू झाले.

अशा प्रकारे ईश्वराचा खेळ सुरू झाला. खेळामध्ये वैचित्र्य यावे म्हणून ईश्वराने काही नियम केले व या नियमानुसार सर्व गोष्टी घडत असतात.

**ईश्वरत्त्व हरवू नये म्हणून,**

-माणसाला कितीही पैसा मिळाला तरी त्याचे मन बेचैन असते.

सत्ता, संपत्ती, सौन्दर्य, सामर्थ्य, उच्च शिक्षण, उच्च अधिकार या सर्व गोष्टी जरी त्याच्याजवळ असल्या तरी तो आतून बेचैन असतो, अशांत असतो, तो जीवनाशी तडजोड करून जगतो. परंतु त्याला खरा आनंद कधीच प्राप्त होत नाही.

**कारण –**

ईश्वराने असा नियम केलेला आहे की, जोपर्यंत मनुष्य मूळ स्वरूपापर्यंत म्हणजे परमेश्वरापर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत त्याच्या जीवनात खरा आनंद निर्माण होऊ नये. मनुष्य जेव्हा ईश्वराशी एकरूप होतो तेव्हाच त्याला खरा आनंद प्राप्त होतो. तो जसजसा ईश्वराच्या दिशेने पुढेपुढे जाऊ लागतो तसतसा त्याला कणाकणाने आनंद मिळू लागतो व ईश्वराशी पूर्ण तादात्म्य पावल्यानंतर तो परमानंदाच्या समुद्रात बुडून जातो. मानवांच्या सर्व दुःखांचे व समस्यांचे मूळ ईश्वराचा वियोग हेच होय ! ईश्वरापासून विभक्त राहिल्याने दुःख होते व ईश्वराचा भक्त झाल्यावर दुःख शिल्लक राहत नाही.

**भक्त म्हणजे विभक्त नव्हे ।**
**आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे।।**
**हे अवघेचि जाणणे । विलक्षण ।।**

**अहंकार –**

प्रत्येक माणसाला तो जे काही करतो ते नेहमी बरोबर वाटत असते. हा अहंकार म्हणजे तो ईश्वर असल्याची खूण असते. परंतु त्याच्यातील ईश्वरत्त्व मलिन झाल्याकारणाने, या ताठा, क्रोध व इतर अनेक दुर्गुणांमध्ये होते. म्हणून ज्याच्यात सद्‌गुण असतात तो मनुष्य आनंदी असतो. कारण त्याच्यात ईश्वरत्त्व चमकू लागलेले असते.

ज्याच्यात दुर्गुण असतात तो सदैव दुर्मुखलेला, खिन्न, उदास व दुःखी असतो.

**कर्म तैसे फळ –**

ईश्वराच्या या खेळामध्ये विविधता यावी म्हणून सूक्ष्मशरीर म्हणजे जीवात्मा (Spirit) जसे कर्म करील तशी त्याला फळे भोगावी लागतील, अशी व्यवस्था ईश्वराने केलेली आहे. त्यामुळे पृथ्वीतलावरील आपण सर्व मानव जरी ईश्वरच असलो तरी विविध प्रकारची सुख-दुःखे भोगत आहोत व विविध प्रकारच्या चांगल्या-वाईट कर्मांची फळेही भोगत आहोत. असे हजारो युगांपासून सुरू आहे व पुढे हजारो युगे असेच चालत राहील. जोपर्यंत मला-तुम्हाला या खेळाचा कंटाळा येत नाही, तोपर्यंत हे असेच चालत राहणार व याला काहीच उपाय नाही.

आपण जी काही कर्मे करू त्या कर्मांची फळे भोगण्यासाठी आपण पुन्हा पुन्हा जन्माला येणार व मरण्यापूर्वी कोट्यावधी कर्मांचे ओझे घेऊन मरणार व पुन्हा त्या कर्मांची फळे भोगण्यासाठी पुनःश्च जन्माला येणार. जन्म-मृत्यूचे हे रहाटगाडगे अनादि कालापासून चालत आहे व अनंत कालापर्यंत चालत राहणार. कारण हा सर्व खेळ आपणच सुरू केलेला आहे व या खेळाचे सर्व नियमही आपणच बनविलेले आहेत.

वरील सर्व गोष्टी मी सर्वसामान्य माणसांना उद्देशून लिहिलेल्या आहेत. यातील काही सज्जन, सद्गुणी व ईश्वरभक्त असतात. अशी माणसे म्हणजे कणाकणाने ईश्वराच्या दिशेने पुढे सरकणारी माणसे ! या माणसांची जमेची बाजू म्हणजे, यांच्यातील सद्गुण व सज्जनता वाढत जाते. यांची अधोगती होत नाही. पाच-दहा जन्मातच ईश्वराच्या साम्राज्यात त्यांना प्रवेश प्राप्त होतो. जन्म-मरणाच्या चक्रातून त्यांची

सुटका होते. हळूहळू ते परमेश्वराशी एकरूप होतात. म्हणजे स्वतःच्या स्वरूपाची त्यांना ओळख होते.

ईश्वराच्या साम्राज्यात प्रवेश प्राप्त होतो, असे वर म्हटले आहे, याचा अर्थ मृत्यूनंतर त्यांचे सूक्ष्मशरीर दिव्य व परमानंदमय अशा लोकात प्रवेश करते व हाडामांसांच्या स्थूलदेहात त्यांना कधीही जन्म घ्यावा लागत नाही. दिव्यलोकात त्यांची प्रगती होतच राहते. पुष्कळवेळा अधिक वेगाने प्रगती करावी म्हणून हे दिव्य आत्मे पृथ्वीतलावर जन्म घेतात व अतिशय वेगाने प्रगती करतात. काही ईश्वरस्वरूप महान दिव्य आत्मे मानवांचा उद्धार करण्यासाठी स्त्री-पुरुषांच्या रूपाने पृथ्वीतलावर अवतीर्ण होतात व मानवांचा उद्धार करतात.

दुर्गुणी, दुष्ट अशा माणसांविषयी काही लिहिण्याची आवश्यकता नाही. असे लोक स्वतःच्याच आत्म्याचे प्रचंड नुकसान करतात. ईश्वरी नियमाप्रमाणे जितके दुर्गुण जास्त तितके दुःख व तितक्या यातना अधिक. या यातना युगानुयुगे चालत राहतात, असे लोक स्वतःचे सर्व भविष्य बिघडवून टाकतात, स्वतःच्याच आत्म्याचे नुकसान करतात.

मनुष्य ईश्वरच आहे, स्त्री-पुरुषाच्या रूपाने ईश्वरच नटलेला आहे, म्हणून प्रत्येक स्त्री-पुरुषाला मी पूर्ण आहे असा अभिमान असतो. मी पूर्ण आहे या अभिमानाचे रूपांतर अहंकारात होते व अहंकाराची विविध रूपे आपल्याला दिसून येतात. अशिक्षितातील अशिक्षितालाही मी पूर्ण आहे असा अभिमान असतो व सुशिक्षित विद्वानालाही मी पूर्ण आहे असा अभिमान असतो. हा अभिमान जेव्हा खालच्या दर्जाला जातो, मलिन होतो तेव्हा त्याचे रूपांतर गर्व, ताठा, मग्रूरता इत्यादी दुर्गुणांमध्ये

होते. पूर्णत्त्वाचा अभिमान जीवात्म्याला खाली खाली नेऊ लागतो. हे जरी खरे असले तरी पूर्णत्त्वाचा अभिमान असणे म्हणजे ईश्वरत्त्वाची जाणीव असणे. या जाणीवेला शुद्ध करणे, सूक्ष्म करणे व नंतर नष्ट करणे म्हणजेच योग साधना ! सारे विश्व पूर्ण आहे या विश्वात पूर्णाशिवाय म्हणजे परमानंदमय, चैतन्यमय ईश्वराशिवाय दुसरे काहीच नाही. स्त्री पूर्ण आहे. पुरुष पूर्ण आहे. हे दोन पूर्ण (पती + पत्नी) जेव्हा एकत्र येतात तेव्हा तिसरे पूर्ण निर्माण होते व ते ही पूर्णच असते. अशा या पूर्णांच्या कुटुंबातून जेव्हा थोडेफार पूर्ण वजा होते म्हणजे कोणीतरी मरते तेव्हा पूर्णातील काहीही कमी न होता पूर्णच शिल्लक राहते. कारण या विश्वात पूर्णाशिवाय दुसरे काहीच नाही.

**पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**

हे सारे (विश्व) पूर्ण आहे. हे सतत पूर्णच असते. पूर्वी पूर्ण होते, आता पूर्ण आहे व भविष्यकाळातही पूर्णच राहणार आहे. या पूर्णात कितीही पूर्ण मिळाले तरी ते वाढत नाही ( या विश्वामध्ये मनुष्य किंवा इतर जीवसृष्टी कितीही निर्माण झाली तरी पूर्णात वाढ होत नाही) व या पूर्णातून कितीही पूर्ण वजा झाले तरी ते पूर्ण कमी होत नाही. म्हणजे कितीही जीवसृष्टी नष्ट झाली तरीही पूर्णातून काहीही कमी होणार नाही. पूर्ण हे सदैव पूर्णच राहणार. कारण या विश्वामध्ये पूर्णाशिवाय म्हणजे चैतन्याशिवाय दुसरे काहीही नाही. या सर्व सृष्टीमध्ये चैतन्य, परब्रह्म, परमेश्वर भरून राहिलेला आहे. परब्रह्माशिवाय या जगात काहीही नाही. सर्वांच्या आत-बाहेर परब्रह्मच भरून राहिलेले आहे व परब्रह्माचे सगुण रूप परमेश्वर !

परमेश्वराचे किंचित घनरूप म्हणजे महाकारणदेह जो

विश्वव्यापी तर असतोच पण परमेश्वराशी संलग्न असतो. या महाकारणदेहातून सर्व विश्वाचे मूळ कारण असा, कारणदेह तयार होतो. या महाकारणदेहात मला काय काय करायचे आहे याचे मास्टर प्लॅन असतात. हा कारणदेह सूक्ष्मशरीराला तयार करतो. या सूक्ष्मशरीरात लाखो विचारांच्या लाटा निर्माण होत असतात.

सूक्ष्मशरीराचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतातून विशिष्ट द्रव्य एका सेकंदात खेचून घेऊन सूक्ष्मदेह हाडामांसाचे स्थूलशरीर केव्हाही धारण करू शकतो. इतकेच नव्हे तर या देहाच्या आधाराने खाऊ, पिऊ शकतो, सिगरेट ओढू शकतो. गरज असल्यास काही तास किंवा काही दिवस हे स्थूलशरीर धारण करून तो विविध प्रकारचे कार्य करू शकतो. परंतु मनात येताच हे स्थूलशरीर एका सेकंदात अदृश्यही करू शकतो. या स्थूलशरीराचे विघटन सेकंदापेक्षाही कमी काळात होते. वातावरणातील देव-देवता, श्रीस्वामी समर्थ, लाहिरी महाशय, श्रीपाद श्रीवल्लभ, साईबाबांसारखे थोर महात्मे आजही स्थूलशरीरात प्रकट होतात. भक्तांशी गप्पा गोष्टी करतात. हा देहसुद्धा हाडामांसांनी परिपूर्ण असतो. त्रिमितीयुक्त असतो, आपण या देहाला मिठी मारू शकतो, हातात हात घेऊ शकतो, हा देह श्वासोच्छ्वासही करतो. हाताने वस्तू उचलतो, अगदी मानवाच्या देहाप्रमाणे सर्व कामे करतो. परंतु सेकंदाच्या दहाव्या भागात तो अदृश्यही होतो. याबाबत माझ्या अनेक अनुभवांपैकी एक अनुभव पुढे देत आहे.

एकदा एका झाडाखाली बसलेला असतांना भगवान् दत्तात्रेय समोरून येतांना दिसले. त्यांनी भगव्या रंगाचा चुडीदार व कुर्ता घातलेला होता. डोक्याला फेटा बांधलेला होता. फेट्यातून केस खाली लोंबत

होते. केस, दाढी, मिशा काळेभोर होते, डोळे अत्यंत तेजस्वी होते. सुमारे शंभर सव्वाशे फुटावरून ते माझ्याकडे चालत येत होते. मी औदुंबर वृक्षाखाली नेहमीप्रमाणेच बसलेला होतो.

श्रीदत्त महाराजांना येतांना पाहून मी उभा राहिलो. मनात म्हटले,

''आज श्रीदत्त महाराज स्थूलदेह धारण करून आले आहेत आता यांना सोडायचे नाही. बराच वेळ गप्पागोष्टी करायच्या.''

ते जवळ येताच मी त्यांच्या पोटाला अगदी घट्ट मिठी मारली व जोराने म्हणालो-

''मी आता तुम्हाला सोडणार नाही, मला बरेच प्रश्न विचारावयाचे आहेत.'' परंतु दुसऱ्याच क्षणाला माझ्या मिठीत कोणीही नव्हते. मिठीसाठी पसरलेले हात तसेच होते.

या सर्व गोष्टी एवढ्यासाठीच लिहिलेल्या आहेत की, सूक्ष्मशरीराला स्थूलदेह केव्हाही निर्माण करता येतो व या स्थूलदेहाच्या आधाराने अनेक कार्ये करता येतात. स्थूलदेहासाठी फक्त मनाचा संकल्प पुरेसा असतो इतर कशाचीही गरज भासत नाही.

कर्मानुसार, प्रारब्धाचे भोग भोगण्यासाठी किंवा शिकण्यासाठी किंवा आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी किंवा एखाद्या माहात्म्याला जगाच्या उद्धारासाठी जेव्हा स्थूलदेहाची गरज भासते तेव्हाच स्त्री-पुरुषाच्या संयोगाने निर्माण होणाऱ्या देहामध्ये स्त्री गरोदर असताना सातव्या महिन्यामध्ये जीवात्मा (spirit) प्रवेश करतो व मनुष्य म्हणून पृथ्वीतलावर ऐंशी-पंच्याऐंशी वर्षे राहतो.

**येथे आधी कोंबडी की, आधी अंडे हा वाद संपुष्टात येतो.**

परमेश्वराने सूक्ष्मदेहाला स्थूलदेह धारण करण्याची क्षमता आधी दिली. स्त्री-पुरुषांचे स्थूलदेह आधी तयार झाले व तद्नंतर बऱ्याच काळानंतर स्त्री-पुरुष संयोगातून संतती ही क्रिया सुरू झाली.

मानव स्वतःचे ईश्वरत्व विसरला, ईश्वराने मानव होतांना स्वतःवर काही नियम लादून घेतलेले आहेत, हे मी यापूर्वी सांगितलेले आहे. या नियमांप्रमाणे मनुष्यजन्म ही **कर्मयोनी** आहे. मनुष्यरूपाने जन्माला येणारे स्त्री-पुरुष जे काही कर्म करतील त्या कर्माप्रमाणे त्यांना चांगली अथवा वाईट फळे भोगावी लागतील. असा हा खेळ आपणच सुरू केलेला असून म्हणजेच ईश्वराने सुरू केलेला असून हा खेळ संपावा अशी जर आपली इच्छा असेल तर, ईश्वराच्या दिशेने प्रवास करण्यास आपण सुरुवात केली पाहिजे. अनेक प्रकारची चांगली वाईट कर्मे करून आपण सतत प्रवाहात पुढे पुढे जात आहोत. हे पुढे पुढे जाणे थांबवून मागे वळून ईश्वराच्या दिशेने प्रवास करण्यास म्हणजे आपल्या मूळ उगमाच्या दिशेने प्रवास करण्यास सुरुवात केली पाहिजे व यासाठी दुर्गुणांचा त्याग व सद्गुणांचे आचरण, संकुचितपणाचा त्याग व परोपकाराचे आचरण, ईर्षा, द्वेष, मत्सराचा त्याग व प्रेम आणि इतरांना मदत करण्याच्या वृत्तीची जोपासना करावयास हवी. अशा प्रकारे सद्गुणांच्या आचरणाने आपण एक दिवस परमेश्वरापर्यंत पोहोचू व मग आपल्याला अनुभव येईल की एक ईश्वरच या सृष्टीत भरून राहिलेला आहे.

### प्राणी जगत

ईश्वर स्त्री-पुरुषांच्या रूपाने कसा नटला व तो कसे खेळ करत आहे हे आपण पाहिले. प्राणी-पशुंच्या रूपामध्येसुद्धा ईश्वर असाच नटलेला आहे. फक्त ही भोग योनी आहे. मनुष्यजन्म सोडून प्राणी-पशुच्या रूपात जेव्हा जीवात्मा जन्म घेतो तेव्हा त्याला कसलेही पाप-

पुण्य लागत नाही. येथे फक्त जीवन उपभोगायचे असते. वाघ जेव्हा हरिणाला मारतो तेव्हा त्याला काहीही पाप लागत नाही. येथे परमेश्वराने **जीवो जीवस्य जीवनम्।** असा नियम बनविलेला आहे. म्हणजे जीवाला खाऊन जीवाने जगायचे आहे. म्हणून हरिणाला मारल्याने वाघाला पाप लागत नाही. कारण हरिण हे वाघाचे भोजन आहे.

येथे एक गमतीदार गोष्ट सांगण्यासारखी आहे. हरिणाच्या शरीरात किंवा वाघाच्या शरीरात राहणाऱ्या जीवात्म्यांना जर एखाद्या योग्याने स्वतःकडे बोलावून घेतले तर ते येतात व चक्क मनुष्यवाणीने त्यांचे सुख-दुःख योग्याला सांगतात. योग्याशी गप्पा मारतात. मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग एक मध्ये पिंपळवृक्षामध्ये राहणाऱ्या आत्म्याने माझ्याशी वार्तालाप केल्याचे मी लिहिलेले आहे.

हा विषय समजून घेतांना म्हणजे सर्व विश्वामध्ये परमेश्वर कसा भरलेला आहे याचा अनुभव घेतांना थोड्याशा विवेक बुद्धीचा वापर केल्यास हा विषय चटकन लक्षात येईल.

प्रथम आपण स्थूलदेहाचा विचार करू.

या स्थूलदेहामध्ये हाडे व मांस आहे, शिरांमधून रक्त वाहत आहे, हा स्थूलदेह जड आहे, हा एक दिवस मरतो व जीवात्मा त्यातून बाहेर पडतो.

ज्या गोष्टी मनुष्याच्या देहात आहेत त्याच गोष्टी वाघाच्या देहात आहेत. एक दिवस वाघाचा देह मरतो व वाघाच्या देहातून जीवात्मा बाहेर पडतो. पुष्कळवेळा प्राण्यांच्या देहातून मनुष्याचे आत्मे बाहेर पडतात. कारण त्यांच्या कर्मानुसार त्यांना प्राण्यांचे देह प्राप्त झालेले असतात. इतकेच नव्हे तर वृक्षांमध्येही माणसाच्या आत्म्यांचा वास असतो. मनुष्ययोनी ही कर्मयोनी असल्याकारणाने कर्माप्रमाणे

माणसांचे जीवात्मे विविध योनींमध्ये भटकत राहतात व प्राण्यांचे जीवात्मे मृत्यूनंतर ईश्वराने त्यांच्यासाठी जे स्थान निर्माण केले असेल त्या स्थानात जातात. स्वर्गलोकात राहणारे वाघ, सिंह  व हरिण हे एकत्र खेळतात. तेथे त्यांच्यात वैरभाव नसतो.

हाडामांसांचा माणसांचा स्थूलदेह, त्यात वाहणारा रक्ताचा प्रवाह, शरीरात राहणारा जीवात्मा या गोष्टी आपण समजून घेतल्या तसेच प्राण्यांचे स्थूलदेह व प्राण्यांच्या स्थूलदेहात राहणारे जीवात्मे यांचीही माहिती घेतली, अगदी त्याचप्रमाणे आपण जी पृथ्वी पाहतो हा पृथ्वीचा स्थूलदेह असून या पृथ्वीमध्ये वाहणाऱ्या नद्या या पृथ्वीच्या शिरा आहेत. या पृथ्वीलाही एक आत्मा असून जसे माणसाचे आयुष्य संपल्यानंतर माणसाचा देह मरतो, तसेच पृथ्वीचे आयुष्य संपल्यानंतर ही पृथ्वी मरून जाईल व पृथ्वीवरील जीवन संपून जाईल व या पृथ्वीचा आत्मा परमेश्वराच्या साम्राज्यात प्रवेश करेल.

पृथ्वीतलावर जे काही चांगले ग्रंथ लिहिले जातात, या चांगल्या ग्रंथांच्या अदृश्य कॉपीज् तयार केल्या जातात व स्वर्गलोकातील आत्म्यांना अभ्यासासाठी त्या दिल्या जातात. अशा प्रकारे या सर्व विश्वामध्ये फक्त एकच परब्रह्म भरून राहिलेले आहे. परब्रह्माशिवाय या विश्वात काहीही नाही. सोनेच अलंकाराचे रूप धारण करते. मग या सोन्याला बांगडी, चंद्रहार अशी नांवे पडतात. अलंकार जरी असंख्य असले तरी सोने एकच असते. तसेच सर्व विश्व हे ईश्वरच आहे. ईश्वराहून दुसरे काहीच नाही.

**श्लोकार्धेन प्रवक्षामि । यदुक्तं ग्रंथ कोटिभिः ।**
**ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या । जीवो ब्रह्मैव नापरा ।।**

कोट्यावधी ग्रंथांमध्ये जे अप्रत्यक्षरित्या सांगितले आहे ते मी अर्ध्या श्लोकात सांगतो. एकच ब्रह्म सत्य आहे, जग मिथ्या आहे,

खोटे आहे, आभासमय आहे, जीव हाच ब्रह्म आहे. या विश्वामध्ये ब्रह्माशिवाय दुसरे काहीही नाही.

असंख्य उभ्या आडव्या धाग्यांनी वस्त्र विणले जाते. हे वस्त्र म्हणजे विश्व आहे परंतु ज्यापासून वस्त्र निर्माण झाले, वस्त्र हे ज्याचे परिवर्तनशील रूप आहे, तो कापूस **ब्रह्म** आहे. कापसाशिवाय वस्त्र नाही, सोन्याशिवाय अलंकार नाहीत त्याप्रमाणे ब्रह्माशिवाय जग नाही. कापूस हेच वस्त्र, सोने हाच अलंकार व ब्रह्म हेच जग !

येथपर्यंत वाचल्यावर कदाचित वाचक असे म्हणतील, जर, आपणच ईश्वर आहोत तर आजपर्यंतच्या साधू-संतांनी राम, कृष्ण, शिव, विष्णू अशा प्रकारे तेहतीस कोटी देवांची भक्ती करण्यास सांगितले ते का?

वाचकांनी प्रथम हे समजून घ्यावे की भारतातील सर्व साधू-संत हे आत्मज्ञानी होते. जे ज्ञान मी या अध्यायात लिहिले आहे ते सर्व ज्ञान त्यांचेच आहे. परंतु त्या काळातील समाज खूपच अज्ञानी होता. ज्याप्रमाणे आंधळ्या माणसाला हात धरून घरी पोहोचवावे लागते त्याप्रमाणे पूर्वीच्या महान संतांनी समाजाला सगुणोपासना सांगितली व सगुणोपासनेच्या आधाराने चित्तशुद्धीचा मार्ग दाखवून दिला. एकदा का चित्ताची शुद्धी झाली की मग ईश्वराचा साक्षात्कार होण्यास वेळ लागत नाही. आमचे साधू-संत आत्मज्ञानी होते याचे काही पुरावे खाली देत आहे.

**राम झरोका बैठके । सबका मुजरा लेत ।**
**ज्यासी जैसी चाकरी । वैसा उसको देत ।।**

कबीराच्या या दोह्याचा अर्थ आहे -

मानवाच्या शरीरामध्ये भ्रूमध्याच्या ठिकाणी परमात्मा राम बसलेला आहे व जो जशी भक्ती, सेवा, साधना करेल त्या प्रमाणे

त्याचे फळ त्याला देत आहे.

**धन्य जिसने ध्यान धर । भ्रूमध्य मे देखा ।**
**अयोध्या है भक्त की । मस्तक तिलक रेखा ।।**

तुलसीदासाच्या या काव्याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे -

तुलसीदास म्हणतात -

''तो मनुष्य धन्य आहे ज्याने भ्रूमध्यामध्ये ध्यान लावले आणि ईश्वराला पाहिले. भ्रूमध्याच्या ठिकाणी सद्भक्त जेथे तिलक लावतो याच स्थानाला अयोध्या असे म्हणतात व या अयोध्येत राम राहतो.''

मीराबाई म्हणते -

**तन के तंबुरेमे । सासोंकी तार बोले ।**
**जय सियाराम । जय राधेश्याम ।।**

शरीररूपी तंबोऱ्यामध्ये माणसाचा श्वास ही तार असून या श्वासामधून जो ध्वनि बाहेर पडतो तो ध्वनि म्हणजेच ईश्वराचे चिंतन होय.

अशा प्रकारे सर्व साधू-संतांनी माणसाच्या शरीरात असणाऱ्या ईश्वराचा शोध घ्या ! असे सुचविले आहे. परंतु सामान्य माणसाला हे जमत नाही म्हणून विविध प्रकारच्या देवतांच्या मूर्ती बनवून सामान्य माणसांना त्याची पूजा करावयास सांगितली जाते. परंतु जग आता सुशिक्षित झाले आहे. पुराणातील कथांना बाजूला ठेवून लोकांनी सत्याचा शोध घेतला पाहिजे. सत्याचा शोध जगातील सर्व लोकांनी प्रामाणिकपणे घेण्याचा प्रयत्न केल्यास जगातील सगळी दुःखे व समस्या दूर होऊन जग सुखी होईल.

**उदाहरणार्थ -**

याच अध्यायामध्ये मी लिहिले आहे की, माळेत ओवलेल्या

मण्यांप्रमाणे किंवा हारात गुंफलेल्या फुलांप्रमाणे सर्व माणसांचे महाकारण देह परब्रह्मरूपी धाग्यात ओवलेले असतात.

**वर लिहिलेले सूत्र शंभर टक्के सत्य असून जेव्हा एक मनुष्य दुसऱ्या माणसाला फसवितो, लांडी-लबाडी करतो, दुसऱ्याशी धूर्ततेने वागतो, दुसऱ्याचा गैरफायदा घेतो तेव्हा तो परमेश्वरालाच फसवित असतो व कर्माच्या कायद्याप्रमाणे तो स्वतःचे प्रचंड नुकसान करत असतो. एखाद्या व्यक्ती विषयी मनात थोडासा आकस व अढी जरी ठेवली तरीसुद्धा प्रचंड आध्यात्मिक नुकसान होते. आध्यात्मिक प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात. इतरांना मदत करण्याच्या वृत्तीने व इतरांना आनंद देण्याच्या वृत्तीने आध्यात्मात प्रगती होत असते.**

समजा एखाद्या माणसाने दुसऱ्या माणसाला दहा रूपयाला फसविले, ईश्वरी नियमाप्रमाणे या माणसावर दहा रुपयाचे ऋण झालेले आहे. **ऋण, हत्या, वैर**, गुंडगिरी, दहशतवाद, चोरी, उन्मत्तपणे वागणे, जुलुम, गर्व, ताठा, अहंकार या सर्व गोष्टी **जीवात्म्याला** हजारो वर्षे विविध योनीत जन्म घेण्यास भाग पाडतात.

येथे आपण फक्त दहा रुपयाच्या ऋणाचा विचार करत आहोत. ज्याने दहा रुपयाला फसविले तो मनुष्य सुमारे तीन हजार वर्षांनी पृथ्वीतलावर जन्माला आला व ज्याला दहा रुपयाला फसविले तोही मनुष्य पृथ्वीतलावर जन्माला आला. या दोन माणसांच्यामध्ये सुमारे पाच हजार मैलांचे अंतर आहे. कर्माच्या कायद्याप्रमाणे ज्याने दहा रुपयाला फसविले आहे तो मनुष्य पाच हजार मैल दूर जाईल. तेथे ज्याच्याकडून दहा रुपये पूर्वजन्मात घेतले त्याच्याशी त्याची ओळख होईल व कुठल्या ना कुठल्या प्रकारे त्याला लाखो रुपये देईल. याशिवाय फसविणे हा गुन्हा जो त्या माणसाने केला आहे, ईश्वराच्या

नियमाप्रमाणे त्याच्या ज्या वेगळ्या शिक्षा होतील त्याही भोगणे त्याला भाग पडेल. **गहनोकर्मणागतिः** असे म्हटले जाते. कर्माची गति किती गहन असते हे दहा रुपयाचे उदाहरण देऊन दाखवून दिले आहे. येथे जे लिहिले आहे ते शंभर टक्के सत्य आहे. दहा रुपयाला फसविल्याचे इतके दुष्परिणाम जर होत असतील तर जे लोक भयंकर कर्मे करतात त्यांचे काय होत असेल हे ईश्वरालाच माहीत. यासाठी प्रत्येक माणसाच्या हृदयामध्ये ईश्वर आहे याची जाणीव माणसाला होणे अतिशय आवश्यक आहे.

इतरांना आनंद दिल्याने, सर्वांशी प्रेमाने वागल्याने, इतरांच्या उपयोगी पडल्याने, आपल्यामध्ये सात्त्विकतेची वाढ होते व जसजशी सात्त्विकता वाढू लागते तसतसे आपण ईश्वराच्या जवळ जातो. आपण ईश्वराच्या जवळ जातो म्हणजे आपण आपल्या मूळ स्वरूपाच्या जवळ जातो. हे आपले मूळ स्वरूप परमानंदमय आहे, ईश्वरमय आहे.

आपण ईश्वर आहोत. परमानंदमय आहोत. म्हणून आपल्याला सतत आनंद हवा असतो. आपल्याला स्वतःच्या परब्रह्ममय, परमानंदमय या स्वरूपाचा विसर पडल्याकारणाने आनंदाची उणीव आपल्याला सतत जाणवत असते. खूप पैसा आहे पण मी सुखी नाही. उपभोगाची खूप साधने आहेत, तरीपण मनाला तृप्ती नाही. भरपूर सत्ता हातात आहे, तरीही मन सुखी नाही. देशाचा राजा झालो, तरीही मी सुखी नाही. साधू संन्यासी झालो, सुखी असल्याचा देखावा निर्माण केला, तरीही मी सुखी नाही अशी या 'मी' ची अवस्था असते. अशा प्रकारे आपण आपले काहीतरी हरवले आहे अशा अवस्थेत वावरत असतो. काय हरवले आहे ते समजत नाही व जे हरवले आहे ते सापडत नाही. पृथ्वीतलावरील अनेक वस्तूंमध्ये मनुष्य सुख़ाचा शोध घेतो. परंतु त्याला सुख कोठेही सापडत नाही. हे सारे सर्वसामान्य

माणसाविषयी लिहिलेले आहे.

खऱ्या सुखाचा व खऱ्या आनंदाचा शोध घेण्यासाठी प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने पोहावे लागते. प्रारब्धानुसार जे काही प्राप्त होईल, त्याचा आनंदाने स्वीकार करावा लागतो. सर्व कर्मे करतांना मन ईश्वराच्या चरणी ठेवावे लागते व ईश्वराला आवडेल असेच वागावे लागते. इतरांना क्षमा करणे ईश्वराला आवडते म्हणून कोणी कसाही वागला तरी आपण त्याला क्षमा करावी. त्याला धडा शिकवण्याची वृत्ती आपल्यामध्ये असू नये.

दुर्बलांना नेहमी मदत करत राहावी. इतरांना जास्तीत जास्त आनंद देण्याचा प्रयत्न करावा. ईश्वराची स्तोत्रे दररोज कमीत कमी एक तास वाचावी. दररोज किमान एक तास सोऽहम् ध्यान करावे. सोऽहम् साधना जास्त वेळ करण्यास जमले तर अधिक चांगले.

मनाला शांत ठेवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. मनामध्ये विचारांच्या लाटा उठणे बंद झाले की, आपल्या स्वरूपाचा साक्षात्कार सुरुवातीला काही क्षण होतो. साधनेची वेळ जसजशी वाढत जाईल तसतसा हा अनुभव वाढत जातो व परमानंदाचा ठेवा आपल्याला प्राप्त होतो. ईश्वराचा शोध घेण्याचे काम येथे संपलेले असते व आपण ईश्वरस्वरूप झालेले असतो. या अवस्थेला **सहजावस्था** असे म्हणतात. **जग, जीवन, जगदीश्वर, भक्त, भक्ती, भगवंत, साधना, साधक, साध्य** अशा त्रिपुटींचा विलय परब्रह्मात झालेला असतो व सर्वत्र एकच परब्रह्म भरलेले आहे असा अनुभव येत असतो, हा अनुभव कलेकलेने येतो. हा अनुभव अखंड येऊ लागल्यानंतर **सिद्धावस्था** प्राप्त होते.

# ७. परब्रह्म

परब्रह्म हे तुमचे माझे समस्त जीवसृष्टीचे चराचराचे आदिकारण आहे. कोट्यावधी ईश्वर परब्रह्मामध्ये तादात्म्य राहून सृष्टी नियंत्रणाचे कार्य करत असतात. कोट्यावधी सिद्ध-महात्मे परब्रह्माशी तादात्म्य पावून सृष्टीच्या कल्याणाचे कार्य करत असतात. परब्रह्म स्वरूप असे हे सिद्ध-महात्मे जीवसृष्टीच्या उद्धारासाठी परब्रह्माच्या इच्छेनुसार अवतार धारण करतात.

परब्रह्म हे प्राणवायुप्रमाणे आहे. प्राणवायुहूनही ते अत्यंत सूक्ष्म आहे. या प्राणवायुमुळे सज्जन मनुष्य जसा जगतो तसाच दुर्जन मनुष्यही जगतो. प्राणी, पशुही या प्राणवायुवरच जगत असतात. या प्राण-शक्तीमुळेच पृथ्वी जिवंत आहे. ज्याप्रमाणे तलावामध्ये काठोकाठ पाणी भरलेले असते. या तलावाच्या पाण्यामध्ये एक ग्लास क्लोरीन वायु टाकला असता, संपूर्ण तलावातील पाणी शुद्ध होते त्याप्रमाणे विश्वभर जो प्राणवायु पसरलेला आहे त्या प्राणवायुला तसेच प्राणवायुहूनही अत्यंत सूक्ष्म असणाऱ्या सर्व वायुंना पवित्रता, शुद्धता, तेज आणि संजीवन प्रदान करण्याचे कार्य परब्रह्म करते.

बाहुलीमध्ये एक बॅटरी सेल असतो. या बॅटरी सेलमुळे त्या बाहुलीच्या आत बसविलेले मशीन चालू होते व ती बाहुली चालू लागते, बोलू लागते, गाऊ लागते, हातवारे करू लागते अगदी त्याच प्रमाणे परब्रह्म संपूर्ण विश्वाला संजीवन देत असते व या परब्रह्मामुळेच आपण चालतो, बोलतो, खातो, पितो. सूर्यही या परब्रह्मामुळेच प्रकाश देतो.

अनंत ब्रह्माण्डे या परब्रह्माच्या पोटात सामावलेली आहेत. पृथ्वी, ग्रह, नक्षत्र, तारे या परब्रह्मामुळे प्रकाशतात व फिरत असतात. या संपूर्ण विश्वामध्ये परब्रह्माशिवाय दुसरे काही नाही. एकच परब्रह्म विविध रूपांनी नटलेले आहे.

ज्याप्रमाणे सोन्याचे असंख्य अलंकार होतात परंतु सर्व अलंकारात सोन्याशिवाय दुसरे काहीच नसते त्याप्रमाणे या विश्वात परब्रह्माशिवाय दुसरे काहीही नाही.

ज्याप्रमाणे बल्ब, ट्युब, फॅन, टीव्ही, कुलर, फ्रीज, एअर-कंडीशनर इत्यादी हजारो प्रकारची विजेची उपकरणे, हजारो प्रकारची मशीन्स ही फक्त विजेवर (इलेक्ट्रीसिटीवर) चालतात, वीज नसेल तर सगळा कारभार ठप्प होतो, त्याप्रमाणे सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र, तारे या सर्वांना परब्रह्म प्रकाशित करते. परब्रह्म हेच सर्वांचे जीवन आहे.

परब्रह्म दगडात आहे, परब्रह्म झाडात आहे, परब्रह्म प्राणी, पशू, पक्षी यांच्यात आहे. सृष्टीतील यच्चयावत् जड व चेतन पदार्थांमध्ये परब्रह्म भरून राहिलेले आहे. चेतन पदार्थातील परब्रह्म आपल्या अनुभवास येते. झाडाच्या पानामध्ये असणारे चैतन्य आपण अनुभवू शकतो. परंतु जड पदार्थातील म्हणजे दगड, लोखंड, प्लॅस्टीक, लाकूड इत्यादी पदार्थातील परब्रह्म आपल्या अनुभवास येत नाही. तरीही या

विश्वामध्ये परब्रह्माशिवाय अन्य काहीच नाही हेच सत्य आहे.

ज्योतिर्मय स्वरूपात राहणारे योगी, स्वर्गलोकातील देवी-देवता, सिद्ध-महात्मे, ईश्वरस्वरूप-परमेश्वरस्वरूप महात्मे, पृथ्वीतलावर आत्तापर्यंत होऊन गेलेले सर्व अवतार, हिमालयासारख्या पर्वतातून राहणारे योगी-योगिनी, मनुष्याच्या दृष्टीला न दिसणारे परंतु विविध ग्रहांवरती वास्तव्य करून राहणारे, विविध प्रकारचे आत्मे सारेच परब्रह्माची उपासना करत असतात.

परब्रह्म जरी सर्व व्यापक असले तरी अहंकार, कल्पना, विचार, यांच्या जाळ्यात गुरफटलेल्या मानवाला परब्रह्माचा अनुभव येत नाही. कूटस्थामध्ये (fontanel) लाईटरच्या स्पार्कप्रमाणे परब्रह्म आपले अस्तित्व दाखविते. मसुराच्या दाण्याप्रमाणे असणाऱ्या नीलबिन्दूरूप महाकारणदेहाला हे तेजस्विता प्रदान करते व परमात्मस्वरूपही प्रदान करते. त्यामुळे परब्रह्म जसे सर्वत्र संचलेले आहे तसाच नीलबिन्दूरूप दिसणारा परमात्मास्वरूप महाकारणदेहही सर्वव्यापी असतो.

जन्मोजन्मींच्या कर्म संस्काराची बीजे धारण करणाऱ्या अंगुष्ठ-प्रमाण कारणदेहालाही परब्रह्माकडूनच चैतन्य प्राप्त होत असते व माणसाच्या सूक्ष्मदेहाला म्हणजे जीवात्म्यालाही परब्रह्माकडूनच चेतना प्राप्त होत असते. माणसाच्या सूक्ष्मदेहाला म्हणजे जीवात्म्याला जी चेतना परब्रह्माकडून मिळत असते त्या चेतनेमुळेच स्थूलशरीरातील श्वास घेणे, सोडणे, रुधिराभिसरण, अन्नपचन इत्यादी क्रिया आपोआप होत असतात. गाढ झोपेतही यांचे कार्य चालूच असते.

अंतर्मुख व्हा व थोडा विचार करा -

स्वतःच्या मनाला, बुद्धीला प्रश्न विचारा मी कोण आहे ? मी

जर हाडामांसाचा देह आहे तर जेव्हा **मी** या देहातून बाजूला होईन तेव्हा हा देह मृत होईल. म्हणजे एक गोष्ट सिद्ध झाली की, मी म्हणजे हाडामांसाचा देह नव्हे.

जर मी म्हणजे हाडामांसाचा देह नव्हे तर मी कोणीतरी **सूक्ष्म** आहे हे सिद्ध होते.

मी कोणीतरी सूक्ष्म आहे हे लक्षात आले. आता मी सूक्ष्म आहे म्हणजे कोण आहे याचा शोध घ्यावयास हवा. माझे सूक्ष्म स्वरूप म्हणजे काय आहे याचा शोध घेण्यासाठी एखाद्या प्रकाशमार्गी सद्‌गुरुची सेवा करावी लागते.

प्रकाशमार्गी सद्‌गुरुची सेवा केल्यानंतर सूक्ष्मशरीरातील मानस-सरोवरामध्ये उठणाऱ्या विचारांच्या लाटा कमी कमी होऊ लागतात. सद्‌गुरु सांगतात, ''हंस हो ! म्हणजे मानस-सरोवरात तुला विहार करता येईल, विचारांचे वादळ शमेल.''

हंस स्वरूप प्राप्त झाल्यानंतर विचारांचे वादळ शमते. परंतु विचार तरंग उठतच राहतात. हंसाला मानस-सरोवरात उठणाऱ्या या विचार तरंगाचाही कंटाळा येतो. तो पंख फडफडवितो. आकाशाच्या दिशेने झेप घेतो. विहंगममार्गाचे अनुसरण करतो. परमहंस होतो, जीवनमुक्त होतो, परब्रह्माच्या प्रान्तात विहार करतो.

# ८. परमहंस

परब्रह्म हे आकाशाप्रमाणे आहे. अत्यंत सूक्ष्म आहे म्हणून आध्यात्मिक भाषेमध्ये त्याला चिदाकाश, महदाकाश, शून्य, महाशून्य, परमशून्य असे म्हणतात. व्यावहारिक भाषेमध्ये याला अवकाश, अंतराळ, खगोल इत्यादी स्थूल नावे आहेत. या महाशून्यामध्ये कोट्यावधी नक्षत्र, तारे, ग्रह, सूर्य फिरत असतात. असे म्हणतात की, आपला सूर्य इतका मोठा आहे की, त्या सूर्याच्या पोटामध्ये तेरा लक्ष पृथ्वी सहज मावतील व अंतराळामध्ये इतक्या विशाल आकाराचे तारे आहेत की, ज्यांच्या पोटामध्ये आपले हजारो सूर्य मावतील. एकंदरीत हे सगळे विश्व अफाट आहे.

या अफाट व अचाट विश्वामध्ये मुक्तपणे, स्वैरपणे जो आत्मा संचार करू शकतो, प्रत्येक ग्रहगोलावरील जीवसृष्टीचे ज्ञान मिळवू शकतो, जीवसृष्टीला पाहू शकतो, अशा महान आत्म्याला परमहंस म्हणतात. परमहंस पदाला पोहोचलेला महात्मा परमात्मास्वरूप असतो. हे परमहंस पद कसे प्राप्त होते हे आपण थोडक्यात पाहू.

परमहंसपद प्राप्त होण्यासाठी चार अवस्थांमधून जावे लागते. या चार अवस्था पुढील प्रमाणे–

**१) कुटीचक २) बहुदक ३) हंस ४) परमहंस**

या चारही अवस्थांमध्ये कोणते अनुभव येतात व एकेक अवस्था कशी पचवावी लागते हे आपण थोडक्यात पाहू !

## कुटीचक

ज्याचे मन अत्यंत स्वच्छ आहे, ज्याच्या मनात कसल्याही इच्छा आकांक्षा नाहीत, ज्याला कसलीही अपेक्षा नाही, जो मनाने तृप्त आहे, असा साधक एखाद्या नदीच्या किनारी एखादी कुटी म्हणजे झोपडी बांधतो व या झोपडीमध्ये तो सतत सोऽहम् ध्यान करत राहतो. तो सोऽहम् ध्यानामध्ये रंगून जातो.

वातावरणातील व भूगर्भातील दुष्ट शक्तींनी त्रास देऊ नये म्हणून तो साधक सात्त्विक देवतेच्या स्तोत्रांचे रोज एक तासभर पाठ करतो व नंतरच सोऽहम् ध्यानात रंगून जातो.

सुरुवातीला काही काळ विचारांचे वादळ त्याच्या मनात थैमान घालत असते. काही काळाच्या अभ्यासानंतर मन शांत होऊ लागते.

सुरुवातीला डोळ्यासमोर गडद अंधार दिसतो. या गडद अंधःकाराला भूताकाश असे म्हणतात. हळूहळू हा अंधार विरळ होऊ लागतो व सूर्योदयापूर्वीचे आकाश जसे असते तसे आकाश दिसू लागते. या आकाशाला **चित्ताकाश** असे म्हणतात. साधकाचे सूक्ष्मशरीर येथपर्यंत अतिशय शुद्ध झालेले असते. काही काही साधकांचे शरीर इतके पारदर्शक होते की या पारदर्शक सूक्ष्मशरीरामध्ये अनेक देवी-देवतांची दर्शने होतात.

## बहुदक

साधकाच्या चित्ताची शुद्धी झाल्यानंतर मन एकाग्र होऊ लागते. मन एकाग्र होणे म्हणजे कुठल्यातरी एकाच विचारावर मनाला

बारा ते चौदा तासांपर्यंत अडकवून ठेवणे. याला मन एकाग्र होणे असे म्हणतात. हीच खरी **एकाग्रता** होय.

बहुदक म्हणजे बगळा ज्याप्रमाणे एकाग्रतेने ध्यान करतो व मासा जवळ येताच पट्कन सूर मारून त्याला पकडतो व उंच आकाशात झेप घेऊन एखाद्या झाडावर जाऊन बसतो व तो मासा खाण्याचा आनंद लुटतो.

मन चोवीस तास अहोरात्र एकाच विषयावर एकाग्र होऊ लागले की, त्या अवस्थेला **धारणा** असे म्हणतात. या अवस्थेमध्ये अनेक सिद्धी प्राप्त होतात. म्हणून या अवस्थेला बहुदक असे नांव दिलेले आहे. येथे योग्यांना असे म्हणायचे आहे की, अनेक सिद्धी प्राप्त करणारे तुम्ही बगळे होणार की, या **बहुदक** स्टेजकडे दुर्लक्ष करून पुढे जाणार?

जे साधक बहुदक म्हणजे बगळ्याप्रमाणे मनाची एकाग्रता या स्टेजमध्ये राहतात ते कशाप्रकारे मनाची एकाग्रता करतात व सिद्धीरूपी मासे जे मानस सरोवरात फिरत असतात ते कसे पकडतात याची आपण थोडीफार माहिती घेऊ, कारण हा विषय खूपच मोठा आहे.. केवळ या विषयावरच एक पुस्तक लिहिता येईल.

एकाग्रता प्राप्त झाल्याकारणाने साधक सिद्धींची प्राप्ती करून देणारा एखादा मंत्र निवडतो व त्या मंत्राचा जप करू लागतो. काही दिवसातच त्याला ती सिद्धी प्राप्त होते. त्यानंतर तो दुसरी सिद्धी प्राप्त करण्यासाठी मंत्राचा जप करतो. या मंत्रजपाने त्याला दुसरी सिद्धी प्राप्त होते.

बगळा ज्याप्रमाणे एकाग्रतेने माश्याचे ध्यान करतो व एकेक मासा खाण्याचा आनंद लुटतो त्याप्रमाणे साधक एकेका मंत्राचा जप करतो व एकेक सिद्धी प्राप्त करू लागतो. असे हजारो मंत्र आहेत व

हजारो मंत्रांच्या हजारो सिद्धी आहेत.

| | | |
|---|---|---|
| **अतीत अनागत ज्ञान** | - | कोणाचेही भूत-भविष्य जाणणे. |
| **त्रिकालज्ञान** | - | भूत, भविष्य, वर्तमान जाणणे. |
| **पशू-पक्षी भाषा ज्ञान** | - | सर्व प्राणी व पशू काय बोलतात हे ओळखणे. |
| **अरिष्टज्ञान** | - | माणसावर येणाऱ्या संकटाचे आगाऊ ज्ञान होणे. |
| **भुवनज्ञानम्** | - | जगात कोठे काय चालले आहे हे बसल्या जागी समजणे. |
| **दूरदर्शन** | - | बसल्या जागेवरून हजारो मैलावर कोण काय करीत आहे ते पाहणे. |
| **दूरश्रवण** | - | शेकडो मैलावर दोन व्यक्ती आपसात काय बोलत आहेत ते ऐकणे. |
| **वनस्पतीज्ञानम्** | - | कुठली वनस्पती कुठल्या रोगावर उपयोगी येते हे जाणून घेणे. |
| **किमया** | - | धातुपासून सोने बनविणे. |

**यक्ष-यक्षिणी साधन** - वातावरणामध्ये अनेक प्रकारच्या यक्ष-यक्षिणी निवास करून असतात. यांना अर्धदेवता मानले जाते. याशिवाय असंख्य क्षुद्र शक्तीही असतात. मनाची एकाग्रता साध्य झालेला साधक यांच्या मंत्रांचा जप करतो व विविध प्रकारचे चमत्कार करण्याचे सामर्थ्य प्राप्त करतो.

वरील सर्व माहिती एवढ्याकरिताच लिहिली आहे की, एकाग्रता प्राप्त झाल्यानंतरसुद्धा साधक कसे भरकटतात व सिद्धींच्या जाळ्यात कसे फसतात. बगळे होऊन सिद्धींचे मासे खाण्यात कसा आनंद मानतात. प्रकाशमार्ग प्राप्त होऊनही सिद्धींच्या मोहांना कसे फसतात. वाचकांना हे समजावे म्हणून या सर्व गोष्टी लिहिल्या आहेत.

जे साधक सिद्धींच्या साधना करत नाहीत व फक्त सोऽहम् ध्यान करत राहतात, त्यांच्या समोर मोहाचे आणखी एक दालन उघडले जाते. या दालनामध्ये विविध प्रकारची सामर्थ्ये भरलेली असतात.

प्रकार असा होतो की, साधकाची इच्छा नसतांनाही अंगी विविध प्रकारची सामर्थ्ये प्रकट होऊ लागतात, दुसऱ्याच्या मनातील विचार कळू लागतात, अचानकपणे मन आपल्या पायावर अथवा हातावर एकाग्र केले असता तो हात अथवा पाय पहिलवानसुद्धा उचलू शकत नाही. तर पुष्कळवेळा संपूर्ण शरीर कापसासारखे हलके होते. अशाप्रकारच्या योगसिद्धी अंगी आपोआप प्रकट होऊ लागतात. साधकाने या सर्व सिद्धींकडे दुर्लक्ष करावयाचे असते.

## हंस

साधना करतांना प्राप्त होणाऱ्या सर्व सिद्धींकडे जो दुर्लक्ष करतो, सिद्धींचा स्वीकार करण्याचे टाळतो, त्याला **हंस** स्टेज प्राप्त होते.

मानस सरोवरामध्ये विहार करणारा हा **हंस** सद्‌गुणांचे मोती खातो. मानस सरोवर म्हणजे आपले मन व **हंस** म्हणजे सोऽहम् ध्यान करणारा साधक !

असा साधक सिद्धी-सामर्थ्याचा स्वीकार करत नाही.

जास्तीत जास्त सद्‌गुण अंगी बाणण्याचा प्रयत्न करतो. मनाला परब्रह्मामध्ये लीन करण्याचा प्रयत्न करतो.

लहानपणी पोथ्या वाचतांना त्याचप्रमाणे विद्वान लोकांनी लिहिलेले आध्यात्मिक ग्रंथ वाचतांना पुढील गोष्टींचे अत्यंत आश्चर्य वाटत असे. या सर्व आध्यात्मिक ग्रंथांमध्ये पुढील गोष्टींचे रसभरीत वर्णन आहे.

१) कावळा जेव्हा मानस सरोवरास जाऊन पोहोचतो तेव्हा तो आपोआप हंस होतो.

२) दुधामध्ये पाणी मिसळून ते जर हंसासमोर ठेवले तर हंस त्यातील फक्त दूध पितो व भांड्यामध्ये पाणी शिल्लक राहते. हंसाच्या या अद्‌भुत करणीचा भारतीय विद्वानांवर इतका प्रभाव पडला की त्यांनी हंस नीर-क्षीर न्याय म्हणून शब्दप्रयोग व्याकरणांत प्रचलित केला व आध्यात्माच्या जवळजवळ सर्व पुस्तकांमध्ये हंस नीर-क्षीर न्याय हा शब्दप्रयोग सर्रास वापरला जातो.

३) हंस फक्त मोती खातो व इतर कुठल्याही खाद्य पदार्थांकडे तो मुळीच पाहत नाही.

सुमारे चाळीस वर्षांपूर्वीचे विद्वान, पंडीत, शास्त्री, किर्तनकार, पुराणिक या विषयावर नेहमीच चर्चा करत असत.

माझ्या ज्ञानाच्या कक्षा जसजशा वाढू लागल्या तसतसे या सगळ्या गोष्टींचे अर्थ कळू लागले.

१) कावळा म्हणजे ज्याचे सूक्ष्मशरीर काळेकुट्ट आहे, असा जीवात्मा किंवा असा मनुष्य. अशा माणसाने जर मनाचा निश्चय केला व विविध प्रकारच्या उपासना करून त्याने मनात उठणाऱ्या विचारांचे

वादळ शांत केले तर तो मनरूपी सरोवरामध्ये पोहणारा हंस होईल. जो मनरूपी सरोवरावर किंवा मानस सरोवरात स्वैरपणे विहार करतो त्याला हंस असे म्हणतात.

साधनेच्या सुरुवातीला साधक कावळा असतो. मनावर विजय मिळवून तो हंस बनतो असा याचा अर्थ.

२) हंस पक्षी दूध आणि पाणी यांना वेगळे करू शकत नाही. परंतु हंस स्टेज प्राप्त झालेला योगी जेवढे चांगले तेवढ्याचाच स्वीकार करतो व वाईटाचा तो स्वीकार  करत नाही.

३) हंस पक्षी चारा खातो. परंतु हंस स्टेज प्राप्त झालेला योगी फक्त सद्‌गुणांचाच स्वीकार करतो, तो सद्‌गुण शिकतो. सद्‌गुण अंगी बाणण्याचा प्रयत्न करतो.

आमच्या प्राचीन विद्वानांनी उपमा अलंकाराचा स्वैरपणे वापर करून जनतेची भरपूर दिशाभूल केलेली आहे व हा प्रकार जवळजवळ सर्वच ग्रंथांनी केलेला आहे असो.

श्वास घेतांना सो व सोडतांना हम्‌ असा जो नैसर्गिक ध्वनि होत असतो, या ध्वनिवर लक्ष केन्द्रीत करून रोज बारा तास याप्रमाणे अनेक वर्षे साधना केल्यानंतर हंस ही स्टेज प्राप्त होते. अर्थात परमेश्वराची कृपा असेल, गुरुची कृपा असेल, प्रारब्ध शुद्ध झालेले असेल, मन स्वच्छ असेल, चित्तशुद्धी झालेली असेल तरच या साधनेत यश येते अन्यथा या साधनेत यश येत नाही.

अनेक वर्षे सोऽहम्‌ साधना केल्यानंतर चित्ताकाशामध्ये हंस (साधक) विहार करू लागतो. या चित्ताकाशात त्याला अनेक योगी भेटतात, पुढील मार्गदर्शन करतात, आत्मा स्फटिकाप्रमाणे शुद्ध

होतो. समाधी लागते. अधून मधून **चिदाकाशाचे** दर्शनही होते. हृदय परमानंदाने भरून ओसंडून वाहू लागते, अशा माणसाला **उत्तम पुरुष** म्हटले जाते.

## परमहंस

हंस स्टेज अंगी जिरल्यानंतर योग्याला उत्तम पुरुष म्हटले जाते; महात्मा म्हटले जाते; तर परमहंस स्टेज अंगी जिरल्यानंतर योग्याला पुरुषोत्तम अथवा परमात्मा म्हटले जाते.

हंस स्टेज पूर्णपणे प्राप्त झाल्यानंतर आत्म्याचा आणखी विकास होऊ लागतो. तद्नंतर एक एक मितीवर (dimensions) विजय मिळवित पुढे जावे लागते. एकूण नऊ मिती आहेत. या नऊही मिती पार करून पुढे गेल्यानंतर **परमहंस** ही स्टेज प्राप्त होते. येथे आत्मा परमात्मा होतो. जीवनमुक्त होतो. या अवस्थेचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात.

परमहंस अवस्थेतील सिद्धयोगी नेहमी महाशून्यात निवास करतात. याला **चिदाकाश** असेही म्हणतात. ही देवी-देवतांच्याही पलिकडची अवस्था आहे.

ही स्टेज प्राप्त करण्यासाठी स्वर्गलोकातील देवी-देवता, साधक, पुनःश्च भूतलावर मानवरूपाने जन्म घेतात. कारण मानवदेहाने साधना करूनच ही अवस्था गाठावी लागते. स्वर्गलोकातील दिव्यदेहाने ही अवस्था गाठायला हजारो वर्षे लागतात. मानवदेहाने ही अवस्था गाठायला फक्त पन्नास वर्षांची साधना पुरेशी असते. मात्र साधकाचे चित्त अतिशय शुद्ध असावे लागते. तरच पन्नास वर्षात तो परमहंस स्टेजपर्यंत जाऊन पोहोचू शकतो.

परमहंस स्टेज अंगी पूर्णपणे जिरविल्यानंतर जीवनमुक्ताला दोन पर्याय शिल्लक राहतात.

**परब्रह्मात विलीन व्हायचे, की, परमेश्वर व्हायचे !**

बरेचसे योगी परब्रह्मात विलीन होतात. लाखातील एखादाच परमेश्वर पदापर्यंत जाऊन पोहोचतो. याचा अर्थ असा नव्हे की परमेश्वर हे पद परब्रह्मापेक्षा श्रेष्ठ आहे. येथे फरक असा असतो की परब्रह्मात विलीन होणे म्हणजे चैतन्यात विलीन होणे व परमेश्वर होणे म्हणजे ऋषी होऊन हजारो लाखो वर्षे तपश्चर्या करत राहणे.

परमेश्वर होण्यासाठी परब्रह्म स्वरूपता प्राप्त झाल्यानंतर देहासहित निर्गुण निराकार होऊन लाखो वर्षे तपःश्चर्या करावी लागते. विश्व कल्याणासाठी अनेक वेळा अवतारही घ्यावे लागतात. पुष्कळवेळा हजारो लाखो लोकांची पापे स्वतः भोगून काढावी लागतात. या सर्व गोष्टी अतिशय कष्टाच्या असतात म्हणून लाखातील एखादाच परमेश्वर पदापर्यंत जाऊन पोहोचतो असे म्हटले आहे.

भारतातील अनेक पर्वतांमध्ये हजारो वर्षांचे ऋषी आजही तपःश्चर्या करत आहेत. उत्तर ध्रुवावर तसेच आल्पस् पर्वतातही काही ऋषी तपस्या करत आहेत. हे सर्व ऋषी अनादी कालापासून तपःश्चर्या करत असून पुढे अनंतकालपर्यंत तपःश्चर्या करत राहणार आहेत.

सिक्कीमहून तिबेटला जाणाऱ्या मार्गामध्ये आजही काही गुप्त स्थाने असून येथे हजारो वर्षांचे योगी तपस्या करत आहेत.

अशा योग्यांना, ऋषींना **नित्यसिद्ध** असे म्हटले जाते. तीन

प्रकारचे सिद्ध असतात.

**१) नित्यसिद्ध –** हजारो वर्षे तपःश्चर्या करत राहणाऱ्या ऋषींना नित्यसिद्ध म्हटले जाते. यांचे देह चिन्मय असतात. हे कधी कधी अवतार घेतात व पृथ्वीवरील पुण्य वाढवितात.


**२) साधनासिद्ध –** विविध प्रकारच्या साधना करून हे लोक सिद्ध बनतात व जीवनमुक्त सिद्धावस्था प्राप्त होताच परब्रह्मात विलीन होतात.

**३) कृपासिद्ध –** एखादा करुणाशील दयाळू सत्पुरुष एखाद्या सद्गुणी माणसावर कृपा करतो व हा माणूस पुढे सिद्ध बनतो. अशा व्यक्तीला कृपासिद्ध म्हटले जाते.

अशाप्रकारे कुटीचक या अवस्थेपासून आध्यात्माचा प्रवास सुरू होऊन परमहंस पदापर्यंत प्रवास पूर्ण केला जातो.

परमहंस पदापर्यंतचा प्रवास पूर्ण झाल्यानंतर सिद्धावस्था प्राप्त व्हावी म्हणून प्रयत्न केला जातो. मूलाधारचक्रापासून सहस्रारचक्रापर्यंत कुंडलिनीचा प्रवास पूर्ण झाल्यानंतर परमहंस अवस्था प्राप्त होते. नंतरच सिद्धावस्था प्राप्त करण्यासाठी पुढील साधना केल्या जातात. या साधना करण्यासंबंधी योग्य ती मदत सिद्धयोग्यांकडून मिळते. या साधना हिमालयातील गुप्त आश्रमांमध्ये शिकविल्या जातात.

# ९. द्रौपदी स्वयंवर



द्रौपदी स्वयंवर या कथेतील आध्यात्म

रामायण व महाभारत हे दोन्ही अतिशय गूढ ग्रंथ असून कथा सांगण्याच्या रूपाने या ग्रंथांमध्ये अतिशय गूढ व गुप्त अशा साधना सांगितल्या आहेत. हे ग्रंथ हजारो वर्षांपूर्वी लिहिले गेले असल्याने, नंतरच्या काळात या ग्रंथांमध्ये बरीच भेसळ झाली असण्याची शक्यता आहे. येथे आपण द्रौपदी स्वयंवर या कथेतील आध्यात्म पाहू !

मूळ कथा अशी,

द्रुपद राजाने आपली मुलगी द्रौपदी, हिचे स्वयंवर आयोजित केले होते. स्वयंवरात '**पण**' असा होता की,

दरबारामध्ये एक मत्स्ययंत्र टांगलेले होते. या मत्स्ययंत्रातील मासा गरगर फिरत होता. खाली एका थाळीमध्ये पाणी ठेवलेले होते. गरगर फिरणाऱ्या माश्याचे प्रतिबिंब त्या पाण्यात पडलेले होते. या पाण्यात पाहायचे व माश्याला बाण मारायचा असा '**पण**' द्रुपद राजाने लावलेला होता. जो कोणी हा **पण** जिंकेल, त्याला द्रौपदी वरमाला घालील असे त्याने जाहीर केले होते. अर्जुनाने हा '**पण**' जिंकला व द्रौपदीने त्याला वरमाला घातली.

धर्म, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव या पाच पांडवांची द्रौपदी ही पत्नी झाली.

हिन्दू परंपरेनुसार एक धार्मिक कथा म्हणून शेकडो वर्षे आम्ही ही कथा आवडीने वाचतो, ऐकतो व आम्हाला आनंद होतो. परंतु इतर धर्मातील लोक विचारतात पाच सख्ख्या भावांनी एकाच स्त्री बरोबर लग्न करणे हे योग्य आहे का ?

या कथेच्या द्वारा व्यास महर्षींनी एक आध्यात्मिक साधना सांगितली आहे. ती साधना अशी,

पाच पांडव म्हणजे शरीरात राहणारे पाच मुख्य वायु ! प्राण, अपान, व्यान, उदान, समान ! शरीरात राहणाऱ्या या पंचप्राणांना ऋषींनी पाच पांडव अशी उपमा दिली.

द्रौपदी म्हणजे **कुंडलिनी शक्ती.**

मत्स्ययंत्र म्हणजे मनात गरगर फिरणारे विचार चक्र.

सोऽहम्  साधना करा व विचार चक्राचे भेदन करा म्हणजे कुंडलिनी शक्ती जागृत होईल. असा या कथेचा अर्थ आहे.

सोऽहम् साधना सुरू केल्यानंतर प्राण जेव्हा आज्ञाचक्रातून सहस्त्रार चक्राकडे जाऊ लागतो, तेव्हा दोन्ही भिवयांच्या वरती धनुष्याचा आकार तयार होतो. साधना करतांना हा आकार स्पष्टपणे दिसतो  व श्वासाला बाणाचे रूप प्राप्त होते. मनरूपी मत्स्याचा वेध केला जातो. म्हणजे मनरूपी गरगर फिरणारा मासा मारला जातो. कुंडलिनी शक्ती जागृत होते. विचारचक्र पूर्णपणे थांबते. मनाची एकाग्रता साध्य होते व जागृत झालेली कुंडलिनी शक्ती पुढील सर्व साधना करून घेते व साधक सिद्धपुरुष बनतो असा या कथेचा अर्थ आहे.

## द्रौपदी वस्त्रहरण

महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरण हा प्रसंग सर्वांना परिचित आहे. या प्रसंगाद्वारे व्यास महर्षींनी एक गूढ संदेश सर्व साधकांना दिलेला आहे.  तो गूढ संदेश असा -

कुंडलिनी शक्तीला जबरदस्तीने आधीन करण्याचा प्रयत्न करू नका, तसा प्रयत्न केल्यास ती अग्निस्वरूप कुंडलिनी संपूर्ण कुळाचा विनाश करेल.

गूढ व अघोरी शक्तींच्या प्राप्तीसाठी, ज्या शक्तींद्वारे संपूर्ण समाजाला मुठीत ठेवता येईल अशा शक्तींच्या प्राप्तीसाठी, तांत्रिक, कापालिक, अघोरी, औघड मार्गातील साधक स्मशान जागरणासारख्या क्रिया करतात. कच्चे मांस खातात, रक्त पितात, प्रेतावर बसून साधना करतात. अशा प्रकारच्या आसुरी शक्ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे

म्हणजे कुंडलिनी शक्तीचे वस्त्रहरण करणे होय. जे लोक असे प्रकार करतात त्यांचा नाश होतो असे व्यास महर्षींना सांगावयाचे आहे. यासाठी त्यांनी द्रौपदी वस्त्रहरण या काल्पनिक प्रसंगाची निर्मिती केली.

येथे धृतराष्ट्र म्हणजे ज्याची बुद्धी आंधळी आहे, म्हणजे ज्याला काही समजत नाही, असा मूढ परंतु निश्चयी स्वभावाचा मनुष्य ! दुर्योधन म्हणजे या माणसातील भयंकर अहंकार! व दुःशासन म्हणजे बेशिस्त पद्धतिने केलेल्या वेड्यावाकड्या साधना!

द्रौपदी वस्त्रहरण या कथेतील अर्थ हा असा आहे. आजही असे अघोरी साधू आहेत की जे कच्च्या रक्त, मांसाने हवन करतात. रक्त, मांसाने हवन करून वातावरणातील विविध शक्तींना आधीन करण्याचा प्रयत्न करतात. व्यास महर्षींना असे म्हणायचे आहे की, असे प्रकार करू नका, अशा प्रकाराने सृष्टीवर संहाराची संकटे येतात.

**आध्यात्म रामायण**

महाभारताप्रमाणेच रामायणही गूढ व रहस्यमय भाषेत लिहिलेले आहे. रामायणाची कथा थोडक्यात अशी,

अहंकार रूपी रावणाची कन्या सीता म्हणजे कुंडलिनी शक्ती ! जन्माला आल्याबरोबर रावणाला म्हणते की, मी तुझा सर्वनाश करीन. अहंकार रूपी रावण सीतेला जनकाच्या राज्यसीमेमध्ये एका पेटीत घालून पुरतो. याचा अर्थ – जनक म्हणजे मनुष्याचा जनन प्रदेश, नाभीच्या खालचा प्रदेश, येथे कुंडलिनी शक्ती सुप्तावस्थेमध्ये असते. थोडक्यात अहंकारी माणसाची (रावणाची) कुंडलिनी शक्ती (सीता) जनन प्रदेशामध्ये (जनकाच्या राज्यामध्ये) हजारो वर्षे गाढ झोपलेली असते. (अहंकारामुळे गाडली गेलेली असते)

श्वासरूपी धनुष्याच्या आधाराने राम, सीता स्वयंवर जिंकतो म्हणजे श्वासाच्या साधनेने कुंडलिनी शक्ती जागृत होते.

कुंडलिनी शक्ती जेव्हा अनाहत चक्रापर्यंत जाते, तेव्हा तिचे कुंडलिनी हे नांव जाते व तिला मारूती असे म्हणतात. लक्ष्मण म्हणजे लक्षावर एकत्रित केलेले मन! म्हणजे मारूती व एकाग्र मन या उभयतांच्या सहाय्याने रावणाचा म्हणजे अहंकाराचा नाश करणे रामाला शक्य झाले.

**कथेचे तात्पर्य असे की अहंकारामुळे गाडली गेलेली कुंडलिनी शक्ती श्वासरूपी धनुष्याच्या आधाराने जागृत करा ! ती अनाहत चक्राच्या आसपास आली की तिचे रूपांतर मारूती मध्ये होईल. एकाग्र मनाची म्हणजे लक्ष्मणाची साथ तर तुम्हाला प्रथम पासून आहेच, या अहंकाराचा नाश करा व तुम्ही मनुष्य आहात देव बना, असा रामायणाचा खरा अर्थ आहे.**

म्हणून रामदास स्वामी रामाची आरती करतांना म्हणतात,

**जय देव जयदेव निज बोधा रामा।**

**परमार्थी आरती करी पूर्ण कामा ।।धृ।।**

**अर्थ –** विवेक व आत्मज्ञान याने संपन्न अशा माझ्या हृदयात राहणाऱ्या रामा, (परमात्मा) तू परिपूर्ण परमेश्वर आहेस. माझी आध्यात्मिक प्रगतीची इच्छा पूर्ण कर.

रामायण व महाभारत हे दोन्ही ग्रंथ गूढ व रहस्यमय भाषेत लिहिलेले आहेत. या ग्रंथांमध्ये आत्मा, मन, कुंडलिनी व माणसाच्या अंतरंगातील विविध प्रवृत्ती, अहंकार, दोष, दुर्गुण यांची वर्णने आहेत. या वर्णनांच्या आधाराने स्वतःतील दुःप्रवृत्ती कशा काढाव्यात व न

काढल्यास नाश कसा होतो; कुंडलिनी शक्तीला कसे हाताळावे, चुकीच्या पद्धतिने कुंडलिनी शक्तीला हाताळल्यास कुलसंहार कसा होतो, सद्‌गुण कसे श्रेष्ठ ठरतात; दुर्गुणांनी आपत्ती कशा ओढवतात, अशा अनेक गोष्टींची वर्णने या ग्रंथात आहेत.

रामायण व महाभारत हे ग्रंथ वाचण्याचे व प्रवचने देण्याचे नसून अभ्यास करण्याचे आहेत. हा पोस्ट ग्रॅज्युएशनचा स्टडी आहे, म्हणजे पदव्युत्तर अभ्यास आहे, परलोकातील पाचव्या स्तरामध्ये पुण्यात्म्यांना ग्रंथाचे खरे अर्थ समजावून दिले जातात. तेथे रामायण व महाभारत हे ग्रंथही समजावून दिले जातात. विशेष म्हणजे पृथ्वीतलावरील शुद्ध आध्यात्मिक ग्रंथांची सूक्ष्म जगतामध्ये नोंद होत असते. आकाशिक रेकॉर्ड मधून खरे आध्यात्मिक ग्रंथ कनिष्ठ स्वर्गलोकामध्ये ठेवले जातात व तेथे त्या ग्रंथांचा अभ्यास आत्म्यांकडून करून घेतला जातो. हे सर्व ग्रंथ सूक्ष्म द्रव्याचे बनलेले असतात.

# १०. गहनो कर्मणा गतिः

**गहनो कर्मणा गतिः** म्हणजे कर्माची गति गहन असते.

सृष्टीरूपी खेळ ईश्वराने रचला. अनेक रूपांनी तो स्वतःच नटला. प्रत्येक वेळी त्याने खेळामध्ये अनेक बदल केले. या अनेक बदलांपैकी एक बदल अत्यंत महत्त्वाचा ठरला. तो बदल म्हणजे–

**''प्रत्येक आत्मा, स्त्री–पुरुष रूपाने जे काही चांगले–वाईट कर्म करेल, ईश्वरीनियमानुसार त्याचे फळ त्याला भोगावे लागेल.''**

या ईश्वरीनियमामुळे प्रत्येक आत्म्याला शेकडो जन्म घ्यावे लागतात व तरीही त्याला मुक्ती मिळत नाही. या नियमांमुळे प्रचंड सुख व प्रचंड दुःख विश्वामध्ये निर्माण झाले व मुक्ती प्राप्त होणे दुरापास्त झाले. स्त्री–पुरुष संयोगाने प्रजोत्पत्ती, नरमादी संयोगाने पशू, प्राणी, पक्षी यांची उत्पत्ती यामुळे विश्वाचा पसारा प्रचंड वाढला. ''**कर्माप्रमाणे फळ,**'' ''**करावे तसे भरावे,**'' ''**पेरावे तसे उगवते,**'' ऋण, हत्या, वैर व त्यांचे दुष्परिणाम, सत्कर्म व दुष्कर्मांची फळे यामुळे मनुष्ययोनीला कर्मयोनी म्हणजे केलेल्या चांगल्या अथवा वाईट कर्मांचे फळ भोगणारी योनी, असे म्हटले जाते. तर मनुष्येतर योनीला म्हणजे पशू, प्राणी, पक्षी इत्यादी जीवात्म्यांना **भोगयोनी** असे म्हटले जाते.

भोगयोनीतील जीवांना म्हणजे पशू , प्राणी, पक्षी यांना जन्माला आल्यापासून मरेपर्यंत फक्त सुख-दुःख भोगायचे असते. क्रियामाण कर्माचा लेश त्यांना लागत नाही. म्हणजे या जन्मामध्ये ते जे काही कर्म करतात, त्यातून पाप किंवा पुण्य निर्माण होत नाही.

मनुष्य (स्त्री-पुरुष) जे काही कर्म करतात, त्याचे चांगले अथवा वाईट फळ भोगावे लागते. कर्माची फळे कशी भोगावी लागतात; याची एक-दोन सत्य उदाहरणे पुढे देत आहे.

रावसाहेब हे स्वभावाने परोपकारी होते. परिस्थितीने गरीब होते. तरीही गरजू माणसाला ते नेहमी मदत करत असत. गावात येणाऱ्या प्रत्येक साधू-संतांचा ते आवर्जून परामर्श घेत. गरीब होते परंतु आनंदी व समाधानी होते.

त्यांची बहीण मुंबईला राहत होती. नवऱ्याला चांगली नोकरी होती. मुले शिकत होती. अचानक बहिणीच्या नवऱ्याची नोकरी गेली. अन्नान्न दशा झाली. रावसाहेबांना ही हकिकत कळताच रावसाहेबांनी आपल्या बहिणीला, तिच्या नवऱ्याला व मुलाबाळांना गावी बोलावून घेतले व आपल्या जवळ ठेवून घेतले. खर्च वाढल्याकारणाने रावसाहेबांवर कर्ज झाले परंतु ईश्वरावर त्यांची अढळ श्रद्धा होती.

दोन-तीन वर्षांनंतर बहिणीच्या नवऱ्याला चांगली नोकरी लागली व तो मुलाबाळांना घेऊन मुंबईला गेला. मुले मोठी झाली व भरपूर पैसा कमवू लागली.

इकडे रावसाहेबांची परिस्थिती अतिशय खालावली. त्यांच्या मुलाने मुंबईला नोकरीला जाण्याचे ठरविले.

रावसाहेबांनी आपल्या बहिणीला सांगितले तू पूर्वी झोपडपट्टीत

राहत होतीस आता तुझी परिस्थिती चांगली झाल्यानंतर तू मुंबईला मोठा फ्लॅट विकत घेतला आहेस. तुझी झोपडपट्टीतील दहा x दहाची खोली तू मला दिलीस तर मी तेथे येऊन राहीन व माझा मुलगा नोकरी करेल. आम्ही तुला दर महिन्याला तुझ्या खोलीचे भाडे देऊ!

बहिणीची मुले खोली देण्यास नाखूष होती. मुलांना असे वाटत होते की दहा x दहाची खोली जर आपण मामाला दिली व उद्या मामा तिच्यावर कब्जा करून बसला तर मग काय करायचे ? शेवटी आईच्या आग्रहापोटी त्यांनी खोली देण्याचे कबूल केले आणि विरार जवळील एका छोट्याशा गावामध्ये आपल्या गावापासून चारशे किलोमीटर दूर अंतरावर रावसाहेब स्थलांतरीत झाले.

दहा x दहाच्या खोलीमध्ये आठ माणसांचा कसाबसा संसार सुरू झाला. रावसाहेबांचा मुलगा दहा-बारा तास कष्ट करत असे व कसाबसा आठ-दहा माणसांचा संसार चालवित असे. त्यातच रावसाहेबांच्या धाकट्या मुलीचे लग्न झाले व सहाजिकच कर्जाचा बोझा वाढला. त्यामुळे आपल्या बहिणीला दोन-तीन महिन्याचे भाडे रावसाहेब देऊ शकले नाहीत.

बहिणीचा मुलगा मुंबईमध्ये आलिशान फ्लॅटमध्ये आपले आई-वडील, बहीण-भाऊ यांना घेऊन राहत होता. त्याच्याकडे भरपूर पैसा होता. परंतु दोन-तीन महिन्याचे भाडे आपल्या मामाने दिले नाही म्हणून तो भडकला. आपल्या आई बरोबर तो खूप भांडला व त्याने रावसाहेबांना ताबडतोब जागा सोडून देण्यास सांगितले.

रावसाहेबांच्या मुलाने मित्राकडून कर्ज घेतले व सर्व भाडे चुकते केले तरीही त्याने मला खोली रिकामी करून पाहिजेच, असा हट्ट धरला.

रावसाहेब आपल्या मुलांना म्हणाले, 'मला आता येथे राहायचे नाही. आपण आत्ता आपल्या गावाला जाऊ ! मी सर्व कुटुंबाला घेऊन उद्याच्या उद्या गावाला जाणार, तू नोकरी सोडून आठ-दहा दिवसांनंतर गावाला आलास तरी चालेल !' दुसऱ्याच दिवशी रावसाहेब सर्व कुटुंबियांना घेऊन आपल्या गावाला निघून गेले.

तिसऱ्या दिवशी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास रावसाहेबांची बहीण व तिचा नवरा दोघेही जण हातात मोठे कुलूप घेऊन आले व रावसाहेबांच्या मुलाला ताबडतोब जागा रिकामी करण्यास सांगितले. रावसाहेबांचा मुलगा म्हणाला -

''मी नोकरीचा राजीनामा दिलाच आहे. चार-पाच दिवसात माझा पगार होईल व नंतर मी गावाला निघून जाईन. मला चार-पाच दिवस राहण्याची सवलत द्या!''

यावर रावसाहेबांची बहीण व तिचा नवरा म्हणाले, ''आमच्या मुलाने आत्ताच्या आत्ता जागा रिकामी करून त्याला कुलूप लावण्यास सांगितले आहे. पाच मिनिटात आम्हाला जागा रिकामी करून दे ! ''

रावसाहेबांच्या मुलाने खोलीत जे काही थोडेफार सामान होते ते मित्राच्या घरी हलविले व जागा रिकामी करून दिली. नोकरी सोडून आठ-दहा दिवसांनी तो सुद्धा आपल्या गावी निघून गेला.

काळ कोणासाठी थांबत नाही. चांगल्या कर्माचे चांगले फळ व वाईट कर्माचे वाईट फळ प्रत्येक माणसाला भोगावेच लागते. मोठमोठ्या साधूसंतांनाही कर्मफल चुकत नाही. यासाठी-

**सतत परोपकार करत राहावे. दुसऱ्याच्या उपयोगी पडत राहावे. इतरांना मदत करत राहावे, याने भविष्यकाळ उज्वल होतो, व**

**भूतकाळातील पातके नष्ट होतात. याच्या जोडीला ईश्वराची आराधना करावी म्हणजे भाग्योदय होतो.**

रावसाहेब व रावसाहेबांची मुले ईश्वरभक्ती, परोपकार व इतरांना मदत करणे या गोष्टी स्वभावाला अनुसरून करत होते. त्यामुळे त्यांचे भाग्य उजळले. परिस्थिती पालटली व परमेश्वराच्या कृपेने रावसाहेबांची मुले खाऊन पिऊन सुखी झाली. स्वतःची वाहने विकत घेतली व घरेही बांधली.

रावसाहेबांच्या बहिणीचा मुलगा ज्याने रावसाहेबांना दहा x दहाच्या खोलीतून हाकलून लावले होते, जो मुंबईच्या आलिशान फ्लॅटमध्ये राहत होता, ज्याच्या बॅगेमध्ये नेहमी हजारो रूपये पडलेले असत व जो लाखो रुपयांचा व्यापार दर महिन्याला करत असे, त्याचे धंद्यामध्ये अतोनात नुकसान झाले, सगळे वैभव निघून गेले. फ्लॅट, गाडी, सोने, चांदी सर्वकाही विकावे लागले. झोपडपट्टीमध्ये भाड्याने खोली घेऊन राहण्याची पाळी आली.

रावसाहेबांच्या मुलाला यातील काहीच माहीत नव्हते. चार-पाच वर्षांनी जेव्हा त्याला ही हकिकत कळली तेव्हा, तो मुंबईला गेला व आपल्या आतेभावाला सुमारे पन्नास हजाराची मदत केली.

ईश्वरी न्यायाप्रमाणे आपणच केलेल्या कर्माची फळे कशी भोगावी लागतात व आपण आपल्या आचरणाने भविष्यकाळ कसा घडवितो व कसा बिघडवितो हे वरील गोष्टीवरून लक्षात येते.

आपण दुसऱ्याला अत्तर लावल्यास प्रथम अत्तर आपल्या हाताला लागते व सुगंधही प्रथम आपल्याला येतो. त्याचप्रमाणे आपण नेहमी सत्कर्मे करत राहावी. म्हणजे आपला भविष्यकाळ उज्वल होतो.

वाईट कर्मे करणाऱ्या माणसांचा भविष्यकाळ अंधःकारमय असतो. वाईट कर्मे करणारी माणसे, स्वतःचे भविष्य अंधःकारमय करत असतात. लबाडी करणे, फसविणे या गोष्टी दिसायला किरकोळ असल्या तरी जीवन बरबाद करणाऱ्या असतात. वाईट कर्मे करणारी माणसे स्वतःचे, स्वतःच्या मुलाबाळांचे व भावी पिढ्यांचेही भविष्य बिघडवून टाकत असतात. छोट्या छोट्या गोष्टीचेही किती भयंकर परिणाम होत असतात हे पुढील गोष्टीवरून कळून येईल.

सुमारे ६० वर्षांपूर्वी भारतात इंग्रजांचे राज्य होते. राज्य जरी इंग्रजांचे होते तरी भारतामध्ये सातशेहून अधिक संस्थाने होती. प्रत्येक संस्थानाचा एक एक राजा असायचा. या राजाचे राज्य साधारणपणे पाच मैलापासून पंचवीस मैलापर्यंत असायचे. काही अपवाद वगळल्यास भारतातील राज्यकर्त्यांनी प्रजेला छळण्याव्यतिरिक्त दुसरे काहीही काम केलेले नाही. राजाच्या हाताखाली अनेक मंत्री, सरदार, अधिकारी, शिपाई असायचे, हे सर्वजण मिळून या ना त्या कारणाने प्रजेला छळत व त्रास देत राहायचे. अशा असंख्य सरदारांपैकी एका सरदाराच्या पत्नीची ही कथा !

एका मोठ्या संस्थानातील सरदाराची ही पत्नी आपल्या दासींना खूप छळत असे, खूप त्रास देत असे. तिला साडी नेसवायला तीन–तीन दासी लागत. मेकअप करण्यासाठी, मसाज करण्यासाठी अनेक दासी होत्या. आलिशान गाडीतून ती फिरत असे. उर्मटपणाने वागत असे. संपत्तीचा तिला अतिशय गर्व होता.

एकदा या सरदारणीचे दुपारचे जेवण झाले; व ती आपल्या पलंगावर आराम करत बसली. सरदारणीचे जेवण झाल्यानंतर पानाचा विडा देण्याची ड्युटी ज्या दासीची होती त्या दासीने विडा आणून दिला

नाही. दासी विडा देण्यास विसरली होती व जेवायला बसली होती. सरदारीण तेथे गेली, विडा न देता जेवायला बसलेल्या दासीला तिने चोपून काढले व जेवणावरून उठविले. पुढे तीन दिवस तिला उपाशी राहण्याची शिक्षा केली व न जेवता सर्व कामे करावयास लावली.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला व सर्व संस्थानिकांच्या वैभवाला उतरती कळा लागली. या सरदारणीचे तर अतिशय हाल झाले. तिला आठ x सहाच्या एका छोट्याशा खोलीमध्ये राहण्याची पाळी आली. दोन-दोन, तीन-तीन दिवस तिला उपाशी रहावे लागे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत ती जगू लागली.

उन्मत्तपणे वागून मनुष्य आपला स्वतःचा भविष्यकाळ कसा बिघडवून टाकतो; ही कथा त्याचे उत्तम उदाहरण आहे.

आजकाल पैसे खायला घातल्याशिवाय म्हणजे लाच दिल्याशिवाय कुठलेही काम होत नाही. अशा लाच खाणाऱ्या माणसांचे भविष्यकाळात खूप हाल-वनवास होतात. याशिवाय मृत्यूनंतर ईश्वरी शिक्षांना तोंड द्यावे लागते ते वेगळेच. पैसा खाणारे लोक बाह्यात्कारी जरी सुखी दिसत असले तरी जीवनाचा विचार करता, त्याचे भयंकर दुष्परिणाम या जन्मामध्ये किंवा पुढच्या अनेक जन्मांमध्ये भोगावे लागतात. पैसा खाणारे नेते, पुढारी, सरकारी अधिकारी हे चाळीस वर्षे पैसा खातात, परंतु त्याचे दुष्परिणाम चारशे वर्षांपासून चार लाख वर्षांपर्यंत होऊ शकतात. कारण ईश्वर हा अतिशय न्यायनिष्ठूर आहे. ईश्वराच्या न्याय व्यवस्थेमध्ये दयेला कोठेही जागा नाही कारण प्रत्येक माणसाच्या अंतरंगात बसणारा ईश्वरच त्याला शिक्षा देत असतो म्हणजे आपणच आपल्याला शिक्षा करत असतो. ''**पेरावे तसे उगवते**'' हा न्याय येथे लागू पडतो. अशा प्रकारे पैसे खाणारे लोक स्वतःचे भविष्य अंधःकारमय करत असतात.

दोन मित्र रेल्वेत काम करत होते. दोघेही सज्जन होते. एकाचे नांव होते राघव व दुसऱ्याचे नांव होते रावजी. दोघेही पैसा खात नसत व कोणालाही लुबाडत नसत. परंतु दर महिन्याला वर-कमाईचा वाटा दोघांनाही मिळत असे. राघव आपल्या वाट्याचा सगळा पैसा गोर-गरिबांना दान करत असे.

राघवची दान करण्याची पद्धत बघून रावजी त्याला दोष देत असे व म्हणत असे, अरे आपण कोणाकडून लाच घेतली नाही, कोणाचे काम करण्यासाठी पैसे घेतले नाहीत, हे पैसे आपल्याकडे न मागता आलेले आहेत. हे तू सगळेच्या सगळे वाटून का टाकतोस? यावर राघव म्हणाला,

अरे बाबा हे पैसे जरी न मागता आपल्याकडे आले असले तरी ते आपल्या कष्टाचे नव्हेत. अशाप्रकारचा पैसा घेण्याचा अधिकार फक्त सिद्धयोग्यांनाच असतो. सामान्य माणसांनी अशाप्रकारचा पैसा घ्यायचा नसतो. फक्त सिद्धयोगीच पैसा किंवा वस्तूच्या रूपाने माणसांचे पाप घेत असतात. ताजुद्दीनबाबांच्या कृपेने मला एवढेच कळते म्हणून हा पैसा मी गोर-गरिबांना वाटून टाकतो.

राघवचे तर्कशास्त्र रावजीला पटत नसे. ''वरच्या कमाईने,'' त्याने बंगला बांधला. मुला-मुलींची लग्ने केली, इतके सर्व झाल्यानंतर एकावर एक आपत्ती रावजीवर कोसळू लागल्या.

लग्न झालेला त्याचा तरुण मुलगा आजारी पडला. तीन वर्षे पाण्यासारखा पैसा खर्च करूनही रावजी त्याला वाचवू शकला नाही. सुनेची व नातवांची जबाबदारी रावजीवर येऊन पडली. त्यानंतर दीड वर्षातच मुलीच्या नवऱ्याचे निधन झाले. मुलगी व तिच्या चार लहान मुलांची जबाबदारी रावजीवर येऊन पडली.

रावजीच्या एका मुलीचे लग्न बराच काळ होत नव्हते. शेवटी कसेबसे लग्न जुळले. मुलाकडील लोकांनी मागितलेल्या सर्व आशा अपेक्षा पूर्ण केल्या. त्यामुळे मुलीच्या लग्नावर अफाट खर्च झाला. मुलीचे लग्न झाले व सहा महिन्यातच ती परलोकी गेली. या सर्व आपत्तींनी रावजी व त्याची पत्नी हैराण झाली.

रावजीचे अंतर्मन त्याला सांगू लागले, हा सर्व वरकमाईचा परिणाम आहे. रावजीला आपण केलेल्या वरकमाईचा खूप पश्चात्ताप झाला. तो नेहमी राघवला सांगू लागला –

राघव तू किती सुखी आहेस. तू दान–धर्म केलास म्हणून सुखी झालास व तुझी मुले सुखी झाली. मी वरकमाईचा वापर स्वतःसाठी केला त्याचे दुःख भोगत आहे.

वरकमाईचा सर्व पैसा राघवने वाटून टाकला होता शिवाय तो ताजुद्दीनबाबांची सेवाही करत असे. त्याच्या सत्शील व सत्कर्मांच्या आचरणामुळे राघव पूर्णपणे सुखी झाला होता. त्याची मुले कर्तबगार झाली व भाग्यवान झाली, अशा प्रकारे सत्कर्माचे राघवला अतिशय चांगले फळ मिळाले, तर केवळ वरकमाई स्वतःसाठी वापरल्याने रावजीने आपला सर्व भविष्यकाळ अंधःकारमय करून टाकला.

लोकांनी स्वेच्छेने दिलेले पैसे किंवा सरकारी खात्यामध्ये जे पैसे लाच म्हणून जमा होतात, त्यातून मिळणाऱ्या वाटणीचे पैसे याला 'वरकमाई' असे म्हटले जाते. ही लाच नव्हे तरीसुद्धा, अशा कमाईचे दुष्परिणाम होतात असेच म्हणावे लागेल. हे पटवून देण्यासाठी वरकमाईच्या दुष्परिणामाची आणखी दोन उदाहरणे देत आहे.

माझ्या माहितीतील एका सद्गृहस्थाला त्याच्या एका क्लायंटने दहा हजार रूपये दिले. ते दहा हजार रूपये देण्यामागे त्या क्लायंटचा

असा उद्देश होता की, या सद्गृहस्थाने त्याच्याविषयी चांगला रिपोर्ट द्यावा. माझ्या मित्राने पैसे घेण्याचे नाकारले तरीही त्या क्लायंटने पैसे आग्रहाने दिले. नाईलाजाने माझ्या मित्राने पैसे ठेवून घेतले.

पैसे घेतल्यानंतर माझा मित्र आजारी पडला. त्याला हॉस्पिटलला ॲडमिट करावे लागले व जवळजवळ पंधरा हजार रूपये खर्च झाले. माझ्या मित्राची अशी धारणा आहे की, वरकमाईचे जे दहा हजार रूपये घेतले त्याचाच हा दुष्परिणाम असावा.

एकदा एका ड्रायव्हरने मला सांगितले की, एका माणसाने बक्षीस म्हणून त्याला एक हजार रूपये दिले. ते घेतल्यानंतर तो आजारी पडला व त्याला अडीच ते पावणे तीन हजार रूपये डॉक्टरला द्यावे लागले. या ड्रायव्हरलाही असे वाटते की, वरकमाईचे आपण जे एक हजार रूपये घेतले, त्यामुळेच आजारपणाचा फटका आपल्याला बसला व एक हजाराच्या जागी अडीच हजार खर्च करावे लागले.

ज्यांच्यावर परमेश्वराची कृपा आहे किंवा एखाद्या सत्पुरुषाची कृपा आहे, अशा लोकांच्या हातून एखादे वेळी 'वरकमाई' सारखी चूक जरी घडली तरी ईश्वरीशक्ती अशा व्यक्तीला थोडीफार शिक्षा करून त्याला सांभाळून घेतात. परंतु ज्यांच्यावर ईश्वराची कृपा नाही, अशा लोकांना मरेपर्यंत काही शिक्षा होत नाहीत. परंतु मृत्यूनंतर मात्र खूप भयंकर शिक्षा होतात. याशिवाय शेकडो वर्षांनंतर पुन्हा जेव्हा मनुष्य जन्म मिळतो, तेव्हा भयंकर दारिद्र्याला तोंड द्यावे लागते. बऱ्याचवेळा अनेक जन्म दारिद्र्यात काढावे लागतात.

मला बरेच लोक विचारतात,

आजकाल, साध्या शिपायापासून ते मोठमोठ्या मंत्र्यांपर्यंत सगळेच पैसे खात असतात व त्यांना काहीच शिक्षा होतांना दिसून येत

नाही असे का?

यावर माझे उत्तर असे आहे की, ''स्वार्थ, पैसा खाणे, दुसऱ्याचे वाईट करणे, गुंडगिरी करणे, सत्तेचा दुरूपयोग करणे, आतंकवादासारखी भयंकर कर्मे करणे या सर्व गोष्टी आत्म्याचे अतिशय नुकसान करतात.'' या सर्वांना शिक्षा होतच असतात. प्रत्येक माणसाला त्याने केलेल्या प्रत्येक कर्माचे फळ हे भोगावेच लागते. यातून कोणीही सुटत नाही. पूर्वजन्मामध्ये त्याने काहीतरी पुण्य केलेले असते. ते पुण्य प्रथम संपून जाते व एकदा पुण्य संपले की, ''राजा सुद्धा भिकारी होतो.'' पृथ्वीतलावर दुःख, दारिद्र्य व यातना भोगणारे अनेक लोक आपण पाहतो. हे सर्व पूर्वजन्मामध्ये सत्ताधीश अथवा श्रीमंत होते. सत्ता व पैसा यांचा दुरूपयोग केल्याने मृत्यूनंतर त्यांनी हजारो वर्षे यातना भोगल्या व या जन्मामध्ये हे लोक दारिद्र्य व रोगराई भोगत आहेत. अशा गांजलेल्या लोकांवर आपण दया, करुणा व प्रेम यांचा वर्षाव करावयास हवा, त्यांना मदत करावयास हवी. कारण अशा लोकांचा तिरस्कार करणे हे सुद्धा पापच होय!

तुम्ही एखाद्याचा द्वेष, मत्सर, ईर्षा, तिरस्कार करता, तेव्हा अप्रत्यक्षपणे तुम्ही ईश्वराचाच ईर्षा, द्वेष, मत्सर, तिरस्कार करत असता. यामुळे तुमच्या सूक्ष्मशरीरामध्ये वातावरणातील दुष्ट शक्तींना खेचण्याची केन्द्रे जागृत होतात व हळूहळू तुम्ही जिवंत पिशाच्च अथवा जिवंत राक्षस बनता. परिणामी तुमचा भविष्यकाळ अंधःकारमय होतो व मृत्यूनंतर तुम्हाला शेकडो वर्षे यातना भोगाव्या लागतात.

**''जीवन हे ऐंशी-पंच्याऐंशी वर्षात संपणारी गोष्ट नसून, जीवन हे अनादिकालापासून चालू आहे व पुढे अनंत कालपर्यंत चालू राहणार आहे.'' ''आपण सदैव जिवंतच असतो. सत्कर्मे केलेली असतील**

**तर परमानंदमय अशा देवरूपात जिवंत असतो. दुष्कर्मे केलेली असतील तर गाढव, गिधाडाच्या रूपात जिवंत असतो. कुठल्या ना कुठल्या रूपात आपण जिवंतच असतो. फरक इतकाच की, सत्कर्मांमुळे आपण आनंद भोगतो तर दुष्कर्मांमुळे आपण दुःख भोगत राहतो. हे सत्य आहे, म्हणून आपण सतत सत्कर्मे करून इतरांना आनंद देऊन, इतरांना मदत करून आपले वर्तमान व भविष्य आनंदी का करू नये ? ''**

सत्कर्मे, सद्गुण, दान, ईश्वरभक्ती यांनी आपल्या जीवनामध्ये आनंद, शांती, समाधान निर्माण होतात याची काही उदाहरणे पुढे देत आहे.

मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ ते ६ तसेच माझी इतर पुस्तके व पोथ्या यांच्या वाचनाने लाखो लोकांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण झाला. त्यांचे जीवन बदलून गेले, अशा असंख्य लोकांपैकी काही लोकांचे अनुभव पुढे देत आहे. त्यावरून सत्कर्मांनी मनुष्य कसा सुखी होतो, हे वाचकांच्या लक्षात येईल.

एक ज्योतिषी होता. त्याचा ज्योतिषाचा धंदा काही बरोबर चालत नव्हता. एकदा त्याच्या वाचनामध्ये स्वामी दत्तावधूतांची पुस्तके आली. या पुस्तकांमध्ये दान करा म्हणजे लक्ष्मीची कृपा होईल, असे लिहिलेले वाचून त्याने जे काही थोडेफार पैसे त्याला मिळत होते, त्यातून वीस टक्के रक्कम बाजूला काढून एका डब्यात टाकू लागला व आठवड्यातून एकदा दत्त मंदिराबाहेर बसलेल्या भिकाऱ्यांना ते पैसे त्याने वाटावयाला सुरुवात केली.

सत्कर्माची सुरुवात करताच ईश्वराची कृपा होऊ लागते. ज्योतिषाने दान करावयास सुरुवात करताच त्याचे उत्पन्न वाढू लागले

व हळूहळू तो सुखी झाला. परिस्थिती चांगली झाल्यानंतर एकदा तो गाणगापूरला श्रीदत्त दर्शनार्थ गेला असतांना, तेथे त्याला भव्य दिव्य अजानुबाहु अशा एका सत्पुरुषाचे दर्शन झाले, या सत्पुरुषाने त्याला हात धरून मंदिरात नेले व दत्त पादुकांची पूजा त्याच्या हातून करविली. या दिव्य अनुभवाने ज्योतिषाला अतिशय आनंद झाला व चराचरामध्ये ईश्वर भरून राहिला आहे व त्याचे आपल्या भक्तांवरती पूर्ण लक्ष असते, याची त्याला प्रचिती आली.

रत्नागिरी तालुक्यातील तळेकांटे गावातील गजानन सांडीम या मुलाने चार पैसे मिळावेत म्हणून अनेक उद्योगधंदे केले. प्रत्येक वेळी त्याला अपयश आले, रस्त्यावर खडी फोडण्याच्या कामापासून तो चहाची टपरी चालविण्यापर्यंतची अनेक कामे त्याने केली. परंतु त्याला कशातच यश आले नाही. त्याची बहीण सुनिता हिने त्याला सांगितले की, तू 'श्रीदत्तावर' श्रद्धा ठेव व संक्षिप्त श्रीगुरुचरित्र ही पोथी रोज वाच!

गजानन सांडीम याने संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची पोथी वाचण्यास सुरुवात केली. हळूहळू त्याचे उत्पन्न वाढू लागले. थोडे पैसे बाजूला काढून त्याने श्रीगुरुचरित्राच्या पोथ्या विकत घेतल्या व लोकांना वाटल्या व थोडाफार दान-धर्मही केला. थोड्याच दिवसात त्याला मुंबईतील एका कंपनीमध्ये चांगली नोकरी लागली व तो सुखी झाला. जसजसे उत्पन्न वाढत गेले, तसतसा त्याने दान-धर्मही वाढविला व ईश्वरभक्ती, स्तोत्राचे पाठ करणे त्याने सुरू केले. या सर्व गोष्टींमुळे ईश्वरीकृपा होऊन ज्या कंपनीमध्ये तो साधा ऑफिस बॉय म्हणून नोकरीला लागला होता, तेथेच त्याला चांगली वरची जागा मिळाली व कंपनीच्या कामानिमित्त तो विमानातून फिरू लागला. इतका त्याचा भाग्योदय केवळ दत्तभक्ती व थोडासा दान-धर्म या सत्कर्मांनी झाला. यावरून आपण मनाने जर

चांगले असू व नम्र असू तर ईश्वराची कृपा अतिशय लवकर होते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

कोल्हापूरचे दामोदर यांनी स्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचली. पुस्तके वाचून त्यांना दान करण्याची प्रेरणा झाली व थोडे थोडे पैसे त्यांनी बाजूला काढण्यास सुरुवात केली. साठलेल्या पैशातून त्यांनी भांडी विकत घेतली व ती गरिबांच्या वस्तीत जाऊन वाटली. या सत्कर्माने त्यांना अतिशय आनंद झाला व त्यांच्या आर्थिक परिस्थितीत खूप सुधारणा झाली. गरिबांना मदत केल्याने जो आनंद मिळतो त्या आनंदाचे वर्णन शब्दात करता येत नाही.

ठाण्यातील अनंत नावाचा मुलगा परिस्थितीने अत्यंत गांजलेला होता. त्याने दोन-तीन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्याला यश आले नाही. एकदा त्याच्या वाचनामध्ये स्वामी दत्तावधूतांची पुस्तके आली. या पुस्तकांच्या वाचनाने त्याच्या मनावरील दडपण दूर झाले. आत्महत्येचे विचार मनातून निघून गेले व जीवन जगण्यात आनंद वाटू लागला. त्याने संक्षिप्त श्रीगुरुचरित्र या पोथीची अनेक पारायणे केली. श्रीदत्त स्तोत्राचे पाठ केले. या उपासनेने त्याचे मनोबल वाढले व त्याच्यामध्ये आत्मविश्वास जागृत झाला. ईश्वरभक्ती सुरू केल्यानंतर त्याचे दिवस पालटले. थोड्याच दिवसात त्याला चांगली नोकरी लागली व तो सुखी झाला.

**गहनो कर्मणा गतिः** असे या अध्यायाचे नांव आहे.

थोडेसे पैसे खाण्यानेही कसे दुष्परिणाम होतात हे उदाहरण देऊन या अध्यायात सांगितले आहे.

वाचकहो ! नीट लक्षात ठेवा. एखाद्या माणसाचे दहा रूपये

जर तुम्ही बुडविलेत तर शंभर वर्षांनंतर म्हणजे पुढील जन्मी त्या माणसाला तुम्हाला लाखो रूपये द्यावे लागतील, याची जाणीव ठेवा ! यावरून पैसा खाणाऱ्या लोकांच्या आत्म्यांचे काय हाल-वनवास होत असतील याची कल्पना करा !

दुसऱ्याला फसविणे, म्हणजे ईश्वराला फसविणे, म्हणजेच स्वतःला फसविणे! याचे दुष्परिणाम अनेक वर्षे भोगावे लागतात.

दुष्कर्मे, चोरी, डकैती, गुंडगिरी, लाच खाणे, पैशासाठी वाईट धंदे करणे, लूटमार करणे, आतंकवाद या गोष्टी इतक्या भयानक आहेत की, याच्या शिक्षा लाखो वर्षे मानवाच्या आत्म्याला भोगाव्या लागतात. हे संपूर्ण सत्य असून ध्यानामध्ये मी अनेक राजे, महाराजे व बादशहांना शेकडो वर्षांपासून यातना भोगतांना पाहिलेले आहे. या राजे-महाराजांना मोठ-मोठ्या संस्थानिकांना श्रीमंतांना मनुष्यजन्मही मिळणार नाही. शेकडो वर्षे झाली अजून यांच्या यातना संपल्या नाहीत व आणखी शेकडो वर्षे संपणारही नाहीत. तद्नंतर यांच्या आत्म्यांना ओझे वाहणाऱ्या जनावरांचे जन्म मिळतील किंवा सडलेले मांस खाणाऱ्या प्राण्यांचे जन्म मिळतील. असे जन्म मिळाल्यानंतर या राजे, महाराजांना, सत्ताधीशांना, राजकारण्यांना, आपण एकेकाळी मनुष्य होतो, याची जाणीव राहील. म्हणजे मन मनुष्याचे असेल व शरीर प्राण्याचे असेल, अशी यांची अवस्था होईल.

दुर्जन व दुष्टपणे वागणाऱ्या लोकांचे काय होते हे वर थोडक्यात सांगितले आहे.

पूर्वजन्मामध्ये थोड्याशा चुका केल्या, त्यामुळे या जन्मामध्ये दारिद्र्य भोगावे लागले. अशा लोकांनी थोडीशी ईश्वरभक्ती व थोडासा दान-धर्म केल्यानंतर त्यांना ईश्वरीकृपेचे कसे चांगले अनुभव येतात याचेही थोडक्यात वर्णन या अध्यायात केलेले आहे.

वाचकांनी या अध्यायाचे पुन्हा पुन्हा वाचन करावे व लोकांना दुष्कर्मापासून परावृत्त करावे म्हणून, या अध्यायात बऱ्याच गोष्टी स्पष्टपणे लिहिलेल्या आहेत.

जितके दान कराल तितके सुखी व्हाल. मन जितके मोठे कराल तितके ईश्वराच्या जवळ  जाल. जितके सद्गुण अंगी बाणाल तितकी ईश्वरीकृपा तुम्हाला प्राप्त होईल. कर्माची गति गहन आहे. जितके चांगले कर्म कराल तेवढे चांगले होईल. परमेश्वराने, '**करावे तसे भरावे,**' '**पेराल ते उगवेल,**' हा न्याय माणसासाठी ठेवलेला आहे.

# ११. अंते मति सः गतिः

**अंते मति सः गतिः** म्हणजे मृत्युसमयी मनामध्ये जे काही विचार असतील, त्याप्रमाणे पुढचा जन्म प्राप्त होतो. हा या संस्कृत सुभाषिताचा जरी अर्थ असला तरी मृत्युसमयी खूप वेगवेगळ्या घटना घडत असतात.

आयुष्यभर माणसाने ज्या काही चांगल्या-वाईट गोष्टी केल्या, त्या सर्व गोष्टींचा चित्रपट त्याला दाखविला जातो. उद्धार होण्यासाठी त्याला किती संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या होत्या, हेही त्याला दाखविले जाते. नंतर तो चित्रपट बंद पडतो व त्यानंतर खरा प्रकार सुरू होतो .

मनुष्य जर पापी असेल, खूप वाईट कर्मे केलेली असतील, प्रजेला पीडून पैसा कमावला असेल, तर पुष्कळवेळा एका विशिष्ट प्रकारचे प्राणी त्याचे हातपाय खात आहेत, असे दिसून येते. त्या विशिष्ट प्रकारच्या प्राण्याला माझ्यापासून बाजूला करा असे सांगण्याचा तो प्रयत्न करत असतो. परंतु ओठातून शब्द बाहेर पडत नाहीत. त्या प्राण्याच्या चिंतनातच त्याचे प्राण जातात व त्याला त्या प्राण्याच्या योनीमध्ये जन्म प्राप्त होतो.

वरती विशिष्ट प्रकारचे प्राणी असा शब्द वापरला आहे, कारण

कुत्र्याच्या जन्माला जाणाऱ्यांना फक्त कुत्रेच दिसतात. डुक्कराच्या जन्माला जाणाऱ्यांना फक्त डुक्करच दिसतात. हत्तीच्या जन्माला जाणाऱ्यांना हत्तीच दिसतात. पुष्कळवेळा असेही घडते की, जो प्राणी आयुष्यात कधीही पाहिला नाही, असे प्राणी मृत्यूच्यावेळी दिसतात. मृत्यूच्यावेळी जे दिसेल तो जन्म प्राप्त होतो.

काही माणसांना मृत्यूच्यावेळी वेगवेगळी झाडे दिसतात. अशा माणसांचे आत्मे मृत्यूनंतर वृक्षांमध्ये राहतात.

काही माणसांना मृत्यूनंतर आपण अंधःकारमय बोगद्यातून जात आहोत असे दिसते. अशी माणसे मृत्यूनंतर पिशाच्च लोकात जातात.

तंत्र-मंत्राच्या साधना करणारे बरेच साधकही मृत्यूनंतर पिशाच्च लोकात जातात.

काही माणसांना मृत्युसमयी त्यांच्या अगोदर मेलेले त्यांचे पूर्वज, तसेच मित्रमंडळी दिसतात, असे आत्मे मृत्यूनंतर आपल्या मित्रमंडळींच्या व पूर्वजांच्या सहवासात राहतात.

एकंदरीत मृत्युसमयी माणसाला जो प्राणी, पशू ,पक्षी दिसेल त्या योनीत जन्म मिळतो. परिवारातील मृत व्यक्ती, मित्रमंडळी, नातेवाईक, पूर्वज दिसल्यास ते ज्या लोकात राहत आहेत त्या लोकात मृत व्यक्तीचा आत्मा जाऊन राहतो. **अंते मति सः गतिः** याचा अर्थ असा व्यापक आहे.

काही माणसे खूप पुण्यवान असतात. ईश्वराचे नामस्मरण करून ते प्राण सोडतात. पुष्कळ माणसांना आपल्या मृत्यूची वेळही माहीत असते. अशी पुण्यवान माणसे जेव्हा देहत्याग करतात, तेव्हा स्वर्गातील देव-देवता व सिद्धमहात्मे अशा सद्भक्तांच्या स्वागताला हजर असतात.

एखादा सत्पुरुष जेव्हा देहत्याग करून परलोकात जातो, तेव्हा परलोकामध्ये खूप मोठा उत्सव केला जातो. त्या आत्म्याचा खूप सन्मान केला जातो.

काही सद्भक्त आयुष्यभर ईश्वराचे नामस्मरण करतात व मृत्युसमयी परमेश्वराचे नामस्मरण करत प्राण सोडतात, असे सद्भक्त मृत्यूनंतर आनंदमय लोकात जातात.

दया, करुणा, प्रेम इत्यादी सद्गुणांची जे जोपासना करतात अशा सद्भक्तांना मृत्यूनंतर अतिशय उच्च स्थान प्राप्त होते.

**याजसाठी केला होता अट्टहास ।**

**शेवटचा दिस गोड व्हावा ॥**

असे संत तुकारामांनी म्हटले आहे. हा शेवटचा दिवस गोड होण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात, असे संतांनी सांगितलेले आहे.

**आत्म्याच्या खऱ्या समस्या मानवी जीवन संपून गेल्यानंतरच सुरू होतात. मनुष्य जन्माला येतो, पोटासाठी मरेपर्यंत राबतो व एक दिवस मरून जातो. मृत्यूनंतर काही माणसांच्या लक्षात येते की, मनुष्यजन्मरूपी सुवर्णसंधी ईश्वराने आपल्याला दिलेली होती. ती आपण वाया घालविली.**

काही लोक खूप देव-देव करणारे असतात. विद्वान असतात. आपण करत असलेली देवपूजा व विद्वत्ता याचाच त्यांना खूप अभिमान असतो, असे लोक बाहेरून नम्रतेचे ढोंग करतात, पण अंतःकरणामध्ये अहंकार धुमसत असतो. यातील काही तर, वर्षाला गुरु बदलत असतात. आपल्या विद्वत्तेने व उपासनेने आपण नक्कीच मोक्षाला जाऊ असे त्यांना वाटत असते. अशा असंख्य लोकांना समज यावी म्हणून एक हकिकत

सांगतो,

इस्लामपूर परिसरामध्ये मी एकान्तवासात १९६६-६७ साली साधना करत होतो. त्यावेळी पेठ नाक्यावर धुंडीराम महाराज म्हणून, एक अवलिया सत्पुरुष राहत असत. त्यांच्या दर्शनार्थ मी नेहमी जात असे.

मी जेथे साधना करत होतो त्या परिसरातील एक गृहस्थ माझी सेवा करीत असे, मला खायला आणून देत असे. त्या गृहस्थाची सात-आठ वर्षांची एक मुलगी होती. ही मुलगीही कधी कधी आपल्या आई-वडिलांबरोबर माझ्याकडे येत असे.

असे काही दिवस गेल्यावर त्या मुलीला ध्यान लागू लागले. देवी-देवतांची दर्शने होऊ लागली.तिची ही आध्यात्मिक प्रगती पाहून मी तर दिपूनच गेलो. माझेही वय त्यावेळी जेमतेम तेरा वर्षांचे होते. त्या सात-आठ वर्षांच्या मुलीला देवी-देवता दिसतात हे पाहून मला तिच्याविषयी अतिशय आदर वाटू लागला.

तेथील साधना आटोपून मी जरंडेश्वरला साधना करण्यासाठी गेलो. एक महिन्याने परत आलो तेव्हा त्या मुलीच्या भावाने मला पुढील गोष्ट सांगितली.

''तुम्ही गेल्यानंतर काही दिवसातच माझ्या बहिणीला खूप ताप आला. डॉक्टरनी खूप औषधोपचार केले व शेवटी सांगितले, ही मुलगी जगणे कठीण आहे. म्हणून मी पेठ नाक्यावर धोंडीराम महाराजांकडे गेलो व त्यांना सर्व हकिकत सांगितली तेव्हा ते म्हणाले,

'तुझी बहीण मरत असेल तर मरू दे! दत्तावधूतांच्या आश्रमामध्ये गाईच्या रूपाने जन्माला येईल!' ''

धोंडीराम महाराजांचे हे उद्‌गार ऐकून त्या मुलीच्या भावाचे धाबे दणाणले.

तो धावतच डॉक्टरांकडे गेला. तसेच त्याने परमेश्वराची प्रार्थनाही केली व परमेश्वराच्या कृपेने मुलगी ठणठणीत बरी झाली.

ही सर्व हकिकत मला कळल्यानंतर धोंडीराम महाराजांनी असे उद्‌गार का काढावेत हे मला समजेना !

वय वाढले, साधना वाढली, ज्ञान वाढले, ईश्वराची कृपाही वाढली व नंतर - ''धोंडीराम महाराजांच्या शब्दाचा अर्थ माझ्या लक्षात आला.''

''त्या मुलीच्या आजाराचे निमित्त करून धोंडीराम महाराजांनी मला फार मोठा संदेश दिला होता. तो संदेश जसाच्या तसा सांगणे योग्य नाही. थोडासा फेरबदल करून सांगतो.''

त्यांचे म्हणणे असे होते की,

''प्रत्येक माणसाची आध्यात्मात प्रगती व्हावी, त्याला मोक्ष मिळावा, असे तुला वाटते व त्यासाठी तुझी सारखी धडपड सुरू असते. मानवजन्म ही परमेश्वराने मानवाला दिलेली एक सुवर्णसंधी असते. ही सुवर्णसंधी बरेचसे लोक गमावतात व आपल्या कर्माप्रमाणे पशु-पक्षांच्या योनीत जन्म घेतात. या मुलीला जी थोडीफार ध्यानदृश्ये दिसत आहेत, ही केवळ तुझ्या सेवेमुळे दिसत आहेत. ही क्षणिक असून हिच्या भावी आयुष्यामध्ये हिचे वागणे, सुवर्णसंधी गमावणाऱ्या हजारो लाखो लोकांसारखेच असेल.''

धोंडीराम महाराजांनी जो संदेश दिला, त्याचा अनुभव मला लवकरच आला. पुढे त्या मुलीला ध्यानदृश्ये दिसणे बंद झाली व ईर्षा,

द्वेष, मत्सर, लांड्या-लबाड्या करणारी ती एक सामान्य मुलगी बनली व एका सराईत गुन्हेगाराबरोबर तिने लग्न केले.

मनुष्यजन्म ही आत्म्याला दिलेली सुवर्णसंधी असते. आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी आत्म्याला मनुष्यजन्म दिला जातो. पृथ्वी हे एक विद्यापीठ असून येथे मानवता शिकण्यासाठी आपण जन्माला आलेलो असतो. सद्गुण शिकण्यासाठी आपण जन्माला आलेलो असतो. जे आत्मे ही संधी गमावतात किंवा मानवजन्माचा दुरूपयोग करतात अशा माणसांच्या आत्म्यांना अंत समयी खूप भयंकर दृश्ये दिसतात व त्यातच त्यांचा अंत होतो व नंतर ईश्वराच्या कठोर न्यायप्रक्रियेला तोंड द्यावे लागते.

शेवटचा दिवस गोड व्हावा, असे वाटत असेल, तर अखंड नामस्मरण, परोपकार व दान करणे आवश्यक आहे व कोणाचाही द्वेष, मत्सर, हेवा-दावा, ईर्षा या गोष्टी करता कामा नये.

काही लोक खूप सज्जन असतात, त्यांच्या वाट्याला खूप कष्ट व दुःख येत असतात. खरे पाहता ही ईश्वराची कृपाच असते. ईश्वर दुःख व कष्ट देऊन त्यांच्या आत्म्याला शुद्ध करत असतो; त्यांचे प्रारब्ध शुद्ध करत असतो, अशा लोकांचाही शेवट खूप गोड होतो, मृत्यूनंतर अशा लोकांना सद्गती म्हणजे उत्तम स्थान प्राप्त होते. दुःख व कष्ट भोगल्याकारणाने अशा लोकांचे प्रारब्ध शुद्ध झालेले असते. काही माणसे ज्ञानी असतात, परिस्थितीने सुखी असतात, त्यांना माहीत असते की, पुण्य संपल्यानंतर दारिद्र्य, दुःख व कष्ट भोगावे लागतील असे घडू नये म्हणून ते लोक खूप दान करतात व ईश्वरभक्ती करतात. काही लोक सर्वसंगपरित्याग करून एकान्तवासात राहतात व मुक्ती प्राप्त व्हावी म्हणून प्रयत्न करतात, अशा माणसांना उच्चकोटीच्या

स्वर्गलोकात स्थान मिळते किंवा पुन्हा मनुष्यजन्म मिळून त्यांच्या हातून आध्यात्मिक कार्य घडते व जीवनमुक्त अवस्था प्राप्त होते.

सध्याची परिस्थिती अतिशय बिकट आहे. माणसांची इतकी काही अधोगती झालेली आहे की, आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी माणसांकडे वेळ नाही, आध्यात्मिक प्रगतीची इच्छा नाही व मृत्यूनंतर जीवन असते यावर विश्वास नाही. मनाला शांती नाही, मिळविलेला पैसा पुरत नाही, पैशाची हाव संपत नाही, अशा असंख्य समस्यांमुळे माणसांची पराकोटीची अधोगती झालेली आहे.

सर्वत्र सैतानाचे, काळ्याकुट्ट अंधःकाराचे साम्राज्य सध्या पृथ्वीतलावर सुरू आहे. यामुळे भ्रष्टाचार, पैसे खाण्याची प्रवृत्ती, लबाडी, फसवणूक, गुंडगिरी अशा सर्व वाईट गोष्टींचे थैमान पृथ्वीतलावर चालू आहे. यामुळे अगदी स्पष्ट शब्दात सांगायचे ठरविल्यास हजारातील दोन-चार माणसेच स्वर्ग लोकात जातात. राहिलेल्यांपैकी काही पिशाच्च लोकात जातात तर काही पशू , पक्षी, प्राणी यांच्या योनीत जन्माला येत आहेत. ईश्वरीशिक्षा म्हणून पशू, पक्षी, प्राणी यांच्या योनीत जन्माला येणाऱ्या आत्म्यांना आपण पूर्वजन्मी मनुष्य होतो याची जाणीव असते व मनुष्य जन्मात असतांना आपण जी जी पातके केली, ज्या ज्या चुका केल्या त्या सर्व गोष्टी आठवत राहतात.

ज्या ज्या लोकांना आपण त्रास दिला ते सर्व आठवते व त्यांच्या डोळ्यातून पाणी येत राहते. मात्र मांजर, कुत्रा, लांडगा, तरस, बिबट्या, गिधाड अशा प्राण्यांच्या योनीत जन्म घेणाऱ्या मनुष्याच्या आत्म्यांना आपण पूर्वजन्मी मनुष्य होतो याची जाणीव नसते. परंतु यातही एखाद्-दुसरा अपवाद आढळतो. नागपूर येथील दत्तात्रेय आगे यांच्या घरातील कुत्री प्रत्येक एकादशीला उपवास करत असे हे मी 'आत्मसिद्धी' या

माझ्या पुस्तकात लिहिलेले आहे.

पृथ्वीवरील ही परिस्थिती पालटावी म्हणून दैवी सृष्टीमधून प्रयत्न सुरू आहेत. थोडीशी ईश्वरभक्ती करणाऱ्यालाही त्यामुळेच चांगले अनुभव येत आहेत.

आपल्यावर ईश्वराची कृपा व्हावी, अशी जर इच्छा असेल तर, मानवाने काही पक्के विचार, काही खूणगाठी मनाशी बांधावयास हव्यात.

हा देह सोडून एक दिवस जायचे आहे. ही मनाशी खूणगाठ बांधावी व ईश्वरभक्ती, दान-धर्म, परोपकार जास्तीत जास्त करावा. असे केले तरच शांती समाधान मिळेल नाहीतर 'अंते मति सः गति:' या न्यायाप्रमाणे सर्वांची स्थिती आजही होत आहे व पुढेही होत राहील.

भक्तलोक असाही प्रश्न विचारतात की, कशा पद्धतिने वागले असता मुक्ती किंवा मोक्ष मिळेल, किंवा आध्यात्मात प्रगती होईल. यासाठी काही गोष्टी स्पष्टपणे लिहीत आहे. सद्‌भक्तांनी या गोष्टी आचरणात ठेवल्यास त्यांची नक्की प्रगती होईल.

**ऋण**

शक्यतो कोणाकडूनही पैसे उसने घेऊ नयेत. कर्ज काढू नये कारण त्याचे दुष्परिणाम होतात. कर्ज फेडण्यासाठी पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात.

कोणाकडून कसलेही दान घेऊ नये. दान घेण्याचा अधिकार फक्त जीवनमुक्त सिद्धपुरुषांना असतो. सिद्धपुरुष दानाच्या रूपाने, लोकांचे पाप घेतात व त्यांना सुखी व संपन्न करतात.

सामान्य माणसाने दहा रूपयाचे जरी कर्ज घेतले व ते फेडले

नाही तर ईश्वराच्या नियमाप्रमाणे त्या आत्म्याला पुन्हा जन्म घेऊन त्या दहा रूपयाची व्याजासहित रक्कम फेडावी लागते. अशा प्रकारे दहा रूपये कर्जाचे, लाखो रूपये परत करावे लागतात. याला एक पर्याय असा असतो की, कर्ज घेणाऱ्या माणसाजवळ जर पुण्याई असेल, तर पैसे परत करण्याऐवजी कर्ज घेणाऱ्याची पुण्याई कर्ज देणाऱ्याला मिळते. अशा प्रकारे हिशोबाची तडजोड केली जाते. तरीही कोणाचेही कर्ज घेऊ नये अथवा उसने पैसे घेऊ नयेत. हे वाचकांनी लक्षात ठेवावे.

एक रूपयाचीही लाच खाऊ नये. लाच खाणे हे अतिशय भयंकर पाप आहे. इतकेच नव्हेतर सहकारी माणसे लाच घेत असतील व त्या लाचेतील वाटा तुम्हाला देत असतील तरीसुद्धा तो घेऊ नये. ही 'वरकमाई' अनेक दुःखांना आमंत्रण देते व अनेक जन्मही घ्यावयास लावते. तुम्ही इतरांना जेवढे सहकार्य कराल, मदत कराल तितके तुमचे पाप फिटते व तुम्ही ईश्वराच्या जवळ जाता. त्यामुळे तुमच्याने जेवढी होईल तेवढी इतरांना मदत करा. परोपकारातच परमार्थाचे सार आहे.

## हत्या

कोणाचीही हत्या करू नये. मनुष्य ही कर्मयोनी असल्याकारणाने खूनासारख्या महापातकाचे दुष्परिणाम शेकडो वर्षे भोगावे लागतात. एक खून करणे म्हणजे स्वतःला हजारो वर्षे यमयातना देणे, म्हणून खूनाचा विचार कधीही करू नये. तसेच आत्महत्येचा विचार सुद्धा करू नये. आत्महत्येने असंख्य वर्षे यातना भोगाव्या लागतात.

## वैर

कोणाशीही वैर करू नये, कोणाचाही द्वेष , मत्सर करू नये. कोणाचीही कधीही मनात असूया करू नये. मनात राग धरू नये. या सर्व गोष्टी माणसाला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावयास लावतात. वैर ही इतकी

भयंकर गोष्ट आहे की, मृत्यूनंतर प्राणी व पशू यांचे जन्म प्राप्त झाले तरी वैर तेथेही कायम राहते. शिर्डीच्या श्रीसाईबाबांनी सर्प व बेडूक यांच्या-विषयी कथा सांगतांना हे दोघेही पूर्वजन्मी मनुष्य होते. वैर केल्याकारणाने सर्प व बेडूक यांचे जन्म प्राप्त झाले. तरीपण वैर कसे संपले नाही याची गोष्ट सांगितली आहे. अशा प्रकारे ऋण, हत्या व वैर या गोष्टी माणसाच्या आत्म्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यायला लावतात. इतकेच नव्हेतर विविध योनीमध्ये जन्म घ्यावयास लावतात.

तुम्ही आनंदाने जीवन जगा. परंतु कोणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घ्या. तुमच्यामुळे जर कोणाला उगाचच त्रास झाला असेल तर ईश्वरीन्यायाप्रमाणे त्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतील याची जाणीव ठेवा.

**कवणही जिवाचा न घडो मत्सर ।**
**वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।**

ईश्वर हा सर्व ठिकाणी भरलेला आहे. जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तीला त्रास देता, तेव्हा तो त्रास ईश्वरापर्यंत पोहोचतो व याची शिक्षा म्हणून तुम्हाला अनेक वर्षे त्रास भोगावा लागतो.

जेव्हा तुम्ही दुसऱ्याला आनंद देता किंवा मदत करता तेव्हा तुम्ही दिलेला आनंद व मदत ईश्वरापर्यंत पोहोचते व याची परतफेड म्हणून, तुम्हाला हजारो पटीने आनंद व मदत मिळत राहते.

संपूर्ण भारतामध्ये खेड्यापाड्यातून मी पायी हिंडलो आहे. कन्नड, तेलगू , तामिळ, मल्याळम्, गुजराथी, अवधी, भोजपुरी, काश्मिरी, नेपाळी व भोटीया अशा अनेक भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये राहिलेलो आहे. माझी मातृभाषा मराठी व मोडके तोडके हिन्दी, जवळ एक पैसा नाही, पायात चप्पल नाहीत अशा अवस्थेत प्रवास करत असताना मला

भरपूर आनंद व भरपूर मदत सर्व ठिकाणी मिळत गेली. कोठेही कसल्याही गोष्टीची कमतरता पडलेली नाही. या सर्व गोष्टींचे कारण एकच '' तुम्ही इतरांना मदत करा,'' ''तुम्ही इतरांना आनंद द्या,'' म्हणजे ''तुम्हाला अनेक पटीने याच गोष्टी परत मिळतील.'' या नियमाचे मी पूर्वजन्मी पालन केले असावे.

ईश्वरी नियमांचे जर काटेकोरपणे पालन केले गेले तर, परमानंदमय अशी सिद्धावस्था प्राप्त होते. हा ईश्वरी आनंद कुठल्याही बाह्य गोष्टींवर अवलंबून नसतो. परावाणीतून आनंदाच्या उकळ्या फुटत राहतात व ईश्वर सामरस्याचा अनुभव येतो.

**दान**

आपल्या व पूर्वजांच्या उद्धारासाठी सतत दान करत राहणे आवश्यक असते. दानाने आपला व पूर्वजांचा उद्धार होतो. तसेच संपत्ती कधीही कमी पडत नाही.

प्रेमाने वागावे, इतरांना आनंद द्यावा, इतरांना मदत करावी व दान करावे. जीवनामध्ये एवढ्या गोष्टी सांभाळल्या असता, जीवन सुखी होते व मृत्यूनंतर सद्‌गती प्राप्त होते व आत्म्याचा उद्धार होतो. मृत्यूचा क्षणही आनंदमय होतो. जीवनाचे सार्थक होते.

# १२. मंत्रसिद्धी

मंत्र तीन प्रकारचे असतात. सात्त्विक मंत्र, राजस मंत्र व तामस मंत्र.

**तामस मंत्र**

तामस मंत्राने राक्षस, भूत, प्रेत, पिशाच्च, इतरांचे वाईट करण्याच्या विद्या, जनसामान्यांवर सत्ता गाजविण्याच्या विद्या, अशा गोष्टी प्राप्त होतात. अशा साधना करणाऱ्या साधकांना मृत्यूनंतर हजारो वर्षे पिशाच्च योनीत राहावे लागते. अशा लोकांचा उद्धार होणे दुरापास्त असते. स्मशान व कबरस्तानामध्ये या साधना केल्या जातात. दोन-तीन दिवसांच्या साधनेने एखादी विद्या प्राप्त होते व आपण कोणीतरी विशेष आहोत असा भ्रम साधकामध्ये निर्माण होतो. हळूहळू वातावरणातील पिशाच्च व राक्षसांचा अंमल साधकावर सुरू होतो व साधक पूर्णपणे त्यांच्या आहारी जातो. साधकाचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होते व साधक जिवंत राक्षस अथवा जिवंत पिशाच्च बनतो. अशा माणसांना मृत्यूनंतर हजारो वर्षे दुःख, कष्ट, यातना भोगाव्या लागतात. म्हणून तामसमार्गाच्या मंत्रांचा जप करण्याचा विचारसुद्धा मनात आणू नये. शेकडा ९९% साधू हे तामसमार्गी असतात. यापैकी बऱ्याच साधूंना आपण तामस मार्गाची साधना करीत आहोत, याची जाणीवही

नसते. अशी जाणीव जेव्हा एखाद्या साधकाला होते, तेव्हा वेळ निघून गेलेली असते व साधक दुष्टशक्तींच्या पूर्णपणे आधीन झालेला असतो. साधकाच्या मन व बुद्धीवर दुष्टशक्तींनी ताबा मिळविलेला असतो. अशा साधकाने जरी चांगले वागायचे ठरविले व चांगल्या मार्गाने जायचे ठरविले तरी तो जाऊ शकत नाही. अंधःकारमय विश्वातील शक्तींनी त्याला आपले गुलाम बनविलेले असते. हजारातील ९९९ माणसे मग ती श्रीमंत असोत वा गरीब, सुशिक्षित असोत वा अशिक्षित, तामसी शक्तींच्याच आधीन राहत असतात. या तामसी शक्ती माणसांच्या मन बुद्धीवर प्रभाव गाजवितात. त्यांना आध्यात्ममार्गामध्ये प्रगती करू देत नाहीत. पैसा हवा, प्रतिष्ठा हवी, सत्ता हवी अशा अनेक प्रकारचे **हव्यास** माणसाच्या मनात या तामसी शक्ती निर्माण करतात. अनेक प्रकारचे गुन्हे माणसाच्या हातून या तामसी शक्तींमुळे घडतात. जन्म-मरणाच्या चक्रातून आत्म्याची कधीही सुटका होऊ नये, अशी व्यवस्था तामसी शक्ती करतात.

महाकाली, काली, स्मशानकाली, तारा, बगलामुखी, धूमावती, दक्षिणकाली, चंडकाली, प्रचंडकाली, छिन्नमस्ता, महाकालभैरव, बटुकभैरव, कपालभैरव, असितांग भैरव, रूरूभैरव, रवळनाथ, वेताळ, धूम्राक्ष तसेच वातावरणात राहणारी सर्व प्रकारची भूते या सर्व तामसी शक्ती असून या दिसावयास काळ्याकुट्ट असतात. या शक्तींच्या मंत्राना तामसी मंत्र म्हटले जाते.

या तामसी शक्तींच्या साधना केल्या असता पैसा व प्रतिष्ठा प्राप्त होते, परंतु मनाला शांती प्राप्त होत नाही. तामसी साधना करणाऱ्या व्यक्तीला शांती व आनंद कधीही प्राप्त होत नाही. तो सतत अस्वस्थ असतो, त्याचे मन कधीही स्थिर नसते. तो अत्यंत संकुचित मनाचा व

स्वार्थी असतो पुष्कळवेळा सज्जन माणसे चटकन काहीतरी प्राप्त व्हावे, म्हणून तामस मंत्राची साधना करतात व आपल्या आत्म्याचे प्रचंड नुकसान करून घेतात.

### राजस मंत्र

राजस मंत्राची साधना केली असता पैसा व प्रतिष्ठा प्राप्त होते. सन्मार्गही मिळतो. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला राजस मंत्राची उपासना करायला काही हरकत नाही. राजस शक्ती उपकारक असतात. त्या सहसा कोणाचे नुकसान करत नाहीत. राजस शक्ती या अर्ध-देवता असतात. त्यामुळे त्यांची कृपा सांभाळावी लागते. त्यांची कृपाही पटकन होते व अवकृपाही पटकन होते.

महालक्ष्मी, लक्ष्मी, कमला, यक्ष-यक्षिणी, भुवनेश्वरी या सर्व राजस देवता होत. यांच्या मंत्रांची साधना सामान्य माणसाने करावयास हरकत नाही. याने वैभव व प्रतिष्ठा प्राप्त होते व सन्मार्गही मिळतो.

या देवतांच्या उपासकाने सतत दान व परोपकार करीत राहावयास हवे, तरच या देवतांची कृपा त्याला सांभाळता येते. नाहीतर बुद्धी भ्रष्ट होते, अहंकार वाढतो, कंजूषपणा वाढतो व तामसी शक्ती त्याला खेचून घेऊन जातात.

राजस मंत्राची साधना करणाऱ्या साधकाचे मन आनंदी व प्रसन्न राहते. तो स्वतः आनंदात राहतो व इतरांनाही आनंद देतो. राजस मार्गाने साधना करणारे साधूही शांत, प्रसन्न व आनंदी असतात. त्यांच्या हातून अनेकांचे कल्याण होते. सर्वसामान्य माणसांनी राजस मंत्राची उपासना करण्यास काहीही हरकत नाही.

## सात्त्विक मंत्र

जे अत्यंत निःस्वार्थी असतात, ज्यांना समाजाकडून अथवा ईश्वराकडून कसलीही अपेक्षा नसते,ज्यांना मुक्ती हवी असते, ज्यांच्यामध्ये अनेक सद्‌गुण असतात, फक्त असेच लोक सात्त्विक मार्गाने प्रगती करू शकतात.

गणेश, सरस्वती, ब्रह्मा, सावित्री, गायत्री, राम, कृष्ण, दत्त, दुर्गा, विष्णू , शिव, ललिता, षोडषीत्रिपुरसुंदरी, मारूती या सर्व देवता सात्त्विक असून यांच्या मंत्रांची साधना करणाऱ्या सद्‌भक्ताला सात्त्विक आनंद, सद्‌गती व मोक्ष प्राप्त होतो. साधक जितका सद्‌गुणी असेल तितकी अधिक कृपा प्राप्त होत असते.

साधक जेव्हा सात्त्विक मंत्राची साधना करू लागतो तेव्हा त्याला विविध प्रकारचे सुगंध येऊ लागतात. असे सुगंध येऊ लागले की, मंत्र साधना सफल होत आहे, असे समजावे. कालान्तराने स्वप्नामध्ये देवतेचे दर्शन होते. देवता आपले संरक्षण करीत आहे असा अनुभव येतो, सूक्ष्म शरीर शुद्ध होते व हळूहळू देवतेशी तादात्म्यता प्राप्त होते व जन्म-मरणरूपी चक्रातून सुटका होते. साधकाला परमानंदमय अशी सिद्धावस्था प्राप्त होते. त्याच्या हातून अनेकांचे कल्याण होते. अनेकांचा उद्धार होतो. यासाठी सद्‌भक्तांनी सदैव सात्त्विक मंत्राचीच उपासना केली पाहिजे. सात्त्विक मार्गाचेच अनुसरण केले पाहिजे.

## १३. ज्योति

**हरिभजनावीण काळ, घालवू नको रे**
**दोरीच्या सापा भिऊनी भवा**
**भेटी नाही जिवा शिवा**
**अंतरीचा ज्ञान दिवा; मालवू नको रे ।।१ ।।**
**विवेकाची ठरेल ओल**
**ऐसे बोलावे बोल**
**अपुले मत उगीच चिखल; कालवू नको रे ।।२ ।।**
**संत संगतीने उमज**
**आणूनी मनी पुरती समज**
**अनुभवावीण मान; डोलवू नको रे ।।३ ।।**
**सोहिरा म्हणे ज्ञान ज्योति**
**तेथेचि राही दिवस राती**
**तयावीण नेत्रपाती; हालवू नको रे ।।४ ।।**

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी सोहिरोबानाथ नांवाचे एक महान योगी महाराष्ट्रात संचार करत होते. त्यांनी आपल्या आध्यात्मिक अनुभवावर आधारित हा अनुभव लिहिला आहे. या अभंगामध्ये आध्यात्मातील बरीच रहस्ये उलगडून दाखविली आहेत.

## हरिभजन

सोहिरोबानाथ म्हणतात,

हे मानवा, तू सतत परमेश्वराचे चिंतन करत राहा. ईश्वरचिंतना शिवाय एक क्षणही घालवू नकोस ! ईश्वराच्या चिंतनाने चित्तामध्ये ज्ञानदीप प्रज्वलित होईल व चिदाकाशाचे दर्शन घडेल. चिंतन, चित्त, चिदाकाश ही त्रिपुटी (तीन गोष्टी) जेव्हा नाहीशी होईल तेव्हा तू जीवनमुक्त होशील. जीवन, जग, जगदीश्वर या तिन्ही गोष्टी एकच आहेत, असा तुला अनुभव येईल. या विश्वामध्ये परब्रह्माशिवाय दुसरे काही नाही याचा तुला अनुभव येईल.

## दोरीचा साप

जंगलाने वेढलेल्या एका खेडेगावामध्ये गरिबांची दहा-वीस घरे होती. ते लोक चुलीवर जेवण करत, पेटलेल्या चुलीच्या उजेडात चटणी भाकर खात व संध्याकाळी ७-८ ला झोपी जात.

रात्रीच्या अंधारामध्ये एका मुलाचा पाय चार-पाच फूट लांबीच्या एका दोरीवर पडला. साप साप म्हणून मुलगा जोराने किंचाळला व बेशुद्ध पडला. लोकांनी पाणी मारून त्याला शुद्धीवर आणले व दहा-वीस माणसे हातात काठ्या वगैरे घेऊन सापाला मारायला निघाले. साप समजून दोरीला बडव बडव बडविले. इतके बडवूनही साप मरत का नाही, याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. इतक्यात एकाने दिवा आणला तेव्हा सगळ्यांच्या लक्षात आले की, '' आत्तापर्यंत आपण साप साप म्हणून दोरीला बडवित होतो व या दोरीची अतिशय भीती आपल्याला वाटत होती.''

## ज्ञान दिवा

सोहिरोबानाथ म्हणतात,

ज्याप्रमाणे दोरीला साप समजून त्या गावातील लोक दोरीच्या सापाला भीत होते व बडवित होते त्याचप्रमाणे,

''हा संसार, हे विश्व, हे तुझे शरीर, जन्म-मृत्यू, स्वर्ग-नरक, स्त्री-पुरुष या सर्व गोष्टींना तू सत्य मानल्याकारणाने तुझा आत्मा व परमात्मा यांची भेट होत नाही. यासाठी तू प्रथम तुझ्या अंतरंगातील ज्ञान दिवा सतत प्रज्वलित ठेव, त्याला विझू देऊ नकोस !''

सोहिरोबानाथांनी ज्ञान दिवा विझू देऊ नकोस, सतत प्रज्वलित ठेव असे मानवाला सांगितले आहे. हा ज्ञानदिवा म्हणजे ''मी शरीर नाही'' याची जाणीव. ''मी कोण आहे ? हे जाणून घेण्याची जिज्ञासा व या विश्वामध्ये परब्रह्माशिवाय दुसरे काहीही नाही याचा अनुभव.''

जेव्हा ज्ञानाचा दिवा विझतो किंवा मंद होतो, तेव्हा जग सत्य वाटू लागते. जन्म-मृत्यू सत्य वाटू लागतात. जीवनातील आनंद नाहीसा होतो. जीवनात सुख-दुःख निर्माण होते. मनुष्य ''काय करू कसे करू!'' असा जप करू लागतो. निंदा-स्तुती करू लागतो. माझे माझे म्हणू लागतो, मित्र-शत्रू निर्माण करतो, त्याला भीती वाटू लागते, त्याला कोणाच्यातरी आधाराची गरज भासू लागते, राग, द्वेष निर्माण होतात, स्त्री-पुरुष हा भेदभाव निर्माण होतो. या सर्व गोष्टींमुळे आत्मा व परमात्मा यांची भेट होत नाही.

सोहिरोबानाथ म्हणतात,

तुझ्या शरीरात राहणारा आत्मा व तुझ्या शरीरात राहणारा परमात्मा यांची भेट गेल्या हजारो वर्षांपासून झालेली नाही व पुढेही हजारो वर्षे होण्याची शक्यता नाही. कारण तुझा मार्ग चुकलेला आहे.

तू चुकीचे वागत आहेस. तुला दिसणाऱ्या जगाला तू सत्य मानत आहेस. जे जग निर्माण झालेच नाही त्याला तू सत्य मानतोस. तुझा जन्म झालाच नाही तरी तू म्हणतोस मी जन्माला आलो व या जगात कोणीही मरत नाही तरीही तू म्हणतोस हा मेला तो मेला. अनेक प्रकारच्या पोथ्या वाचून तू स्वतःची मते बनवितोस, तुझ्यासारख्याच अज्ञानी व मूर्ख लोकांनी निर्माण केलेल्या रूढी व परंपरा यांना चिकटून राहून त्याप्रमाणे तू आचरण करतोस, मंत्र-तंत्राच्या नादी लागतोस, क्षुद्र शक्तींच्या उपासना करतोस, या तुझ्या चुकीच्या आचरणामुळे तुझ्या अंतरंगातच राहणारे जीव व शिव यांची भेट होत नाही. अशी हजारो वर्षे गेली, पुढे हजारो वर्षे जातील, जीवा शिवाची भेट होणारच नाही. भ्रममय जन्म-मृत्यू , सुख-दुःख याच्या चक्रामध्ये तू फिरतच राहशील.

असे घडू नये असे वाटत असेल तर तुझ्या अंतरंगातील ज्ञानाचा दिवा तू सतत प्रज्वलित ठेव; त्याला विझू देऊ नकोस.

## विवेक

सोहिरोबानाथ म्हणतात,

तू नेहमी असे बोल की, ज्या बोलण्याने लोकांना ज्ञान होईल किंवा जे सत्य असेल. ज्या गोष्टीचा तुला अनुभव नाही असे काहीतरी तू बोलू नकोस.

सोहिरोबानाथांनी,

**विवेकाची ठरेल ओल ।**

**ऐसे बोलावे बोल ।**

**अपुले मत उगीच चिखल; कालवू नको रे ।**

या ओळी मुख्यत्वे करून ग्रंथकर्ते, लेखक, कवी, कीर्तनकार,

प्रवचनकार, समाजामध्ये रूढी व परंपरा निर्माण करणारे यांना उद्देशून लिहिलेल्या आहेत. हे लोक समाजाच्या अज्ञानात भर टाकतात व समाजामध्ये चुकीच्या रूढी व परंपरा यांचा प्रचार व प्रसार करतात. याचे भयंकर दुष्परिणाम समाजाला भोगावे लागतात. याची काही प्रत्यक्ष उदाहरणे मी स्वतः पाहिलेली आहेत ती सांगतो. आजच्या एकविसाव्या शतकात जर असे प्रकार घडतात, तर दोनशे वर्षापूर्वी सोहिरोबानाथांच्या काळामध्ये किती भयंकर रूढी, परंपरा असतील याची कल्पना वाचकांना येईल.

पन्नास-साठ हजार लोकांसमोर एक प्रवचनकार प्रवचन करीत होते. प्रवचनात त्यांनी सांगितले...

कावळा जर मानस सरोवरास गेला तर तो तात्काळ हंस होतो. प्रवचनकारांचे हे वाक्य ऐकून सगळ्या श्रोत्यांनी मान डोलावली. प्रवचनकार पुढे म्हणाले...

हंस या पक्षाचे वैशिष्ट्य असे आहे की, तो कधीही चारा खात नाही, तो फक्त मोतीच खातो. हंस पक्षाचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे दुधामध्ये पाणी मिसळून त्याच्यासमोर ठेवले असता तो फक्त दूध शोषून घेतो व पाणी वाटीत तसेच राहते.

प्रवचनकाराने आमच्या पोथ्या व पुराणांमध्ये जे लिहिलेले आहे ते जसेच्या तसे सांगितले व श्रोत्यांनी हंस व कावळा या दोन पक्षांचे प्रतिबिंब स्वतःच्या मनावर कोरले. ही गोष्ट अगदी अलिकडचीच आहे.

मी त्या प्रवचनकाराचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या डोक्यातील हंस व कावळा हे दोन्ही पक्षी काही गेले नाहीत. त्याने मला स्कंद पुराण, शिवलीलामृत अशा अनेक ग्रंथांचे

दाखले दिले.

म्हणून सोहिरोबानाथ म्हणतात –

**"आपल्या मतांचा चिखल तू कालवू नकोस !"**

**कावळा मानस सरोवरावर गेल्यावर हंस होतो याचा अर्थ सामान्य माणसाने मनाचा शोध घेण्याचा निश्चय करून सोऽहम् साधना केली असता त्याला हंस ही स्टेज प्राप्त होते. हंस ही आध्यात्मातील एक स्टेज असून प्रवचनकार मात्र हंस पक्षाचे वर्णन करत होते.**

हंस ही स्टेज प्राप्त झाल्यानंतर योगी विवेकाने वागू लागतो. योग्याला चांगल्या व वाईट स्पंदनांचे ज्ञान होऊ लागते. तो चांगली स्पंदने ग्रहण करतो व वाईट स्पंदनांचा त्याग करतो. वातावरणामध्ये चांगल्या, वाईट शक्ती असतात. यातील चांगल्या शक्ती तो ग्रहण करतो व वाईट शक्तींचा तो त्याग करतो. याला संस्कृतमध्ये नीर–क्षीर न्याय म्हणजेच हंसाने दूध व पाणी वेगळे करणे असे म्हणतात. येथे योग्याला विवेक ही स्टेज प्राप्त होते.

आमच्या प्रवचनकारांनी येथेही हंस पक्षाला वेठीला धरले.

हंस मोती खातो, चारा कितीही ताजा असला तरी खात नाही, किडे खात नाही असे प्रवचनकारानी सांगितले.

याचा अर्थ हंस स्टेज प्राप्त झालेला योगी सद्गुण प्राप्त करतो. प्रकाशमार्गानेच आध्यात्मात प्रगती करतो.

आमचे कीर्तनकार, प्रवचनकार कशाप्रकारे गोंधळ घालतात हे वर लिहिले आहे.

अशा प्रकारचे गोंधळ गेली पंधरा–वीस हजार वर्षे हिन्दू धर्मात

घातले गेले आहेत व यातून सतीच्या प्रथा, केशवपन प्रथा, दारूड्या व गुंड प्रवृत्तिच्या पतीला देव मानणाऱ्या प्रथा, अशा चुकीच्या प्रथा निर्माण झाल्या म्हणून सोहिरोबानाथ म्हणतात,

**विवेकाची ठरेल ओल ।**

**ऐसे बोलावे बोल ।**

**अपुले मत उगीच चिखल ; कालवू नको रे ।।**

कारण समाजामध्ये जे चुकीच्या प्रथा निर्माण करतात त्यांना खूप मोठे पाप लागते. मनुष्य जन्म त्यांना मिळणे दुरापास्त होते. म्हणून जोपर्यंत **विवेक ख्याति** ही स्टेज प्राप्त होत नाही, तोपर्यंत समाजाला उपदेश करण्याच्या भानगडीत पडू नकोस, असे सोहिरोबानाथांना म्हणावयाचे आहे. म्हणून ज्या शब्दांना, ज्या वाक्यांना, ज्या बोलांना विवेकाचा ओलावा असेल, म्हणजेच परमेश्वराची मान्यता असेल, असेच बोल तू बोलत जा, असे सोहिरोबानाथांनी सांगितलेले आहे. विवेक ही स्टेज इतकी मोठी आहे की, ज्याच्या हृदयामध्ये विवेक निर्माण झाला त्याच्या हृदयामध्ये परमेश्वरस्वरूप सद्‌गुरु येऊन राहिला असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. असे लोक भवसागर तरून जातात.

**मद्‌हृदयी सद्‌गुरु ।**

**तेणे तरलो हा संसार पुरु ।**

**म्हणोनी विशेषे अत्यादरु।**

**विवेकावरी ।।**

समाजातील समाजाभिमुख माणसांना, नेत्यांना, पुढाऱ्यांना, कीर्तनकार, प्रवचनकारांना सोहिरोबानाथांनी इशारा दिला आहे की, विवेक प्राप्त झाल्याशिवाय समाजाला उपदेश करण्याच्या भानगडीत पडू

नका.

जे श्रोते आहेत, कीर्तने, प्रवचने ऐकतात, थोरामोठ्यांचे उपदेश ग्रहण करतात अशा लोकांना उद्देशून सोहिरोबानाथ म्हणतात–

**संत संगतीने उमज ।**

**आणूनी मनी पुरती समज।**

**अनुभवावीण मान; डोलवू नको रे ।**

सोहिरोबानाथ श्रोत्यांना म्हणतात,

खऱ्या संताची, प्रकाशमार्गी सत्पुरुषाची संगत करून, सेवा करून जीवनाचे गूढ रहस्य तू समजून घे ! त्यांनी सांगितल्याप्रमाणे साधना करून अनुभव घे व खऱ्या खोट्याचा शोध घेतल्याशिवाय तू उगाच मान डोलवू नकोस.

समाजात पडलेल्या चुकीच्या प्रथा पाहून सोहिरोबानाथांचे मन कळवळले. समाजातील काही स्वार्थी लोक समाजाला चुकीचे उपदेश देत आहेत व त्यामुळे समाज चुकीच्या मार्गाने जात आहे हे पाहून त्यांनी वरील ओळी रचल्या.

## ज्ञान ज्योति

अभंगाच्या शेवटच्या कडव्यामध्ये सोहिरोबानाथांनी ज्ञान–ज्योतिचा उल्लेख केला आहे. या ज्ञान ज्योतिलाच **शिव** म्हटले जाते.

प्रत्येक माणसाच्या ब्रह्मरंध्रामध्ये एक ज्योति असते. या ज्योतिलाच कारणदेह असे म्हटले जाते. किंबहुना कारणदेहातच ही ज्योति असते. या ज्योतिमुळेच मातेच्या गर्भामध्ये प्राणवायुच्या संचाराविरहित मूल जिवंत राहते. मातेच्या गर्भामध्ये सातव्या महिन्यामध्ये सूक्ष्मदेह म्हणजे **जीव** प्रवेश करतो. हा जीवात्मा मातापित्याचा ऋणानुबंधी

असतो. पृथ्वीतलावरील प्रत्येक माणसाच्या ब्रह्मरंध्रामध्ये ही ज्योति असते. प्राणी व पशुंच्या मध्येही असते.

माणसाच्या मृत्यूच्या थोडाकाळ अगोदर ही ज्योति विझून जाते. म्हणजेच शरीरातून बाहेर पडून जाते व मृत्यूच्यावेळी सूक्ष्मदेह बाहेर पडतो.

एखाद्या व्यक्तीचा अपघातात मृत्यू होणार असेल तर अपघातापूर्वी काही तास अगोदर ही ज्योति शरीरातून निघून जाते व त्यानंतर काही तासांनी अपघात होतो. ईश्वराची इच्छा असेल तरच एखादा सत्पुरुष या ज्योतिला पुनःश्च स्थानापन्न करू शकतो व आपल्या भक्ताचे प्राण वाचवितो. या ज्योतिची ओळख करून घेणे म्हणजेच जीवा शिवाची भेट होणे. या ज्योतिला जाणणे म्हणजेच परमात्म्याचे दर्शन व या ज्योतिशी एकरूप होणे म्हणजे **जीवनमुक्त** अवस्था प्राप्त करणे.

प्रगाढ ध्यानामध्ये ब्रह्मरंध्रातून ही ज्योति बाहेर येते व ध्यान विसर्जन केले असता पुन्हा ही ज्योति मस्तकात लुप्त होते.

सोहिरोबानाथ म्हणतात...

या ज्ञान ज्योतिकडे सतत पाहत राहा. दिवस-रात्र या ज्ञान ज्योतिकडे पाहत राहा. अगदी डोळ्याची पापणीसुद्धा हलवू नकोस. जराही खंड न पडता या ज्ञान ज्योतिवर आपले लक्ष केंद्रीत कर. म्हणजे तुला परब्रह्माचा साक्षात्कार होईल. या जगामध्ये सर्वत्र एकच परब्रह्म भरून राहिले आहे याचा अनुभव येईल.

# १४. देव-दैत्य

मानवी मनामध्ये देव आणि दैत्य या दोघांचेही अस्तित्व असते. सत्प्रवृत्तींना देव म्हटले जाते. दुष्ट प्रवृत्तींना दैत्य किंवा सैतान म्हटले जाते. सत्प्रवृत्तींचे व असत्प्रवृत्तींचे म्हणजे चांगल्या प्रवृत्तींचे व वाईट प्रवृत्तींचे म्हणजेच देव-दैत्यांचे किंवा ईश्वर व सैतानाचे युद्ध गेली हजारो वर्षे सुरू असून, या युद्धात कधी चांगल्या प्रवृत्तींचा जय होतो, तर कधी वाईट प्रवृत्तींचा जय होतो. सध्याच्या काळात मात्र वाईट प्रवृत्तींचे म्हणजेच दैत्यांचे, म्हणजेच सैतानाचे साम्राज्य सर्वत्र दिसून येत आहे.

आमच्या सर्व ग्रंथांमध्ये, पुराणांमध्ये देव-दैत्यांची युद्धे रंगविलेली आहेत. आम्ही सर्वजण या सर्व कथा अतिशय चवीने वाचतो, पुन्हा पुन्हा त्याची पारायणे करतो, परंतु आमच्या लक्षात हे येत नाही की, चांगल्या व वाईट प्रवृत्तींचे म्हणजेच देव-दैत्यांचे म्हणजेच ईश्वर-सैतानाचे अस्तित्व बाहेर कोठे नसून, पुराणांमध्ये नसून ते आमच्या हृदयातच आहे. आमच्या हृदयातील दुष्ट प्रवृत्ती जर आम्ही काढून टाकल्या नाहीत, तर जगात सर्वत्र सैतानाचे साम्राज्य फोफावेल. दुष्टपणा बोकाळेल व या सर्वांचे दुष्परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील. सध्या सैतानाचे साम्राज्य सर्वत्रच पसरलेले आहे व त्या सर्वांचे परिणाम महागाई पासून-आतंकवादापर्यंत विविध रूपांनी आपण भोगत आहोत. या सर्वातून

जर आपल्याला सुटका हवी असेल तर आपल्याला आपल्याच अंतरंगामध्ये बदल करणे आवश्यक आहे. कारण सामुहिक दुष्कर्मांचे दुष्परिणाम म्हणून समाजाला दुर्घटनांना तोंड द्यावे लागते.

एक सज्जन पतिपत्नी होते. दोघेही भरपूर पैसा मिळवित असत. एकदा मी त्यांना म्हटले,

''तुम्ही उभयतांनी थोडे दान करा व रोज जप करा !''

यावर पत्नीने मला विचारले–

''का?'' ''आमच्यावर काही संकट येणार आहे का?''

मी म्हटले, ''तसे काही नाही !''

यावर पत्नी म्हणाली, '' तसे काही नाही ना, मग मला दान व जप करायची आवश्यकताच काय ?''

यावर मी काहीच बोललो नाही.

पतिपत्नी पैसा मिळवत राहिली व सोने जड–जवाहीर खरेदी करत राहिली.


एक दिवस मध्यरात्री त्यांच्या घरात चोर शिरला व सर्व जड–जवाहीर लुटून घेऊन गेला.

यावरून माणसातील कंजूष प्रवृत्ती चोराला जन्म देते व चोरीची प्रवृत्ती पोलीसाला जन्म देते. कर्मश्रृंखलेचे हे छोटेसे उदाहरण आहे. जगातील सर्व समस्यांचे मूळ माणसाच्या मनात आहे.

दुष्टप्रवृत्तीची माणसे समाजात दुष्टपणा वाढवितात व यातून आतंकवाद निर्माण होतो.

संकुचित वृत्तीचा त्याग करून माणसाने जर दान, परोपकार व ईश्वरभक्ती या तीन प्रवृत्तींची कास धरली तर समाजातील ९०% समस्या आपोआप सुटतील असे मला वाटते. सध्या समाजामध्ये सैतानाचे

# दैवी–सत्ता



ईश्वरभक्ती, दान, परोपकार करणारी माणसे सदैव दैवी सत्तेच्या आधीन राहतात.

साम्राज्य कसे बोकाळलेले आहे हे याच अध्यायात दिलेल्या चित्रावरून कळून येईल.


दान-धर्म व ईश्वरभक्ती यांची चेष्टा करणाऱ्या माझ्या माहितीतील एका माणसावर गुन्हेगारीचा खोटा आरोप येऊन त्याला जवळजवळ वर्षभर विविध प्रकारच्या शिक्षांना तोंड द्यावे लागले. त्यानंतर त्याला दान-धर्म व ईश्वरभक्ती यांचे महत्त्व कळले. यावरून दान-धर्म व ईश्वरभक्ती या गोष्टी न केल्यास आपल्यावर आपत्ती येतात हे सिद्ध होते. अशी असंख्य उदाहरणे देता येतील.

ईश्वरभक्ती व दान या दोन गोष्टी जीवनाचे अभिन्न अंग असून या योग्यवेळी जर केल्या नाहीत तर वृद्धापकाळामध्ये त्याचे खूप मोठे दुष्परिणाम भोगावे लागतात. शिवाय पुढील अनेक जन्म दारिद्र्यात काढावे लागतात.

विश्वामध्ये दोन प्रकारच्या शक्ती आहेत एक चांगली शक्ती व दुसरी वाईटशक्ती. आपण चांगल्या शक्तीच्या अधिपत्याखाली जर राहिलो तर आपल्यामध्ये,

''दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, परोपकार, दान, मानवता, इतरांना मदत करण्याची वृत्ती, निःस्वार्थी, नामस्मरण, ईश्वरभक्ती, जप, इतरांना आनंद देण्याची वृत्ती, साधेपणा, सरळपणा, सतत चांगले विचार करणे, स्तोत्रपठण, प्रसन्न व आनंदी राहणे, मन निर्विचार करणे, मन निर्विकल्प करणे, प्रकाशमार्गीय साधना, सोऽहम् साधना, श्रद्धावान असणे, इतरांशी आपुलकीने वागणे, ईश्वरचिंतन या सद्गुणांपैकी एखाद् दुसरा सद्गुण आपल्यामध्ये असेल तर त्या सद्गुणांची जोपासना करून इतर जास्तीत जास्त सद्गुण मिळविण्यासाठी प्रयत्न करावयास हवेत. जितके जास्त सद्गुण अंगी येतील तितके आपण परमेश्वराच्या जवळ जातो. परंतु असे घडत नाही. सैतानीशक्ती, दुष्टशक्ती, वाईटशक्ती

# आसुरी–सत्ता



गुंडगिरीपासून आतंकवादापर्यंत सर्व वाईट कामे करणारी माणसे
दुष्ट शक्तींच्या आधीन राहतात.

आपल्याला प्रकर्षाने खेचत असतात. सैतानाचा अंमल आपल्यावर जास्त असतो. दैत्यांनी, दुष्टशक्तींनी आपल्याला घेरलेले असते, वेढलेले असते त्यामुळे एखादा बारीकसा सद्गुण आपल्यामध्ये असला तर तो दबून जातो किंवा नष्ट होतो व आपण पूर्णपणे दुष्टशक्तीच्या, वाईटशक्तीच्या, सैतानाच्या आधीन सदैव राहतो. एकदा का या सैतानी शक्तींच्या आधीन माणूस झाला की, जन्मोजन्मी त्याची सुटका होत नाही.

**माणसामध्ये या सैतानीशक्ती पुढील दुर्गुणांच्या व दुष्प्रवृत्तींच्या रूपाने निवास करतात.**

दंभ, दर्प, अभिमान, गर्व, ताठा, अहंकार, स्वार्थ, लोभ, मोह, मत्सर, क्रोध, कंजूष, कपट, चोरी, डकैती, संकुचित वृत्ती, आतंकवाद, खून, बलात्कार, वाम मार्गाने पैसा मिळविणे, लाच खाणे, जनतेला लुटणे, दारू पिणे, इतरांना फसविणे, द्वेष, चंचल व संशयी मन, हेकेखोरपणा, अश्रद्धा, स्मशान साधना, काळीविद्या यांच्या साधना, पिशाच्च साधना, औदासीन्य, दुसऱ्याचे वाईट व्हावे असे विचार, नकारात्मक विचार, कारस्थानी वृत्ती, राजकारण अशा सर्व वृत्तींनी सैतानी शक्ती आपले साम्राज्य पृथ्वीतलावर चालवित असतात व वाढवितही असतात. सध्या पृथ्वीतलावर सैतानाचेच साम्राज्य सुरू आहे.

अशा प्रकारे संपूर्ण पृथ्वीवर अनादी कालापासून देव-दैत्यांचे युद्ध सुरू आहे. चांगल्या व वाईट शक्तींचे युद्ध सुरू आहे. आपल्याला देवाच्या बाजूने लढायचे असेल तर चांगल्या प्रवृत्तींची कास धरली पाहिजे. वाईट शक्ती व वाईट प्रवृत्ती माणसांना खेचून नेतच असतात. त्यांना बळी न पडणे यातच मानव जन्माचे सार्थक आहे.

# १५. उत्तिष्ठत जाग्रत

**उत्तिष्ठत ! जाग्रत ! प्राप्य वरान्नि बोधतः ।।**

''उठा !'' ''जागे व्हा !'' ''आत्मज्ञान देणाऱ्या श्रीगुरुला शरण जाऊन, त्याची सेवा करून, त्याच्या आज्ञांचे पालन करून लाखो जन्मांपासून मन व बुद्धीवर साचलेला मळ धुऊन काढा व त्या दिव्यज्ञान संपन्न गुरुप्रमाणे तुम्हीसुद्धा दिव्यज्ञान संपन्न व्हा !'' वरील संस्कृत सुभाषिताचा असा अर्थ आहे.

या कलियुगामध्ये दिव्यज्ञान संपन्न, प्रकाशमार्गी सद्गुरु सापडतच नाहीत. यदाकदाचित सापडले तर त्यांच्यावर श्रद्धा बसत नाही. कारण ते **बाल, उन्मत्त, पिशाच्च, सहज** यापैकी कुठल्यातरी एका अवस्थेत राहतात. ते कुठल्याही अवस्थेत राहिले तरी त्यांच्यावर श्रद्धा बसणे कठीण असते व ती टिकणेही कठीण असते. कारण सिद्धपुरुष ईश्वराच्या इच्छेनुसार पृथ्वीतलावर वागत असतात. सिद्धपुरुषाने कुठे राहायचे व कसे वागायचे हे ईश्वर ठरवित असतो. त्यामुळे अशा सिद्धपुरुषाचे दर्शन होणे दुरापास्त असते व दर्शन झाले तर श्रद्धा बसणे कठीण असते. याशिवाय आत एक, बाहेर एक असे वागणारी माणसे, त्यांच्याजवळ टिकू शकत नाहीत. स्वार्थाने, लोभाने कोणी सत्पुरुषाच्या जवळ गेल्यास प्रकाशमार्गी सत्पुरुषाला वातावरणातील देवतांकडून सूचना

मिळतात व त्या सूचनांनुसार तो वागतो. परंतु खऱ्या श्रद्धेने जे सेवा करतात त्यांची जन्मोजन्मींची कर्मे शुद्ध होतात, प्रारब्ध शुद्धी होते व मृत्यूनंतर मोक्षही प्राप्त होतो. देवतांकडून जशा सूचना येतील त्या बरहुकूम सत्पुरुष वागत असतात. त्यामुळे सत्पुरुषांच्या वागण्याचे अर्थ सामान्य माणसांना कळत नाहीत. म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**तनु मनु जीवे। चरणासी लागावे ।।**
**अगर्वता करावे । दास्य सकळ ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

जर प्रकाशमार्गी सद्‌गुरु तुम्हाला भेटला तर तन, मन, धन, प्राण अर्पण करून त्याच्या चरणांना सर्वस्व मानून तुम्ही त्याचे दास्य करावयास हवे. मनोभावाने त्याची सेवा करावयास हवी व सुईच्या टोकाएवढासुध्दा अहंकार तुमच्या मनामध्ये शिल्लक राहता कामा नये. आपल्या अकलेचे तारे कधीही सिद्धपुरुषासमोर तोडू नयेत, आपल्या इच्छेप्रमाणे सिद्धपुरुषाला वागवू नये. बुद्धीचा गैरवापर करू नये. सिद्धपुरुषाचा दुरूपयोग करण्याचा प्रयत्न करू नये. असे केले असता अधोगती होते.

जो कोणी प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाची मनोभावे सेवा करतो त्याला दिव्यज्ञानाची प्राप्ती होते. हे दिव्यज्ञान प्राप्त झाल्यानंतर विविध प्रकारचे ज्ञान होते. देव-देवतांची दर्शने होतात. गुप्तरूपाने तपस्या करणाऱ्या ऋषींची दर्शने होतात, सिद्ध माहात्म्यांची दर्शने होतात, अंतरिक्षातून भ्रमण करणाऱ्या महायोग्यांची दर्शने होतात. या सर्वांच्या आशीर्वादाने आध्यात्मातील प्रवास होत राहतो, आध्यात्मिक प्रगती

होत राहते व शेवटी आत्मज्ञान होते.

**'मी'**

आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रमाणे अनुभव येऊ लागतो.

या सर्व विश्वाच्यापूर्वी 'मी' च होतो. सर्व विश्व नाहिसे झाले तरी 'मी' शिल्लकच राहीन. 'मी' पूर्वी विश्वव्यापी परमात्मा होतो. मला वाटले; ''खेळ मांडावा ! म्हणून 'मी' विश्व झालो. विश्वाचा नियंता ईश्वर झालो ! अनेक रूपाने 'मी' नटलो. त्यासाठी असंख्य महाकारण देह तयार केले. हे महाकारणदेह परमात्मस्वरूप असल्याने माझ्या खेळात रंग चढेना, नावीन्य निर्माण होईना म्हणून 'मी' या असंख्य महाकारणदेहांचे ऋषी केले ; थोडक्यात 'मी' अनेक ऋषींच्या रूपाने नटलो, तरीही माझ्या खेळात रंग भरेना, म्हणून 'मी' कारणदेहधारी असंख्य स्त्री-पुरुष निर्माण केले. या स्त्रिया- विदुषी (ज्ञानी) तर पुरुष आत्मज्ञान संपन्न ऋषी होते.

''मी असंख्य स्त्री-पुरुष निर्माण केले.'' किंवा असंख्य स्त्री-पुरुषांच्या रूपाने 'मी' नटलो. तरीपण सारेच ज्ञानी असल्याकारणाने -

''कोणीच कोणाला काही विचारत नव्हते.''

''कोणीच कोणाला काही सांगत नव्हते. ''

प्रश्न व समस्या नव्हत्या. प्रश्न निर्माणच होत नव्हते. समोरचा माणूस काय बोलणार, हे बोलण्यापूर्वीच दुसऱ्याला कळत असे. दुसरा माणूस काय उत्तर देणार, हे, तो उत्तर देण्यापूर्वीच प्रश्नकर्त्याला कळत असे. माळेत ओवलेल्या मण्यांप्रमाणे सर्वांची अंतःकरणे एकच असल्याकारणाने ''संवाद'' नव्हता. प्रश्नोत्तरे नव्हती. याशिवाय हवी ती गोष्ट मनाने निर्माण करता येत होती. त्यामुळे प्रयत्न करून काही प्राप्त करणे हा प्रकारच नव्हता. यामुळे खेळात रंग चढत नव्हता. खेळात

मजा येत नव्हती.

खेळात आणखी रसिकता यावी म्हणून मी सूक्ष्मशरीरे निर्माण केली. महाकारणदेहांच्या आत जी कारण शरीरे ठेवलेली होती त्या कारण शरीरांवर सूक्ष्मशरीराचे आवरण घातले व या सूक्ष्मशरीरामध्ये असा संकल्प केला की –

''मला माझ्या परमेश्वरस्वरूपाचा विसर पडेल ! मला माझ्या कारणदेहाचा व महाकारणदेहाचा विसर पडेल! लवकरच मी स्थूलशरीर धारण करणार आहे. सूक्ष्मशरीराने मी स्थूलदेहात राहीन! स्थूलदेहाच्या आश्रयाने मी जी काही चांगली–वाईट कर्मे करीन ती सर्व मला भोगावी लागतील. चांगल्या कर्माने सुख निर्माण होईल, वाईट कर्माने दुःख निर्माण होईल. परंतु जोपर्यंत मी पुनःश्च परमात्म–स्वरूपाशी एकरूप होत नाही, तोपर्यंत मला **परमानंद** कधीच प्राप्त होणार नाही. स्त्री–पुरुषाच्या संयोगाने स्थूलदेह निर्माण होत राहतील व मी चांगल्या–वाईट कर्माप्रमाणे स्त्री–पुरुषांच्या रूपाने पृथ्वीवर जन्म घेऊन चांगल्या–वाईट कर्मांची फळे भोगत राहीन. अशा प्रकारे मी लाखो जन्म घेईन, जेव्हा या सुखाचा व दुःखाचा मला कंटाळा येईल, सुखाला जीव जेव्हा विटून जाईल, तेव्हा मी परमानंदाचा शोध घेण्याचा प्रयत्न करीन. माझे प्रयत्न जर प्रामाणिक असतील तर, प्रकाशमार्गी सिद्धपुरुष मला मदत करतील व मी माझ्या मूळ परमात्म–स्वरूपाप्रत परत येईन. या सर्व प्रवासास म्हणजे परमात्म–स्वरूपापासून विभक्त होऊन पुन्हा परमात्म–स्वरूपाप्रत पोहोचेपर्यंतच्या काळास अठ्ठेचाळीस लाख वर्षे लागतील.''

''विश्वाचा खेळ खेळण्यासाठी करोडो सूक्ष्मशरीरे निर्माण करून किंवा करोडो सूक्ष्मशरीराच्या रूपाने मी नटलो. करोडो स्त्री–पुरुषांच्या रूपाने मी शेकडो वेळा जन्माला आलो व शेकडो वेळा मेलो. अशा

प्रकारे अद्वैत, विशिष्टाद्वैत आणि शेवटी द्वैत असा हा विश्वप्रपंच माझ्यामधून निर्माण झाला.''

प्रकाशमार्गी सद्‌गुरुची भेट झाल्यानंतर अशा प्रकारचे आत्मज्ञान होते. विश्वात आपण सर्वत्र भरून राहिलो आहोत असा अनुभव येऊ लागतो. मन परमानंदात बुडून जाते.

स्व-स्वरूपाचे ज्ञान झालेला साधक मग उलटा प्रवास करू लागतो. प्रथम तो देह ममता सोडून देतो. विचार व कल्पना यावर विजय मिळवून सूक्ष्मदेहाचे अस्तित्व नष्ट करून टाकतो.

सूक्ष्मदेहाचे अस्तित्व नष्ट करून टाकल्यानंतर तो कारणदेहाने साधना करू लागतो. बाह्य जगाला त्याचा स्थूलदेह दिसत असतो. परंतु स्थूलदेहाच्या आत सूक्ष्मदेह नसतो. मनाचे अस्तित्व नसते. याला उन्मनी अवस्था असे म्हणतात.

अदृश्य सृष्टीतील सिद्धमहात्मे अशा योग्याला मार्गदर्शन करत असतात. वातावरणातील देव-देवता अशा योग्याला कुठल्या माणसाशी कसे वागावे हे सांगतात. पृथ्वीतलावरील कुठल्या स्थानी त्याने रहावे व कुठल्या स्थानात त्याने राहू नये याचेही मार्गदर्शन अशा योग्याला सिद्ध माहात्म्यांकडून मिळते. पुष्कळवेळा देव-देवता व सिद्धमहात्मे त्याच्या मुखाने बोलतात. असा साधक परमात्मस्वरूपाशी एकरूप होऊन या जगात वावरत असतो.

अशा साधकाविषयी श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

**देखे साधक निघोनी जाये।**

**मागा पाऊलांची ओळ राहे ।।**

**तेथे ठाई ठाई होये । अणिमादिक ।।**

अशा साधकाच्या पावलांच्या प्रत्येक ठश्याच्या ठिकाणी अणिमा, महिमा, गरीमा अशा महासिद्धी निवास करतात, असा या ओवीचा अर्थ आहे.

आत्मा, परमात्मस्वरूपापासून विभक्त होऊन पुन्हा परमात्म-पदापर्यंत पोहोचण्यास नैसर्गिक कालावधीप्रमाणे अठ्ठेचाळीस लाख वर्षे लागतात. परंतु प्रकाशमार्गी सद्गुरु भेटल्यास, मनोभावाने त्याची सेवा केल्यास प्रकाशमार्गाचा लाभ होतो, विहंगममार्गाचा लाभ होतो व विहंगममार्गाने दररोज आठ तास याप्रमाणे अठ्ठेचाळीस वर्षे साधना केल्यास परमात्मपदाची प्राप्ती होते. साधना अपुरी राहिल्यास अपुरी राहिलेली साधना पुढील जन्मात पूर्ण करता येते. म्हणून ''उठा!'' जागे व्हा! प्रकाशमार्गी सद्गुरुला शरण जाऊन, त्याची सेवा करून जीवनमुक्त व्हा!

**म्हणौनी जाणितेनी गुरु भजिजे ।**
**तेणे कृत कार्य होईजे ।।**
**जैसे मूळ सिंचने सहजे ।**
**शाखा पल्लव संतोषती ।।**

वृक्षाच्या मुळाला पाणी घातल्यानंतर फांद्या व पाने संतुष्ट होतात, त्याप्रमाणे प्रकाशमार्गी सद्गुरुची सेवा करून कृतकृत्य व्हा! जन्माचे सार्थक करून घ्या!

# १६. योगसिद्धी

सिद्धी प्राप्त करण्याचे मार्ग अनेक आहेत. कुठलीही साधना न करता वनस्पती, प्राण्यांची हाडे याने क्षुद्र सिद्धी प्राप्त करता येतात. भूत-पिशाच्चांना वश करणारे मंत्र असतात. हे मंत्र चटकन सिद्ध होतात. या मंत्रांनीही अनेक चमत्कार करता येतात. परंतु या सर्व क्षुद्र सिद्धी मृत्यूनंतर साधकाला नरकात घेऊन जातात. म्हणून असल्या सिद्धींची साधना कधीही करू नये. त्याचप्रमाणे ज्या देवता उग्र आहेत, तामसी आहेत अशा तामसी व उग्र देवतांच्या साधनाही करू नयेत. साधना नेहमी सात्त्विक असावी. काही लोक भैरवांच्या साधना करतात. परंतु या साधनेने मृत्यूनंतर हजारो वर्षे पिशाच्च लोकात राहावे लागते. म्हणून अशा साधनाही करू नयेत.

## देवतासिद्धी

एखाद्या सात्त्विक देवतेच्या मंत्राचा, एकाच आसनावर बसून, सकाळी साडेचार तास व संध्याकाळी साडेचार तास जप केला असता एक वर्षानंतर खूप दिव्य अनुभव येऊ लागतात. मंत्र देवतेची कृपा होते. संसार सुखी होतो. कष्ट दूर होतात. एक वर्षाहून अधिक काळ साधना केल्यास साधनेला बसल्यानंतर दिव्य सुगंधाचा अनुभव येतो. आपल्या आसपास कोणी अत्तराच्या बादल्या ओतल्या आहेत असे वाटते. काही

वर्षे अशा प्रकारे साधना केल्यानंतर प्रथम देवतेचे चरण दिसतात किंवा देवता आपल्या आसपास आहे असा भास होऊ लागतो व नंतर देवतेचा साक्षात्कार होतो.

साधक किंवा साधकाचे घराणे जर शापित असेल, घराण्यात काही दोष असतील, साधक संकुचित वृत्तीचा असेल, तर देवतेचा साक्षात्कार होत नाही परंतु प्रपंच सुखाचा होतो.

देवता सिद्धी प्राप्त झाली असता, देवतेची प्रसन्नता प्राप्त झाली असता मोक्ष मार्गातील अडथळे दूर होतात. परंतु देवतेच्या प्रसन्नतेमुळे जे सामर्थ्य प्राप्त होते त्या सामर्थ्याचा दुरूपयोग केल्यास जन्म मरणाच्या चक्रात साधक पुन्हा अडकतो.

## योगसिद्धी

योग साधनेने अनेक सिद्धी प्राप्त होतात. या सिद्धी योग्याच्या देहामध्येच प्रगट होतात. त्यासाठी सतत अभ्यास करावा लागतो. **परब्रह्माशी तादात्म्यता हे मुख्य ध्येय असते.** त्यामुळे योगी, सिद्धी प्राप्त करण्याच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात व प्रथम परब्रह्माशी तादात्म्यता प्राप्त करतात.

सिद्धींच्या नादी लागणे धोक्याचे असते. याशिवाय पूर्वजन्मातील दोष, घराण्यातील दोष, योग्य गुरु न मिळणे, साधनेकरिता योग्य जागा न मिळणे इत्यादी अनेक कारणाने योग साधनेमध्ये अडथळे येतात. तरीपण चिकाटीने योग साधना करत राहावी. म्हणजे अनेक जन्मांनंतर का होईना परब्रह्माशी तादात्म्यता प्राप्त होते. केवळ योगसिद्धी कशा असतात व त्या कशा प्राप्त करतात याची माहिती साधकांना व्हावी म्हणून पुढे सर्व माहिती देत आहे. साधकांनी याचे प्रयोग करू नयेत व पुस्तक वाचून साधना करू नयेत. ही माहिती फक्त वाचण्यापुरतीच आहे.

## मनाची एकाग्रता

मनाची एकाग्रता पूर्णपणे झाल्याशिवाय तप, योग, साधना, सिद्धी, आध्यात्मिक प्रगती यापैकी काहीही प्राप्त होत नाही. म्हणून मनाची एकाग्रता साध्य करणे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. त्याचबरोबर जबरदस्तीने म्हणजे हिप्नॉटीझम किंवा सेल्फ हिप्नॉटीझम इत्यादी मार्गाने मनाची एकाग्रता केल्यास, असे मन, अघोरी मार्गाने सिद्धी प्राप्त करते. असा साधक मग आपले **संकुचित मन** एकाग्र करतो व असे एकाग्र मन अघोरी मार्गाने अघोरी सिद्धी मिळविते. म्हणजे भूत, प्रेत, पिशाच्च, असुर, राक्षस इत्यादी दुष्ट आत्म्यांना वश करून विविध प्रकारचे चमत्कार करून समाजाला मुठीत ठेवण्याचे काम असे मन करते. अशा साधकाची प्रचंड अधोगती होते. लक्षात ठेवा ! हिरण्यकश्यपु, हिरण्याक्ष, रावण, कुंभकर्ण इत्यादी राक्षसांनी अघोरी मार्गाने मन एकाग्र करून असंख्य अघोरी सिद्धी मिळविल्या. कोट्यावधी लोकांवर राज्य केले व मृत्यूनंतर नरकात गेले. अशा भयंकर अंधःकारमय लोकात गेले की जेथून त्यांची कोट्यावधी वर्षे सुटका होणार नाही. पृथ्वीतलावर आजही अशी काही माणसे आहेत, ज्यांच्याकडे पैसा व सत्ता भरपूर आहे, लाखो लोक त्यांच्या एका हाकेसरशी तोड-फोड आतंकवाद करत आहेत, असे सर्व लोक मृत्यूनंतर अंधःकारमय लोकात जातात, जेथून त्यांची लाखो वर्षे सुटका होत नाही.

मनाची एकाग्रता करणे अतिशय आवश्यक आहे. परंतु ती एकाग्रता सात्त्विक मार्गाने व्हावयास हवी. **ईश्वरभक्ती, दान व परोपकार** करून प्रथम मनाला **सात्त्विक** बनवावे व मन सात्त्विक झाले की, मग ते एकाग्र करावे.

## एकाग्र मन

कोठल्याही एकाच बिंदूवर (point) मन एकाग्र करणे. त्या बिंदूशिवाय मनात अन्य कुठलाही विचार येऊ न देणे म्हणजे "**मनाची एकाग्रता !**" ईश्वरभक्ती, दान व परोपकार करून मन प्रथम अतिशय शुद्ध करावे लागते. "ज्याप्रमाणे सोनार प्रथम सोने शुद्ध करतो व मग त्या सोन्याचा अलंकार बनवितो" त्याप्रमाणे मन स्वच्छ व शुद्ध करावे लागते. असे स्वच्छ व शुद्ध केलेले मन सात्त्विक बनते व अशा सात्त्विक मनामध्ये परब्रह्माचा प्रकाश पडतो.

सुरुवातीला एकच विचार मनात पाच ते दहा मिनिटे घोळविण्याचा अभ्यास करावा.

उदाहरणार्थ - समजा आपण ॐ किंवा राम या शब्दावर मन एकाग्र करायचे ठरविले आहे तर दहा ते पंधरा मिनिटापर्यंत या शब्दा व्यतिरिक्त मनात कुठलाही विचार किंवा कल्पना येऊ द्यावयाची नाही असा निश्चय करून पंधरा मिनिटांचा अभ्यास करावा. वर्ष दीड वर्ष प्रयत्न केल्यानंतर सात्त्विक, परोपकारी साधकांना हा अभ्यास करणे शक्य होईल व पंधरा मिनिटे हा अभ्यास जमू लागला की हळूहळू वेळ वाढविण्यास सुरुवात करावी. तीन तासापर्यंत मन एकाग्र होऊ लागले की योगसिद्धींचे दरवाजे उघडतात. अर्थात या दरवाज्यातून आत जायचे की नाही हे साधकाने स्वतःच ठरवावयाचे असते. काही साधक अनेक प्रकारच्या योगसिद्धी मिळविण्यात धन्यता मानतात, तर काही साधक योगसिद्धींकडे दुर्लक्ष करून परब्रह्माच्या दिशेने पुढे जातात.

योगसिद्धी प्राप्त करण्यासाठी विशिष्ट अभ्यास करावे लागतात. या अभ्यासाला **संयम** असे म्हटले जाते. सध्या या शब्दाचा वापर कोणी करीत नाही. म्हणून मी सुद्धा या शब्दाचा वापर न करता सर्व वर्णन करणार आहे.

## चित्तवृत्तीचा निरोध

मन एकाग्र करणे शंभर टक्के जमू लागले की, किंबहुना मन शंभर टक्के मुठीत आल्यानंतर चित्तवृत्तीचा निरोध करणे जमू लागते. चित्तवृत्ती निरोधाचा अभ्यास पुढील प्रमाणे करावा.

''एखाद्या खोलीमध्ये शांत चित्ताने बसावे. आपले सर्व लक्ष मनावर केन्द्रीत करावे. मनात कुठलाही विचार येणार नाही, कुठलीही कल्पना मनात उठणार नाही याची दक्षता घ्यावी. अनेक महिने असा अभ्यास केल्यानंतर हे जमू लागते. या अभ्यासाने सविकल्प समाधी प्राप्त होते. सविकल्प समाधी साध्य झाल्यानंतर या अवस्थेमध्ये जास्तीत जास्त काळ राहण्याचा प्रयत्न करावा. जितका जास्त वेळ साधक या समाधीत राहील तितका जास्त परमानंद त्याला प्राप्त होईल.''

एकान्तवासामध्ये सविकल्प समाधीचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर जेथे भरपूर गर्दी आहे, आवाज व गोंगाट आहे, लाऊड स्पीकर, टी. व्ही. चालू आहे अशा जागी हाच अभ्यास करावा. गर्दी व गोंगाटामध्येसुद्धा सविकल्प समाधीचा आनंद मिळू लागल्यानंतर या अवस्थेमध्ये आणखी खोल खोल जाण्याचा प्रयत्न करावा. एका सेकंदामध्ये सविकल्प समाधी लावण्याचा व एका सेकंदामध्ये सविकल्प समाधी उतरविण्याचा अभ्यास करावा. या अभ्यासामध्ये निपुण झाल्यानंतर बोलतांना, लिहितांना, भांडतांना, वाद-विवाद करतांना, सर्व प्रकारचे व्यवहार करतांना, एखादा लेख किंवा पुस्तकाचा मजकूर दुसऱ्याला सांगताना याच अवस्थेचा अनुभव घ्यावा.

सविकल्प समाधीच्या अवस्थेमध्ये साधक जेव्हा इतका निपुण होतो तेव्हा देवताही त्याला वंदन करू लागतात. त्याच्या अस्तित्वाचे चमत्कार लोकांना दिसू लागतात. खरे पाहता,''थोडीशी शक्ती गोळा झाली की लगेच साधकाभोवती लोकांची गर्दी होऊ लागते. साधक

बेसावध असेल तर या गर्दीचा मासळी बाजार होण्यास वेळ लागत नाही.'' या मार्गामध्ये पावला पावलावर धोके असतात. अत्यंत सावध साधक सर्व अडथळ्यांना पार करून सविकल्प समाधीमध्ये जेव्हा बुडून जातो तेव्हा सिद्धींचे दरवाजे त्याच्यासाठी सताड उघडले जातात. कुठल्या सिद्धी कशा प्राप्त कराव्या याचे ज्ञान त्याला होऊ लागते. यातील काही सिद्धींची माहिती पुढे देत आहे.

### वनस्पतीज्ञान

सविकल्प समाधी साध्य झाल्यानंतर अनेक प्रकारच्या वनस्पतींचे ज्ञान होते. कुठल्या वनस्पतींचा उपयोग केव्हा व कसा करावा हे समजू लागते. ही वनस्पतीज्ञान सिद्धी, जर साधकाने प्राप्त केली तर त्याला धातुपासून उत्तम प्रतिचे सोने बनविता येते व न खाता-पिता कसे जगावे हे कळते. हिमालयातील भयंकर थंडीत अपुऱ्या वस्त्रानिशी साधक राहू शकतो. कुठल्या रोगावर कुठले औषध द्यावे हे त्याला समजू लागते. परंतु साधक येथे गुरफटल्यास पुढील मार्ग येथे बंद होतो.

### त्रिकालज्ञान सिद्धी

या सिद्धीने कोणाचेही भूत, भविष्य, वर्तमान जाणता येते. ग्रह गतींचे ज्ञान होते. भेटणाऱ्या माणसांच्या पूर्वजन्मांचे ज्ञान होते व स्वतःचे पूर्वजन्मही समजतात. सविकल्प समाधीनंतर ही सिद्धी प्राप्त होते. परंतु साधकाने येथेही थांबू नये, अडकू नये. आनंद जेव्हा बाहेरून प्राप्त होत असतो, तो कालान्तराने दुःख देणारा ठरतो. म्हणून आनंद आतून म्हणजे हृदयातून प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. बाह्य आनंदावर कधीही विसंबून राहू नये. साधक जेवढा निरीच्छ व निस्पृह होत जातो, तेवढा त्याला जास्त आनंद मिळतो. निस्पृह साधक पृथ्वीतलावर राहिला तरी, तो

देवलोकातच वास्तव्य करीत असतो. परमानंदातच वास्तव्य करत असतो. म्हणून सिद्धींच्या मागे न लागता मनाला जेवढे विशाल करता येईल तेवढे विशाल करावे. मन विशाल झाले की परमात्मा आपल्या हृदयात येऊन राहतो व कुठल्याही गोष्टीची कमतरता पडत नाही. अनेक चमत्कार आपोआप होतात. साधकाला फुकटचा मोठेपणा मिळू लागतो. येथेही साधकाने वाहत जाता कामा नये.

### छायापुरुष सिद्धी

उन्हामध्ये किंवा चांदण्यामध्ये आपल्या छायेकडे एकटक पाहत उभे राहावे. एक-दोन मिनिटे पाहिल्यानंतर चटकन वर आकाशाकडे पाहावे. आपली प्रतिकृती आकाशात दिसते. असे बराच वेळ करावे. बरेच दिवस, बरेच महिने ही साधना केल्यानंतर आकाशातून आपली रूपे साकार होतात. ही रूपे साधकासारखीच असतात. अशी अनेक रूपे साकार करून साधक त्यांच्या मार्फत विविध प्रकारची कार्ये करून घेतो. एकाचवेळी अनेक ठिकाणी जाऊन अनेक प्रकारची कार्ये संपादन करतो.

### जड-चेतन साधना

सुईच्या टोकावर त्राटक करावे. या त्राटकाने डोळ्यांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते म्हणून ज्यांचे डोळे अधू आहेत अशा साधकांनी ही साधना करू नये. निरोगी डोळ्यांचा साधक, जेव्हा या साधनेमध्ये सिद्ध होतो, तेव्हा त्याला कुठलीही जड वस्तू कितीही दूरपर्यंत हलविता येते. जड वस्तू त्याच्या आज्ञा मानू लागतात. या साधनेमध्ये जर प्रचंड प्रगती केली तर, जड वस्तूला हवेतून अधांतरी एका जागेहून दुसऱ्या जागी नेता येते. प्रचंड आकाराची शिळा एका जागेहून दुसऱ्या जागी नेता येते, शंकराच्या देवळातील नंदीला चारा

खायला घालता येतो. असे विविध चमत्कार करता येतात.

## अदृश्य सिद्धी

आकाशावर त्राटक करावे. काही दिवस त्राटक केल्यानंतर सुईच्या टोकाएवढा एक चमकदार बिन्दू दिसू लागतो. या बिन्दूवर त्राटक करावे. अनेक वर्षे दररोज तीन तास याप्रमाणे साधना केल्यानंतर अदृश्य होण्याची सिद्धी योग्याला प्राप्त होते. तसेच सूक्ष्मरूप धारण करता येते.

## बलातिबला

बलातिबला सिद्धी म्हणजे भूक व तहान न लागणे. ही सिद्धी प्राप्त झाल्यानंतर योग्याला अन्नाची व पाण्याची गरज राहत नाही. सूर्य किरणातून त्याच्या शरीराला आवश्यक ती सर्व पोषक द्रव्ये मिळत राहतात. ही सिद्धी प्राप्त करण्याची साधना पुढील प्रमाणे -

कंठकूपावर मन एकाग्र करावे. म्हणजे आपल्या मानेमध्ये जो एक खड्ड्यासारखा भाग आहे या भागावर, म्हणजेच कंठकूपावर मन एकाग्र करावे. तेथे काय आहे हे पाहावे. काही दिवस अशी साधना केल्यानंतर अठरा हाताची देवी तेथे उभी आहे, अशी धारणा करावी. सकाळी तीन तास व संध्याकाळी तीन तास, अठरा हाताच्या देवीचे कंठकूपामध्ये ध्यान करावे. म्हणजे बलातिबला सिद्धी प्राप्त होते. काही साधकांना दोन-तीन वर्षात ही सिद्धी प्राप्त होते. तर काही साधकांना बारा बारा वर्षे साधना करूनही ही सिद्धी प्राप्त होत नाही. परंतु आध्यात्मात प्रगती मात्र नक्की होते. कारण या साधनेमध्ये अनेक योग रहस्ये दडलेली आहेत. त्यामुळे ही साधना करणाऱ्याची आध्यात्ममार्गात प्रगती होत राहते.

## आसनसिद्धी

सिद्धासन, पद्मासन किंवा सहजासन या तीन पैकी कोठल्याही एका आसनामध्ये साडेतीन तासापर्यंत, सहजपणे सुखपूर्वक बसून

ईश्वरचिंतन केले असता आसनसिद्धी प्राप्त होते. आसनसिद्धी प्राप्त झाल्यानंतर शरीरातील सर्व नाड्या शुद्ध होतात. विविध प्रकारचे प्राणायाम करण्याची योग्यता प्राप्त होते. शीत-उष्ण, सुख-दुःख यांची जाणीव होत नाही. मन समाधानी बनते. हिमालयासारख्या अतिशय थंड प्रदेशातही फारशी थंडी जाणवत नाही व तामिळनाडूसारख्या उष्ण प्रदेशातही साधक उष्णतेने हैराण होत नाही. शरीर वातावरणाला अनुकूल असे बनते.

स्थिर व ताठ बसावे. मुळीच हलूडुलू नये. ईश्वरचिंतन करावे. छातीच्या डाव्या बाजूला कूर्म नाडी नांवाची एक नाडी आहे. या नाडीवर मन एकाग्र करावे. म्हणजे मनाने छातीच्या डाव्या भागाकडे पाहत राहावे. असे केले असता **आसन स्थिर** होऊ लागते. पोटात वायु निर्माण होणार नाही, अशा प्रकारचा आहार घ्यावा. प्रथम पंधरा मिनिटे आसन स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. हळूहळू वेळ वाढवावा, मनात ईश्वर चिंतन करावे, दृष्टी एखाद्या देवाच्या फोटोवर, ॐ वर किंवा सत्पुरुषाच्या फोटोवर स्थिर करावी, निराकाराची साधना करण्याची इच्छा असेल तर दृष्टी आकाशावर स्थिर करावी. पंधरा मिनिटांपासून आसन स्थिर करण्याच्या अभ्यासाची सुरुवात करून साडे-तीन ते चार तासापर्यंत स्थिरपणे आसनावर बसून ईश्वर चिंतन केले असता आसन सिद्धी प्राप्त होते. आसन सिद्धीचा अभ्यास करत असतांना दृष्टी एखाद्या बिन्दूवर म्हणजे- देवाचा फोटो, सत्पुरुषाचा फोटो, टिकली, जिलेटीन पेपरचा गोल तुकडा, जिलेटीन पेपरची चांदणी, अगरबत्तीचे जळणारे टोक, ज्योति, आकाश, ॐ यावर स्थिर केलेली असते. अशावेळी डोळ्याला त्रास होण्याची शक्यता असते. म्हणून दर दोन मिनिटांनी डोळे मिटून डोळ्यांना आराम द्यावा. अशा प्रकारे वर्ष-दीड वर्ष अभ्यास केला असता आसन सिद्ध होते. आसन सिद्धी प्राप्त झाल्यावर इतर सिद्धी प्राप्त

करणे सहज शक्य होते.

सिद्धासन, पद्मासन घालणे बऱ्याच लोकांना शक्य होत नाही म्हणून सहजासनावर बसून आसन सिद्धीचा अभ्यास करावा. डावा पाय जमिनीवर ठेवून त्यावर उजवा पाय ठेवावा याला सहजासन म्हणतात.

### त्राटक सिद्धी

ज्यांची दृष्टी अतिशय चांगली आहे, जे तरुण आहेत, अशा साधकांनी त्राटक सिद्धीचा अभ्यास करण्यास हरकत नाही. त्राटक म्हणजे एखाद्या वस्तूकडे एकटक पाहत राहणे. ज्या वस्तूवर आपण त्राटक करतो त्या वस्तू संबंधित ज्ञान अथवा सिद्धी प्राप्त होते. अशा प्रकारे साधक हजारो वस्तूंवरती त्राटक करून हजारो प्रकारच्या सिद्धी प्राप्त करतो. विविध प्रकारच्या सिद्धी प्राप्त करण्याचे त्राटक हे मूळ साधन आहे. त्राटक साध्य झाले की योगातील बऱ्याच गोष्टी साध्य होतात.

### भ्रूमध्य त्राटक

भ्रूमध्याच्या ठिकाणी त्राटक केले असता ज्योतिचे दर्शन होते. तसेच वातावरणामध्ये फिरणाऱ्या सिद्धपुरुषांची दर्शने होतात. डोळ्यातील नसांवर या त्राटकाचा परिणाम होत असल्याकारणाने हे त्राटक फार जपून करावे लागते.

### नासाग्र त्राटक

नासाग्र दृष्टी करून नाकाच्या शेंड्याकडे पाहत राहावे, याला नासाग्र त्राटक म्हणतात. याने दिव्य सुगंधाचा अनुभव येतो. तसेच स्वतःच्या शरीरातून वेगवेगळे सुगंध निर्माण करता येतात. या साधनेचे डोळ्यावर परिणाम होत असल्याकारणाने ही साधना सुरुवातीला काही सेकंद करावी व साधनेचा वेळ सेकंदा सेकंदानी वाढवावा.

### प्रतिबिंब त्राटक

एक मोठा आरसा घेऊन त्या आरशातील स्वतःच्या प्रतिबिंबाकडे पाहत राहावे. दररोज तीन तास याप्रमाणे सहा महिने साधना केली असता परचित्त विज्ञान ही सिद्धी प्राप्त होते. प्रतिबिंबाकडे एकटक पाहत राहावे. डोळ्याची पापणी हलवू नये. या साधनेने इतरही अनेक गोष्टी साध्य होतात. साधनेत प्रगती झाल्यानंतर त्या सर्व गोष्टी आपोआप कळू लागतात. कुठल्याही प्रकारची त्राटक साधना करण्यापूर्वी व साधना करून झाल्यानंतर डोळे थंडगार पाण्याने धुवावेत.

### अग्नि त्राटक

एकान्तामध्ये अग्नि पेटवून त्या अग्निकडे एकटक पाहत राहावे. बरीच वर्षे अशी साधना केल्यानंतर अग्निमध्ये देव-देवता दिसू लागतात. काही तेजस्वी आत्मे दिसतात व साधकाला सहकार्य करतात.

### आकाश त्राटक

आकाशाकडे एकटक पाहत राहावे. या साधनेने सूक्ष्मशरीर शुद्ध होते. चिदाकाशाचे दर्शन होते. चित्तशुद्धी होते. आध्यात्मात प्रगती होते. कुठल्याही त्राटक साधनेपेक्षा आकाश त्राटक ही श्रेष्ठ साधना आहे.

### नक्षत्र त्राटक

हे त्राटक रात्रीच्यावेळी करतात. आकाशातील ग्रह, तारा, नक्षत्र निवडून त्यावर एकटक पाहत राहावे. हे त्राटक केल्याने ग्रह, नक्षत्र यांच्या गतींचे ज्ञान होते. त्रिकालज्ञान होते. ज्याप्रमाणे पृथ्वीतलावर मानव राहतात, त्याचप्रमाणे ग्रह, नक्षत्रांवरती मानवाच्या डोळ्यांना न दिसणारे आत्मे राहतात. नक्षत्र लोकावर राहणारे हे आत्मे मानव निर्मित दुर्बिणीला किंवा उपग्रहाला दिसत नाहीत, परंतु त्राटक करणाऱ्या योग्याला हे आत्मे दिसतात व हे आत्मे ग्रह, नक्षत्रांच्या गतींचे ज्ञान देतात.

चंद्रावर त्राटक केल्याने कुठल्या माणसाच्या मनात काय चालले आहे याचे ज्ञान होते. वनस्पतींचे ज्ञान होते. पशू , प्राणी, पक्षी यांच्या भाषांचे ज्ञान होते.

## सूर्य त्राटक

सकाळी उगवत्या सूर्यावर त्राटक करावे. मिनिटा मिनिटाने ही साधना वाढवावी. प्रथम एक मिनिट त्राटक करावे. एक आठवड्यानंतर दोन मिनिटे अशा प्रकारे हळूहळू वेळ वाढवावा. कालान्तराने प्रखर सूर्यावर त्राटक करावे. ज्यांचे डोळे उत्तम आहेत, निरोगी आहेत त्यांनीच ही साधना करावी. ज्यांचे वय दहा ते तीस आहे, डोळ्याला चष्मा लागलेला नाही अशा साधकांनीच ही साधना करावी. या साधनेने त्रिभुवनाचे ज्ञान होते व सर्वज्ञता प्राप्त होते.

सामान्य माणसांनी दररोज डोळे मिटून सूर्याला नमस्कार करावा व सूर्य मंत्राचा एक मिनिट जप करावा. एवढे केल्यानेही खूप फायदे होतात. अशा प्रकारे विविध गोष्टींवरती त्राटक करून विविध प्रकारचे ज्ञान मिळविता येते. त्राटकामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दृष्टी ! जर दृष्टी व्यवस्थित नसेल तर त्राटक साधना करता येत नाही. तसेच त्राटक साधना करणे सर्वांनाच शक्य होत नाही. अशा वेळी ध्यान-धारणेच्या मार्गाने अनेक सिद्धी मिळविता येतात. ज्या सिद्धी त्राटक मार्गाने मिळविता येतात त्याच सिद्धी ध्यान-धारणेच्या मार्गानेही मिळविता येतात. किंबहुना ध्यान- धारणेच्या मार्गाने सिद्धी प्राप्त करणे हे सुरक्षित असते. म्हणून काही योगी त्राटका ऐवजी ध्यान-धारणेच्या मार्गाचा अवलंब करतात. ध्यान-धारणेने कोठल्या सिद्धी प्राप्त होतात हे आता पाहू !

## ध्यान - धारणेच्या मार्गाने प्राप्त होणाऱ्या सिद्धी

## चित्ताची स्थिरता

ध्यानाला बसावे. श्वास घेतांना 'सोऽ' व सोडतांना 'हम्' असे मनातल्या मनात म्हणावे. याने हळूहळू मन स्थिर होऊ लागते व चित्त शुद्धी होते. ही साधना करण्यापूर्वी एखाद्या देवाच्या अथवा देवीच्या स्तोत्राचे चाळीस हजार पाठ करावेत म्हणजे साधनेमध्ये देवतेची मदत मिळते.

सुरुवातीला मनामध्ये विचारांचे काहूर माजेल. एक क्षणभर सुद्धा मन तुम्हाला स्वस्थपणे बसू देणार नाही. तुम्ही मनात म्हणाल, ''काम करतांना, सर्व व्यवहार करतांना मन शांत असते परंतु ध्यानाला बसल्यावर मन अतिशय अस्वस्थ होते, मनात विचारांची गर्दी होते ; असे का ?''

याचे उत्तर असे आहे की, '' कचऱ्याने भरलेली खोली जेव्हा तुम्ही साफ करू जाता, तेव्हा कचरा खूप उसळतो, अगदी जीव नकोसा होतो, परंतु तुम्हाला खोली जर स्वच्छ करायची असेल, तर केरसुणीने खोली स्वच्छ करण्याचे काम तुम्हाला चालूच ठेवावे लागेल. उडणाऱ्या धुळीचा व कचऱ्याचा त्रास सहन करीत तुम्हाला खोली साफ करण्याचे काम चालूच ठेवावे लागेल. तुमच्या या प्रयत्नांचे फळ म्हणून एक दिवस तुमची खोली स्वच्छ होईल. त्यात मोकळी हवा खेळू लागेल व आनंदाने या खोलीत बसून तुम्ही ईश्वर चिंतन करू शकाल!'' सोऽहम् साधना सुरू केल्यानंतर मन अतिशय अस्वस्थ व बेचैन होऊ लागेल. तेव्हा समजावे की, आपल्या मनातील सर्व साठलेला कचरा बाहेर पडत आहे. हा कचरा अनेक जन्मांचा असल्याकारणाने, चित्ताची शुद्धी होण्यास अनेक वर्षांचा काळ द्यावा लागतो व एकदा का चित्त शुद्ध झाले की, ते स्थिर होते व सत्य ज्ञानाचा लाभ होतो, विहंगममार्ग मिळतो.

चमत्कार करणाऱ्या विद्या प्राप्त करण्यासाठी चित्ताची स्थिरता अथवा शुद्धता यांची आवश्यकता नसते. मी असे अनेक साधू पाहिलेले

आहेत की, जे विविध प्रकारचे चमत्कार करतात, समाजाला थक्क करतात. परंतु त्यांचे चित्त शुद्ध नसते, स्थिर नसते. त्यांचे मन अतिशय अस्वस्थ व बेचैन असते. अशी माणसे मृत्यूनंतर पिशाच्च लोकात जातात.

सोऽहम् साधनेने मन स्वच्छ होते, चित्त शुद्धी होते, चित्ताला स्थिरता प्राप्त होते, तेजोमय ब्रह्माचा साक्षात्कारही होतो. परंतु ही साधना अनेक वर्षे अतिशय चिकाटीने करावी लागते. आळस अथवा कंटाळा करून चालत नाही. मन बेचैन होते किंवा मन अस्वस्थ होते म्हणून साधनेकडे दुर्लक्ष करून चालत नाही.

हे पुस्तक वाचणाऱ्या वाचकांनी ही साधना करावयास मुळीच हरकत नाही. या साधनेबरोबर थोडे दान करत राहिल्यास खूप चांगले अनुभव येतात.

**जड समाधी**

साधना करतांना किंवा प्राणायामांच्या काही विशिष्ट क्रियांमुळे जड समाधी साध्य होते. परंतु ही खरी समाधी नव्हे. खऱ्या समाधीने ज्ञान व ईश्वर तादात्म्य यांचा अनुभव येतो. जड समाधीने जगाला फसविता येते. जड समाधी म्हणजे झोपेसारखी स्थिती. या स्थितीमध्ये साधक कितीही काळ राहू शकतो. परंतु तो जेव्हा या समाधीतून उठतो तेव्हा त्याच्या ज्ञानात भर पडलेली नसते. तो पूर्वीइतकाच सामान्य मनुष्य असतो. ज्याने जड समाधी साध्य केली आहे असा साधक स्वतःला एका खड्ड्यामध्ये अथवा पेटीमध्ये बंद करून जड समाधी लावतो व वीस दिवसांनी, चाळीस दिवसांनी, सहा महिन्यांनी अथवा वर्षांनी बाहेर येतो. जगाला खूप मोठे आश्चर्य वाटते, मोठा चमत्कार वाटतो, परंतु ही शुद्ध फसवणूक असते. स्वतःची व जगाची. अशा फसवणूकीने काहीही साध्य होत नाही. साधना करतांना अशा प्रकारे समाधी लागणार नाही याची दक्षता घ्यावी.

ध्येय वस्तूचे चिंतन करीत असतांना ध्येय, ध्याता, ध्यान या त्रिपुटीचे विसर्जन होऊन जी समाधी लागते ती खरी समाधी. अशा समाधीतून विविध प्रकारचे ज्ञान व सिद्धी प्राप्त होतात. काही साधक तर याही पुढे जाऊन सिद्धींकडे दुर्लक्ष करून सर्वातीत अशा परब्रह्माशी तादात्म्य पावतात. त्यांनाच परमहंस असे म्हटले जाते किंवा सिद्ध असे म्हटले जाते. अशा दिव्य पुरूषांच्या चरण स्पर्शाने पृथ्वी धन्य होते. मानव जन्म धन्य होतो. देवताही अशा सिद्धांच्या दर्शनाची अपेक्षा करतात.

**परकायाप्रवेश**

योग साधना करत असतांना अनेक प्रकारचे ज्ञान होते. आपण का जन्माला आलो, कर्माची बंधने कशी असतात, मन बुद्धीवर कर्माचे संस्कार कसे होतात, कर्मबंधनामुळे मनुष्य पुन्हा पुन्हा कसा जन्माला येतो, जन्म मृत्यूच्या चक्रात तो कसा लाखो वर्षे फिरत राहतो, अशा सर्व गोष्टींचे ज्ञान योग्याला होते. वाईट कर्मे केल्यास, कोणावर अन्याय, अत्याचार केल्यास आत्म्याला लाखो वर्षे यातना भोगाव्या लागतात, हे त्याच्या लक्षात येते. एखाद्या गरिबावर केलेला एखादा छोटासा अन्याय सुद्धा शंभर वर्षे यातना देण्यास कारणीभूत ठरतो. हे ज्ञानी योग्याला कळते. त्यामुळे योगी पुन्हा जन्म घेण्याचे टाळतो व ईश्वराच्या आज्ञेने तो परकाया प्रवेश करतो.

योगी प्रथम अंतर्ज्ञानाने एखाद्या तरुण युवकाचा मृत्यू केव्हा व कोठे होणार आहे, याचा शोध घेतो व ज्या क्षणी त्या युवकाचा मृत्यू होतो, त्याच क्षणी योगी आपला देह सोडतो व त्या मृत देहात प्रवेश करतो. योग्याचा देह मरतो व मेलेला तरुण जिवंत होतो. या नवीन तरुण देहाने योगी परत आपली साधना सुरू करतो. गर्भवासाचे कष्ट टळतात. जन्माला आल्यापासून कमीत कमी बारा-तेरा वर्षांचा त्याचा

बालपणाचा काळही वाचतो. याशिवाय आई-वडीलांचे संस्कार, धर्म, जाती यांची बंधने अशा अनेक गोष्टींपासून त्याची सुटका होते. नवीन देहाने तो  नव्या जोमाने नवनवीन साधना करत राहतो.

**वैश्वानर विद्या**

वैश्वानर विद्या म्हणजे सूक्ष्म देहाने प्रवास करणे.(Astral Travel-ling) साधकाने प्रथम शवासनामध्ये झोपावे. दोन तीन वेळा दीर्घ श्वास घ्यावा व तो तोंडाने सोडून द्यावा. मन एकाग्र करावे व उजव्या पायाच्या अंगठ्याकडे मनाने पाहत ॐ म्हणावे. नंतर उजव्या पायाच्या प्रत्येक बोटाकडे मनाने पाहत ॐ म्हणावे. तळव्याकडे  व पायाच्या पृष्ठ भागाकडे पाहत ॐ म्हणावे. नंतर घोट्याकडे व घोट्याच्या सांध्याकडे मनाने पाहत ॐ म्हणावे. नंतर डाव्या पायाचा अंगठा, बोटे, तळवा, पायाचा पृष्ठभाग, घोटा व सांधा प्रत्येकाकडे पाहत ॐ, ॐ म्हणावे. परत उजव्या पायाच्या पोटरीपर्यंतच्या सर्व भागाकडे मनाने पाहत ॐ म्हणावे व तसेच डाव्या पायाच्या पोटरीपर्यंतच्या सर्व भागाकडे मनाने पाहत ॐ, ॐ म्हणावे. नंतर उजव्या गुडघ्यापासून मांडीपर्यंतच्या भागाकडे  मनाने पाहत ॐ म्हणावे. डाव्या गुडघ्यापासून मांडीपर्यंतच्या भागाकडे पाहत ॐ म्हणावे.

प्रथम उजव्या हाताच्या प्रत्येक बोटाकडे मनाने पाहत ॐ म्हणावे. नंतर मनगटापासून खांद्यापर्यंत प्रत्येक भागाकडे हळूहळू मनाने पाहत ॐ म्हणावे. नंतर डाव्या हाताच्या प्रत्येक बोटाकडे मनाने पाहत ॐ म्हणावे नंतर मनगटापासून खांद्यापर्यंत प्रत्येक भागाकडे हळूहळू मनाने पाहत ॐ म्हणावे. कमरेपासून छातीपर्यंतच्या प्रत्येक भागाकडे मनाने हळूहळू पाहत ॐ म्हणावे. पोट, बेंबी, पाठ, छाती, बरगड्या अशा प्रत्येक अवयवाकडे मनाने पाहत ॐ म्हणावे. नंतर मान, ओठ, नाक, डोळे, कान, मानेचा मागचा भाग व शेवटी ब्रह्मरंध्र याकडे पाहत

ॐ म्हणावे. चिकाटीने ही साधना दररोज करावी. या साधनेने शांत झोप लागते. उत्साह वाढतो. मनाची चंचलता कमी होते. हळूहळू एक एक अवयव शिथिल होऊ लागतो व नंतर एक दिव्य अनुभव येतो.

''आपण आपल्या देहातून बाहेर पडतो. अंथरूणावर आपला देह मृतवत पडलेला असतो. आपण सूक्ष्मदेहाने स्थूलशरीराच्या बाहेर पडलेले असतो. आपले स्थूलशरीर व सूक्ष्मशरीर यांना जोडणारी एक रूपेरी दोरी असते. (Silver Cord) ही रूपेरी दोरी स्थूलशरीराच्या नाभीतून बाहेर पडलेली असते व सूक्ष्मशरीराच्या कमरेच्या भागाला चिकटलेली असते. या रूपेरी दोरीचे माहात्म्य असे आहे की सूक्ष्मदेहाने तुम्ही अब्जावधी मैल दूर गेलात तरी ही दोरी तुटत नाही.''

या सूक्ष्मदेहाने ब्रह्माण्डात कोठेही फिरता येते. निरनिराळ्या लोकातील आत्म्यांशी संपर्क साधता येतो. विविध प्रकारचे ज्ञान मिळविता येते. स्थूलदेहाला व सूक्ष्मदेहाला जोडणारी रूपेरी दोरी जेव्हा तुटते तेव्हा स्थूलदेहाचा मृत्यू घडून येतो. सूक्ष्मदेह स्थूलदेहापासून वेगळा होतो व आपल्या कर्माप्रमाणे प्राप्त झालेल्या लोकात (स्वर्गात अथवा नरकात) निघून जातो.

योगी जेव्हा स्वेच्छेने **लिलया** स्वतःचा सूक्ष्मदेह बाहेर काढून ब्रह्माण्डात फिरून पुन्हा शरीरात प्रवेश करतो तेव्हा त्याला वैश्वानर विद्या साध्य होते. या विद्येतील पुढील अवस्था म्हणजे **'मारूती !'**

**'मारूती'** अवस्थेमध्ये योगी कुठल्याही क्षणी स्वतःचा देह सोडू शकतो. रूपेरी दोरी तोडू शकतो व आवश्यकता असेल तर परकाया प्रवेश करू शकतो. थोडक्यात वैश्वानर विद्या म्हणजे परकाया प्रवेश सिद्धीची पूर्व साधना. ही विद्या प्राप्त झाली असता परकाया प्रवेश करणे सहज साध्य होते व परकाया प्रवेश सिद्धी प्राप्त झाली असता दर २५–

३० वर्षांनी शरीर बदलत राहून याच जगामध्ये अनंत काल राहता येते व तपस्या करता येते. जन्म-मृत्यूच्या चक्रातून अशा साधकाची सुटका होते.

रामायण हा ग्रंथ वैश्वानर विद्या, परकाया प्रवेश सिद्धी अशा अनेक सिद्धी प्राप्त करून, शेवटी अहंकाररूपी रावणाला मारून, अहंकाराच्या बंदिवासात असलेली कुंडलिनीरूपी सीता सहा महिन्याच्या साधनेने कशी सोडवावी व आत्मज्ञान कसे प्राप्त करावे म्हणजेच परमात्मा राम कसा प्राप्त करावा हे सांगणारा ग्रंथ आहे. हा ग्रंथ अतिशय गूढ व रहस्यमय असून फक्त योग्यांनाच अशा ग्रंथांचे खरे अर्थ कळतात. असे ग्रंथ अज्ञानी माणसानी हाताळल्यास त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात.

**ऋतंभरा**

माणसाला पूर्वजन्मातील कर्मानुसार बुद्धी होत असते. म्हणून म्हणतात **बुद्धी कर्मानुसारिणी !** पूर्वजन्मातील कर्माप्रमाणे कोणी वकील होतो, तर कोणी डॉक्टर होतो, कोणी इंजिनियर होतो. हे सर्व पूर्व जन्मातील कर्मानुसार होत असते. परंतु परमेश्वराने माणसाला बुद्धीच्या विकासाचे स्वातंत्र्य दिलेले आहे. कोणीही मनुष्य प्राणायाम, ध्यान-धारणा, ईश्वरभक्ती करून आपल्या बुद्धीचा विकास घडवू शकतो.

प्राणायाम, ध्यान-धारणा, ईश्वरभक्ती यांनी बुद्धीचा विकास होतो व बुद्धीचा विकास झाला की, **प्रज्ञा** ही अवस्था प्राप्त होते. **प्रज्ञा** ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर संतोष, समाधान आणि आनंद या गोष्टी प्राप्त होतात. कुठल्याही गोष्टीचे सुख-दुःख वाटत नाही. साधक सतत आनंदात राहतो. अशा अवस्थेमध्ये काही काळ योग साधना केल्यानंतर, **निर्विचार** अवस्थेमध्ये बराच काळ राहणे जमू लागल्यानंतर साधकाला **ऋतंभरा** ही बुद्धीच्या विकासाची सर्वश्रेष्ठ अवस्था प्राप्त

होते.

**ऋतंभरा** ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक चांगल्या-वाईट गोष्टीचे सत्य स्वरूप साधकासमोर उघड होते. कोठल्याही प्रकारचा भ्रम साधकाच्या मनात राहत नाही. त्याला सत्याचे ज्ञान होते. त्याची आकलन शक्ती तीव्र होते. साधक आत्मज्ञानी होतो. परमेश्वराशी एकरूप होण्याचा मार्ग त्याच्यासाठी प्रशस्त होतो. असा साधक ज्ञानमार्गाने, विहंगममार्गाने परमेश्वराशी एकरूप होतो.

## संकल्प सिद्धी

मनाची एकाग्रता प्राप्त झाल्यानंतर बऱ्याच सिद्धी आपोआप प्राप्त होतात. त्यातील काही पुढील प्रमाणे -

### अणिमा

''माझे शरीर कापसापेक्षाही हलके आहे. '' असा संकल्प मनात धरून यावर मन एकाग्र केले असता शरीर कापसापेक्षाही हलके होते.

मी कापसापेक्षा हलका आहे हा संकल्प इतका तीव्र असावा की, शरीर अणूपेक्षाही सूक्ष्म होते. असा साधक मग दिसेनासा होतो. या एका सिद्धीमध्ये देहासहित अदृश्य होता येते. तसेच आपल्या देहाला कापसासारखे हलके करता येते. या सर्व गोष्टी केवळ मनाच्या धारणेने म्हणजे संकल्पाने शक्य होतात.

### गरिमा

'' माझा देह पर्वताप्रमाणे अचल आहे '' किंवा ''माझे वजन पाचशे किलो आहे'' मनामध्ये अशा प्रकारचा संकल्प केला असता योग्याचा देह इतका जड होतो की, त्या देहाला दहा माणसेसुद्धा उचलू शकत नाहीत.

### लघिमा

लघिमा सिद्धीने शरीर पाहिजे तेवढे लहान करता येते किंवा वजनरहित करता येते. या सिद्धीने योगी दरवाजाच्या फटीतून अथवा एखाद्या सूक्ष्म छिद्रातून बाहेर जाऊ शकतो अथवा अधांतरी आसन लावून बसू शकतो. मी हवेपेक्षाही हलका आहे, असा संकल्प मनात करून योगी हवेत अधांतरी बसतो. मी हवेहून सूक्ष्म आहे, असा संकल्प करून योगी एखाद्या सूक्ष्म छिद्रातून अथवा दरवाजाच्या फटीतून बाहेर जाऊ शकतो.

### महिमा

या सिद्धीने आपला देह कितीही मोठा करता येतो, आपला आकार वाढविता येतो. मी विशाल आहे, मी प्रचंड आहे, मी सर्वव्यापी आहे अशा संकल्पाने योगी आपला आकार हवा तेवढा वाढवू शकतो.

### प्राप्ति

योग्याचे मन इतके शक्तीसंपन्न असते; इतके पवित्र असते की, वातावरणातील देव-देवता त्याच्या इच्छा तात्काळ पूर्ण करतात.

### प्राकाम्य

संकल्प करताच हवेतून विभूति, कुंकू, बेदाणा अशा वस्तू निर्माण करणे. थोडा पदार्थ असंख्य लोकांना पुरविता येतो.

### ईशत्त्व

देवाप्रमाणे समाजात मान मिळणे, अनेक भक्त असणे. लोकांनी देव समजणे.

### वशित्त्व

सर्व समाज आपल्याला अनुकूल असणे. प्रसिद्धी होणे.

योगातील या आठ महासिद्धी आहेत. याशिवाय इतरही अनेक सिद्धी प्राप्त करता येतात. सिद्धींना योगमार्गातील अडथळा मानले जाते. योगी सिद्धींमध्ये अडकला तर त्याची प्रगती होत नाही, म्हणून खरे साधक सिद्धींकडे दुर्लक्ष करतात व परमेश्वराच्या दिशेने पुढे पुढे जात राहतात.

**प्राणसिद्धी**

आपल्या देहामध्ये प्राण, अपान, व्यान, उदान व समान असे पाच मुख्य वायु आहेत.

**१) प्राण** – हा वायु हृदयात राहतो. या वायुवर विजय प्राप्त केला असता समाधी लागते.

**२) अपान** – हा वायु मोठ्या आतड्यात राहतो. या वायुवर विजय मिळविल्यानंतर कितीतरी दिवस अन्नपाण्याविना राहता येते.

**३) व्यान** – हा वायु सर्व शरीराला व्यापून राहतो. या वायुवर विजय मिळविल्यानंतर सर्व व्यापकता प्राप्त होते.

**४) उदान** – हा वायु कंठात राहतो. या वायुवर विजय प्राप्त केल्याने भूक, तहान लागत नाही. अन्नपाण्याविना कितीही दिवस जगता येते. याशिवाय पाण्यावरून चालता येते. काट्यांच्या ढीगावर झोपले असता काटे अंगात रूतत नाहीत. चिखलातून चालले असता चिखल पायाला लागत नाही. अतिशय वेगाने चालता येते. जमिनीला स्पर्श न करता योगी वेगाने चालू शकतो.

**५) समान** – हा वायु नाभीकमलात राहतो. या ठिकाणी मन एकाग्र केल्यानंतर कुंडलिनी शक्ती जागृत होते. शरीरातील सर्व नाड्यांचे ज्ञान होते. शरीर तेजोमय होते.

**दिव्य श्रवण**

कानामध्ये जी पोकळी आहे या पोकळीवर मन एकाग्र करून

धारणा केली असता दिव्य श्रवण सिद्धी प्राप्त होते. आकाशात संचार करणाऱ्या देवतांची, दिव्य आत्म्यांची संभाषणे ऐकू येतात.

**आकाशगमन सिद्धी**

शरीरांतर्गत जी पोकळी आहे या पोकळीवर मन एकाग्र करून धारणा केली असता आकाशगमन सिद्धी प्राप्त होते.

आपल्या शरीरांतर्गत जे प्राण (वायु) आहेत त्या वायुच्या आधाराने या सिद्धी प्राप्त होतात.

**परचित्तविज्ञान सिद्धी**

आसनावर बसून ध्यान करावे. आपले सर्व लक्ष छातीच्या मध्यभागी केन्द्रीत करावे. दररोज चार तास याप्रमाणे वर्षभर साधना केली असता परचित्तविज्ञान ही सिद्धी प्राप्त होते. मनुष्य, प्राणी, पशू मनामध्ये काय विचार करत आहेत हे कळते. कुठलीही सिद्धी प्राप्त करावयाची साधना करतांना जी साधना सांगितली गेली आहे, ती साधना कमीत कमी सकाळी चार तास व संध्याकाळी चार तास याप्रमाणे एक वर्ष करावी लागते. म्हणजे ती सिद्धी प्राप्त होते. अर्थात काही साधना अशाही आहेत की, तीन-तीन वर्षे साधना करावी लागते.

**सिद्ध दर्शन**

जोपर्यंत परमेश्वराशी तादात्म्यता प्राप्त झाली नाही, तोपर्यंत सिद्धींच्या मागे लागू नये, असे सांगितले जाते व एकदा ईश्वरप्राप्ती झाली की मग सिद्धींची आवश्यकता राहत नाही. ईश्वरप्राप्तीनंतर सिद्धी नगण्य ठरतात. येथे सिद्धींची माहिती फक्त वाचकांना योगाचे वैभव कळावे म्हणून दिली आहे. या प्रकरणातील **चित्ताची स्थिरता** या परिच्छेदात दिलेली **सोऽहम् साधना व सिद्ध दर्शन** ही साधना, या दोन साधना कोणीही केल्या तरी चालतील.

आसन घालून बसावे. डोळे मिटावे व आपले सर्व लक्ष ब्रह्मरंध्राकडे म्हणजे सहस्त्रारचक्राकडे केन्द्रीत करावे. एकाग्र चित्ताने चार तास सकाळी व चार तास संध्याकाळी ही साधना करावी. एक वर्षानंतर दिव्य अनुभव येऊ लागतात. आकाशातून विहार करणाऱ्या सिद्धपुरुषांची दर्शने होतात व त्यांच्याकडून मार्गदर्शनही होते. ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुलभ होतो.

ही साधना करतांना स्थान शुद्धी म्हणजे शुद्ध भूमीची अत्यंत आवश्यकता असते. जवळपास अर्धा मैलाच्या परिसरात कोठेही स्मशान, कबरस्तान असू नये. साधनेस सुरुवात केल्यानंतर जर भयंकर दृश्ये दिसू लागली, जमिनीतून काही प्रवाह (currents) आपल्या शरीरात प्रवेश करत आहेत, असे वाटू लागल्यास जागा शुद्ध नाही, असे समजावे व साधनेची जागा बदलावी. भूत, पिशाच्च, शाकिनी, डाकिनी, हाकिनी, काकिनी इत्यादी क्षुद्र देवता दिसू लागल्यास साधनेची जागा बदलावी. अशा प्रकारे सर्व बाजूंनी सुसज्ज झाल्यानंतर साधनेस सुरुवात करावी. साधनेला बसल्यानंतर चिदाकाशाचे दर्शन झाले, देहाचे अस्तित्व नाहीसे झाले की, साधनेत प्रगती होत आहे, असे समजावे. हळूहळू प्रकाशब्रह्माचा साक्षात्कार होतो. सिद्धपुरुषांची दर्शने होतात व ईश्वरप्राप्तीच्या दिशेने आपला मार्ग अधिक प्रशस्त होतो. आपण ईश्वराच्या अधिक जवळ जातो. या एकाच साधनेने साधक जीवनमुक्त अवस्थेपर्यंत पोहोचू शकतो.

विहंगममार्गाने, आकाशमार्गाने जाणाऱ्या सिद्धपुरुषांची दर्शने साधकाला होऊ लागल्यानंतर त्यांच्या आज्ञांचे पालन करून त्यांच्याशी अत्यंत नम्रतेने वागून साधकाने पुढील साधना शिकावयाच्या असतात. ईश्वरापर्यंत कसे पोहोचायचे, ईश्वराशी एकरूप कसे व्हायचे, सहजावस्था कशी प्राप्त करायची, इत्यादी सर्व गोष्टींचे मार्गदर्शन ते करतात. हिमालय,

विंध्य, सह्याद्री, गिरनार, श्रीशैल, अरूणाचल, निलगिरी इत्यादी पर्वतांमधून राहणाऱ्या महाऋषि, महासिद्धांची दर्शनेही साधकाला या विहंगममार्गी सिद्धपुरुषाच्या कृपेने प्राप्त होतात. त्यांचे आशीर्वादही प्राप्त होतात, त्यांचे संरक्षणही प्राप्त होते. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पाचही तत्त्वांमध्ये ज्या देवी-देवता व दिव्य आत्मे राहतात, त्यांची दर्शने साधकाला होतात. असा या साधनेचा महिमा आहे.

## पंचमहाभूतांवर विजय

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांवर योगी विजय प्राप्त करतात. या पाचही तत्त्वांवर त्यांची सत्ता चालते. यासाठी शरीरातील पंचमहाभूतांच्या तत्त्वांवर योगी चित्ताची एकाग्रता करतात व एकेक तत्त्वावर विजय मिळवित पाचही तत्त्वांवर विजय मिळवितात. या साधनेने योगी पंचमहाभूतांवर स्वामित्व प्राप्त करतात.

## जात्यांतर सिद्धी

या सिद्धीने पाण्याचे रूपांतर दुधात, मधात किंवा तूपात कशातही करता येते. पृथ्वीतलावर जे काही पदार्थ निर्माण होतात ते एकाच मूल पदार्थातून अभिव्यक्त होत असतात. या मूल पदार्थाला आपण प्रकृति असे म्हणू. या मूल प्रकृतितून पृथ्वीतलावरील सर्व पदार्थ निर्माण होतात. या मूल प्रकृतिवर विजय मिळविला असता योगी दूध, पाणी, तूप, मध, फळ-फळावळ, मेवा, मिठाई, अन्नपदार्थ निर्माण करू शकतो किंवा दूधाचे तूपात व तूपाचे रूपांतर पाण्यात असे काहीही करू शकतो.

मनुष्य देहामध्ये ईश्वराचे संपूर्ण अस्तित्व आहे. या अस्तित्वावरील आवरणे दूर करून त्या ईश्वराला प्रकट करणे हे कार्य माणसाने करावयाचे असते व यासाठी साधना करावयाची असते. साधनेने माणसाचे रूपांतर परमेश्वरात होते. हीच खरी जात्यांतर सिद्धी!

या अध्यायामध्ये मी फक्त योगसिद्धी या विषयावर लिहीत आहे. अघोरी साधनेद्वारा नजरबंदी करणारे काही तामसी साधक रुद्राक्ष माळेतून पाणी काढून दाखवितात किंवा रिकाम्या झोळीतून फळ-फळावळ काढून दाखवितात. ही पिशाच्च सिद्धी असून अशा सिद्धींचा व योगसिद्धींचा काही संबंध नाही.

## कामरूप सिद्धी

कामरूप सिद्धी म्हणजे इच्छेनुसार वाट्टेल ते रूप धारण करणे. सर्व चराचर म्हणजे मीच आहे, अशी धारणा करून, जेव्हा योगी या धारणेशी एकरूप होऊन ध्यान करतो, तेव्हा त्याला कुठलेही रूप धारण करता येते. तो कधी हरिणाचे रूप घेऊन जंगलात फिरतो, तर कधी पक्षाचे रूप घेऊन आकाशात विहार करतो. सर्व विश्वाच्या रूपाने मीच नटलेला आहे, मी ईश्वर आहे, अशी त्याची धारणा असते. ही धारणा इतकी तीव्र असते की, तो क्षणाक्षणाला आपले रूप बदलू शकतो.

## अनेक देह सिद्धी

ईश्वरस्वरूप योगी अनेक देह धारण करून एकाच वेळी अनेक ठिकाणी कार्य करू शकतो. आकाशतत्त्वावर विजय मिळविल्याकारणाने हे त्याला साध्य होते. आपल्या रूपासारखी तो अनेक रूपे धारण करतो व अनेक ठिकाणी जातो. लोकोद्धाराचे कार्य करतो. अहंकार शून्य झाल्याकारणाने, बुद्धी ईश्वराशी तादात्म्य पावली असल्याकारणाने त्याच्या कुठल्या रूपानी काय कार्य केले हे मूळ रूपाला माहीत नसते. असंख्य आरश्यांमध्ये आपली असंख्य प्रतिबिंबे दिसतात, त्याप्रमाणे योग्याची ही असंख्य प्रतिबिंबे पृथ्वीतलावर सर्वत्र संचार करत असतात व ईश्वरी कार्य करतात. मूळ रूपाला त्यांची काहीही कल्पना नसते. चित्त ईश्वरस्वरूप झाल्यानंतर असे चमत्कार घडतात.

## पूर्व जन्म ज्ञान

ध्यानामध्ये चित्ताची एकाग्रता झाल्यानंतर मी पूर्वजन्मी कोण होतो, या विषयावर चिंतन केले असता आपले सर्व पूर्वजन्म कळून येतात तसेच इतरांचेही पूर्वजन्म कळतात.

## कायेंद्रिय सिद्धी

कायेंद्रिय सिद्धी म्हणजे सदैव तरुण राहण्याची विद्या. देहासहित अमर होण्याची विद्या. या सिद्धीची साधना हिमालयातील सिद्धाश्रम, कौशिक आश्रम, राजराजेश्वरी आश्रम, ज्ञानगंज इत्यादी ठिकाणीच करता येते. येथे सदैव तरुण राहून शेकडो वर्षे तपस्या कशी करावी हे शिकविले जाते. त्याचबरोबर विश्वाची उत्पत्ति, स्थिती, लय कसा करावा हेही शिकविले जाते. या जागा म्हणजे योग्यांचे महाविद्यापीठ असून, येथे फक्त ठराविक योग्यांनाच प्रवेश प्राप्त होतो. साधनेची सर्व रहस्ये येथे समजावून दिली जातात. अणूपासून विविध पदार्थ कसे तयार करावेत, सूर्याच्या प्रकाशातून विविध पदार्थ कसे तयार करावेत, वायुपासून विविध पदार्थ कसे तयार करावेत असे विविध विषयांचे योगविज्ञान येथे शिकविले जाते. येथे साधकाला परमेश्वर बनविले जाते.

वाचकांच्या माहितीसाठी या प्रकरणामध्ये काही योगसिद्धींची माहिती दिलेली आहे. योगसिद्धी असंख्य असून केवळ योगसिद्धींच्या वर्णनावरच एक स्वतंत्र पुस्तक लिहावे लागेल. योग साधनेने देहालाही शून्य बनविता येते. असा शून्य देहधारी योगी, सदेहाने भिंतीतून पलिकडे जाऊ शकतो. या सर्व साधना महायोग्यांच्या आहेत. त्याची चर्चा न करणे बरे. योगसिद्धी या अध्यायात वाचकांचे ज्ञान व मनोरंजन करण्याचा मी थोडाफार प्रयत्न केला आहे. हे ज्ञान माझ्याबरोबर लुप्त होऊन जाऊ

नये म्हणून या ग्रंथात संग्रहित करून ठेवले आहे. याने वाचकांच्या ज्ञानात भर पडेल. हिमालयामध्ये तसेच इतर अनेक पर्वतांमध्ये आजही हजारो वर्षांचे योगी साधना करीत आहेत. परकायाप्रवेश करणारेही योगी आहेत. हजारो वर्षे वय असणारे, परंतु वीस वर्षांचे दिसणारेही योगी आहेत. क्वचित एखाद्याला यांच्या दर्शनाचा लाभ होतो. क्वचित एखाद्याला यांचा सहवास प्राप्त होतो व योगसिद्धीची माहिती मिळते.

# १७. मी कोण ?

एकान्तात बसून मी कोण ? याचा विचार करावा. मी म्हणजे शरीर नव्हे, असा अनुभव येईल. तरुणपणी आपण शरीराला अतिशय जपतो, मरण कधी येऊच नये असे वाटते. मरणाची कल्पनासुद्धा कोणीही कधीही करत नाही.

वृद्धापकाळामध्ये सर्व शरीर गलितगात्र झाल्यानंतर मात्र लवकर मरण येऊ दे, म्हणजे लवकर माझी सुटका होईल असे वाटते. पुनःश्च मी कोण ? हा प्रश्न शिल्लकच राहतो.

तरुणपणी मृत्यूची कल्पनासुद्धा सहन न करणारा मनुष्य वृध्दापकाळामध्ये प्रतिक्षण मृत्यूची प्रतीक्षा करत राहतो.

गलितगात्र वृद्ध शरीरामध्ये मृत्यूची प्रतीक्षा करणारा 'मी कोण?' याचा विचारही मनुष्याच्या मनात येत नाही. शेवटी मृत्यू येतो, मनुष्य मरतो. कोणी बालवयात मरतात, कोणी तरुणपणी मरतात तर कोणी वृद्धापकाळात मरतात. देह मरतो, देहाच्या आत राहणारा 'मी' मात्र जिवंतच असतो. पूर्वीपेक्षा अधिक जोमाने 'मी जिवंत असतो.' सूक्ष्मदेहात राहून जीवन व्यतित करत असतांनाही मी कोण याचा शोध लागत नाही. सूक्ष्मदेहातील जीवन हे कधी एक दिवसाचे असते, तर कधी एक लाख वर्षांचेही असू शकते. या सर्व गोष्टी कर्मावर अवलंबून

असतात. अशी लाखो वर्षे जातात परंतु ''मी कोण ?'' हे कधीही कळत नाही.

सूक्ष्मदेहधारी जीवात्मे बऱ्याचवेळा स्थूलदेह धारण करतात. आपल्या प्रियजनांना भेटतात, बोलतात, इतकेच नव्हे तर आपल्या प्रियजनांना मार्गदर्शनही करतात. सूक्ष्मदेहधारी हे आत्मे स्थूलदेह धारण करून वाट चुकलेल्यांना वाट दाखवितात. साधना करणाऱ्या साधूंना खाद्य पदार्थ व इतर वस्तू आणून देतात.

माणसांचेच आत्मे स्थूलदेह धारण करतात असे नव्हे, तर प्राण्यांचे आत्मेही स्थूलदेह धारण करून फिरतात.

एक मुलगा खूप आजारी होता. अनेक उपाय करूनही त्याला काही बरे वाटत नव्हते. तो शेवटच्या घटका मोजू लागला ; इतक्यात त्या मुलाच्या घरी एक साधू आला व तेथील सर्व लोकांना म्हणाला, ''हा मुलगा वाचेल, घराच्या शेजारी असणारे वारूळ तुम्ही खोदा, पाच-सहा फूटावर एक आत्मा नागरूपाने राहत आहे ; त्याला दूध पाजताच हा मुलगा बरा होईल.'' असे सांगून तो साधू सर्वांच्या देखत अदृश्य झाला. लोकांनी ते वारूळ खोदले, नागाला दूध पाजले व शेवटच्या घटका मोजणारा तो मुलगा ठणठणीत बरा झाला.

या कथेमध्ये नाग व साधू दोघेही अदृश्य सृष्टीतील होते व दोघांनीही स्थूलशरीर धारण केले होते. हे आत्मे स्थूलशरीर कशाप्रकारे धारण करू शकतात यावर संशोधन होणे अत्यंत आवश्यक आहे.

आम्ही म्हणतो की, ''अदृश्य सृष्टीतील आत्मे इच्छाशक्तीद्वारा स्थूलशरीर धारण करतात.'' परंतु हे म्हणणे सर्वार्थाने समर्पक नाही. कारण सगळ्याच आत्म्यांना काही प्रकटरूप धारण करता येत नाही. अशा प्रकारे प्रकट होण्याच्या मागे काहीतरी निश्चित नियमावली

असली पाहिजे ही नियमावली काय याचा विचार संशोधकांनी करावयास हवा. याशिवाय–

या प्रकट होणाऱ्या माणसांमध्ये व प्राण्यांमध्ये मांस, हाडे, पोटातील लिव्हर वगैरे भाग कुठल्या पदार्थांचे तयार होतात ?

प्राण्यांच्या अंगावरील दाट केस(फर) कोठून व कसे तयार होतात?

हाडा, मांसासहित प्रकट झालेले हे स्थूलदेहधारी मनुष्य व प्राणी एका सेकंदामध्ये हवेत विरघळून कसे जातात ? या सर्व गोष्टींवर संशोधन व्हावयास हवे.

एकदा एक मनुष्य रस्त्याने जात होता. त्याने पाहिले की, एक कोकरू (बकरीचे पिल्लू) एकटेच रस्त्याने जात आहे. त्या माणसाने विचार केला, ते बकरीचे पिल्लू कळपातून चुकलेले असावे व कळप कोठेतरी दूर निघून गेलेला असावा. आपण या बकरीच्या पिल्लाला उचलावे व घरी घेऊन जावे. नाहीतर या लहान पिल्लाला कुत्रे फाडून खातील असा विचार करून त्याने त्या पिल्लाला उचलले, आपल्या खांद्यावर ठेवले व तो चालू लागला. थोड्यावेळाने आपल्या खांद्यावरील वजन वाढल्यासारखे त्याला वाटू लागले. म्हणून त्याने बकरीच्या पिल्लाला खाली उतरविले व एका झाडाखाली तो थोडावेळ विश्रांती घेत बसला. थोडावेळ विश्रांती घेतल्यानंतर त्याने बकरीच्या पिल्लाला परत उचलले,

अचानक बकरीचे पिल्लू त्याच्या हातात विरघळू लागले. बकरीच्या पिल्लाचा मागचा भाग प्रथम विरघळला. मधला भाग विरघळत असतानांच त्याने त्या पिल्लाला टाकून दिले व आपले हात सोडविले. बकरीच्या पिल्लाचा अर्धा भाग जमिनीवर पडताच आवाज न

होणाऱ्या दिवाळीतील फटाक्याप्रमाणे प्रकाश जमिनीवर पसरला व एका सेकंदाच्या आत अदृश्य झाला.

वरील गोष्टीवरून हे सिद्ध होते की, वातावरणातील बकरीच्या पिल्लाचे एक भूत स्थूलरूप धारण करून फिरत होते. अशीच आणखी एक कथा आठवली ती सांगतो,

अमृतकुन्डाजवळ शेतकऱ्यांनी दोन सश्यांना पाहिले व लगेच त्यांनी त्या सश्यांना मारून वनभोजन करायचे ठरविले. दोन चांगले मोठ्या आकाराचे ससे होते. त्यांना शेतकऱ्यांनी मारले व लगेच त्या सश्यांना पूर्ण सोलून शिजविण्यासाठी चुलीवर ठेवले. त्यात मसाला, मीठ वगैरे टाकले व एका काठीने ढवळू लागले. इतक्यात दोन्ही ससे उडी मारून पातेल्याच्या बाहेर आले व जंगलात पळून गेले. वातावरणातील भूतांना माणसाची गंमत करण्याची लहर आली की ते कसे प्रकार करतात हे या कथेतून दिसून येते. (अमृतकुंड कर्नाटकात सोलापूर – हैद्राबाद रोडवर आहे.)

या प्रकरणामध्ये,

अदृश्य सृष्टीतून हाडामांसाचा देहधारी साधू कसा प्रकट झाला, हे शरीर त्याने कशाप्रकारे निर्माण केले यावर संशोधकांनी विचार करावयाचा आहे.

पृथ्वीतलावर फिरणारे नाग, साप दूध पित नाहीत परंतु काही आत्मे नागाच्या रूपात राहतात. ते दूध पितात असे म्हटले जाते. नागाच्या रूपात राहणारे आत्मे हे नागाचे शरीर कशाप्रकारे धारण करतात, नागाच्या शरीरातील सगळे अवयव ते कसे निर्माण करू शकतात, भूताने बकरीचे रूप कसे धारण केले, सश्याच्या रूपाने भूतांनी शेतकऱ्याची गंमत कशी केली या सर्व गोष्टींवर संशोधन व्हायला हवे.

मी शरीर नाही, हे लक्षात आल्यानंतर आपल्याला आपल्या सूक्ष्मशरीराची ओळख होते. सूक्ष्मशरीरामध्ये आपल्याला प्रवेश प्राप्त होतो. थोडक्यात आपण सूक्ष्मशरीरात जागृत होतो.

सूक्ष्मशरीरात जागृत झाल्यानंतर स्थूलदेहाच्या साधना बंद होतात व सूक्ष्मशरीर साधना करू लागते. सूक्ष्मशरीराच्या साधनाही सूक्ष्म असतात. या कशा करतात याचे वर्णन देण्यास ईश्वराची परवानगी नाही. परंतु एक-दोन कथा सांगतो. त्या कथांच्या आधाराने या साधना किंवा तपस्या कशा असतात याची थोडीफार कल्पना येईल. येथे साधक सूक्ष्मशरीरात राहून '' मी कोण आहे '' याचा शोध घेत असतो.

एकदा एक अधिकारी एका सत्पुरुषाच्या दर्शनाला जीपने जंगलात जात होते. त्यांच्या जीपसमोर एक पांढरा शुभ्र ससा थोडावेळ पळाला व नंतर जंगलात अदृश्य झाला.

अधिकारी जेव्हा सत्पुरुषाजवळ पोहोचले तेव्हा ते सत्पुरुष म्हणाले,

''सश्याच्या रूपाने मीच तुझ्या समोर पळत होतो.''

शिर्डीच्या श्रीसाईबाबांच्या चरित्रातही अशा प्रकारचे दाखले आढळतात.

सूक्ष्मशरीरात राहून साधना करणारे सिद्धयोगी विविध प्रकारची रूपे धारण करून साधना करत असतात किंवा **''एकोऽहम् बहुस्याम्''** म्हणजे मी एक आहे अनेक व्हावे, या ईश्वरीतत्त्वाचा अनुभव घेत असतात.

सूक्ष्मशरीरात जागृत झालो, सूक्ष्मशरीराने साधना करू लागलो, तरीही ''मी'' म्हणजे सूक्ष्मशरीर नव्हे ही जाणीव जागृत असतेच. सूक्ष्मशरीराच्या साधना संपल्यानंतर सूक्ष्मशरीर गळून पडते व कारणशरीरात ''मी'' जागृत होतो. पावसाळ्यामध्ये काजवे चमचम

करतांना दिसतात, कारणदेहामध्ये राहणारे योगी काजव्याप्रमाणे प्रकाशमान कारणदेहाद्वारा विश्वभर फिरत असतात व मनात येईल तेव्हा स्थूलदेह धारण करून कोणालाही दर्शन देतात.

कारणदेहातून सिद्धयोगी जेव्हा महाकारणदेहात प्रवेश करतात तेव्हा सर्व ब्रह्माण्डे त्यांच्या पोटात सामावली जातात इतका तो विश्वव्यापी होतो. महाकारणदेहात प्रवेश झाल्यानंतर म्हणजेच विश्वव्यापी झाल्यानंतर 'मी कोण? ' याचा खुलासा होतो. त्यावेळी पुढील प्रमाणे ज्ञान होते.

फार फार वर्षांपूर्वी, हजारो लाखो वर्षांपूर्वी ''मी ईश्वर होतो,'' सर्व जगाचे आदिकारण होतो, विश्वव्यापी होतो. या एकटेपणाचा कंटाळा आल्याने मी असंख्य कारणदेह तयार केले. असंख्य कारणदेह जरी तयार केले तरी मूळस्वरूप जे महाकारणदेह आहे किंवा ईश्वरस्वरूप आहे या ईश्वरस्वरूपामध्ये त्या सर्वांना ओवून ठेवले. हेतू असा की, कारणदेहरूपी अब्जावधी पतंग विश्वात कोठेही भरकटले तरी त्या सर्वांची मूळ दोरी महाकारणदेहरूपी मूळ स्थानाला बांधलेली राहावी व जोपर्यंत महाकारणदेहरूपी मूळ ईश्वरस्वरूपाशी सामरस्यता प्राप्त होत नाही तोपर्यंत कोट्यावधी जन्म घेतले तरी हा कारणदेह बेचैन राहावा.

कोट्यावधी कारणदेह निर्माण करून अद्वैतातून मी द्वैतात आलो. तरीपण खेळात रंगत भरत नव्हता. कारण, कारणदेह ही माझी 'मूळ कल्पना'. त्यामुळे कारणदेह, जी, जी, कल्पना करेल, तसे तात्काळ घडत असे. कोट्यावधी कारणदेहांनी कोट्यावधी कल्पना केल्या व त्या तात्काळ सिद्ध झाल्या. त्यामुळे खेळात आनंद वाटेनासा झाला. म्हणून मी सूक्ष्मशरीराची कल्पना केली व सूक्ष्मदेह बरहुकूम स्थूलदेहाची कल्पना केली. स्थूल व सूक्ष्मदेहाची कल्पना केल्यानंतर स्थूलदेहाच्या आधाराने सूक्ष्मशरीर जे काही कर्म करेल त्या कर्माचे

चांगले वाईट परिणाम त्याला भोगावे लागतील, अशी व्यवस्था केली. अशाप्रकारे मीच मांडलेला हा जगत्संसार सुरू झाला. या जगत्संसारात मी कोण ? हे मी पूर्णपणे विसरून गेलो होतो. आज कळले की, **''मी ईश्वरालाही चेतन करणारे परब्रह्म आहे.''**

वर जे काही लिहिले आहे त्यावरून पुढील गोष्टी लक्षात येतात. प्रत्येक जीव हा ईश्वरच आहे. चांगली कर्मे केली असता व ईश्वराचे चिंतन केले असता जाणीवेचा विकास होऊ लागतो व ईश्वरस्वरूपापासून बाजूला झालेला जीवात्मा पुन्हा ईश्वरस्वरूपात विलीन होतो.

वाईट कर्मे करणारे लोक स्वतःच्याच आत्म्याचे भयंकर नुकसान करत असतात. हजारो वर्षे यातना भोगत राहतात व या यातना भोगण्यासाठी विविध प्रकारच्या योनीत जन्म घेत राहतात. पूर्वजन्मी केलेल्या वाईट कर्मांमुळेच दारिद्र्य, दुःख, आपत्ती व रोग निर्माण होत असतात. या सर्व गोष्टींना आपणच कारण असतो.

काया, वाचा, मनाने कोणालाही दुखवू नये. काया, वाचा, मनाने कोणाचे कधीही नुकसान करू नये. ईर्षा, द्वेष, मत्सर, असूया करू नये. या सर्व गोष्टी प्रचंड दुःख निर्माण करतात व हे दुःख भोगण्यासाठी असंख्य जन्म घ्यावे लागतात. यापेक्षा प्रेमाने वागा, परोपकार करा व ईश्वरभक्ती करा. म्हणजे हळूहळू आत्मा ईश्वराच्या दिशेने पुढे जाऊ लागेल. जन्मोजन्मी केलेली पातके ईश्वराच्या कृपेने नष्ट होतील व अवीट परमानंदमय अशी सिद्धावस्था प्राप्त होईल.

**सर्वही रूपी रूपवंत जो । सर्वही नेत्री पाहे ।**
**सर्वही हृदयी राहे । तो दत्तगुरु हे बोले ।।**

# १८. जीवन-मुक्त

स्वतःतील सर्व प्रवृत्तींवर विजय प्राप्त केल्याशिवाय जीवन-मुक्त ही अवस्था प्राप्त होत नाही.

आध्यात्माच्या प्रान्तात प्रवेश केल्याबरोबर साधक कीर्तने, प्रवचने करू लागतात व हजारो लोकांच्या घोळक्यात स्वतःला हरवून बसतात. प्रसिद्धी व पैसा मिळतो परंतु मुक्ती प्राप्त होत नाही. जीवनमुक्त सिद्धावस्था प्राप्त होण्यासाठी मायेच्या या सर्व पसाऱ्यापासून स्वतःला दूर ठेवावे लागते व आपले चित्त परब्रह्मात विलीन करावे लागते.

मायेपासून परावृत्त झाल्यानंतर मनाची एकाग्रता साध्य करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. मनाची एकाग्रता साध्य करणे म्हणजे मन कुठल्यातरी एकाच विषयावर एकाग्र करणे, एकाच विषयाचे मनात चिंतन करणे.

उदाहरणार्थ ॐ या एकाच अक्षराचे मनात चिंतन केले असता ॐ व्यतिरिक्त अन्य काही मनात येऊ न देणे म्हणजे मन एकाग्र करणे व ॐ शिवाय कशाचीही आठवण न होणे म्हणजे **एकाग्रता !**

एकाग्रता प्राप्त झाल्यानंतर आध्यात्मातील खरी **चढण** सुरू होते. ज्या देवतेचे चिंतन करावे ती देवता साक्षात् प्रकट होते व वरदान देते. साधकाला विविध प्रकारच्या शक्ती मिळविण्याचे मोह होऊ

लागतात. येथेच साधकाने स्वतःला जपायचे असते. शून्यामध्ये विलीन होण्या व्यतिरिक्त अन्य कुठलीही कामना मनात ठेवायची नसते. मला शून्यामध्ये किंवा परब्रह्मामध्ये विलीन व्हावयाचे आहे एवढ्या एकाच कामनेने साधना करायची असते. कसलीही अपेक्षा न करता साधक जेव्हा साधना करू लागतो तेव्हा वातावरणातील देव-देवता त्याला महत्त्व प्राप्त व्हावे म्हणून विविध प्रकारचे चमत्कार घडवितात. समाजात साधकाचे महत्त्व वाढू लागते व येथे साधकाची फसगत होण्याची खूप दाट शक्यता असते. म्हणून या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून एकान्तात राहून साधक जेव्हा परब्रह्माचे चिंतन करतो तेव्हा खरी जीवन-मुक्त सिद्धावस्था प्राप्त होते. अर्थात यासाठी बरीच वर्षे साधना करत रहावे लागते.

### जीवन-मुक्तांचे वैशिष्ट्य

जीवन-मुक्त सिद्धपुरुषांचे वैशिष्ट्य असे असते की, दोऱ्यात ओवलेल्या मण्याप्रमाणे सगळे जीवन-मुक्त सिद्धपुरुष एकमेकांना ओळखत असतात. इराणमध्ये राहणारा जीवन-मुक्त सिद्धपुरुष भारतातील सिद्धपुरुषाला ओळखत असतो, तसेच इस्त्राईलमध्ये राहणारा सिद्धपुरुषही भारतातील सिद्धपुरुषाला ओळखत असतो. जगातील सगळे सिद्धपुरुष एकमेकांना ओळखत असतात.

ताजुद्दीनबाबा नागपूरमध्ये एका भक्ताच्या घरी राहत होते. तो भक्त कुठल्यातरी कामानिमित्ताने शेगावला गेला. आपले काम उरकून तो शेगावला श्रीगजानन महाराजांच्या दर्शनाला गेला. तेव्हा श्रीगजानन महाराज त्याला म्हणाले, ''ताजुद्दीनबाबांच्या रूपाने मीच तुझ्या घरी राहत आहे. तू येथे कशाला आलास?'' असे म्हणून त्यांनी ताजुद्दीनबाबा व आपण एकच आहोत हे दाखवून दिले.

श्रीउपासनी महाराज ब्राह्मण होते. योग साधना करताना काही चुका घडल्याने त्यांना त्रास होऊ लागला. त्यांनी शिर्डीच्या श्रीसाईबाबांकडे जावे असे, दोन-तीन दृष्टांत त्यांना झाले. परंतु श्रीसाईबाबा मुस्लीम आहेत त्यांच्याकडे जायचे नाही असे त्यांनी ठरविले होते. शेगावचे श्रीगजानन महाराज हे सिद्धपुरुष असून जातीने ब्राह्मण आहेत, असे कळले म्हणून ते श्रीगजानन महाराज यांचेकडे गेले.

श्रीगजानन महाराजांचे दर्शन घेताच, श्रीगजानन महाराजांनी त्यांच्या मुस्कटात एक लावून दिली व म्हणाले, ''मी काय तुझ्या बापाचे देणेकरी आहे काय? इथे कशाला आलास? शिर्डीच्या श्रीसाईबाबांकडे जा! तेच तुझे काम करतील, ब्राह्मणपणाचा अहंकार सोडून दे!''

हे ऐकल्यानंतर श्रीउपासनी महाराज श्रीसाईबाबांना शरण गेले. श्रीसाईबाबांच्या मार्गदर्शनाप्रमाणे त्यांची साधना सुरू झाली व नंतर ते श्रीउपासनी महाराज म्हणून प्रसिद्ध झाले.

डॉ. काशीनाथ हे ब्राह्मण होते व त्यांचे गुरुही ब्राह्मण होते. एकदा त्यांचे गुरु त्यांना म्हणाले ''मी आता लवकरच देह सोडणार आहे परंतु तत्पूर्वी तुला मी एका योग्य गुरुच्या हवाली करेन !''

डॉ. काशीनाथ यांची भोपाळहून नागपूरला बदली झाली. नागपूरच्या वेड्यांच्या हॉस्पिटलचे मुख्य डॉक्टर म्हणून त्यांची नेमणूक झाली. डॉ. काशीनाथ भोपाळहून नागपूरला आले व त्यांचे गुरुही त्यांच्याबरोबर आले.

वेड्यांच्या हॉस्पिटलच्या दरवाजात येताच डॉ. काशीनाथ यांचे ब्राह्मण गुरु जोराने म्हणाले, ''अरे भाई ताजुद्दीन बाहर आ। इस लडकेको तुम्हारे हवाले करने मैं यहाँ आया हूँ।'' यावर ताजुद्दीनबाबा

म्हणाले,

''उसकाही तो इन्तजार करते यहाँ पागल खानेमे भर्ती हुआ हूँ।'' असे म्हणून ताजुद्दीनबाबा बाहेर आले व त्यांनी डॉ. काशीनाथ यांच्या ब्राह्मण गुरुला मिठी मारली.

डॉ. काशीनाथ आश्चर्याने हा सर्व प्रकार पाहत उभे होते. तेव्हा डॉ. काशीनाथ यांचे ब्राह्मण गुरु डॉक्टरांना म्हणाले, ''यापुढे ताजुद्दीनबाबा हे तुझे गुरु आहेत, ते तुझे संरक्षण करतील व पुढच्या सर्व गोष्टी शिकवतील. म्हणून तुझी भोपाळहून नागपूरला बदली मीच केली व तुला सत्संग देऊन सर्व गोष्टी शिकविता याव्यात म्हणून स्वतः ताजुद्दीनबाबा वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये भर्ती झाले.''

अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थ देह सोडण्याच्या तयारीत होते. अक्कलकोटचे पोस्टमास्तर श्रीस्वामी समर्थांचे दर्शनास नित्य नियमाने येत असत. एक दिवस श्रीस्वामी समर्थ त्यांना म्हणाले, '' मी आता लवकरच हा देह सोडणार आहे. मी देह सोडल्यावर तुझी राजापूरला बदली होईल. राजापूरला काका पुराणिक नांवाचे सत्पुरुष राहतात ते व आम्ही एकच आहोत, तू त्यांचे दर्शन घेत जा !''

श्रीस्वामी समर्थांच्या समाधीनंतर पोस्टमास्तर साहेबांची राजापूरला बदली झाली. राजापूरला गेल्याबरोबर त्यांनी काका पुराणिक कोणी सत्पुरुष आहेत का याची चौकशी केली. परंतु काका पुराणिक नावाचे कोणीच प्रसिद्ध सिद्धपुरुष नाहीत असे त्यांना कळले. त्यामुळे पोस्टमास्तर, असे का व्हावे ? याचा विचार करू लागले. इतक्यात त्यांना एका माणसाने सांगितले की, काका पुराणिक नांवाचे एक मनुष्य धोपेश्वर येथे राहतात. ते सामान्य संसारी मनुष्य आहेत कोणी प्रसिद्ध साधू नाहीत. हे ऐकून त्यांना भेटण्यासाठी पोस्टमास्तर राजापूरहून

धोपेश्वरला गेले. धोपेश्वर हे गाव डोंगरावर असल्याने त्यांना रेड्याच्या पाठीवर बसून प्रवास करावा लागला. धोपेश्वरला पोहोचल्यानंतर काका पुराणिक यांनी श्रीस्वामी समर्थांनी जे काही सांगितले, त्याच उद्‌गारांची आठवण करून दिली व ओळख पटविली. अशा प्रकारे पोस्टमास्तर काका पुराणिकांच्या सहवासात राहू लागले. कालान्तराने काका पुराणिकांनी देह ठेवला. नंतर पोस्टमास्तरांची बदली अहमदनगरला झाली. तेथून ते शिर्डीला श्रीसाईबाबांच्या दर्शनाला गेले. तेव्हा श्रीसाईबाबांनी अक्कलकोट स्वामींचा सहवास, काका पुराणिकांची भेट या सर्व गोष्टी पोस्टमास्तरांना सांगितल्या व सगळे संत एकच असतात, हे सिद्ध करून दिले.

शिर्डीच्या श्रीसाईबाबांच्या कपाळाला गंध किंवा भस्म कोणीही लावीत नसे. कोणी तसे करण्याचा प्रयत्न केल्यास श्रीसाईबाबा खूप चिडत असत. डॉ. पंडीत नावाचे एक गृहस्थ श्रीसाईबाबांच्या दर्शनाला गेले. म्हाळसापती व तात्या श्रीसाईबाबांची पूजा करत होते. म्हाळसापतीनी श्रीसाईबाबांच्या गळ्याला गंध लावले व तात्यांनी पायाला. इतक्यात पंडीतांनी पूजेचे ताट त्यांच्या हातातून ओढून घेतले. श्रीसाईबाबांचे डोके हातानी धरून त्यावर सुरेख तीन रेषा काढल्या व मध्ये केशराचा टिळा लावला. श्रीसाईबाबा आता भडकणार, व भक्तांना चोपून काढणार, असे सर्व जुन्या वरीष्ठ भक्तांना वाटले, परंतु, श्रीसाईबाबा अगदी शांत होते. त्यांनी डॉ. पंडीतांना शांतपणे पूजा करू दिली. त्या दिवशी संध्याकाळी श्रीसाईबाबांच्या सर्व जुन्या भक्त मंडळींनी श्रीसाईबाबांना विचारले,

''तुम्ही कधीही कपाळाला गंध सुद्धा लावून घेत नाही. डॉ. पंडीत आजच आले. त्यांनी चक्क तुमचे डोके धरून त्रिपुंड्र काढला, हे

कसे काय तुम्हाला चालले?'' यावर श्रीसाईबाबा म्हणाले, ''त्याने माझी पूजा केलीच नाही, धोपेश्वर (राजापूर) येथील काका पुराणिकांची पूजा केली.''

सर्व सिद्ध कसे एकरूप असतात, याचे आणखी एक उदाहरण आठवले म्हणून सांगतो.

बऱ्याच वर्षांपूर्वी एक पुस्तक वाचले होते. त्या पुस्तकामध्ये एका तरुण युवकाने आपल्या प्रवास वर्णनाची माहिती दिली होती. हा मुलगा खूप आध्यात्मिक होता. हा तरुण युवक इजिप्तला गेला. इजिप्तमध्ये त्याची एका जीवनमुक्त सिद्धपुरुषाशी गाठ पडली. त्याने त्याला बऱ्याच गोष्टी सांगितल्या व नंतर तो म्हणाला –

''येथून तू जेरूसलेमला जाणार आहेस! जेरूसलेमच्या पवित्र स्थानावर जेव्हा तू जाशील, तेव्हा तुला माझ्यासारखाच एक दुसरा सिद्धपुरुष भेटेल!''

त्या तरुण युवकाच्या मनात जेरूसलेमला जाण्याचे नव्हते. जेरूसलेम इस्त्राईलमध्ये आहे व तेथे सतत बॉम्बस्फोट होत होते. परंतु पुढे अशी काही कारणे घडत गेली की, त्यामुळे त्याला इस्त्राईलला जाणे भाग पडले.

इस्त्राईलला पोहोचल्यानंतर जेरूसलेम येथील ख्रिश्चन, यहुदी व मुस्लीम या तिघांचेही एक पवित्र धर्मस्थळ आहे. हे धर्मस्थळ पाहण्यासाठी तो गेला.

हजारो लोक तेथे आपापल्या रीतिरिवाजाप्रमाणे प्रार्थना करीत होते, इतक्यात त्या धर्मस्थळापासून दूर अंतरावर काहीतरी स्फोटाचा आवाज ऐकू आला. पळापळ सुरू झाली व पाच मिनिटात सर्व धर्मस्थळ रिकामे झाले. या तरुण युवकाने पाहिले की, तेथे जवळच एक वृद्ध

मनुष्य शांतपणे बसलेला आहे. त्याला तेथून निघून जाण्यास मदत करावी म्हणून हा युवक त्या वृद्ध मनुष्याकडे गेला व या तरुण युवकाने त्या वृद्ध माणसाला विचारले,

''स्फोटाचे आवाज ऐकू येत आहेत, सगळीकडे पळापळ सुरू आहे , मी आपल्याला सुरक्षित स्थानी जाण्यास मदत करू का ?'' यावर तो वृद्ध गृहस्थ शांतपणे म्हणाला,

''तुला इजिप्तच्या सिद्धपुरुषाने माझ्याकडे पाठविले व मी तुला येथे भेटेन, हे त्याने तुला आगाऊच सांगितले, हे खरे ना ?''

हे ऐकल्यावर त्या तरुण युवकाला आश्चर्याचा धक्का बसला व त्याने त्यांना नम्रपणे नमस्कार केला.

जगातील सर्व सिद्धपुरुष अशा प्रकारे माळेत ओवलेल्या मण्यांप्रमाणे एकच असतात.

**साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळाले ।।**

जीवनमुक्त अवस्था प्राप्त झाल्यानंतर साधक परमेश्वराशी तदाकार होतात. मन विचाररहित व कल्पनारहित करणे जमल्यानंतर पुढील मार्ग आपोआप मिळू लागतात व जीवन-मुक्त सिद्धपुरुष ही अवस्था प्राप्त होते.

**बोले परि मौनात । निवास करी शून्यात ।**
**चैतन्य देहासहित । जीवन-मुक्त असे ऐसा ।।१।।**
**अद्वैत सुख निर्मळ । पिंड ब्रह्माण्डाचा खेळ ।**
**सर्वत्र पाहे सोज्वळ । एक ब्रह्म भरलेले ।।२।।**

# १९. प्रश्नोपनिषद

माझी पुस्तके वाचून वाचकांच्या मनामध्ये काही प्रश्न निर्माण झाले. त्या प्रश्नांची उत्तरे या अध्यायात देत आहे.

**प्रश्न – तुम्ही जे लिहिले आहे ते यापूर्वीच्या साधू-संतांनी का लिहिले नाही ?**

उत्तर – पृथ्वीतलावर येणारे ज्ञान आणि विज्ञान हे स्वर्गलोकातून खाली उतरत असते. कोठल्यावेळी कोठले ज्ञान व विज्ञान पृथ्वीतलावर पाठवायचे हे स्वर्ग लोकातील देवता ठरवितात व तद्नुसार ज्ञान व विज्ञान हे पृथ्वीतलावर प्रकट होत असते. एकशे दहा वर्षांपूर्वी पृथ्वीतलावर एकही विमान नव्हते. आज लाखो विमानातून करोडो लोक प्रवास करत आहेत.

अशा प्रकारे पृथ्वीतलावरील मानवाला माध्यम बनवून पृथ्वीतलावर ज्ञान व विज्ञान खाली येत असते.

गेली हजार वर्षे साधू-संत मानवतेचा प्रचार करत आहेत. आता मानवतावादाचे महत्त्व बऱ्याच राष्ट्रांना कळलेले आहे. म्हणून अशा प्रकारची पुस्तके आता पृथ्वीतलावर सर्वत्र निर्माण होत राहतील. सुमारे एक हजार वर्षांपूर्वी श्रीमुक्तेश्वर, श्रीबसवेश्वर, श्रीअल्लमप्रभू, श्रीपाद

श्रीवल्लभ या संतांनी जगासमोर खरे ज्ञान आणण्याचा प्रयत्न केला. तद्नंतर ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत अनेक संतानी लोकांना सत्यज्ञानाचा प्रकाश देण्याचा प्रयत्न केला. परंतु समाज अति मूढ असल्याकारणाने समाजाला तो प्रकाश प्राप्त होत नव्हता. आता समाज सुशिक्षित झालेला असल्याकारणाने या ज्ञानाचा फायदा बऱ्याच लोकांना मिळेल.

**प्रश्न – आध्यात्मात गुरुचे महत्त्व किती ?**

उत्तर – आध्यात्मात खऱ्या गुरुचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु खऱ्या गुरुचे दर्शन सध्या अत्यंत दुर्लभ झालेले आहे व समाजालाही खऱ्या गुरुची गरज नसून आपल्या गरजा भागविणारा कुणीतरी हवा असतो व यामुळे शेतामध्ये ज्याप्रमाणे कांद्याचे पीक येते, त्याप्रमाणे सर्वत्र भोंदू साधू-संतांचे पीक आलेले आहे.

खरा गुरु आपल्या भक्तांचे प्रारब्ध शुद्ध करतो. परंतु त्यासाठी भक्त सुद्धा योग्यतेचा असावा लागतो. भक्ताची पात्रता असेल तरच गुरु त्याचे प्रारब्धातील सर्व भोग बाजूला ठेवून त्याची आध्यात्मिक प्रगती करून घेतो. यासाठी भक्ताजवळ पराकोटीची समर्पण बुद्धी असावी लागते. थोडे सुद्धा गैर वागून चालत नाही. कारण सद्‌गुरुला वातावरणातील कर्मफळाचे भोग भोगायला लावणाऱ्या देवी-देवतांना व शक्तींना तोंड द्यावयाचे असते व आपल्या भक्तांनाही सांभाळावयाचे असते. शिवाय भक्ताची आध्यात्मिक प्रगतीही करून घ्यावयाची असते. यासाठी गुरुला खूप मोठी तारेवरची कसरत करावी लागते. भक्तामध्ये नवीन दोष निर्माण होणार नाहीत, याची काळजीही घ्यावी लागते. गुरुचे कार्य खूपच कठीण असते. त्यामुळे खऱ्या सिद्धपुरुषांकडे बाजार नसतो. प्रसिद्धी नसते. त्यामुळे खऱ्या गुरुचे दर्शनही दुर्लभ असते.

**प्रश्न – ऋषी मुनींनी लिहिलेल्या पुराण ग्रंथांवर तुम्ही टीका केली आहे असे का ?**

उत्तर – आपल्या ऋषी-मुनींनी समाजाला ज्ञान देणारे ग्रंथ लिहिले. पुराण ग्रंथांमध्ये अप्रतिम असे खगोल शास्त्राचे ज्ञान आहे. परंतु काही पोटभरू विद्वानांनी या पुराण ग्रंथांमध्ये अनेक भाकडकथा घुसडून दिल्या व ग्रंथातील ज्ञान लोकांपर्यंत पोहोचण्याऐवजी लोकांपर्यंत भाकड कथा पोहोचल्या. या भाकडकथांच्याद्वारे चुकीचे संदेश समाजात पसरले. याची काही उदाहरणे पुढे देत आहे.

स्कंदपुराण ब्रह्मोत्तर खंड या ग्रंथावर आधारित शिवलीलामृत हा ग्रंथ लिहिला गेला आहे. यात अनेक कथा असून त्यापैकी अध्याय चौदा मध्ये श्रीयाळ-चांगुणाची कथा आहे. वाचकांनी ही कथा वाचावी व यात किती खरे आहे व किती खोटे आहे ते स्वतःच ठरवावे.

दत्त जन्माची कथा तर प्रसिद्ध आहे. या कथेवर वाचकांनी विचार करावा व ही कथा खरी आहे का खोटी आहे याचा शोध घ्यावा.

श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ माझा अतिशय आवडता ग्रंथ आहे. त्याची अनेक पारायणे मी केली आहेत. प्रभू दत्तात्रेयांचे आशीर्वाद या ग्रंथाला आहेत. या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी या ग्रंथाच्या लेखकाने या ग्रंथामध्येही उगाचच काही भाकडकथा टाकून श्रीदत्त महाराजांना थोडासा कमीपणाच आणला आहे.

उदाहरणार्थ, एका स्त्रिचा नवरा मेला आहे. पतिच्या प्रेताजवळ पत्नी आक्रोश करत आहे. साधूच्या रूपात तेथे दत्तमहाराज येतात, स्कंद पुराणातील, काशी पुराणातील एक लांबलचक कथा सांगतात. असे घडणे कधी शक्य आहे का ? देवाच्या नांवावर वाट्टेल त्या थापा मारायची सवय आमच्या पंडितांना आजही आहे.

आंध्र प्रदेशातील उमा-महेश्वर येथे मी पस्तीस वर्षांपूर्वी साधना करत होतो. उमा-महेश्वर हे स्थान अरण्यात गुहेमध्ये असून येथे कोणीही जात नसे. गुहेमध्ये शिवलिंग होते. शेजारच्या गुहेमध्ये प्राचीन कालीन पार्वती देवीची मूर्ती होती. परंतु पुजारी व भक्तगण यांचा पत्ता नव्हता. मी तेथे काही काळ साधना करत होतो.

एक दिवस फॉरेस्ट खात्याचे दोन गार्ड माझ्याजवळ आले. ते म्हणाले,

''फॉरेस्ट खात्याने येथून अर्धा किलोमीटर अंतरावर एक छोटीशी चौकी बांधायचे काम काढले आहे, म्हणून आम्ही आलो आहोत.''

मी जेथे बसत होतो तेथून पाण्याचा एक बारीक ओघळ खाली वाहत जात होता. तो ओघळ त्या फॉरेस्टच्या गार्डस्ना मी दाखविला व म्हटले,

''येथे एक छोटासा खड्डा करून त्याला सिमेंट लावून तुम्ही जर दिलेत तर मला ग्लास बुडवून पाणी पीता येईल.''

फॉरेस्ट खात्याच्या गार्डस्नी खड्डा करून देण्याचे मान्य केले व दोन दिवसात तेथे खड्डा करून त्याला सिमेंट लावून दिले. खड्डयात पाणी साठू लागले व माझी पाणी पिण्याची सोय झाली. माझ्या तेथील वास्तव्यात फॉरेस्ट खात्याचे दोन गार्डस् व दोन कामगार या व्यतिरिक्त कोणीही तेथील देवाच्या दर्शनास आले नव्हते. काही काळ तेथे साधना करून मी माझ्या पुढील प्रवासास निघून गेलो. मध्ये पाच- सहा वर्षांचा काळ गेला. नागार्जुन सागर येथे झोपडी बांधून राहू लागलो.

एक दिवस काही महाराष्ट्रातील मित्र मंडळी आली होती त्यांना

मी म्हणालो,

आपण उमा–महेश्वरला जाऊ या ! तेथे आता भरपूर बाजार भरलेला असेल. तेथे आपल्याला कशीही वागणूक मिळाली तरी तुम्ही शांत राहायचे !

''स्वामीजी येथे पूर्वी राहिलेले आहेत, त्यांनी येथे तपस्या केली आहे व हे स्थान जागृत केले आहे, असे काहीही बोलायचे नाही.''

सर्व मित्रांना अशा सूचना करून आम्ही ॲम्बेसॅडर गाडीने निघालो.

जो डोंगर, मी पायवाटेने चढून गेलो होतो, तेथे, गुहेपर्यंत डांबरी रस्ता झाला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला हॉटेल्स व दुकाने होती. गुहेच्या आसपास अनेक पुजारी आपल्या यजमानांच्या नांवाने पूजा करत होते. सर्वत्र मोठा बाजार भरलेला होता.

हा सर्व बाजार पाहून माझे मित्र मला म्हणू लागले –

'' पाच–सहा वर्षांपूर्वी येथे एकही मनुष्य येत नव्हता, असे जे आपण म्हणालात त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही, परंतु आमची खात्री आहे की, अनेक ठिकाणी तुम्ही आपली शक्ती लोककल्याणार्थ ठेवली आहे. तशीच शक्ती येथे ठेवली आहे. ती शक्तीच हे सर्व करत आहे.

मी त्यांना म्हटले,

''तुम्ही कोणी काही बोलू नका, फक्त पाहत राहा !''

आमचे संभाषण मराठीतून चालले असल्याकारणाने तेथे कोणाला कळणे शक्यच नव्हते.

आम्ही मराठीतून बोलत आहोत हे पाहून दोन पुजारी पुढे आले

व आमच्याशी हिन्दीमधून बोलू लागले -

''प्रथम तुम्ही ब्रह्मकुण्डावर जा ! ब्रह्मदेवाने तेथे चौऱ्यांशी हजार वर्षे तपस्या केली आहे. तेथील पाणी डोक्यावर शिंपडल्यानंतर तुमचे सात जन्मांचे पातक जळून जाईल व तुम्ही शुद्ध व्हाल. नंतर या गुहेत येऊन शंकर पार्वतीचे दर्शन घ्या, म्हणजे तुम्हाला मुक्ती प्राप्त होईल.

मी दोन्ही पुजाऱ्यांच्या हातात शंभराच्या दोन नोटा ठेवल्या तेव्हा ते स्वतःच माझ्याबरोबर कुण्ड दाखविण्यास आले.

''याला ब्रह्मकुण्ड म्हणतात '' पुजाऱ्याने सांगितले. वस्तुतः ते कुण्ड फॉरेस्ट गार्डची मदत घेऊन मी स्वतःच तयार केले होते.

ब्रह्मकुण्डावर पुजाऱ्याने आम्हा सर्वांच्या डोक्यावर थोडे-थोडे पाणी शिंपडले. आम्ही सर्वांनी त्या ब्रह्मकुण्डाला नमस्कार केला, नंतर देवाची पूजा करून सर्व पुजाऱ्यांना भरपूर दक्षिणा देऊन आम्ही निघालो.

तीर्थक्षेत्रांच्या नांवाने भाकडकथा कशा निर्माण होतात व कशा पसरविल्या जातात याचे उदाहरण वर दिले आहे. अशा असंख्य चुकीच्या कथा पुराणात लिहिल्या गेल्या आहेत व समाजाला चुकीचा संदेश दिला गेला आहे. अशा प्रकारे चुकीचा संदेश देणाऱ्या लोकांवर मी टीका केली आहे.

**प्रश्न - लघुरूद्र व महारूद्र करणाऱ्यांवर आपण टीका केली आहे असे का ?**

उत्तर - मी लिहिलेल्या सर्व गोष्टी अनुभवावर आधारित आहेत.

संस्कृत भाषेचा प्रचंड दुरूपयोग झाल्याकारणाने संस्कृत भाषा

जवळजवळ नामशेष झाल्यासारखी झालेली आहे. कुठलीही स्तोत्रे व ग्रंथ हे शब्दब्रह्मावर आधारित लिहिलेले असतात. या शब्दब्रह्माचे जर ज्ञान नसेल तर ज्याप्रमाणे अग्निला जर लहान मुलाने स्पर्श केला तर ते लहान मूल आहे याचा विचार न करता अग्नि भाजण्याचे काम करतो, त्याचप्रमाणे संस्कृतमधील रूद्रसूक्तासारखी सूक्ते अग्निप्रमाणे जाज्वल्य असून त्याचा वापर कसा करावा हे न कळता उगाचच रूद्रसूक्तासारख्या सूक्तांचे पाठ केले असता त्याचे दुष्परिणाम होतात असे माझ्या पाहण्यात आलेले आहे.

रूद्रसूक्तासारख्या जाज्वल्य संस्कृत सूक्ताचे पाठ जेथे चालतात, तेथे आसपास कोठेही रेडे, म्हशी, गाढव, डुक्कर अशी जनावरे असू नयेत. कारण या जनावरांमधून निघणारी स्पंदने व रूद्रसूक्तासारख्या दिव्य संस्कृत सूक्ताची स्पंदने यांचे घर्षण होऊन त्यातून अतिशय विनाशकारी शक्ती निर्माण होते. इतकेच नव्हे तर गायत्री मंत्राचे अनुष्ठान जेथे चालत असेल तेथे आसपास कोठेही म्हशी, रेडे अशी जनावरे पाळली जाऊ नयेत. भारतातील कोणीही अशा नियमांचे पालन करत नाहीत, कोणालाही हे नियम माहीत नाहीत व यामुळे शक्ती-शक्तींमध्ये वितुष्ट निर्माण होऊन जे कोणी असे करत आहेत त्यांच्या घराण्यांमध्ये विकृत संतति निर्माण होणे, वेड लागणे, स्त्रियांना बाधा होणे असे प्रकार घडत असतात.

**प्रश्न - या कलियुगामध्ये देव-देवतांशी संभाषण करणे शक्य आहे का ?**

उत्तर - ज्याचे अंतःकरण अतिशय निर्मळ आहे, जो मनाने सरळ आहे व त्याला प्रकाशमार्गी गुरु भेटला आहे, गुरुच्या मार्गदर्शनानुसार कठोर साधना जो करत आहे, अशा कुठल्याही

सद्भक्ताला या कलियुगातही देवतांची दर्शने, साक्षात्कार, मार्गदर्शन प्राप्त व्हावयास काहीही हरकत नाही. मानवाचा जन्मच मुळी आध्यात्मात प्रगती करण्यासाठी झालेला असतो. येथे मानव जितके सद्गुण प्राप्त करतो तितका तो ईश्वराच्या जवळ जातो.

**प्रश्न – देवतांच्या चित्रांना काही अर्थ आहे का ?**

उत्तर – शंभर पानांमध्ये राहणारा मजकूर एका चित्रामध्ये व्यक्त करता येतो. म्हणून चित्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

हिन्दू धर्मामध्ये अनेक देवी-देवतांची चित्रे आहेत. या चित्रांना खूप अर्थ असून ही चित्रे मानवाची आध्यात्मिक प्रगती कोठपर्यंत झाली आहे हे दर्शवितात. त्याचप्रमाणे खूप मोठा आध्यात्मिक संदेशही देतात. परंतु या गोष्टी इतक्या गुंतागुंतीच्या व रहस्यमय आहेत की शब्दाच्या माध्यमातून ते सर्व सांगणे अशक्य आहे. तसेच सृष्टीमध्ये अशी अनेक रहस्ये आहेत, की, ती उघड करण्यास योग्य वेळ अद्याप आलेली नाही.

ईश्वराची इच्छा असेल तर भावी काळात कोणीतरी योगी इतर अनेक रहस्यांवरील पडदा बाजूला सारून समाजाला त्या रहस्याचे ज्ञान देईल व ईश्वराची इच्छा नसेल तर ही सर्व रहस्ये तशीच विश्वोदरात दडून राहतील.

**प्रश्न – आम्हाला थोडक्यात आध्यात्म सांगा.**

उत्तर – दररोज एक तास नामस्मरण करावे. दररोज दान व परोपकार करावा. दररोज एक तास श्वासावर लक्ष ठेवून ध्यान करावे. आपल्यातील दुर्गुण घालवावेत व सद्गुण आणण्याचा प्रयत्न करावा, हे आध्यात्माचे सार आहे. या गोष्टींचे पालन केल्यास आध्यात्मात प्रगती नक्कीच होईल. श्वासाच्या रूपाने परमेश्वर आपल्या हृदयात राहतो. म्हणून

श्वासावर सतत लक्ष ठेवावे. दीर्घश्वसन करावे. उगवत्या सूर्याचे डोळे मिटून एक मिनिट ध्यान करावे व आकाशाकडे दररोज पाच मिनिटे पाहावे.

**प्रश्न – मृत्यू वेगवेगळ्या रितीने का येतो ?**

उत्तर – माणसाची कर्मगती जशी असेल, त्याप्रमाणे प्रत्येक माणसाला मृत्यू येतो. एखाद्या माणसाने जर आपल्या आयुष्यामध्ये काहीच पुण्य केलेले नसेल किंवा केलेले पुण्य, ईर्षा, द्वेष, मत्सर करून नष्ट केले असेल तर शांतपणे मृत्यू येत नाही. असा मनुष्य मृत्यूची वाट पाहत राहतो.

एखाद्या आत्म्याची आध्यात्मिक प्रगती अपुरी असते. ही पूर्ण होईपर्यंत त्याला मृत्यू येत नाही. एखाद्या माणसाने जर पूर्वजन्मी कोणाचा खून केला असेल तर या जन्मी त्याचाही खून होतो. अशा प्रकारे मृत्यू वेगवेगळ्या रितीने येण्यास अनेक कारणे असतात.

**प्रश्न – विज्ञानयुगामध्ये ईश्वरभक्तीला महत्त्व देणे योग्य आहे का?**

उत्तर–ईश्वरभक्ती हे विज्ञानच आहे. ईश्वराचे पवित्र नाम मनातल्या मनात घेण्यास सुरुवात केल्यानंतर आपण आपोआपच दीर्घ श्वास घेऊ लागतो. दीर्घश्वसन सुरू झाल्यानंतर रक्तामध्ये प्राणवायुचे प्रमाण वाढते. जाणीवपूर्वक दीर्घश्वसन केल्यास रक्तामधील प्राणवायुचे प्रमाण अतिशय वाढते व रक्त शुद्ध होते. याने आरोग्य सुधारते. अनेक वर्षे दीर्घश्वसन केल्यास शरीरातील सर्व नाड्या शुद्ध होतात. सूक्ष्मशरीर शुद्ध होते. मनात वाईट विचार येतच नाहीत. आध्यात्मिक प्रगती होते. मन प्रसन्न होते व परमेश्वराचा साक्षात्कार होतो.

ॐ

# २०. मृत्यूपूर्वी व मृत्यूनंतर

मृत्यू ! हे हेडींग वाचून वाचक म्हणतील स्वामीजींनी या विषयावर लिहायला नको होते. कारण वयाच्या ऐंशीव्या वर्षीसुद्धा मृत्यूची कल्पना करणे, कोणालाही नको असते. आयुष्यभर माणसे मृत्यू हा विषय टाळून इतर सर्व विषयांवर बोलत असतात. मृत्यू कोणालाच नको असतो. कदाचित बरेच वाचक हा अध्याय वाचणार सुद्धा नाहीत, तरी वाचकांनी हे लक्षात घ्यावे.

**''आपण सगळे अमरच आहोत. मृत्यू नांवाची कुठलीही गोष्ट कोठेच नाही. देहाच्या मृत्यूनंतर आपण हजारो पटीने जिवंत होत असतो. मात्र पैसा, प्रतिष्ठा, सत्ता, शिक्षण यातील काहीही आपल्या जवळ नसते.''**

एका थोर तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे -

''मृत्यू सत्य व चिरंतन आहे. जीवन हा अपघात आहे !''

येथे त्या तत्त्ववेत्त्याला असे म्हणायचे आहे की, आपल्या शरीरामध्ये दर सेकंदाला बदल होत असतात. दर दिवशी करोडो पेशी मरत असतात. दर दिवशी आपण मोठे होत असतो. वृद्धत्वाकडे झुकत असतो. असे असतांना जीवनाला चिरंतन मानण्याऐवजी मृत्यू जो सत्य व चिरंतन आहे, त्याचे स्मरण नित्य ठेवून तो सुखाने कसा येईल यासाठी

प्रयत्न करावा. परंतु माझे म्हणणे असे आहे की, ''मृत्यू नांवाची कुठलीही गोष्ट या विश्वात नाही. म्हणून आपण मृत्यू हा विषय समजावून घ्यावयास हवा. मृत्युला नीट समजावून घेतल्यानंतर 'जीवन कसे जगावे' हे लक्षात येते. मृत्युला न ओळखणारी माणसे मरेपर्यंत भ्रमात राहतात.

माणसाला आपली खरी लायकी मृत्यूनंतरच कळून येते. पृथ्वीतलावर जीवन जगत असतांना अनेकांना स्वतःच्या तालांवर नाचविणारा, मनात येईल तेव्हा कोणाचाही खून करणारा, दादागिरी करणारा, असा मनुष्य मृत्यूनंतर अत्यंत लाचार अवस्थेत यातना भोगत असतो. दुःख व यातना त्याने स्वतःच्या कर्मानेच निर्माण केलेल्या असतात. मृत्यूनंतर त्याच्या लक्षात येते की, तो हजारो पटीने जिवंत झालेला आहे व त्याने जी काही दुष्कर्मे पृथ्वीतलावर जीवन जगत असतांना चाळीस वर्षात केली त्याचे दुष्परिणाम हजारो वर्षे भोगावे लागणार आहेत व हजारो वर्षांच्या शिक्षा संपल्यानंतर पुढे जे मानवजन्म मिळतील ते लाचार व दयनीय अवस्थेतील असतील. दुःख, लाचारी व पश्चात्ताप याव्यतिरिक्त आपल्या हातात काहीच नाही, हे त्याच्या लक्षात येते.

**येथे एक सांगणे आवश्यक आहे की, चित्रगुप्त नांवाचा कोणीही यमाचा हिशेबनीस नसून प्रत्येक मनुष्य जी काही चांगली-वाईट कर्मे करतो त्याची एक फिल्म माणसाच्या मेंदूमध्ये तयार होत असते व मृत्युच्या ठीक एक मिनिट अगोदर प्रत्येक माणसाला ती फिल्म दाखविली जाते. हे गुप्त चित्र दाखविले जात असतानांच महापापी लोकांना म्हणजे गुंडगिरी करणे, खून - मारामाऱ्या करणे, इतरांना छळणे, आतंकवाद करणे, पैसा खाणे अशा लोकांना तुम्ही या सर्व चुका केलेल्या आहेत व मनुष्य जन्माचा दुरूपयोग केलेला आहे, याची जाणीव करून दिली जाते व**

**नंतर यातना लोकात त्यांची रवानगी केली जाते.**

मनुष्यजन्म ही मधली अवस्था (middle stage) असून मनुष्य जन्माला आल्यानंतर आपण स्वतःची अधोगती करायची की, उर्ध्वगती करायची हे आपण स्वतःचे स्वतः ठरवावयाचे असते.

सत्कर्मे करून आपण सज्जन बनायचे, देव माणूस बनायचे, देवासमान आनंदमय व इतरांना आनंद देणारा व देवांनाही प्रिय होईल असा मनुष्य बनायचे की नाही, हे आपल्याला ठरविता येते.

**क्रिया – प्रतिक्रिया**

**चिंती परा । ते येई घरा ।**

**अदृश्य सृष्टीचा । न्याय खरा ।।**

आपण इतरांसाठी जे चिंतन करतो तेच आपल्याला प्राप्त होते.

इतरांना आनंद दिला असता, आपल्या जीवनात आनंद निर्माण होतो. दुसऱ्याला अत्तर लावले असता आपल्याला सुगंध प्राप्त होतो. म्हणून नेहमी सर्वांचे चांगले व्हावे, असाच विचार करावा, म्हणजे मृत्यूनंतर परमानंददायक अशा लोकात प्रवेश प्राप्त होतो.

दुसऱ्याला जर दुःख दिले तर त्याची प्रतिक्रिया म्हणून आपल्याला अनेक पटीने दुःख भोगावे लागते. इतरांना सहकार्य करणे, सामंजस्याने वागणे व सलोख्याने वागणे या गोष्टींचे रहस्य हेच आहे की, आपण दुसऱ्याला अत्तर लावले तर प्रथम आपल्या हाताला अत्तर लागते व सुगंध प्रथम आपल्याला प्राप्त होतो. आपण दुसऱ्याविषयी वाईट चिंतन केल्यास आपण स्वतःचे सगळे भविष्यच बिघडवून टाकतो.

समजा एखाद्या माणसाने जनतेचे एक हजार रूपये खाल्ले पण

इतर बरीच चांगली कामेही केली तर या कर्माचा परिणाम म्हणून पुढील जन्मी त्याला जनतेला किमान एक कोटी रूपये कुठल्या ना कुठल्या मार्गाने परत करावे लागतील. अशा प्रकारे क्रियेची प्रतिक्रिया होत असते. पुष्कळवेळा या जन्मी केलेल्या कर्माची फळे पुढल्या जन्मी भोगावी लागतात. काही वेळा या जन्मी केलेल्या कर्माची फळे याच जन्मी भोगावी लागतात.

माझ्या माहितीतील एक मनुष्य परदेशामध्ये जाऊन संगीताचे कार्यक्रम करीत असे व खूप पैसा कमवित असे.

तेथील एका स्त्रिने मला संगीत शिकावयाचे आहे, शिकवाल काय? असे विचारले. या माणसाने संगीत शिकवितो असे सांगून तिला भारतात येण्याचे आमंत्रण दिले. ती भारतात आल्यानंतर पुणे-मुंबई सारख्या मोठ्या शहरामध्ये तिला संगीत शिकविण्याची सोय करण्याऐवजी भारतातील एका खेडेगावामध्ये संगीताची थोडीशी माहिती असणाऱ्या संगीतकाराकडे तिला शिकावयास ठेवले. तिच्याकडून फी मात्र भरपूर घेतली.

या घटनेनंतर त्या संगीतकारावर अनेक आपत्ती आल्या व त्याचे प्रचंड नुकसान झाले. अशा प्रकारे मनुष्य स्वतःचे भविष्य स्वतःच्या कर्मानुसार घडवित असतो अथवा बिघडवित असतो.

काही लोक माझ्या नांवाने पैसे बाजूला काढतात. त्यांना खूप चांगले अनुभव येतात. अडीअडचणी दूर होतात, दारिद्र्य दूर होते, संकटातून मार्ग निघतो, आधी-व्याधी यांचे निवारण होते, आरोग्य चांगले राहते असे अनुभव परमेश्वराच्या कृपेने त्यांना येत असतात. येथेही क्रिया-प्रतिक्रिया अनुभवास येतात. अशा काही एक-दोन गोष्टी आठवल्या त्या पुढे देत आहे.

एका माणसाने एक दुकान काढले. दुकानाची विक्री जेमतेम रोजची ३०-४० रूपये होती. दुकानामध्येच त्याने एक डबा ठेवला होता व या डब्यामध्ये तो रोज थोडे थोडे पैसे माझ्या नांवाने टाकीत असे. या त्याच्या क्रियेची प्रतिक्रिया अशी झाली की ज्या दिवसापासून त्याने पेटीत पैसे टाकावयास सुरुवात केली त्या दिवसापासून त्याच्या विक्रीमध्ये विलक्षण वाढ झाली व वर्षभरात तो खूप श्रीमंत झाला.

क्रिया-प्रतिक्रिया (Action-Reaction) कशी होत असते हा मुद्दा मी वाचकांना समजावून देत आहे. पृथ्वीतलावरच क्रिया-प्रतिक्रिया एकाच जन्मात कशा होत असतात हे या उदाहरणावरून लक्षात येईल. मृत्यूनंतर तसेच पुढील जन्मात आपल्या कर्मांचे सुपरिणाम व दुष्परिणाम कसे होत असतात हेही लक्षात येईल.

एक लबाड मनुष्य होता. लोकांकडून पैसे घेणे व बुडविणे यात त्याला आनंद वाटत असे. तो लबाड मनुष्य माझ्या या भक्ताकडे आला व त्याने माझ्या दुकानदार भक्ताकडे दोन हजार रूपये मागितले. त्यावेळी माझ्या या भक्ताची परिस्थिती नुकतीच चांगली होऊ लागली होती.

माझा भक्त म्हणाला,

''देवाच्या नांवाने मी जे पैसे बाजूला काढले आहेत त्यात दोन हजार रूपये असतील. ते मी तुला देतो. परंतु तू हे लवकरात लवकर परत कर कारण ते पैसे मला देवाला नेऊन द्यावयाचे आहेत.''

यावर ''पंधरा-वीस दिवसात पैसे परत करतो.'' असे सांगून तो लबाड मनुष्य पैसे घेऊन गेला.

यानंतर सुमारे तीन वर्षे त्या माणसाने पुनश्च माझ्या भक्ताला तोंड दाखविले नाही.

हा लबाड मनुष्य कोल्हापुरात राहत होता. त्याचा मुलगा व सून मुंबईत राहत होते व भरपूर पैसे कमवित होते. आपल्या नातवाचा पाचवा वाढदिवस साजरा करण्यासाठी हा लबाड मनुष्य कोल्हापूरहून मुंबईला आला. मुंबईत येऊन आपल्या नातवाचा पाचवा वाढदिवस त्याने उत्साहाने साजरा केला. मुलगा, सून, नातू यांच्या सहवासात तो अगदी आनंदात राहत होता.

एक दिवस सर्वजण फिरावयास बाहेर पडले. राणीच्या बागेत गेले. राणीच्या बागेत फिरत फिरत आजोबा, मुलगा, सून व नातू सर्वजण घोड्यासमोर उभे होते. अचानक घोड्याने नातवाच्या तोंडावर लाथ मारली. नातू रक्तबंबाळ झाला. त्याला तात्काळ दवाखान्यात हलविण्यात आले. नातवाला बरे करण्यास पस्तीस हजार रूपये खर्च आला. ही घटना सुमारे तीस वर्षांपूर्वीची आहे. त्या काळात पस्तीस हजार रूपये खर्च आला म्हणजे मुलाने व सुनेने कमविलेली सर्व कमाई नष्ट झाल्यासारखे झाले.

असे म्हणतात की आपत्ती येऊ लागल्या की, एका पाठोपाठ एक येत असतात. काही दिवसात मुलाची व सुनेची दोघांचीही नोकरी गेली, त्यामुळे ते सर्व हवालदिल झाले. डोक्यावर कर्ज झाले.

एका माणसाच्या चुकीचे दुष्परिणाम संपूर्ण घराला कसे भोगावे लागतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे. असे म्हणतात की, माणसाच्या सर्व समस्यांचे मूळ त्याच्या अंतरंगातच असते. म्हणून 'लबाडी करू नये,' 'कोणाला फसवू नये,' 'प्रामाणिकपणे वागावे' असे म्हटले जाते. ''स्वार्थाला परमेश्वराच्या दरबारात महान अपराध मानले जाते.'' नातवाला अपघात झाला, मुलगा व सून यांची नोकरी गेली, खिशात एकही पैसा शिल्लक राहिला नाही. इतके सर्व झाल्यानंतर

त्या माणसाला देव आठवला.

आपले असे का होते, हे विचारण्यासाठी अनेक दरबारात त्याने हजेरी लावली. शेवटी परमेश्वराच्या कृपेने त्याला एक दत्तभक्त व्यक्ती भेटली. त्या व्यक्तीने त्याला व त्याच्या मुलाला दोघांनाही पुढीलप्रमाणे सांगितले,

''एका सद्भक्ताने देवाच्या नांवाने पैसे बाजूला काढले होते. लोकांकडून पैसे घ्यायचे व बुडवायचे ही वृत्ती तुमच्यात फार पूर्वीपासून आहे. तुमच्या स्वभावाला अनुसरून तुम्ही या सद्भक्ताने देवाच्या नांवाने बाजूला काढलेले पैसे भूल-थापा मारून काढून घेतले व बुडविले. त्याचेच दुष्परिणाम तुम्ही भोगत आहात.''

यावर त्या गृहस्थाने दत्तभक्ताला विचारले,

''पैसे मी घेतले व बुडविले ही गोष्ट तुम्ही सांगितली, हे बरोबर आहे, परंतु मी केलेल्या पापाची शिक्षा परमेश्वराने मला करायला हवी होती. परमेश्वराने माझ्या मुलाला, सुनेला व नातवाला शिक्षा का केली?''

यावर तो दत्तभक्त म्हणाला,

''संसारी मनुष्य जे काही चांगले अथवा वाईट कर्म करतो, ते तो आपल्या मुलाबाळांसाठी करत असतो. म्हणून आई-वडिलांच्या चांगल्या अथवा वाईट कर्मांची फळे मुलांना भोगावी लागतात.''

''मग आता यावर उपाय काय?'' आजोबांनी विचारले.

''तुमच्या मुलाने त्या सद्भक्ताच्या घरी जाऊन भांडी घासली पाहिजेत!'' दत्तभक्ताने सांगितले.

यावर मुलगा म्हणाला, ''मी जाईन, भांडी घासीन, पण

आम्हाला चांगला गुण येऊ दे ! सध्या आमच्याजवळ विष खायलासुद्धा पैसे नाहीत व ज्या सद्भक्ताचे पैसे आमच्या वडिलांनी बुडविले तो येथून चारशे किलोमीटर दूर राहतो.''

''ज्या दत्तमहाराजांचे पैसे तुम्ही बुडविलेत तेच तुमची सर्व व्यवस्था करतील. माणसाने सुधारावे म्हणून ईश्वर शिक्षा करत असतो.''

दत्तभक्ताने सांगितल्याप्रमाणे आजोबांचा मुलगा हातात एक पिशवी घेऊन, रत्नागिरीला जाण्यास निघाला. मुंबईतील आपल्या घरापासून सात रस्त्यापर्यंत सुमारे २-३ कि. मी. तो चालला. इतक्यात पाठीमागून एक ट्रक आला. ट्रक ड्रायव्हरने गाडी थांबवून त्याला, ''कोठे चाललास'' असे विचारले. या मुलाने मला रत्नागिरीला जावयाचे आहे असे सांगितले. ट्रकवाल्याने त्याला गाडीत घेतले, वाटेमध्ये त्याला चहा, नाश्ता, जेवण सर्व दिले व रत्नागिरी जिल्ह्यातील एका खेडेगावात त्याला जायचे होते तेथे नेऊन सोडले.

वडिलांनी ज्याचे पैसे बुडविले होते त्या सद्भक्ताच्या घरी जाऊन मुलाने माफी मागितली व दोन-तीन महिने तेथे सेवा केल्यानंतर त्या सर्वांना परत चांगले दिवस आले.

**''पेरावे तसे उगवते '' ''करावे तसे भरावे''**

**''क्रिया - प्रतिक्रिया'' ''Action -Reaction''**

या गोष्टी पृथ्वीतलावरच कशा होत असतात हे आपण पाहिले. परंतु ज्यांना पृथ्वीतलावर शिक्षा होत नाहीत त्यांना मृत्यूनंतर अतिशय कठोर शिक्षांना तोंड द्यावे लागते. या शिक्षा हजारो वर्षे चालत असतात.

पृथ्वीतलावर जीवन जगतांना 'स्वार्थाने वागणे,' 'इतरांना

फसविणे,' 'लांड्या-लबाड्या करणे', 'मनाने दुष्ट असणे' या गोष्टी किरकोळ समजल्या जातात. परंतु परमेश्वराच्या दरबारात या सर्व गोष्टी गुन्हा मानल्या जातात व प्रत्येक गुन्ह्याची वेगवेगळी शिक्षा असते. ईश्वराचा न्याय अतिशय बारकाईने केला जातो. न्यायदान करतांना प्रत्येक प्रवृत्ती विचारात घेतली जाते. त्यामुळे ऐहिक गोष्टींचा हव्यास धरणाऱ्या दुष्प्रवृत्त माणसांना मृत्यूनंतर खूप मोठ्या शिक्षा भोगाव्या लागतात.

लोभी, स्वार्थी, अहंकारी, पैशाच्या मागे लागलेले, कपटी, कारस्थानी, सत्तापिपासू, प्रजेला आपल्या मुठीत ठेवणारे, समाजात चुकीच्या प्रथा निर्माण करणारे, लबाड्या व फसवणूक करणारे, मांत्रिक, तांत्रिक, स्मशानात साधना करणारे साधू अशा सर्व लोकांची मृत्यूनंतर दयनीय अवस्था असते. ही अवस्था इतकी भयंकर असते की, त्यांचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात. परमेश्वराच्या दरबारात स्वार्थाला खूप मोठा गुन्हा मानला जातो. म्हणून स्वार्थाच्या अंतर्गत येणारे प्रत्येक कर्म उदाहरणार्थ - लबाडी, फसवणूक, आत एक बाहेर एक असे वागणे या छोट्या छोट्या गोष्टींमुळेसुद्धा मृत्यूनंतर मोठ्या शिक्षा होऊ लागतात.

अनेकांना असे वाटते की, एकदा मनुष्य जन्म प्राप्त झाला की, नंतर मनुष्य सोडून इतर जन्म प्राप्त होत नाहीत. परंतु हे शंभर टक्के चूक आहे. कित्येकवेळा महापापी लोकांना ओझे वाहणाऱ्या जनावरांच्या रूपात अनेक जन्म घ्यावे लागतात. तर परोपकार न करणाऱ्या स्वार्थी लोकांना कावळ्याच्या योनीत जन्म मिळतात. ज्यांच्यावर शनी ग्रहाचा कोप असतो अशा लोकांना अनेक जन्म काक योनीत घ्यावे लागतात. ज्यांच्यावर केतू ग्रहाचा कोप असतो किंवा जे साधू स्मशानातील नर-मांसाचे भक्षण करतात अशा लोकांना गिधाडाच्या योनीत अनेक जन्म घ्यावे लागतात. माणसे स्वतःच्या दुष्कर्माने ग्रहांचे, देव-देवतांचे व शक्तींचे कोप ओढवून घेतात. अशा प्रकारे मनुष्य जन्म प्राप्त

झाल्यानंतर वर जायचे, की, खाली जायचे, परमानंदमय प्रकाशमय देवलोकात जायचे की, अंधःकारमय सैतानाच्या यातना लोकात जायचे, हे प्रत्येक माणसाने विचार करून ठरवायचे असते.

मृत्यूनंतर मनुष्य अनेक पटीने जिवंत होत असतो. परंतु आत्म्याचे हे अनेक पटीने जिवंत होणे यातनामय, की आनंदमय हे माणसाची पृथ्वीतलावरील कर्मे ठरवितात.

**शिक्षा भोगण्यासाठी अथवा शिक्षण घेण्यासाठी आत्म्याला विविध प्रकारचे देह प्राप्त होतात.**

कधी कधी शिक्षा भोगण्यासाठी मनुष्याला प्राणी, पशू , पक्षी, वृक्ष, जलचर इत्यादी विविध योनीत जन्म घ्यावे लागतात. तर शिकण्यासाठी प्राणी, पशू, पक्षी, यातना भोगणारे पिशाच्च आत्मे, मोठमोठ्या शिळांमध्ये व वृक्षांमध्ये राहणारे आत्मे मनुष्यरूपाने जन्म घेतात. अशा नीच दर्जातील लोकातून आत्मे (spirits) जेव्हा पृथ्वीतलावर मनुष्यदेहात जन्म घेतात, तेव्हा त्यांची बुद्धी ही त्यांच्या पूर्वजन्मानुसार असते. या बुद्धीला सन्मार्गावर आणण्यासाठी सत्पुरुष व सद्ग्रंथ यांच्या मार्फत प्रयत्न केले जातात. अनेक वेळा संधी देऊनही न सुधारल्यास विविध प्रकारच्या शिक्षांना तोंड द्यावे लागते. अनेक प्रकारच्या आपत्ती येऊ लागतात. आधी-व्याधींनी मानव त्रस्त होतात. मानवांवर विविध प्रकारची संकटे येतात त्याचे मूळ कारण प्रत्येक मानवाच्या अंतरंगातच असते.

## मृत्यूनंतर

मनुष्यदेहाला मृत्यू येण्यापूर्वीच अनेक आघात करून ईश्वर माणसाला शहाणे करण्याचा प्रयत्न करत असतो. त्याने केलेल्या चुकांच्या व कर्मांच्या त्याला शिक्षा देऊन त्याच्या आत्म्याला शुद्ध

करण्याचा प्रयत्न करत असतो. इतके करूनही जर मनुष्य सुधारला नाही तर त्याची रवानगी यातना लोकात होते. हे यातना लोक कसे आहेत यावर एक दृष्टीक्षेप !

ईश्वर योग्यांना विविध प्रकारचे ट्रेनिंग (प्रशिक्षण) देतो. या ट्रेनिंगमध्ये विविध लोक पहावे लागतात. या लोकांमध्ये जे आत्मे राहतात, त्या आत्म्यांची सुख-दुःखे समजावून घ्यावी लागतात. त्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न करावा लागतो. एका दिवसात ५०-५० हजार आत्म्यांना सद्‌गती देण्याचे काम करावे लागते. अदृश्य सृष्टीतील विविध प्रकारचे लोक फिरतांना योग्यांना विशिष्ट प्रकारचे कवच दिले जाते. या कवचामुळे त्या लोकातील वातावरणाचा त्रास होत नाही व ईश्वराने दिलेले कार्य व्यवस्थितरित्या पूर्ण करता येते.

### प्रेत-लोक

या लोकामध्ये सर्वत्र विविध प्रकारच्या प्रेतांचे खच पडलेले असतात. मेलेले प्राणी, मनुष्य यांच्या दुर्गंधीने आसमंत भरून गेलेला असतो. वातावरणामध्ये प्रचंड धूर असतो. एक सेकंदसुद्धा येथे राहणे सर्वसामान्य माणसास शक्य नसते. याशिवाय इतर काही बऱ्याच गोष्टी असतात त्याचे वर्णन न केलेले बरे !

जेथे एक मिनिटही राहणे शक्य नाही, अशा भयानक वातावरणात हजारो वर्षे आत्मे शिक्षा भोगत असतात. पृथ्वीतलावरील सैतानाची उपासना करणारे लोक, भूत-पिशाच्च्यांच्या साधना करणारे लोक, कबरस्तानात साधना करणारे साधक, आतंकवाद करणारे अशा सर्व लोकांना येथे शिक्षा भोगण्यासाठी यावे लागते व येथे ते पृथ्वीतलापेक्षा हजारो पटीने जिवंत असतात.

येथील आत्म्यांना शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, भूक, तहान

व श्वासोच्छ्वास या सर्व गोष्टी असतात. यांचे प्रेतदेह भयानक असतात. स्वतःच्या दुष्कर्मांनी यांनी आपल्या सूक्ष्मदेहाचे भयानक नुकसान केलेले असते. प्रचंड भूक, तहान असते परंतु खावयास व प्यावयास काहीही मिळत नाही. असह्य दुर्गंधी सहन करावी लागत असते. त्यांच्या प्रेतदेहाची गंध घेण्याची क्षमता अफाट असते. म्हणजे सामान्य मनुष्य तीन फूटावरचा सुगंध अथवा दुर्गंध घेतो. परंतु पापी माणसाला जेव्हा प्रेतदेह प्राप्त होतो व प्रेतलोकात त्याची रवानगी केली जाते तेव्हा कित्येक मैलावरचा दुर्गंध घेण्याची क्षमता त्याला प्राप्त होते. या दुर्गंधीने तो प्रतिसेकंद हैराण होतो. अशी कित्येक वर्षे त्याला या दुर्गंधीत काढावी लागतात. याशिवाय इतर शिक्षा होतात त्या वेगळ्याच. या लोकातील एक दिवस म्हणजे मानवाचे एक वर्ष इतका मोठा असतो. शेकडो वर्षांचा यातनाकाल संपल्यानंतर येथील प्रेतात्म्यांना गिधाड, तरस, बहिरी ससाणा अशा योनींमध्ये जन्म मिळतो. या लोकात भयंकर अंधःकार असतो. सर्वत्र प्राणी, पशू , मनुष्य यांच्या प्रेतांचे खच पडलेले असतात. वातावरणात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असते. प्रेतांचे मांस खाणाऱ्या काळ्याकुट्ट डाकिणी सर्वत्र फिरत असतात. प्रेतात्म्याला हळूहळू या सर्वांची सवय होते. दुर्गंधी हेच त्याचे जीवन होते व प्रेतांचे मांस खाणे हेच त्याचे जेवण होते. हजारो वर्षांचे येथील आयुष्य संपल्यानंतर येथील प्रेतात्म्यांना कच्चे रक्त-मांस खाणाऱ्या प्राण्यांच्या रूपात जन्म मिळतो.

पृथ्वीतलावरील चेटूक विद्येची साधना करणारे, इतरांचे वाईट करता यावे म्हणून तामस विद्या शिकणारे, प्रेतावर बसून साधना करणारे, स्मशान साधना करणारे, चार बाजूला चार प्रेतं ठेवून मध्ये पाचवे प्रेत ठेवून त्या प्रेताच्या पोटावर बसून साधना करणारे, एकाच वेळेला आतंकवादाने अनेक लोकांच्या मृत्युस कारणीभूत ठरणारे, इतरांचे वाईट

व्हावे म्हणून करणी करणारे, अशी सर्व माणसे मृत्यूनंतर या लोकात येतात व शेकडो वर्षे येथेच राहतात.

पृथ्वीतलावर आजही असे साधू व साधक आहेत की, जे या प्रेतलोकाची साधना करतात. एक-दोन दिवसाच्या साधनेनेच प्रेत-लोकातील दुष्ट शक्ती साधकांच्या आधीन होऊ लागतात, कारण हे साधू व साधक या प्रेतात्म्यांना कच्च्या रक्त, मांसाचे प्रलोभन दाखवितात व त्यांना वश करून घेतात व यांच्या आधाराने संपूर्ण समाजावर आधिपत्य गाजवितात. असे साधू राजकारण्यांना व श्रीमंत लोकांना खूप प्रिय असतात. अशा साधूंकडे गर्दीही खूप असते. अशा साधूंचे सर्व शिष्यगण मृत्यूनंतर आपला गुरु ज्या पिशाच्च लोकात असेल तेथे खेचले जातात. असे साधू स्वतःबरोबर समाजाचीही वाट लावतात.

**राक्षस-लोक**

पृथ्वीतलावरील क्रूर राज्यकर्ते, खून, गुंडगिरी करणारे, धंदेवाईक किलर (सुपारी घेऊन खून करणारे), प्रजेचे रक्त शोषण करणारे राज्यकर्ते, मगरूर उन्मत्त अधिकारी किंवा माणसे, अत्यंत धूर्त, क्रोधी, अहंकारी, कपटी असे लोक देह मेल्यावर अनेक पटीने जिवंत होऊन या लोकात येत असतात. येथे त्यांना भयानक यातना भोगाव्या लागतात. अनेक वर्षे यातना भोगल्यानंतर रेडा, गाढव अशा ओझे वाहणाऱ्या प्राण्यांच्या रूपाने त्यांना जन्म मिळतो. पुष्कळ वेळा येथील आत्म्यांना शिळांमध्ये किंवा खडकांमध्ये, वृक्षांमध्ये राहावे लागते.

यांनाही भूक, तहान, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, श्वास या गोष्टी असतात. भांडणे, मारामाऱ्या व किंकाळ्या या लोकात सतत ऐकू येत असतात व येथे प्रचंड अंधःकाराचे साम्राज्य असते. सत्तांध होऊन प्रजेला जे लुटतात, लुबाडतात असे राज्यकर्ते या लोकात यातना

भोगतात. या लोकामध्ये प्राचीन काळातील असंख्य राज्यकर्ते असून त्यांना अद्याप गती मिळालेली नाही. पूर्वीच्या या राज्यकर्त्यांना पुढे शेकडो जन्म मांसभक्षी प्राणी, पशू ,पक्षी यांचे घ्यावे लागणार आहेत. या लोकातील बरेचसे दुष्ट आत्मे हे आपली भूक भागविण्यासाठी कच्चे मांस व रक्त भक्षण करतात.

पृथ्वीतलावरील एक वर्ष म्हणजे यांचा एक दिवस. हे राक्षसी आत्मे वृक्ष व शिळा यामध्ये जास्त करून आढळतात. असे वृक्ष बुलडोझरनेसुद्धा तोडता येत नाहीत. वृक्षांमध्ये व शिळांमध्ये राहणारे हे राक्षसी आत्मे मानवांकडे रेडे, बकरे, कोंबड्या यांचे मांस मागतात व याच्या बदल्यांमध्ये माणसांच्या मनोकामना पूर्ण केल्याचे नाटक करतात. तीन प्रकारच्या मनोकामना मात्र ते खरंच पूर्ण करतात.

१) रक्त, मांसाचे बळी जो देतो त्याच्या शत्रूंचा नाश करणे.

२) भरपूर सत्ता प्राप्त करून देणे. ही सत्ता राज्यसत्ता असू शकते किंवा धनसत्ता असू शकते किंवा दहशतवाद असू शकतो. अशा प्रकारे या आसुरी शक्ती संपूर्ण समाजावर आपला पगडा गाजवितात.

३) संतान प्राप्ती – या आसुरी शक्ती त्यांच्या स्थानात येणाऱ्या अनेकांच्या पोटी, मुला-मुलींच्या रूपाने जन्म घेतात. अशा रितीने समाजात आसुरी नर-नारी निर्माण होतात. आसुरी प्रान्तातून जन्माला आलेली मुले मोठेपणी गुंड, आतंकवादी, दहशतवादी बनतात किंवा प्रजापीडक राज्यकर्ते, पैसे खाऊ किंवा प्रजेच्या रक्ताचे शोषण करणारे पुढारी किंवा लुटेरे बनतात.

मानवाचे एक वर्ष म्हणजे या लोकातील असुर आत्म्यांचा एक दिवस. यामुळे वर्षातून एकदा यांना नैवेद्य दाखविला की यांच्याकडून वर्षभराची राखण मिळू शकते.

आसुरी शक्तींची स्थाने संपूर्ण जगभर आहेत. आशिया व आफ्रिकेत जास्त आहेत.

आसुरी शक्ती मध्येसुद्धा काही सौम्य प्रवृत्तींच्या आसुरी शक्ती असतात. यांना शिजवलेल्या मांसाचा नैवेद्य दाखविला जातो.

या सर्व आसुरी शक्ती, तसेच संपूर्ण पिशाच्च लोक महाकाल किंवा महाकाली यांच्या आधीन असतात व असंख्य भैरव व असंख्य वेताळ यांच्या हाताखाली काम करतात.

भारतातील अनेक तांत्रिक, कापालिक, अघोरी या असुर लोकातील राक्षसी आत्म्यांना तंत्राद्वारे वश करतात व त्यांच्याद्वारे संपूर्ण समाजावर आपला प्रभाव पाडतात. यांचा प्रभाव इतका जबरदस्त असतो की यांच्या विरोधात बोलण्याचे धाडस कोणीही करू शकत नाही. अफाट संपत्ती, अफाट प्रसिद्धी व अफाट सत्ता या सिद्ध तांत्रिकांकडे असते. कोट्यावधी भक्त असतात. परंतु मृत्यूनंतर यांचे काय होते हे समजावयास मार्ग नाही.

सत्ता, राजवैभव, अफाट प्रसिद्धी इत्यादी गोष्टी प्राप्त करण्यासाठी जेथे राक्षसी आत्म्यांची स्थाने आहेत, अशा जागी माणसे जातात. अनेक प्राण्यांचे बळी देऊन राक्षसी आत्म्यांना प्रसन्न करतात व आपल्या मनोकामना पूर्ण करून घेतात. अशी स्थाने भारतामध्ये सर्वत्र आहेत. नेपाळमध्येही भरपूर आहेत. बंगाल, आसाममध्ये जास्त आहेत. या स्थानांमध्ये हजारो कोंबड्या, बकऱ्यांचे बळी दररोज दिले जातात. दुर्दैव असे की देवीला किंवा देवाला आपण बळी दिला असे म्हणतात. परंतु कुठलीही देवी अथवा देव बळी मागत नाही, हे वाचकांनी लक्षात घ्यावे कारण **देव किंवा देवी म्हणजे दिव्य प्रकाश !**

## पिशाच्च लोक

पृथ्वीवरील अशिक्षित, मूढ, अज्ञानी, ज्यांना जेवणे व झोपणे या पलिकडे काहीही कळत नाही, देवाचे नांव ज्यांच्या मुखात येत नाही, स्वार्थी, अप्पलपोटी, आत एक व बाहेर एक असे असणारे, असुया व मत्सर करणारे, भुरट्या चोऱ्या करणारे असे सर्व लोक मृत्यूनंतर पिशाच्च लोकात जातात.

यातील बऱ्याच लोकांना आपण मेलो आहोत हेही समजत नाही. ते ज्या अवस्थेत मेलेले असतात, ते त्या अवस्थेचाच अनुभव घेत असतात. पुष्कळ वेळा शेकडो वर्षे निघून जातात, पण या लोकांना आपण मेलो हेही कळत नाही व पुनर्जन्मही कळत नाही. आत्म्याला गती, सद्गती, दुर्गती असते हेही कळत नाही. या लोकात भयंकर अंधार असतो. हजारो वर्षांपासून या लोकात असंख्य आत्मे खितपत पडलेले असतात. विविध स्तरावर विविध प्रकारचे आत्मे विविध प्रकारची दुःखे भोगत असतात.

येथेही शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, भूक, तहान व श्वास या गोष्टींचे अस्तित्व असते. यातील काही आत्मे अन्नाच्या वासानेच तृप्त होतात तर काही आत्म्यांना अन्नाचा वास मिळत नाही कारण त्यांनी अन्नदान केलेले नसते. इतरांना प्रेम दिलेले नसते. म्हणूनच पृथ्वीतलावर जीवन जगतांना होईल तितके दान करावे असे सांगितलेले आहे. येथे केलेले दान व परोपकार पिशाच्च लोकातही उपयोगी पडत असतात. या लोकातील एक दिवस हा पृथ्वीवरील एक वर्षाइतका मोठा असतो. पृथ्वीलोकातील बरीच माणसे या लोकात येत असतात. आत्महत्या केलेली सर्व माणसे या लोकात येत असतात व भयंकर यातना भोगत असतात.

आत्महत्या केलेल्या माणसांना इतक्या भयंकर यातना भोगाव्या

लागतात की त्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही. कारण आत्महत्या करणे महापाप आहे.

प्रत्येक मानवाला शिकण्यासाठी, आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी ईश्वराने पृथ्वीतलावर जन्म दिलेला असतो. मानवाला भोगावी लागणारी सुखदुःखेही त्याच्याच पूर्वजन्मातील कर्मानुसार भोगावी लागत असतात. पृथ्वी ही कर्माचा निचरा करण्याचे स्थान असून आध्यात्मिक प्रगती करण्याचे केन्द्र आहे. पृथ्वीतलावरील मानवाला परमेश्वराने खूप स्वातंत्र्य दिलेले आहे. या स्वातंत्र्याचा फायदा घेऊन मानवाने जास्तीत जास्त आध्यात्मात प्रगती करावी अशी ईश्वराची इच्छा असते. परंतु पृथ्वीतलावरील मानव या स्वातंत्र्याचा अनेक प्रकारे दुरूपयोग करतो व या दुरूपयोगामुळे मृत्यूनंतर त्याला पिशाच्च लोकात, राक्षस लोकात जावे लागते.

इतरांना त्रास देणे, गुंडगिरी करणे, दादागिरी करणे, लोकांवर जरब बसविणे, पैसा खाणे, खून करणे, इतरांना दुःख देणे, व्याजाने पैसा देणे, कंजूषपणा, ईर्षा, द्वेष, मत्सर करणे, अहंकार करणे या सर्व गोष्टी मानवी स्वातंत्र्याचा दुरूपयोग आहे. याशिवाय इतर अनेक अशा गोष्टी आहेत की, ज्यामुळे मानवी स्वातंत्र्याचा दुरूपयोग केल्याचे पातक लागते व शरीर मेल्यावर हजारो पटीने जिवंत होऊन मनुष्य आपल्या कर्माप्रमाणे असुर, राक्षस, भूत, प्रेत, पिशाच्च लोकात हजारो वर्षे यातना भोगत राहतो. तीस चाळीस वर्षात केलेल्या पातकांचे दुष्परिणाम हजारो वर्षे भोगावे लागतात, अशा असंख्य पातकांपैकी एक **आत्महत्या !**

अदृश्य सृष्टीमध्ये आत्महत्येला महापातक मानले जाते. आत्महत्येमुळे सुटका होत नसून आत्म्यावरची बंधने कितीतरी पटीने वाढतात. अनेक वर्षे यातना भोगाव्या लागतात. या यातना भोगतांना

जीवात्मा (spirit) असे म्हणतो की, आत्महत्या करण्याची दुर्बुद्धी माझ्या भयंकर शत्रूलाही कधी होऊ नये व अशा भयंकर यातना शत्रूलाही कधी भोगायला लागू नये. इतक्या भयंकर यातना आत्महत्या करणाऱ्या माणसाच्या आत्म्याला होत असतात. एखाद्या माणसाचे आयुष्य जर **ऐंशी वर्षांचे असेल, त्याने जर वयाच्या तिसाव्या वर्षी आत्महत्या केली तर, दुसऱ्याच क्षणाला तो हजारो पटीने जिवंत होऊन त्याला पन्नास वर्षांचा यातनामय नरकवास प्राप्त होतो. ही तात्काळ झालेली शिक्षा असते. बाकीचा न्यायनिवाडा पन्नास वर्षांनंतर होतो.**

आत्म्यावरती पूर्वजन्मातील अनेक कर्मांची आवरणे असतात. या आवरणांनुसार मृत्यूनंतर त्याने कोठे जायचे हे ठरत असते. दुष्कर्मांमुळे, वाईट कर्मांमुळे, वाईट विचारांमुळे आत्म्यावरची आवरणे वाढू लागतात आत्म्याला जडत्त्व येऊ लागते. आत्मा अपवित्र होतो व भूत, प्रेत, पिशाच्चादी लोकात खेचला जातो.

सत्कर्मांनी, परोपकाराने, शुभविचारांनी, ईश्वरभक्तीने आत्मा पवित्र होत असतो व परमानंदमय अशा दिव्य लोकात खेचला जातो म्हणून सतत सत्कर्मे करीत राहावे, निःस्वार्थ असावे, परोपकारी असावे, मानवतावादी असावे असे सांगितले जाते.

पृथ्वीवरील काही तंत्र साधक पिशाच्च लोकातील पिशाच्चांना वश करून चमत्कार दाखवितात परंतु मेल्यानंतर त्यांना या लोकात येऊन राहावे लागते व यातना भोगाव्या लागतात.

परमेश्वराने मानवाला वर जायचे की खाली जायचे, स्वर्गात जायचे की नरकात जायचे, चांगले वागायचे की वाईट वागायचे, हे ठरविण्याचा पूर्ण अधिकार दिलेला आहे व तुम्ही ‘‘**जसे कराल तसे भोगाल**’’ हाच ईश्वराचा आदेश आहे.

ईश्वराने एवढे स्वातंत्र्य दिलेले आहे, तरीही माणसाला कसे वागावे हे कळत नाही, म्हणून सद्ग्रंथ निर्माण केलेले आहेत. किर्तनकार, प्रवचनकार निर्माण केलेले आहेत. सर्वजण चांगल्या मार्गाने जा ! असे सांगत असूनसुद्धा सज्जनांना दान-धर्म करण्याऐवजी निराशेत जगणे आवडते. ईर्षा, द्वेष, मत्सर, असुया करणे त्यांना जमते व दुर्जनांच्याविषयी तर काही लिहिण्याची गरज नाही. यामुळेच सर्व पृथ्वी समस्यांनी भरून गेलेली आहे.

## भूत लोक

पृथ्वीवरील जीवन जगतांना इतरांना सतत उल्लू बनविणारे, सतत खोटे बोलणारे, खट्याळ प्रवृत्तीचे, इतरांवर हुकमत गाजविण्याची प्रवृत्ती असणारे, अस्थिर व अस्वस्थ मनाचे, खोटया कहाण्या रंगवून सांगण्याची प्रवृत्ती असणारे, खोटे धंदे करणारे लोक मृत्यूनंतर भूत लोकात जातात.

पृथ्वीवर प्लँचेटचे प्रयोग जे लोक करतात त्या प्लँचेटच्या प्रयोगात ही भूते प्रकट होतात व विविध नांवे सांगून, आत्म्यांशी संपर्क (contact) करणाऱ्या लोकांची फसवणूक करतात व कालांतराने प्रयोग करणाऱ्यांच्या मनबुद्धीवर तसेच प्रयोगकर्त्यांच्या घरादारांवर आपले आधिपत्य गाजवितात.

पृथ्वीतलावर अनेक लोकांच्या अंगात संचार होत असतो. याला अंगात येणे असेही म्हणतात. हे अंगात आलेले आत्मे अनेक देव-देवतांची व सत्पुरुषांची नांवे सांगतात. परंतु मानवाने एवढाच विचार करावा ज्याच्या अंगात देव-देवता येतात तो मनुष्य सामान्य, स्वार्थी व संकुचित वृत्तीचा राहिलच कसा ? खरी गोष्ट अशी आहे की भूत लोकातील भुतात्मे (spirits) अतिसामान्य भक्तिहीन माणसाच्या अंगात प्रवेश करतात व देव-देवतांची नांवे सांगून समाजाला

फसवितात. खोडकरपणा करणे, खट्याळपणा करणे हा भुतांचा स्वभाव असतो. इतरांना त्रास दिल्यावर भुतांना आसुरी आनंद मिळत असतो.

आशियामध्ये अनेक देव-देवतांचे दरबार आढळून येतात. या दरबारांमध्ये बहुत करून भुतात्म्यांचाच खेळ चाललेला असतो. इतकेच नव्हे तर भारतातील अनेक देवास्थानांमध्येही भूत व भैरव गणांचेच वास्तव्य असते.

भारतामध्ये अशी कितीतरी स्थाने आहेत जेथे गेल्यावर तुम्हाला एक भूत देण्यात येते. या भुताला घेऊन आल्यानंतर हजारो लोक तुमच्या पाठीमागे लागतात, तुम्हाला देवासारखा मान देतात, तुम्हाला पैसा व प्रसिद्धी मिळते. परंतु मृत्यूनंतर भूतलोकात हजारो वर्षे राहावे लागते.

भुतांना मर्यादित क्षेत्रांमध्ये फिरण्याचा अधिकार असतो. पृथ्वीतलावरील बरेचसे सुशिक्षित व श्रीमंत स्त्री-पुरुष मृत्यूनंतर भूत योनीत गेलेले आढळतात. भुतांना शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, श्वास, भूक, तहान या गोष्टी असतात. वासना असतात. वासाने भूते आपली तहान, भूक भागवितात. यांचा दिवसही पृथ्वीतलावरील एक वर्षाएवढा मोठा असतो. हिन्दू धर्मात यामुळेच वर्षातून एकदा श्राद्ध करण्याची पद्धत आहे. तसेच वर्षातून एकदा देवाला जाण्याची पद्धत आहे. या लोकातही अंधार असतो परंतु तो जास्त गडद नसतो.

पृथ्वीतलावरील काही लोकांकडे सिद्धी आढळतात. या सिद्धीच्या आधाराने हे साधक बरेच चमत्कार करून दाखवितात. हातातून विभूती, हळद, कुंकू, लॉकेटस् , देवाच्या मूर्ती इत्यादी वस्तू काढणे, भूतकाळ अचूक सांगणे, मनातील विचार ओळखणे असे अनेक चमत्कार भूत सिद्धीने करून दाखविता येतात. परंतु मृत्युसमयी

अशा लोकांचे खूप हाल होतात. वश केलेली भुते हाल हाल करून मारतात व मृत्यूनंतर हजारो वर्षे आपला गुलाम करून ठेवतात. खून करणे, हत्या करणे हे महापाप आहे. ज्याची हत्या केली जाते त्या मनुष्याचा आत्मा पिशाच्च लोकात किंवा भूत लोकात येऊन राहतो व ज्याने हत्या केली त्या माणसाच्या घराण्याचा सर्वनाश करतो. ज्याने हत्या केली तो व त्याच्या घराण्यातील सर्व लोक मृत्यूनंतर भूत, प्रेत, पिशाच्च, राक्षस यापैकी कुठल्यातरी लोकात जातात व शेकडो वर्षे यातना भोगतात.

ज्या लोकांचा आत्मा पैशात अडकलेला असतो, जे लोक पैशाच्या पाठीमागे लागलेले असतात, जे लोक पैशालाच देव मानून जगत असतात अशा लोकांना मृत्यूनंतर हजारो वर्षे भूत लोकात यातना भोगाव्या लागतात. सत्ता व प्रसिद्धी यांच्यामागे लागलेल्या लोकांनाही मृत्यूनंतर भूत लोकातच यातना भोगाव्या लागतात. या यातना मानसिक असतात कारण भूत लोकामध्ये त्यांना कोणीही विचारत नसते. पृथ्वीतलावर जी माणसे सर्वसामान्य माणसांवर प्रभाव गाजवितात (उदाहरणार्थ - युनियन लीडर, राजकारणी, नेते, पुढारी व लाखो भक्त असणारे साधू) अशा लोकांच्या यातनांना अंत नसतो. भयानक अशा क्लेशकारी यातना त्यांना भोगाव्या लागतात व हे सर्व हजारो वर्षे चालते.

### बालमृत्यू

पृथ्वीतलावर जे बालमृत्यू होतात त्या लहान मुलांचे आत्मे मृत्यूनंतर चौथ्या लोकात जातात. या चौथ्या लोकामध्ये त्यांना खूप प्रेम दिले जाते. त्यांना त्यांच्या आई-वडिलांची आठवण होऊ दिली जात नाही. किंबहुना सर्व नात्यांचा विसर पडतो. चौथ्या लोकातील अधिकारी आत्मे, अधिकारी स्त्रिया या मुलांची काळजी घेतात व

त्यांची आध्यात्मिक प्रगती करून घेतात. अर्थात सगळेच बाल आत्मे चौथ्या लोकात येतात असे नाही काही त्याहून वरच्या लोकात जातात. तर काही खालच्या लोकात जातात. परंतु सर्व बाल आत्म्यांची व्यवस्थित काळजी घेतली जाते व जास्तीत जास्त बाल आत्मे चौथा लोक किंवा त्याहून वरच्या लोकात जावेत म्हणून प्रयत्न केला जातो.

बाल आत्म्यांना प्रेम व शिक्षण दोन्ही दिले जाते व त्यांचे चांगल्या रितीने संगोपन केले जाते. पृथ्वीतलाच्या कालगणनेप्रमाणे या बाल आत्म्यांचे वय वाढत जाते व सूक्ष्मदेहही त्या पद्धतिनेच वाढतो.

उदाहरणार्थ-समजा दोन वर्षाच्या एका लहान मुलाचा मृत्यू झाला आहे, तद्नंतर सुमारे वीस वर्षांनी त्याची आई मृत्यू पावली व आई चौथ्या लोकात गेली तर तिचा मुलगा तिला बावीस वर्षांचा झालेला दिसेल. ही घटना फक्त बालमृत्यू झालेल्या आत्म्यांच्या बाबतीतच घडते. इतर गोष्टी कर्मानुसार घडतात.

## पितृ-लोक

या लोकाला पितृ-लोक म्हणतात. याचे कारण पृथ्वीतलावरील वृद्धावस्थेमध्ये मृत्यू पावलेले व ज्यांनी कुठलेही पाप केलेले नाही, थोडीशी देवाची भक्ती केली परंतु आध्यात्मिक उन्नत्ती केली नाही, ज्यांच्या जवळ मनाचा मोठेपणा नसतो, जे कुटुंबवत्सल असतात, आपल्या मुलाबाळांची चिंता करतात, कुटुंबाची सेवा करण्यात ज्यांचे आयुष्य व्यतित झालेले असते अशी माणसे मृत्यूनंतर पितृ-लोकात येतात. या पितृ-लोकाला संस्कृतमध्ये जन-लोक म्हटले जाते. एखाद्या पुरुषाला पुढील जन्म स्त्रिचा द्यावयाचा असेल किंवा एखाद्या स्त्रिला पुढील जन्म पुरुषाचा द्यावयाचा असेल तर सूक्ष्म शरीरामध्ये आवश्यक ते बदल या पितृ-लोकातच केले जातात.

आपले बरेचसे पूर्वज (ज्यांनी पाप केलेले नसते) या लोकात येऊन राहतात म्हणून याला पितृ-लोक (Ancestors Sphere) असे म्हणतात.

पृथ्वीतलावरील जे लोक सत्संग व सद्ग्रंथांचे वाचन करूनसुद्धा भ्रमात राहतात, आपले तेच खरे करतात, परंतु प्रामाणिक व सज्जन असतात असे लोक मृत्यूनंतर या लोकात येतात. यामुळे पृथ्वीतलावरील बरेच सज्जन व कुटुंबवत्सल माणसे या लोकात येतात. येथील आत्म्यांना शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या गोष्टी असतात. श्वासोच्छ्वास फारसा करावा लागत नाही. पृथ्वीतलावरील माणसे यांच्या नांवाने केळीच्या पानावर किंवा धातुच्या प्लेटमध्ये जे अन्न बाजूला ठेवतात किंवा देवाजवळ ठेवतात किंवा घराबाहेर ठेवतात ते यांना पोहोचते व या अन्नाच्या वासाने पितृगण तृप्त होतात.

''**माझ्या मते असे अन्न घराबाहेर ठेवावे किंवा गच्चीत ठेवावे. पितरांच्या नांवाने काढलेले अन्न घरात ठेवू नये !**''

या लोकातील वातावरण पृथ्वीसारखेच असते, फक्त चंद्र, सूर्य एकदम दिसतात. शरीर नाही त्यामुळे दमणे अथवा घाम येणे असा प्रकार नसतो. वातावरणात उष्णताही नसते व थंडीही नसते. चंद्र पौर्णिमेच्या चंद्रासारखा दिसतो. येथील वातावरण फारसे कष्टाचे नसते. रूढी व परंपरा यांचे संस्कार मनावर असतात. त्यामुळे प्रत्येकजण आपआपल्या धर्माप्रमाणे प्रार्थना करतो. पृथ्वीतलावरील पैसा, प्रतिष्ठा व शिक्षण याला काहीच अर्थ नाही हे येथे आल्यावर कळते. परंतु धर्माचा पगडा जो मनावर असतो तो या लोकात आल्यावरही जात नाही. येथील आत्मे अतिशय वेगाने हवेतून प्रवास करतात. त्यांना चालावे लागत नाही. या लोकामध्ये जे गुरु असतात त्या गुरुंच्या

आज्ञेशिवाय त्यांना काहीही करता येत नाही किंवा कोठेही जाता येत नाही. आपआपल्या धर्माप्रमाणे येथील लोक प्रार्थना, ध्यान-धारणा करीत असतात. या लोकाला चौथा लोक असे म्हटले जाते. सूक्ष्मशरीरे या लोकात तयार होतात. एखाद्या पुरुष व्यक्तीला स्त्री म्हणून जन्म द्यावयाचा असल्यास किंवा एखाद्या स्त्रिला पुरुष म्हणून जन्म द्यावयाचा असल्यास सूक्ष्मदेहात आवश्यक ते फेरबदल या लोकात केले जातात. जन्मतः व्यंग असणाऱ्या मुलांचे सूक्ष्मशरीरही चौथ्या लोकातच तयार होते.

## सारांश

पृथ्वीतलावर कशाप्रकारचे जीवन जगले असता मृत्यूनंतर कशी अवस्था होते हे मानवाला नीट समजावून सांगावे म्हणून मृत्युपूर्वी व मृत्यूनंतर हे प्रकरण लिहिले. हे प्रकरण लिहितांना थोडासा तेच तेच पुन्हा लिहिण्याचा दोष पत्करावा लागला आहे. परंतु याला माझा नाईलाज आहे. जग वेगाने अधोगतीकडे जात आहे. मानवाची वैचारिक पातळी खालावत आहे. मनुष्य स्वार्थाने अंध झालेला आहे. सत्तेसाठी हपापलेला आहे. या सर्व गोष्टींचे किती भयानक दुष्परिणाम होतात याची त्याला जाणीव नाही. याची जाणीव करून देण्यासाठी तेच तेच लिहिण्याचा दोष पत्करून हे प्रकरण लिहिले आहे.

जे सद्गुणांनी संपन्न होतात असे लोक उच्च अशा स्वर्गलोकात जातात जेथे फक्त आनंद व अप्रतिम सौन्दर्य यांची रेलचेल असते.

नरकात जायचे रस्ते दोन आहेत व स्वर्गात जायचे रस्ते सात आहेत.

मृत्यूच्या वेळी प्राण गुदद्वारातून अथवा मूत्रद्वारातून बाहेर पडल्यास जीवात्मा (spirit) आपल्या कर्माप्रमाणे भूत, प्रेत, पिशाच्च,

राक्षस लोकात जातो. मूत्रद्वार व मलद्वार हे दोन नरकात जावयाचे किंवा अधोगतीचे मार्ग आहेत.

मुख (तोंड), उजवी नाकपुडी, डावी नाकपुडी, उजवा डोळा, डावा डोळा, उजवा कान, डावा कान ही सात स्वर्गद्वारे आहेत. या मार्गाने प्राण गेला असता आत्मा स्वर्गात जातो.

पुण्यवान व्यक्ती वयाच्या ८०-९० व्या वर्षी जरी मृत्यू पावली तरी त्या व्यक्तीच्या शरीरातून १६ ते २५ वर्षे वयाचा एक तरुण युवक अथवा युवती बाहेर पडते व स्वर्ग लोकात प्रवेश करते.

पापी व्यक्ती मेल्यानंतर त्याच्या कर्मानुसार विविध प्रकारचे देह त्याला प्राप्त होतात. हे देह चित्र-विचित्र, भयंकर आकाराचे असतात व यातना लोकात त्याची रवानगी केली जाते. **माणसाने वर जायचे की खाली जायचे हे ज्याचे त्याने ठरवावयाचे असते**. पृथ्वी हा मध्य बिन्दू आहे. जीवात्मा येथून वर जातो किंवा खाली जातो. कर्मानुसार प्रत्येक जीवात्म्याला विविध प्रकारचे सूक्ष्मदेह प्राप्त होतात. सत्कर्मांनी दिव्य, प्रकाशमय, पारदर्शक, तेजोमय असे देह प्राप्त होतात तर वाईट कर्मांनी शिळांसारखे, वृक्षांसारखे कठीण देह किंवा प्राण्यांसारखे देह प्राप्त होतात. म्हणून सतत चांगले कर्म करत राहावे असे साधू संतांनी सांगितले आहे. आपण आपल्या सत्कर्मानुसार आत्मा, महात्मा, देवतात्मा, परमात्मा बनू शकतो तर आपण आपल्या वाईट कर्मानुसार दुष्ट मनुष्य, भूत, पिशाच्च, राक्षस, सैतान इत्यादी बनून हजारो वर्षे यातना भोगू शकतो. आपण काय बनायचे हे आपल्या हातात आहे व हाच या प्रकरणाचा **सारांश** आहे.

माणसाच्या स्थूलदेहाला काहीही अर्थ नसतो. हे सर्वांना माहीत आहे. परंतु स्थूलदेहाच्या आधाराने मनुष्य जी काही वाईट कर्मे

करतो त्या वाईट कर्मांमुळे सूक्ष्मदेहामध्ये पुढील प्रमाणे स्थित्यंतरे होतात.

आतंकवाद, दहशत फैलावणे, प्रजेला छळणे, पैसा खाणे, गुंडगिरी करणे, प्रजेला लुटणे अशाप्रकारची दुष्ट कर्मे करणाऱ्या लोकांच्या सूक्ष्मशरीरावर वेगवेगळ्या प्रकारची आवरणे पडू लागतात. सूक्ष्मशरीर अतिशय जड होऊ लागते. मृत्यूच्या काही क्षण अगोदर त्यांना त्यांच्या कर्मानुसार भयंकर प्राणी, पशुंचे सूक्ष्मदेह प्राप्त होतात. कर्मे फारशी वाईट नसतील तर काकयोनीत जन्म मिळतो. पण कर्मे भयंकर असतील तर लाखो वर्षे यातना भोगाव्या लागतात व नंतर प्राणी देह प्राप्त होतात.

मानव जन्म हा पूर्वजन्मातील कर्मे शुद्ध करण्यासाठी परमेश्वराने दिलेला असतो. ईश्वरभक्ती, दान, परोपकार इत्यादी सत्कर्मे करून मानवाने आपले सूक्ष्मशरीर शुद्ध करावे अशी ईश्वराची अपेक्षा असते.

**कंदीलाच्या काचेवर ज्याप्रमाणे काजळी धरते त्याप्रमाणे पूर्वजन्मातील वाईट कर्मांमुळे सूक्ष्मदेहावर गडद काळ्या रंगाची काजळी धरते. सूक्ष्मदेह काळा होतो. असा मनुष्य चांगले विचारही करू शकत नाही. तो वाईट मार्गाने भरकटत जातो. मानवजन्म ही ईश्वराने दिलेली सुवर्णसंधी असते. सूक्ष्मशरीर शुद्ध करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध करून दिल्या जातात. इतके करूनही माणसाने प्रगती न केल्यास भयंकर शिक्षा भोगाव्या लागतात. अति वाईट कर्मे करणाऱ्या दुष्ट लोकांना अठ्ठेचाळीस लाख वर्षे अनेक योनीत यातना भोगाव्या लागतात. परमेश्वराची ही सर्वात मोठी शिक्षा आहे. क्रूर राज्यकर्त्यांना ही शिक्षा भोगावी लागते. इतर वाईट कर्मे करणाऱ्या माणसांना त्यांच्या त्यांच्या दुष्कर्मानुसार कमी अधिक शिक्षा होत असतात.**

एकदा एका घरात गेलो होतो. त्या घरामध्ये कोणीही रहात

नसे. तेथे एक भयंकर पिशाच्च आहे, असे लोकांनी मला सांगितले म्हणून मुद्दाम त्या घरात मी रहावयास गेलो. संध्याकाळच्या सुमारास तेथे एक भूत प्रकट झाले. हे भूत ब्राह्मणाचे होते. डोक्याला मोठी शेंडी होती. अनेक प्रकारचे मंत्र ते म्हणत होते. बहुतेक ते वेदमंत्र होते. मी त्या ब्राह्मणास त्याची अशी अवस्था होण्याचे कारण विचारले, तो म्हणाला–

''दोनशे पंचाहत्तर वर्षांपूर्वी या घरात मी राहत होतो. खूप श्रीमंत होतो, पंडीत होतो, घनपाठी होतो, त्यामुळे मला असे वाटत होते की, मृत्यूनंतर मी स्वर्गलोकात जाणार, परंतु मला हे कळत नाही की, मी अद्याप माझ्याच घरात कसा राहत आहे. या घराचा उंबरठा ओलांडून मला बाहेर जाता येत नाही. फक्त घरातील खोल्यांमध्ये मी फिरतो. विरंगुळा म्हणून मला तोंडपाठ असलेले सर्व मंत्र म्हणत राहतो. माझी सुटका केव्हा होईल हे मला कळत नाही. या घरात कोणी प्रवेश केला की मला खूप त्रास होतो. म्हणून या घरात येणाऱ्या माणसाला मी त्रास देऊन पळवून लावतो. तुमच्या येण्याने मला शांती प्राप्त झाली, मनाला आनंद वाटला म्हणून मी तुमच्या समोर प्रकट झालो असे म्हणून तो म्हातारा अदृश्य झाला.''

या वृद्धाला पिशाच्च योनी का प्राप्त झाली, याचा जेव्हा मी शोध घेतला तेव्हा मला पुढीलप्रमाणे उत्तर सापडले –

''हा गृहस्थ अतिशय कंजूष होता. आपल्या विद्वत्तेचा त्याला गर्व होता. त्याला कोणी नातेवाईक नव्हते. एकटाच राहत होता. ''माझ्या मृत्यूनंतर माझ्या घराचे काय होईल'' असे विचार त्याच्या मनात सतत येत असत. 'अंते मति सः गतिः' या न्यायाप्रमाणे मरतेवेळी त्याच्या मनात घराचे विचार राहिल्याकारणाने तो भुतात्मा बनून त्याच घरात पावणे तीनशे वर्षे राहिला व अजूनही तेथेच असेल.''

एक लेखक होते. त्यांचे पुस्तक खूपच गाजले. लेखक अत्यंत सज्जन व आध्यात्मिक होते. मृत्युपूर्वी त्यांनी आणखी एक पुस्तक लिहिले. या पुस्तकाविषयी त्यानी कोणाला काहीही सांगितले नाही. एक दिवस ते मृत्यू पावले. सज्जन व आध्यात्मिक असल्याकारणाने त्यांना स्वर्गलोकात प्रवेश मिळावयास हवा होता. परंतु आपण जे पुस्तक लिहिले ते प्रसिद्ध केले नाही याची चिंता त्यांना मृत्युसमयी लागून राहिली, त्यामुळे मृत्यूनंतर स्वर्गात न जाता ते मध्येच अडकून पडले. ते ज्ञानी असल्यामुळे त्यांना कळून चुकले की पुस्तक प्रकाशित झाल्याशिवाय आपल्याला स्वर्गलोकात प्रवेश मिळणार नाही. सुमारे तीस वर्षे ते पितृलोकात भटकत होते. तीस वर्षांनंतर एका माध्यमाद्वारे त्यांना पृथ्वीतलावर पुस्तक प्रकाशित करा ! असा संदेश पाठविता आला. त्यांच्या नातेवाईक व मित्रांना या पुस्तकाविषयी काहीही माहिती नव्हती, ती सर्व माहिती त्यांनी माध्यमाद्वारे दिली. पुस्तक प्रकाशित झाले व या सज्जन आत्म्याला स्वर्गलोक प्राप्त झाला.

ईश्वराचा न्याय किती कठोर असतो हे समजावे म्हणून ही गोष्ट लिहिली आहे. या गोष्टीवरून विचार करा, जे दुसऱ्यांचा द्वेष, मत्सर करतात, खोटे बोलून सत्पुरुषांनासुद्धा बनवितात, लांड्या-लबाड्या करतात व दुष्ट कर्मे करतात त्यांचे काय होत असेल ?

ईश्वरभक्ती, दान व परोपकार करून सज्जनतेने वागून आध्यात्मात प्रगती केली असता सूक्ष्मदेह पारदर्शक होतो, पवित्र होतो व जेवढी आध्यात्मात प्रगती केली असेल त्याप्रमाणे स्वर्गलोकात स्थान प्राप्त करतो. पाच, सहा, सात या लोकांना स्वर्गलोक म्हटले जाते. परंतु त्याहीपलिकडे अनेक लोक असून त्या लोकांमध्ये निर्वाण पदवी प्राप्त केलेले आत्मे राहतात. हे सर्व लोक अत्यंत सुन्दर असून त्यांचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात. प्रत्येक मानवाने

स्वर्गलोकात जावयाची कामना करून कर्मे केली पाहिजेत.

## स्वर्ग–लोक

पाच, सहा, सात या तीनही लोकांना स्वर्गलोक म्हटले जाते. हे तीनही लोक एकाहून एक सुन्दर आहेत. पृथ्वीतलावरील जे लोक मानवता याच गोष्टीला धर्म मानतात, असेच लोक स्वर्गलोकात प्रवेश करतात. पृथ्वीतलावरील हिन्दू, ख्रिश्चन, मुस्लीम, बौद्ध, शीख, ज्यू इत्यादी धर्मांना काहीही अर्थ नाही. प्रेम, परोपकार, मानवता, इतरांना क्षमा करणे, करुणा, दया, इतरांना मदत करण्याची प्रवृत्ती अशा सद्‌गुणांनाच ईश्वर प्राधान्य देतो हे या स्वर्गलोकात आल्यावर कळते.

रूढी, परंपरा व ज्या धर्मात आपण जन्माला आलो, त्या धर्मातील चुकीचे नीतिनियम या सर्व गोष्टी झुगारून देऊन जो उदार मनाने वागतो, प्रेमाने वागतो, निःस्वार्थ बुद्धीने वागतो, इतरांना मदत करतो असा आत्मा अत्यंत सुंदर अशा देवलोकात म्हणजे स्वर्गलोकात येऊन राहतो.

येथे आल्यावर स्त्री–पुरुष हे भेद मावळलेले असतात, आत्मे ज्योतिर्मय असतात, शांत व प्रसन्न असतात, सर्वजण एकाच निर्गुण निराकार परमेश्वराची उपासना करतात, ध्यान करतात. या लोकातील आत्मे फक्त ईश्वरी कार्यासाठीच पृथ्वीतलावर अवतार धारण करतात. खूप मोठे ईश्वरीकार्य करून पुन्हा ब्रह्मलोकात परत जातात. पृथ्वीतलावर निर्वाण स्टेज प्राप्त केलेले योगी या ब्रह्मलोकात येऊन राहतात. याला creator's plane असेही म्हणतात. सृजन करण्याचे सामर्थ्य येथे प्राप्त होते. विश्वाच्या उत्पत्तीची रहस्ये येथे योग्याला ज्ञात होतात, प्रकाश–मार्गातील व अंधारमार्गातील अनेक रहस्ये येथे ज्ञात होतात. येथील योगी, योगिनी परमानंदात डुंबत असतात व सदैव ध्यानमग्न असतात. कित्येक योगी तर हजार हजार वर्षे समाधीतून खाली उतरतच नाहीत. शब्द, रस, रूप, स्पर्श, गंध यांचे अस्तित्व येथे

नसते. येथील योग्यांना कुठलेही रूप धारण करता येते. ते कामरूप असतात. कुठलेही रूप धारण करून कधी कधी या लोकातील योगी पृथ्वीलासुद्धा भेट देतात. सर्व देव-देवतांच्या पलिकडील ही अवस्था असून पृथ्वीतलावरील अत्यंत सात्त्विकतेचे आचरण करणाऱ्यालाच निर्वाण पदवी प्राप्त होते. असा आत्मा मृत्यूनंतर या लोकात येऊन राहतो.

पृथ्वीतलावर महात्मा म्हणून जे प्रसिद्ध साधू व प्रवचनकार असतात ज्यांच्या प्रवचनाला अथवा दर्शनाला लाखो लोक गोळा होत असतात, अशा माणसांना मृत्यूनंतर स्वर्गलोकाचे द्वार उघडले जात नाही, निर्वाण पदवी अशा लोकांसाठी खूप दूरची गोष्ट असते. खऱ्या सत्पुरुषाचा कीर्तिसुगंध हा त्याच्या महासमाधीनंतरच हळूहळू पसरतो. उदाहरणार्थ - अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ, शिर्डीचे श्रीसाईबाबा व शेगावचे श्रीगजानन महाराज !

हिऱ्याच्या बाजारात गर्दी नसते, त्याप्रमाणे विहंगममार्गी, प्रकाशमार्गी खऱ्या सिद्धपुरुषाजवळ गर्दी नसते. आध्यात्मिक प्रगतीची खरी तळमळ असेल, पूर्वजन्मातील सत्कर्मे साथ देत असतील, वातावरणातील देवतांची कृपा असेल तरच एखादा प्रकाशमार्गी, विहंगममार्गी सिद्धपुरुष भेटतो. तो अनेक मार्गांनी परीक्षा पाहतो. या सर्व परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाल्यास तो तुमचा स्वीकार करतो व परमेश्वराचा साक्षात्कार घडवून देतो, परंतु असे सिद्धपुरुष भेटणे कठीण असते, भेटल्यास त्यांच्या वागण्याचे रहस्य कळणे कठीण असते. त्यांच्यावर श्रद्धा बसणे कठीण असते अशा सर्व कठीण परिस्थितींना तोंड देत जो साधना करतो, तो सप्तस्वर्गापलिकडील दिव्य अशी सिद्धावस्था प्राप्त करतो.

# २१. मुक्ती

मुक्ती प्राप्त करणे, हा प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. किंबहुना मुक्ती प्राप्त करण्यासाठीच मानवरूपामध्ये विविध लोकातून आत्मे जन्म घेतात. येथे जन्माला आल्यानंतर ''आपण कशाकरिता जन्माला आलो ?'' याचा मानवाला विसर पडतो आणि जन्ममरणरूपी चक्रामध्ये तो पुन्हा अडकतो. इतकेच नव्हे तर वाईट कर्मे करून तो अधोगतीलाही जातो. थोडीफार श्रद्धा असलेला मनुष्य एखाद्या प्रसिद्ध साधूच्या भक्तांच्या कळपात दाखल होतो. आपल्या आत्म्याचे कल्याण होईल असे त्याला वाटते. परंतु त्या साधूला मात्र मुक्तीपेक्षा पैसा व प्रसिद्धी अधिक महत्त्वाची वाटत असते. श्रद्धाळू भक्त साधूच्या मागे व साधू पैसेवाल्यांच्यामागे असे दृश्य दिसून येते. ईश्वराची कृपा व्हावी म्हणून श्रद्धाळू भक्त साधूच्या मागे लागतो. पैसा व प्रसिद्धी प्राप्त व्हावी म्हणून बरेचसे साधू चेटूक विद्येचा अवलंब करतात. भारतात अशी असंख्य स्थाने आहेत जेथे जाऊन पिशाच्च आणले असता पैसा व प्रसिद्धी प्राप्त होते. असे साधू व त्यांचे भक्त यापैकी कोणालाही मुक्तीचा मार्ग प्राप्त होत नाही.

जन्म-मरणरूपी चक्रामध्ये असे आत्मे अनंतकालपर्यंत फिरत राहतात. समाजाला चुकीची दिशा दाखविणाऱ्या साधूंना तर लाखो वर्षे

दुसऱ्या तिसऱ्या लोकात काढावी लागतात. मुक्तीचा मार्ग त्यांच्या नशिबातून जवळजवळ कायमचा पुसला जातो. कारण त्यांनी स्वतःबरोबर असंख्य माणसांच्या आत्म्यांचे नुकसान केलेले असते. वातावरणातील भयानक शक्ती अशा साधूंना असह्य यातना देत असतात.

सात्त्विक माणसांचेही चुकीच्या संगतीने कसे नुकसान होते याचे एक उदाहरण पुढे देत आहे.

रमेश नांवाचा माझा एक मित्र होता. तो अत्यंत सात्त्विक असल्याकारणाने त्याला मी काही मंत्रजप व उपासना सांगितली होती. ती तो नित्यनियमाने करीत असे. पण ही उपासना सांगतांना कुठल्याही प्रकारचे आडंबर मी केलेले नव्हते. उपासनेचे त्याला अनेक दिव्य अनुभव आले, दोन वेळा हार्टअटॅक येऊनही तो वाचला, दोन वेळा ॲक्सीडेंट मधून तो वाचला. देवी-देवतांची ध्यानामध्ये दर्शनेही होऊ लागली. एकदा तर त्याला स्वप्नामध्ये देवीने सांगितले, ''तुझे गुरु तुझे दाही दिशांनी संरक्षण करीत आहेत व तुझी आध्यात्मात प्रगती करून घेत आहेत, अशीच साधना करत रहा, तुला मुक्तीचा मार्ग मिळेल !''

रमेश सरळ साधा सात्त्विक होता. साधू-संतांच्या व देवांच्या गोष्टीत तो रमून जात असे. एक दिवस त्याला एक स्त्री भेटली. या स्त्रिने त्याला सांगितले, मी तुला एक वस्तू व एक मंत्र देते. वस्तू तू जवळ ठेव व मंत्राचा जप करत रहा ! काही दिवसानंतर हजारो लोक तुझे भक्त बनतील, तुला मान देऊ लागतील, तुला लाखो रूपये मिळतील. या शिवाय ग्रह नक्षत्र ताऱ्यांवरून तू फिरू शकशील. रमेशला खूप खूप आनंद झाला. ईश्वराची फार मोठी कृपा आपल्यावर

झाली असे त्याला वाटले.

त्या स्त्रिने त्याला नंतर आपल्या समोर बसविले. त्याच्या डोक्यावर हात ठेवून दोन-चार भुते त्याच्या डोक्यात घुसविली व एक यंत्र त्याला जवळ ठेवण्यास दिले.

त्या दिवसापासून ईश्वराचे नांव रमेशच्या मुखात येईनासे झाले. त्याला आपल्या आजूबाजूला अनेक भूत-पिशाच्चे दिसू लागली. आपण आता लवकरच मरणार असे त्याला वाटू लागले.

मी एकान्तवासात साधना करत होतो. एका माणसाबरोबर मी रमेशला निरोप पाठविला व ताबडतोब निघून ये, म्हणून सांगितले. त्याप्रमाणे रमेश माझ्याकडे यावयास निघाला. घरातून बाहेर पडताच अचानक ज्या स्त्रिने रमेशला मंत्र दिला होता त्या स्त्रिच्या रूपात दुष्ट शक्ती प्रकट झाली व रमेशला विविध प्रकारची प्रलोभने दाखवू लागली. तुला रोजचे हजारो रूपये मिळतील, हजारो लोक तुझ्या दर्शनाला येतील, 'तू तुझा आत्मा आम्हाला विकून टाक !' 'सैतानाला, आत्मा विकला असे म्हण ! म्हणजे तुला सर्व ऐश्वर्य भोगायला मिळेल' असे स्त्री रूपातील ती दुष्ट शक्ती सांगू लागली.

या क्षणापर्यंत रमेश त्या स्त्रिला मनुष्य स्त्री असेच समजत होता. परंतु त्याने निश्चय केला होता की, तिच्या कुठल्याही प्रश्नाला उत्तर द्यायचे नाही संपूर्ण दुर्लक्ष करायचे, त्याप्रमाणे त्याने तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. शेवटी ती म्हणाली,

'' मी तुला शेवटचे विचारते, माझा स्वीकार करतोस, की नाही ते सांग ? ''

रमेशने काहीही उत्तर दिले नाही.

अचानक रमेशच्या उघड्या डोळ्यासमोर ती स्त्री अदृश्य

झाली. ही घटना भर दिवसा सकाळी अकरा वाजता घडलेली आहे.

आजही अशा घटना घडतात, हे पाहून आश्चर्य वाटते.

ट्रेनमध्ये बसून रमेश माझ्याकडे निघून आला. चुकीच्या साधना केल्याने त्याच्या सूक्ष्मदेहात जे काही दोष निर्माण झाले होते ते काढण्यासाठी मी त्याला मार्गदर्शन केले, मदत केली व तो पुन्हा मुक्ती मार्गावर अग्रेसर झाला.

मानवाचा जन्म मुक्ती प्राप्त करण्यासाठी झालेला असतो, तो श्रीमंत असो अथवा गरीब मुक्ती प्राप्त करण्यासाठी जर त्याने योग्य प्रयत्न केले तर तो निःसंशय मुक्ती प्राप्त करू शकतो. मी जी काही पुस्तके लिहिली आहेत त्या सर्व पुस्तकांमध्ये मानवाचा उद्धार कसा होईल, त्याला मुक्ती प्राप्त कशी होईल याचे मार्गदर्शन केले आहे. तरीसुद्धा पुन्हा पुन्हा तेच तेच लिहिण्याचा म्हणजे पुनरूक्तीचा दोष पत्करून मी या अध्यायामध्ये मुक्तीच्या मार्गाचे विवरण पुन्हा एकदा करीत आहे. या नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यास वाचक मुक्तीच्या दिशेने अग्रेसर होतील हे निश्चित समजावे. त्याचबरोबर किरकोळ दोष मुक्ती मार्गात कसे विघ्न निर्माण करतात, याचेही मार्गदर्शन करीत आहे.

पुढे ज्या गोष्टी लिहीत आहे त्यांचे आचरण करण्याचा प्रयत्न केल्यास ईश्वराच्या दिशेने, मुक्तीच्या दिशेने, जीवनमुक्तीच्या दिशेने निश्चित प्रगती होईल व आध्यात्मात प्रगती होईल.

१) पापमार्गाने पैसे मिळवू नये. वाईट मार्गाने मिळविलेला पैसा मृत्यूनंतर भयंकर अशा अंधःकारमय लोकात घेऊन जातो व हजारो वर्षे यातना भोगावयास लावतो. अशा माणसांना मनुष्य जन्म हजारो वर्षे मिळत नाही.

२) कंजूषपणा करू नये, पैशाचा हव्यास धरू नये व व्याजाने पैसे देऊ नये.

३) माणसाचे जास्तीत जास्त आयुष्य ऐंशी ते पंच्याऐंशी वर्षे. यातील पन्नास वर्षे नोकरी-उद्योग करण्याची. या काळात जर पाप गोळा केले तर त्याची शिक्षा कमीत कमी पाच हजार वर्षे व जास्तीत जास्त अठ्ठेचाळीस हजार वर्षे याची जाणीव ठेवावी. याची जाणीव मानवाला झाल्यास तो आतंकवादासारखी भयानक कृत्ये करणार नाही.

स्वर्गलोकात धर्म नाही. सद्‌गुणी माणसाला स्वर्ग-लोकात प्रवेश प्राप्त होतो. म्हणून सद्‌गुण, ईश्वरभक्ती, प्रेम, परोपकार, मानवता या गोष्टींचे आचरण करावे.

४) काही लोक आध्यात्माच्या फक्त गप्पा करतात व आपण आध्यात्मिक आहोत हे दाखविण्यासाठी इतरांना प्रश्न विचारत रहातात. अशा वृत्तीच्या माणसांची आध्यात्मात प्रगती होत नाही कारण हे स्वतःलाच फसवत असतात.

५) काही माणसांना इतरांना फसविण्यात खूप आनंद वाटतो. ही **आत्मवंचना** आहे. आध्यात्मात प्रगती होण्यामध्ये इतरांना फसविणे, थापा मारणे या गोष्टी अनेक अडथळे निर्माण करतात. या गोष्टी टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा.

६) जे लोक स्वतःला शहाणे समजतात त्यांची आध्यात्मात प्रगती होत नाही.

७) नम्रता आणि सेवा हाच ज्ञानप्राप्तीचा मार्ग आहे.

८) गर्व, ताठा, अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सर, इतरांवर अन्याय करणे या

सर्व गोष्टी म्हणजे मुक्तीच्या मार्गातील अडथळ्यांचे पर्वत होय. या गोष्टी जर आपण घालवू शकलो नाही तर समस्या व संकटांना तोंड द्यावे लागते.

९) हे नेहमी लक्षात ठेवावे की, एक ना एक दिवस सारे वैभव येथेच सोडून आपण मरणार आहोत. तेव्हा पृथ्वीतलावरील गोष्टींचा जास्त हव्यास न धरणे हे चांगले. आपण जी काही कर्मे करू ती आपल्याबरोबर येणार आहेत व त्याची फळे आपल्यालाच भोगावी लागणार आहेत म्हणून जास्तीत जास्त चांगली कर्मे करण्याचा प्रयत्न करावा.

१०) आपल्यातील वाईट प्रवृत्तींचा शोध घ्यावा. स्वतःच्या इच्छेप्रमाणे दुसऱ्यांना वागावयास भाग पाडणे, टवाळी व खट्याळपणा करणे, या गोष्टी पण माणसाला भूतयोनीत घेऊन जातात याची जाणीव ठेवावी.

११) प्रारब्धानुसार तुमचा धंदा-उद्योग कुठलाही असू दे ! जो काही धंदा-उद्योग असेल तो प्रामाणिकपणे करून ईश्वराची सेवा करत राहिल्याने ईश्वराची कृपा होते व मार्ग सापडतो. धंदा करतांना कोणालाही फसवू नये व नोकरी करत असल्यास लाच खाऊ नये. नोकरी करणाऱ्यांनी प्रजेशी आपुलकीने वागावे. आजच्या काळात या गोष्टी आचरणास जरी कठीण वाटत असल्या तरी मृत्यूनंतर आपल्याला सुखी व्हायचे आहे याची जाणीव ठेवल्यास असे वागणे कठीण नाही. आजही हजारो सरकारी नोकर लाच न खाता प्रामाणिकपणे नोकरी करत आहेत व समाधानी आहेत.

१२) आपल्या उत्पन्नातील २०% रक्कम दानधर्मात खर्च करावी. असे केल्याने प्रारब्ध शुद्ध होते व लक्ष्मीची कृपा होते.

माझी पुस्तके वाचून अनेकांनी दान-धर्म करण्यास सुरुवात केली व त्यांना खूपच चांगले अनुभव आले. नागपूरमधील एका गृहस्थाने माझी पुस्तके वाचून २०% रक्कम बाजूला काढण्यास सुरुवात केली. काही काळ असे केल्यानंतर देवाच्या नांवाने साठलेल्या त्या पैशातून ब्लँकेटस् विकत घेतली व गरिबांना वाटली. हळूहळू त्याची परिस्थिती पालटली व तो सुखी झाला. दानाने लक्ष्मीची वाढ होते परंतु माणसांचे असे होते की, भरपूर पैसा जेव्हा हातात असतो तेव्हा ते दान करत नाहीत व पुण्याई संपून जेव्हा दारिद्र्य येते, तेव्हा ईश्वराच्या नांवाचा जप सुरू करतात व ईश्वराने आपल्याला ताबडतोब कोट्यावधी रूपये द्यावे अशी अपेक्षा करतात. अर्थात, असे घडत नाही व मग ते ईश्वराला नांवे ठेवण्याला सुरुवात करतात, असे वागल्याने माणसाची अवनती होते दुसरे काही नाही.

१३) आपल्या आवडत्या देवाच्या नांवाचा दररोज कमीतकमी पाच हजार जप करावा. हा जप येता-जाता, उठता-बसता कसाही केला तरी चालतो.

१४) दररोज सकाळी, संध्याकाळी व झोपण्यापूर्वी तीन वेळा ध्यान करावे. ध्यान करतांना आपले लक्ष श्वासावर केन्द्रीत करावे. हळूहळू ही साधना वाढवावी. सुरुवातीला दहा मिनिटे करावी व २-३ महिन्यात दोन तासांपर्यंत प्रॅक्टीस वाढवावी. या साधनेने मुक्तीच्या दिशेने आपण अतिशय वेगाने पुढे जातो. दानाने पूर्वकर्म शुद्ध होतात तर ध्यानाने आध्यात्मात प्रगती होते, मुक्तीचा मार्ग प्रशस्त होतो.

१५) आध्यात्मात जसजशी प्रगती होत जाईल तसतसा कोणीतरी पुढे

मार्ग सांगणारा भेटतो. म्हणून अभ्यास करत रहावे. मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करावा. मन एकाग्र झाले की आपल्याच देहात परमात्मा प्रगट होतो. जोपर्यंत मन चंचल आहे तोपर्यंत विश्वपसारा आहे. मन शांत, शुद्ध, एकाग्र झाले की या विश्वामध्ये दडलेला ईश्वर दिसू लागतो व आपण ईश्वरात विलीन होतो.

**समाप्त**

# प्रकाशकाचे परिशिष्ट

श्रीस्वामी दत्तावधूत गेली वीस वर्षे एकान्तवासात राहून पुस्तके लिहिण्याचे कार्य ईश्वरी आज्ञेनुसार करत आहेत. **मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग सात** हे त्यांचे शेवटचे पुस्तक ठरेल असे त्यांनी म्हटले आहे. परंतु त्यांनी आणखी लिखाण करावे अशी आमची इच्छा आहे.

**मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग एक ते सहा, आत्मसिद्धी, भारतीय गूढविद्या, अमरत्वाकडे वाटचाल, जीवनमुक्तीचा मार्ग, अगम्यवाणी, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदुर्गा त्रिशती, श्रीदुर्गा सप्तशती, श्रीस्वामी समर्थ सप्तशती, श्रीदत्तलीलामृत, श्रीसिद्धलीलामृत, ईश्वरप्राप्तीचे चार मार्ग,** इत्यादी **पुस्तके वाचून ''आमचे जीवन सुखी झाले''** अशा आशयाची हजारो पत्रे आम्हाला आली. शेकडो फोन कॉल्स आले. युरोप, अमेरिकेतूनही पत्रे आली. वाचकांच्या प्रचंड मागणीमुळे काही पुस्तकांच्या वर्षातून दोन-दोन आवृत्त्या काढाव्या लागल्या. पाच-पाच हजार प्रति तीन-चार महिन्यात संपून जात असत. ज्या सद्भक्तांनी पुस्तके वाटण्याची सेवा केली, त्यांनाही खूप चांगले अनुभव आले. यातील काही निवडक अनुभव पुढे देत आहे.

सौ. नीला वाघमारे न्यूजर्सी, अमेरिका येथे राहतात. अनेक वर्षांपासून त्यांना पाठदुखी व कंबरदुखीचा त्रास होता. अमेरिकेमध्ये उपचार केले, ऑपरेशनही केले परंतु काही उपयोग झाला नाही. श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचायला सुरुवात केल्यानंतर पाठ व कंबर यातून गरम वाफा निघू लागल्या. पाठदुखी आणि कंबरदुखी कायमची बरी झाली. सौ. नीला वाघमारे सध्या अमेरिकेमध्ये श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेली पुस्तके सेवा म्हणून वाटतात.

न्यूझीलंडमध्ये कोठारे नांवाचे एक गृहस्थ राहतात. ते मुंबईत आले असतांना त्यांच्या चुलत भावाने श्री. मिलीन्द कोठारे याने स्वामी दत्तावधूतांची पुस्तके दिली. न्यूझीलंडला परत गेल्यानंतर कोठारे यांनी संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचण्यास सुरुवात केली. ही पोथी वाचायला सुरुवात करताच त्यांच्या जीवनातील सर्व अडचणी दूर झाल्या. त्याने ही गोष्ट आपल्या अनेक मित्रांना सांगितली. त्यांच्या सर्व मित्रांनी कोठारे यांच्याकडून संक्षिप्त श्रीगुरुचरित्र घेतले व वाचण्यास सुरुवात केली. ज्यांनी ज्यांनी संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचले त्या सर्वांच्या अडचणी दूर झाल्या.

सांगलीतील एक सद्गृहस्थ जोशी याच्यावर खूप कर्ज होते. तो अक्षरशः लोकांच्या नजरा चुकवून फिरत असे. कर्ज वसुलीसाठी लोक त्याच्या दारात नेहमी उभे राहत असत. त्यांची कशीबशी समजूत घालून हा मनुष्य त्यांना परत पाठवित असे. एक दिवस त्याच्या एका मित्राने त्याला सांगितले–

**''श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेले संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाच, म्हणजे तुला काहीतरी मार्ग मिळेल.''**

मित्राच्या सल्ल्याप्रमाणे जोशीने संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचावयास सुरुवात केली.

एक दिवस एक नातेवाईक जोशीला म्हणाले –

''तुझ्या डोक्यावरचे सर्व कर्ज फेडून टाकण्याची श्रीदत्त महाराजांनी मला आज्ञा केली आहे, तुझे सर्व कर्ज मी फेडतो, तुला जमेल तसे तू मला पैसे परत कर !''

श्रीदत्तमहाराजांच्या अपार कृपेचे श्री. जोशींना आश्चर्य वाटले. त्या नातेवाईकाने जोशींचे सर्व कर्ज फेडून टाकले.

ठाण्यातील सुरेशने आत्महत्या करण्याचा निश्चय केलेला होता. घरची परिस्थिती खूप गरिबीची होती, गरिबीमुळे शिक्षण नव्हते, नोकरी नव्हती. सर्व परिस्थितीवर उपाय म्हणून सुरेश याने आत्महत्या करण्याचे ठरविले होते.

अचानक श्रीस्वामी दत्तावधूतांचे एक पुस्तक त्याने वाचले ते पुस्तक वाचताच आपल्यावर ईश्वरीकृपेचा वर्षाव होत आहे असा अनुभव त्याला आला. मनातील आत्महत्येचे विचार निघून गेले. जीवनामध्ये चैतन्य निर्माण झाल्यासारखे त्याला वाटले. तो तात्काळ वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये आला. आपली सर्व हकिकत त्याने ऑफिसमध्ये काम करणाऱ्या प्रकाशला सांगितली. प्रकाशने त्याला तात्काळ पुस्तकांचा एक सेट दिला व संक्षिप्त श्रीगुरुचरित्र रोज वाचायला सांगितले.

श्रीगुरुचरित्राचे रोज वाचन सुरेशने सुरू केले. त्याचबरोबर श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या इतर पुस्तकांचे व पोथ्यांचे वाचन चालू ठेवले. काही दिवसातच त्याला नोकरी लागली व तो सुखी झाला.

कुमारी सुनिता हिचा विवाह जमत नव्हता, असे का होत आहे, हे कोणालाही कळत नव्हते. एका ज्योतिषाने सुनिताला देवीची उपासना करावयास सांगितली. त्याच दिवशी दीपा नांवाच्या तिच्या एका मैत्रिणीने तिला श्रीदुर्गा त्रिशती दिली. श्रीदुर्गा त्रिशतीचे पाठ करताच तिच्या लग्नातील विघ्ने दूर होऊन तिचे लग्न झाले व ती सुखी झाली.

एक घराणे पिशाच्च शक्तीच्या त्रासाने हैराण झाले होते. श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचून त्यांच्या मनातील आशा पल्लवित झाल्या. त्यांनी घरामध्ये श्रीदुर्गा सप्तशती व श्रीदुर्गा त्रिशती, श्रीस्वामी समर्थ सप्तशती व संक्षिप्त श्रीगुरुचरित्र इत्यादी पोथ्यांचे वाचन सुरू केले. श्रीदुर्गा त्रिशती या पोथीतील देवी कवच, देवीसूक्त व नारायणीस्तुती या स्तोत्रांचे हजारो पाठ केले. या उपासनेने पिशाच्च शक्तींचा त्रास नाहीसा झाला व घराण्याला चांगले दिवस आले.

शैला मसुरकर गेली अनेक वर्षे स्वामीजींची पुस्तके सेवा म्हणून लोकांना वाटण्याचे कार्य करीत आहे. एक दिवस तिच्या स्वप्नामध्ये तिचे वडील आले व म्हणाले गेल्या १६ वर्षात मी तुमच्या स्वप्नात आलो नाही कारण माझ्यावर करणी केलेल्या तांत्रिकांच्या कैदेत मी होतो. तू जी पुस्तके  वाटण्याची सेवा केलीस त्या सेवेच्या पुण्याईमुळे माझी सुटका झाली. आमच्या काळामध्ये जर अशी पुस्तके निर्माण झाली असती तर माझ्यासारख्या असंख्य आत्म्यांचा उद्धार झाला असता. शैलाच्या या दृष्टांतावरून श्रीस्वामीजींच्या पुस्तकांची सेवा केल्याने अदृश्य सृष्टीतील पूर्वजांच्या आत्म्याचाही उद्धार होतो हे सिद्ध होते.

सांगलीतील सौ. पटवर्धन या अनेक त्रासाने व्यापलेल्या

होत्या. जीवनाला कंटाळलेल्या होत्या. कुठल्यातरी कामाच्या निमित्ताने त्या कोल्हापूरला गेल्या. कोल्हापूरला त्यांनी महालक्ष्मीच्या मंदिरात जाऊन महालक्ष्मीचे दर्शन घेतले. मंदिरातून बाहेर आल्या तेव्हा एक गरीब हडकुळा मुलगा त्यांच्यासमोर येऊन म्हणू लागला, ''ताई, मला खूप भूक लागली आहे, ही पोथी घ्या व मला जेवणासाठी दहा रूपये द्या!''

सौ. पटवर्धन यांनी त्याला दोन रुपये देऊन स्वतःची सुटका करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने पाठ सोडली नाही. तो सारखा म्हणू लागला ही पोथी घ्या व मला १० रुपये द्या. त्याने असा बराच आग्रह केल्यानंतर सौ. पटवर्धन यांनी पोथी घेतली व त्याला त्या पोथीची किंमत रु. ३० देऊ लागल्या. मुलगा म्हणाला, ''मला दहा रूपये पुरेत!'' तरी पण सौ. पटवर्धन यांनी त्या मुलाला आग्रह करून रु. ३० घ्यायला लावले व ती पोथी घेतली. 'ती पोथी होती, श्री स्वामी दत्तावधूत लिखित श्रीदुर्गा सप्तशती!'

महालक्ष्मीच्या मंदिरामध्ये श्रीदुर्गा सप्तशती मिळाली म्हणून सौ. पटवर्धन यांना आनंद झाला. घरी गेल्यावर त्यांनी श्रीदुर्गा सप्तशती वाचली. पुढील काही दिवसात त्यांच्या सर्व समस्यांचे निराकरण झाले. जीवनात आनंद निर्माण झाला. त्या पुन्हा महालक्ष्मीच्या दर्शनाला गेल्या व तेथे त्यांनी त्या मुलाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तो मुलगा त्या परिसरात कोठेही सापडला नाही. इतकेच नव्हे तर महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात व त्या गल्लीत कोठेही श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके कोणीही दुकानदार विकत नाहीत, असे त्यांच्या लक्षात आले. यामुळे त्या मुलाच्या रूपाने परमेश्वरानेच आपल्याला मार्ग दाखविला, असे त्यांना वाटू लागले. घरी परत आल्यावर त्यांनी वनिता बुक्सला पत्र

पाठवून सविस्तर हकिकत कळविली व श्री स्वामी दत्तावधूत यांची सर्व पुस्तके मागवून घेतली. त्यांचे जीवन सुखी झाले व सध्या त्या सेवा म्हणून श्री स्वामी दत्तावधूत यांची पुस्तके लोकांना वाटतात. त्यांनी ज्यांना ज्यांना श्री स्वामी दत्तावधूत यांची पुस्तके दिली त्यांना खूप चांगले अनुभव आल्याचे सौ. पटवर्धन यांनी कळविले आहे.

शीतलादेवी मुंबई, येथे नवरात्रोत्सव सुरू होता. आमचा एक सहाय्यक यशवंत याने शीतलादेवी मंदिराजवळील एका फूल विक्रेत्याकडे श्रीस्वामी समर्थ सप्तशती पोथ्या ठेवल्या.

त्या रात्री अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थ फूल विक्रेत्याच्या पाच वर्षाच्या मुलीच्या स्वप्नात आले व तिच्याबरोबर गोट्या खेळू लागले. थोडा वेळ तिच्याबरोबर गोट्या खेळून त्यांनी तिला भरपूर गोट्या दिल्या व आशीर्वाद देऊन निघून गेले. पहाटे पाच वाजता ती मुलगी उठली व गोट्या शोधू लागली. ''माझ्या गोट्या कोठे गेल्या?'' म्हणून रडू लागली. आई-वडिलांनी काय झाले म्हणून विचारले असता, समर्थ सप्तशतीवरील अक्कलकोट स्वामींचा फोटो दाखवून ती म्हणाली, ''हे आजोबा माझ्या स्वप्नात आले होते. माझ्याशी गोट्या खेळले व मला भरपूर गोट्या देऊन गेले.'' असे म्हणून गोट्या कोठे आहेत म्हणून ती विचारू लागली ! आई-वडिलांनी तिची समजून घालून परत तिला झोपविले.

सकाळी उठल्यानंतरही ती मुलगी गोट्यांची आठवण करत होती व श्रीस्वामी समर्थांची आठवण करत होती. दुपारी तिची मावशी तिच्याकडे आली. इतर बायकांबरोबर बोलतांना ती मावशी म्हणाली,

''माझा हा रोग केव्हा जाणार? ईश्वरालाच माहीत. किती

डॉक्टर केले, किती औषधे केली पण माझा रोग बरा होत नाही !'' हे ऐकून ती पाच वर्षांची मुलगी म्हणाली,

''मावशी तू हे पुस्तक वाच! म्हणजे तुझे सगळे रोग जातील.'' असे म्हणून श्रीस्वामी समर्थ सप्तशती तिला दिली. तिच्या मावशीने ती श्रद्धेने घेतली व वाचावयास सुरुवात केली. दुसऱ्याच दिवशी ती परत त्या मुलीला भेटावयास आली व मुलीच्या आईला म्हणाली,

''तुझ्या मुलीच्या तोंडात साखर पडो. बऱ्याच वर्षांनी मला आज खूपच बरे वाटत आहे. अगदी आपण बरे झालो असे वाटत आहे. खूप उत्साह वाटत आहे.''

दुसरे दोन अनुभव असेच बोलके आहेत.

एक सद्भक्त श्रीगुरुलीलामृत नांवाचा श्री स्वामी समर्थांचा ग्रंथ दररोज वाचत असे. एकदा ते हा ग्रंथ वाचत असताना त्यांच्यासमोर एक व्यक्ती आली व श्रीस्वामी समर्थ सप्तशती त्यांना देऊन म्हणाली,

''हा ग्रंथ सिद्धयोग्याने लिहिला असून, या ग्रंथात खूप शक्ती आहे !'' असे म्हणून श्रीस्वामी समर्थ सप्तशती ग्रंथ देणारी व्यक्ती अदृश्य झाली.

सौ. निता व श्री. गौतम आंगणे या पती-पत्नींना श्रीस्वामी समर्थ सप्तशती वाचनाने बरेच अनुभव आलेले आहेत. ते सर्व येथे घेणे शक्य नाही. सारांशरूपाने त्यांचे अनुभव पुढील प्रमाणे...

श्री. गौतम आंगणे यांच्या डाव्या डोळ्यातील रक्तवाहिन्या तुटल्यामुळे त्यांना अंधूक दिसत असे. यावर तीन-चार वेळा लेझर किरणांचा वापर करून त्या सील केल्या गेल्या. तरीही काही उपयोग

झाला नाही. श्रीस्वामी समर्थ सप्तशती वाचावयास सुरुवात केल्यानंतर मनात एक असा आत्मविश्वास निर्माण झाला की, आपला डोळा नक्की बरा होणार. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीस्वामी समर्थ सप्तशतीचे वाचन सुरु केल्यानंतर मनावरील दडपण (Tension) दूर झाले व मनात आत्मविश्वास निर्माण झाला. श्री. गौतम आंगणे यांनी सर्व प्रकारची महागडी ट्रीटमेंट बंद केली व सर्व भार श्रीस्वामी समर्थांवर टाकला व श्री स्वामी समर्थ सप्तशतीचे वाचन करीत राहिले. काही दिवसांतच त्यांचा डोळा पूर्ण बरा झाला. श्री. गौतम आंगणे यांनी कृतज्ञतेने श्री स्वामी समर्थ सप्तशती या पोथीच्या अनेक प्रती सद्भक्तांना वाटल्या.

ॲडव्होकेट प्रभाकर मुळे हे गेली काही वर्षे श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेली पुस्तके विकत घेतात व भाविकांना वाटतात. त्यांना या सेवेचे विलक्षण अनुभव आलेले आहेत.

डिसेंबर २००० मध्ये श्रीदत्तजयंतीच्या दिवशी भगवान् श्रीदत्तात्रेयांनी त्यांना स्वप्नात दर्शन देऊन एक विशिष्ट मंत्र दिला व त्याचा जप करण्यास सांगितले, आणि ''आत्तापर्यंत तू जी काही सेवा केलीस त्याने तुझे गतजन्मींचे प्रारब्ध शुद्ध झाले असून, यापुढे तू जी काही सेवा करशील त्याचा उपयोग तुझ्या पुढील जन्मांसाठी होईल!'' असे सांगितले.

श्री. प्रभाकर मुळे यांनी संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीस्वामी समर्थ सप्तशती, श्रीदुर्गा सप्तशती इत्यादी श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या सद्ग्रंथांचे समाजात वाटप केले. त्यांनी ज्यांना ज्यांना ग्रंथ वाटले, पुस्तके वाटली, त्या सर्वांनाही चांगले अनुभव आले.

एकदा त्यांच्याकडे एक पती-पत्नी वकिली सल्ला घेण्यासाठी आले.

''सून बरोबर वागत नाही, भांडणे करते व न सांगता माहेरी निघून जाते,'' अशी त्यांची तक्रार होती. मुलाला घटस्फोट मिळवून द्यावा अशी विनंती सासऱ्याने श्री. प्रभाकर मुळे यांना केली. त्यासाठी आवश्यक तो खर्च करण्यास ते तयार होते.

श्री. प्रभाकर मुळे यांनी त्यांची समजूत घातली व संक्षिप्त श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ त्यांना वाचण्याचा सल्ला दिला व आपल्याजवळील ग्रंथ त्यांना देऊ लागले.

वकिलांचा हा विचित्र सल्ला ऐकून सासरेबुवा चक्रावले, परंतु सासूने पोथी घेतली व ''मी जरूर वाचेन,'' असे सांगितले !

त्यानंतर आठ-दहा दिवसांनी ते दोघे परत श्री. प्रभाकर मुळे वकिलांकडे आले व त्यांनी श्री. प्रभाकर मुळे यांना पुढील प्रमाणे हकिकत सांगितली.

सासरेबुवा म्हणाले,''माझी तर मुळीच श्रद्धा नव्हती, परंतु माझ्या बायकोने संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचावयास सुरुवात केल्यानंतर आमच्या घरातील वातावरणच पालटून गेले. घरात एक प्रकारची शांतता निर्माण झाली. एक प्रकारचे आनंदाचे वातावरण निर्माण झाले. तिसऱ्या दिवशी सून घरी परत आली. तिच्या स्वभावातही बराच फरक झाला. आता आम्ही सुखी आहोत.'' असे म्हणून त्यांनी श्री. प्रभाकर मुळे यांना शाल व श्रीफळ अर्पण केले व संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या आणखी प्रती मागून घेतल्या.

एकदा श्री. प्रभाकर मुळे यांनी निवस्कर नावाच्या एका

सद्‌गृहस्थांना भेटून सांगितले, ''मी तुम्हाला काही सद्‌ग्रंथ भेट देणार आहे. तुम्ही रविवारी जरूर माझ्याकडे या !'' या गोष्टीचा निवस्कर यांना विसर पडला. शनिवारी रात्री निवस्करांच्या पत्नीच्या स्वप्नामध्ये अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ आले व म्हणाले, ''तुझ्या नवऱ्याला उद्या मुळे यांच्याकडे पुस्तके घेण्यास पाठव !'' असे म्हणून अक्कलकोट स्वामी अदृश्य झाले.

हा अनुभव ऐकून निवस्करांना अतिशय धन्य वाटले. त्यांनी श्री. मुळे यांच्याकडे येऊन हा अनुभव सांगितला व श्रद्धेने पुस्तके घेतली.

श्री. प्रभाकर मुळे यांच्या परिचयाचे एक वयस्कर गृहस्थ आहेत. त्यांच्या मुलाचे व त्यांचे संबंध दुरावले होते. सूनही त्यांच्याशी व्यवस्थित वागत नसे. या गृहस्थांचा मुलगा व सून हे मुंबईच्या बाहेर राहतात. मुलगा आपल्या वडिलांना भेटावयास येत नसे व फोनही करीत नसे. त्यामुळे हे गृहस्थ बेचैन असायचे. श्री. मुळे यांनी त्यांना संक्षिप्त श्रीगुरुचरित्र दिले व ही पोथी रोज पूर्ण वाचावयास सांगितली. त्या गृहस्थाने ही पोथी वाचावयास सुरुवात केल्यानंतर त्यांच्या मुलाचा त्यांना फोन आला. हळूहळू त्यांचे संबंध सुधारले. आता मुलगा व सून मधूनमधून त्यांच्याकडे येतात व राहतात. मुलगा नास्तिक होता, तोसुद्धा आता देवपूजा करतो व उपवास करतो. आता ते वयस्कर गृहस्थ आनंदात जीवन जगत आहेत.

स्वाती साटमकर यांच्या घरामध्ये काही दुष्टशक्तींचे अस्तित्व होते. त्यामुळे घरात सुखशांती नव्हती. त्यांचा नऊ वर्षांचा मुलगा कामेश अतिशय विचित्र वागत असे. शाळेत जात नसे व अभ्यासही

करत नसे. तो भडकला की आईला मारायला धावत असे.

स्वाती साटमकर यांची मैत्रिण सुनिताने, स्वाती साटमकर यांना संक्षिप्त श्रीगुरुचरित्र दररोज वाचण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे तिने संक्षिप्त श्रीगुरुचरित्र दररोज वाचावयास सुरुवात करताच घरातील वातावरण पालटले.

मुलगा व्यवस्थित शाळेत जाऊ लागला. अभ्यास करू लागला. सर्व विस्कटलेली घडी ठीक झाली. तद्नंतर स्वाती साटमकर यांनी सेवा म्हणून संक्षिप्त श्रीगुरुचरित्र ग्रंथाच्या अनेक प्रती सद्भक्तांना वाटल्या.

पोलीस खात्यातील एका पोलिसाला संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचा अतिशय विलक्षण अनुभव आला.

या पोलिसाचे नाव पवार. सुमारे १८ वर्षे याला पिशाच्च बाधेचा त्रास होता. एक पिशाच्च याच्या कानामध्ये चोवीस तास काहीतरी बोलत असे. त्याला सुखाने झोपू देत नसे. पिशाच्च जेव्हा त्याच्या अंगात येऊन त्याच्याशी बोलत असे तेव्हा त्याचे हात, पाय, तोंड वाकडे होत असत व बघणाऱ्याला भयानक दृश्य दिसत असे. १८ वर्षे या त्रासाने पवार हैराण झालेला होता. ही बाधा जाण्यासाठी त्याने अनेक उपाय केले. अखेरीस एक दिवस त्याच्या जीवनात तो भाग्याचा क्षण आला.

एक दिवस श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेले भारतीय गूढविद्या हे पुस्तक त्याच्या वाचनात आले व वातावरणातील चांगल्या वाईट शक्तींचे ज्ञान त्याला मिळाले. म्हणून त्याने श्रीस्वामी दत्तावधूतांची जी पुस्तके मिळाली ती वाचून काढली व एक दिवस श्रीस्वामी दत्तावधूतांची माहिती मिळविण्यासाठी तो वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये

दाखल झाला.

वनिता बुक्सचा सेवक प्रकाश याला त्याने आपली सर्व हकिकत सांगितली.

प्रकाश म्हणाला, श्रीस्वामी दत्तावधूतांसंबंधी मला काही सांगता यायचे नाही कारण ते नेहमी एकांतवासात राहतात. मीच अद्याप त्यांना पाहिलेले नाही. परंतु त्यांनी काही पोथ्या लिहिल्या आहेत. या पोथ्यांच्या वाचनाने लोकांच्या समस्यांचे निराकरण होते, असे म्हणून प्रकाशने संक्षिप्त श्रीगुरुचरित्र पवारच्यासमोर ठेवले.

संक्षिप्त श्रीगुरुचरित्राकडे दृष्टी जाताच पवारच्या अंगात पिशाच्चाचा संचार झाला. त्याचे अंग वाकडे तिकडे झाले. ते पिशाच्च पवारला सांगू लागले, ''या पोथीला हात लावू नकोस! ही खूप दिव्य पोथी आहे,!'' ''माझे अंग भाजले जात आहे.'' ''तू ताबडतोब येथून निघ! नाही तर तुला मारून टाकीन !''

अंगातून पिशाच्च निघून गेल्यानंतर पवारने सर्व हकिकत प्रकाशला सांगितली. यावर प्रकाश म्हणाला, ''मग तर तुम्ही हे संक्षिप्त श्रीगुरुचरित्र घ्याच ! जळून जाऊ दे पिशाच्च शक्तीला !''

पवारने संक्षिप्त श्रीगुरुचरित्र घेतले व घरी गेला. आठ-दहा दिवसांनी पवार परत आला व प्रकाशला म्हणाला, ''खरंच ! संक्षिप्त श्रीगुरुचरित्र एक दिव्य ग्रंथ आहे. बाधा जाण्यासाठी मी अनेक साधू संतांकडे गेलो. अनेक उपाय केले. परंतु माझी बाधा काही गेली नाही.''

संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचनास सुरुवात केल्यानंतर मला एक स्वप्न पडले.

स्वप्नामध्ये हिरव्यागार मैदानात मी उभा आहे. जवळच एक तुडुंब पाण्याने भरलेली विहीर दिसली. विहिरीचे पाणी स्फटिकासारखे स्वच्छ होते. अचानक तेथे एक सत्पुरुष प्रकट झाले. ते साक्षात् दत्तमहाराज होते ते मला म्हणाले –

''विहिरीतून आंघोळ करून ये ! मी तुला एक मंत्र देतो त्या मंत्राच्या जपाने तू सुखी होशील !''

मी विहिरीतून आंघोळ करून आलो. त्यांनी मला ''**श्रीदत्त जय दत्त**'' मंत्र दिला व म्हणाले, या मंत्राचा जप सतत करीत रहा. तुझे सर्व कष्ट दूर होतील. इतक्यात एक काळी भयंकर आकृती तेथे आली व श्रीदत्तमहाराजांना म्हणाली, ''दिसेल त्या व्यक्तीचा तुम्ही उद्धार करता, भेटेल त्या व्यक्तीला मंत्र देता, तुम्ही असे करत राहिलात तर आम्ही काय करायचे ?''

यावर श्री दत्तमहाराज म्हणाले, ''तुझे काम तू कर माझे काम मी करतो !'' माझे स्वप्न संपले. दुसऱ्या दिवसापासून मी **श्रीदत्त जय दत्त** असा जप अखंड करण्यास सुरुवात केली. संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे वाचन व जप यांनी माझी बाधा पूर्णपणे निघून गेली व मी आता पूर्णपणे सुखी आहे.

सांगली येथील नाना मुरलीधर झांबेड यांना बरीच वर्षे वाईट शक्ती त्रास देत होत्या. कोणीतरी त्यांना बेळगाव येथील एका पीराची माहिती दिली. त्यामुळे ते बेळगावला पीराकडे गेले. त्या पीराने त्यांना दत्तभक्ती करण्यास सांगितले. पीराच्या आदेशाप्रमाणे नाना दत्तभक्ती करू लागले. दत्ताला १०८ प्रदक्षिणा घालू लागले व दत्त मंत्राचा २० लाख जप केला. एक दिवस श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेली पुस्तके त्यांना

वाचावयास मिळाली. नानांनी सर्व पुस्तके वाचून काढली व त्यांनी आपल्या जीवनामध्ये काही बदल केले.

''**श्रीदत्त जय दत्त**'' असा जप करण्यास सुरुवात केली. श्री स्वामी दत्तावधूत यांची पुस्तके विकत घेऊन गुरुसेवा म्हणून लोकांना वाटण्यास सुरुवात केली. दान करण्यास सुरुवात केली.

संक्षिप्त श्रीगुरुचरित्र दररोज जमेल तितके वेळा वाचण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे उपासना सुरू केल्यानंतर त्यांना नरसोबावाडीला जाण्याची प्रेरणा मिळाली. नाना अधून-मधून नरसोबावाडीला जाऊ लागले. प्रदक्षिणा घालू लागले व तेथे बसून संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचू लागले. या उपासनेने त्यांचे सर्व कष्ट दूर झाले.

नरसोबावाडीच्या अकराव्या वारीच्या वेळी एका तेजःपुंज साधूचे दर्शन नानांना झाले. त्यांना काहीतरी पैसे द्यावेत म्हणून नानांनी खिशात हात घातला. तोपर्यंत ते तेजःपुंज साधू अदृश्य झाले. त्याच दिवशी त्यांना बेळगावच्या पीराचा निरोप मिळाला म्हणून ते बेळगावला गेले. तेथील पीराने त्यांना सांगितले,

''गुरु दत्तात्रेयांचे दर्शन तुला झालेले आहे. तू जी उपासना करतोस तीच उपासना चालू ठेव. म्हणजे संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचन, पुस्तकांची सेवा, दान-धर्म व जप या गोष्टी चालू ठेव !'' असे सांगितले.

ही सर्व हकिकत नाना झांबेड यांनी पत्राने आम्हाला कळविली, हे पत्र आम्हाला ५ ऑगस्ट २००५ रोजी मिळाले.

विशाल सांडीम गेली तीन-चार वर्षे श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाटण्याची सेवा करत होता. शिवाय तो सर्व पोथ्या दररोज वाचत असे व जप करत असे. इतके करूनही त्याला मनासारखी नोकरी

मिळत नव्हती. तरीपण श्रद्धेने सेवा करणे, जप करणे व दान करणे चालूच होते.

एक दिवस अचानक त्याला ऑस्ट्रेलियाहून भरपूर पगाराच्या नोकरीसाठी बोलावणे आले व विशाल ऑस्ट्रेलियाला आपल्या कुटुंबासहित निघून गेला.

ऑस्ट्रेलियामध्येही त्याने ज्यांना ज्यांना श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके दिली त्यांना सुद्धा चांगला अनुभव आला. सध्या विशाल सांडीम ऑस्ट्रेलियात राहत असून श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पुस्तकांचे व पोथ्यांचे प्रसाराचे कार्य करीत आहे.

श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्या वाचून फक्त संसारिक अडचणीच दूर होतात असे नव्हे तर आध्यात्मातही प्रगती होते. अशा अनेक व्यक्तींनी आपले आध्यात्मिक अनुभव आम्हाला कळविले आहेत. त्यापैकी काही अनुभव पुढे देत आहे.

स्वामीजींची पुस्तके वाचायला लागल्यानंतर स्मिता राणे हिला स्वप्नामध्ये देवी-देवतांची दर्शने होऊ लागली. स्वप्नामध्ये एका देवीने तिला ''तू रोज ध्यान करत जा !'' असे सांगितले. श्रीस्वामीजींच्या पुस्तकामध्ये ध्यानाचे जे मार्गदर्शन केले आहे ते वाचून तिने ध्यान करण्यास सुरुवात केली.

ध्यानामध्ये तिला प्रथम असंख्य ज्योति दिसल्या व ज्योतितून एक एक देवता साकार होत गेली. हळूहळू ध्यानमार्गात प्रगती झाली. मूलाधार चक्रापासून सहस्त्रार चक्रापर्यंत सर्व चक्रांची दर्शने झाली. चक्रस्थित देवतांची दर्शने झाली. अर्धनारी ईश्वराचेही दर्शन झाले. चिदाकाशात विहार करावयास मिळाला. केवळ पुस्तके वाचून अशा

प्रकारचे दिव्य अनुभव आले. गेली बारा वर्षे अशा प्रकारचे दिव्य अनुभव ती दररोज घेत आहे. या दिव्य अनुभवांमुळे मन सदैव प्रसन्न व परमानंदात डुंबत राहते असा तिचा अनुभव आहे.

आता जेव्हा मी हे लिहीत आहे तेव्हा अचानक वातावरणामध्ये सर्वत्र सुगंध पसरलेला आहे. या सुगंधाचे वर्णन करणे अशक्य आहे. हा सुगंध कसला आहे तेही ओळखता येत नाही. याचा अर्थ इतकाच आहे की मी जे सद्भक्तांचे ध्यानाचे अनुभव लिहीत आहे त्यामुळे वातावरणातील देवतांना आनंद होत आहे.

निता, सोनाली व दीपा या तीन बहिणींचेही अनुभव खूप दिव्य आहेत. त्यांच्या असंख्य आध्यात्मिक अनुभवांपैकी काही निवडक अनुभव पुढे देत आहे.

मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग ३ या पुस्तकातील काही पाने वाचून निता डोळे मिटून पडली असता टी.व्ही. ची सिरीयल संपली असता ज्याप्रमाणे भराभर टायटल्स वर जातात त्याप्रमाणे अनेक देव-देवतांची भराभर दर्शने झाली. श्रीदत्तमहाराज, कमळात बसलेली देवी, उभी देवी, पांढरे वस्त्र नेसलेली देवी, गणपती, पांढरे वस्त्र नेसलेले ऋषी अशा अनेक देव-देवता भराभर वर सरकत गेल्या. या घटनेनंतर तिला अधून-मधून ध्यानात दर्शने होऊ लागली.

देवीसूक्ताचे दीड हजार पाठ केल्यानंतर एकदा देवीने दर्शन दिले. देवीने हाताला धरून आकाशात नेले तेथे सर्वत्र सोनेरी प्रकाश होता. आकाशामध्ये एक हत्ती दिसला. एकदा हातात डाव घेतलेली एक देवी दिसली त्याच वेळी घरामध्ये पैंजणांचे आवाज ऐकू येत होते. नंतर कळले की ही देवी 'अन्नपूर्णा ' होती. ध्यानामध्ये एक देवी दिसली. त्या

देवीचे डोळे अतिशय सुंदर होते. नंतर कळले ही देवी 'मीनाक्षी' होती. एकदा ध्यानामध्ये ऐरावताचे दर्शन झाले. या ऐरावताने गणपतीचे रूप घेतले.

एकदा ध्यान करत असतांना श्रीपाद श्रीवल्लभांचे दर्शन झाले तसेच लाहिरी महाशयांचेही दर्शन झाले. आकाशात हंस उडताना दिसले. निळ्या रंगामध्ये शंकराचे दर्शन झाले. भगव्या वस्त्रातील एक ऋषी झपझप पावले टाकीत आले व त्यांनी आशीर्वाद दिला. एकदा ध्यानामध्ये आकाशात ॐ चे दर्शन झाले.

सोनाली हिला ध्यानामध्ये सुरुवातीला खूप अस्पष्ट दृश्ये दिसायची. श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचून आपल्यालाही ध्यान लागावे असे तिला वाटत असे. तिने देवीसूक्त व नारायणी स्तुती या स्तोत्रांचे शेकडो पाठ केले. दररोज एक तास जप केला. एवढी साधना केल्यानंतर एक दिवस तिला ध्यानामध्ये गणपतीचे दर्शन झाले. गणपतीने लाल पितांबर नेसलेला होता. गणपतीने सोंड उचलून सोनालीच्या डोक्यावर ठेवली. या घटनेनंतर सोनालीला दररोज ध्यानामध्ये दृश्ये दिसू लागली. ध्यानाला बसल्यानंतर सुगंध येऊ लागला. एकदा तिला ध्यानामध्ये दिसले, निताला देवीचे रूप प्राप्त झाले असून तिच्या अंगावर दागिने आहेत व डोक्यावर मुकुट आहे. बऱ्याचवेळा तिला ध्यानामध्ये असंख्य बिंदूंचे पुंजके दिसत व हे पुंजके अंगावर येत आहेत असे दिसले.

एकदा ध्यानामध्ये तिला श्रीनृसिंह स्वामी सरस्वतींचे दर्शन झाले. विराट आकारामध्ये श्रीस्वामी समर्थ दिसले. शिवलिंगावर बसलेले श्रीस्वामी दत्तावधूत दिसले.

एकदा ध्यानामध्ये शिर्डीचे श्रीसाईबाबा, श्रीगोंदवलेकर महाराज, श्रीवासुदेवानंद सरस्वती, गोरक्षनाथ यांची दर्शने झाली. अलंकार घातलेला पांढरा हत्ती एकदा ध्यानामध्ये दिसला. एकदा ध्यानामध्ये हिमालय पर्वत दिसला. हिमालयात एक गुफा होती व या गुफेमध्ये हनुमानजी बसलेले होते.

निता व सोनाली यांची धाकटी बहीण दीपा हिलाही ध्यानाचे असंख्य अनुभव आहेत. सर्वप्रथम हिनेच स्वामीजींची पुस्तके वाचली व हिला खूप दिव्य अनुभव येऊ लागले.

असंख्य भक्त असे आहेत की, ज्यांना श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचून ध्यान लागू लागले, आध्यात्मात प्रगती होऊ लागली, आनंद मिळाला, मनोकामना पूर्ण झाल्या. या सर्वांचे अनुभव एकत्र करून छापायचे ठरविल्यास तो एक मोठ्या ग्रंथाचा विषय होईल. येथे फक्त मी भक्तांना आलेल्या हजारो अनुभवांपैकी काही अनुभवांचे वर्णन करीत आहे. यात हेतु एवढाच आहे की, श्रीस्वामी दत्तावधूतांनी केवळ पुस्तकांद्वारे लोकांचे इहलौकिक व पारलौकिक कल्याण कसे केले हे वाचकांना कळावे. ईश्वराचे लोकोद्धाराचे कार्य अनादि कालापासून चालू आहे व पुढे अनंत कालपर्यंत चालू राहणार आहे. त्यासाठी ईश्वर सद्भक्तांना माध्यमे बनवत असतो. ज्यांची मने स्वच्छ आहेत अशा सद्भक्तांना ध्यानाचे अनुभव देतो व समाजामध्ये भक्ती वाढेल, श्रद्धा वाढेल, अशी व्यवस्था करतो.

दीपा, देवी कवचाचे दररोज अनेक पाठ करत असे. पाठ करता करता तिला ध्यान लागू लागले. एकदा तिला ध्यानामध्ये एक लखलखीत तारा आकाशातून खाली येत आहे असे दिसले.

देवीसूक्ताचे पाठ करत असतांना अचानक ध्यान लागले, ध्यानामध्ये एक पर्वत दिसला. पर्वतातून तेजाची किरणे बाहेर येत होती.

डोळे मिटून श्रीदत्तस्तोत्र म्हणत असतांना पिवळ्या रंगाचे तेजस्वी गोळे अंगावर पडू लागले.

दीपा, एका रात्री नारायणीस्तुती या स्तोत्राचे पाठ करून झोपी गेली. तेव्हा तिला एक स्वप्न पडले. स्वप्नात तिला दिसले-

ती समुद्र किनाऱ्यावर फिरत असून अचानक तिची एक मैत्रिण तिला भेटली व म्हणाली, ''तू एका सिद्धपुरुषाकडून स्वतःची आध्यात्मिक प्रगती करून घेत आहेस. खरे आहे ना ?'' हे ऐकून दीपाला आश्चर्य वाटले, कारण दीपा फक्त श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचत होती व पुस्तकात सांगितल्याप्रमाणे साधना करत होती व ही गोष्ट तिने कोणालाही सांगितलेली नव्हती. स्वप्नातच दीपाला या सर्व गोष्टीचे आश्चर्य वाटले.

सकाळी उठल्यावर तिने हे स्वप्न एका जाणकार व्यक्तीला सांगितले तेव्हा ती जाणकार व्यक्ती म्हणाली, ''याचा अर्थ तुझी आध्यात्मात प्रगती होत असून तुला योग्य मार्ग मिळाला आहे.''

दीपाला ध्यानामध्ये अनेक वेळा देवतांची दर्शने झाली. एकदा भगव्या वस्त्रातले ऋषी ध्यानस्थ बसलेले दिसले, श्रीस्वामी समर्थांचे व मारूतीचेही दर्शन झाले. तळपता सूर्य ध्यानात दिसला. एकदा पंचमुखी गजाननाचे दर्शन झाले.

देवीसूक्त व देवीकवचाचे प्रत्येकी पंधराशे पाठ केल्यानंतर विशाल आकारात देवीचे दर्शन झाले.

दीपाची बहीण सोनाली हिला एकदा शेषशायी भगवान् विष्णूचे दर्शन झाले. एकदा ध्यानामध्ये बरीच फुले दिसली, फुलांनी सजविलेला एक झोपाळा दिसला, त्या झोपाळ्यावर गणपती बसलेला होता. त्याने एक पाय दुमडून ठेवला होता व दुसरा पाय खाली सोडला होता. त्याचे रूप अतिशय सुंदर होते. गणपतीने सोनालीला आशीर्वाद दिला. गणपतीच्या दोन्ही बाजूला दोन देवता चवऱ्या ढाळत होत्या.

गणपतीच्या दर्शनाने सोनालीला अतिशय आनंद झाला व तिच्या मुखाने आपोआप अथर्वशीर्ष बाहेर पडू लागले. ध्यानातून उठल्यानंतर बराच वेळ सोनाली परमानंदात डुंबत होती.

निताचा नवरा गौतम; या गौतमलाही श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पुस्तकांच्या व पोथ्यांच्या वाचनाने व पुस्तकांमध्ये सांगितलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे केलेल्या साधनेने खूपच दिव्य अनुभव आले; त्यातील काही अनुभव पुढे देत आहे.

गौतमने श्रीस्वामी समर्थ सप्तशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदुर्गा त्रिशती या पोथ्यांची पारायणे सुरू केल्यानंतर त्याला एक मोठा अनुभव आला तो म्हणजे एका कंपनीकडे चाळीस हजार रूपये त्याचे येणे होते, ती कंपनी बंद पडल्याने गौतमने पैशाची आशा सोडून दिली होती. पोथ्यांची पारायणे सुरू केल्यानंतर आशा सोडून दिलेली अनेक येणी वसूल झाली व या कंपनीने चाळीस हजार रूपयेही परत केले.

एकदा ध्यानाला बसलेला असतांना जोरजोराने घंटानाद ऐकू येऊ लागला. नंतर गणपतीचे दर्शन झाले. ध्यानामध्ये गौतमने बऱ्याच वेळेला सत्पुरुषांचे आवाज ऐकले. पूर्वेकडे डोके करून एकदा गौतम जमिनीवर झोपलेला होता. अचानक त्याच्या शरीरातून सूक्ष्मदेह

(Astral body) बाहेर पडला. बाहेर पडलेल्या या त्याच्या सूक्ष्मदेहाचे पाय पूर्वेकडे होते व डोके पश्चिमेकडे होते. गौतमने आपला सूक्ष्मदेह फिरवला व त्याचे पाय पश्चिमेकडे गेले.

एकदा ध्यानामध्ये गौतमने असे पाहिले की, पृथ्वी त्याच्याहून खूप छोटी आहे. पृथ्वीवरील भ्रष्टाचारी माणसे अठरा विश्वे दारिद्र्ये असणाऱ्या घरात जन्माला आलेली आहेत. त्यांना खावयास-प्यावयास केव्हातरी मिळत आहे. लोकांच्या दयेवर त्यांना जगावे लागत आहे. त्यांची ही परिस्थिती पाहून गौतम त्या सर्वांना म्हणाला-

''बघा ! मी तुम्हाला सांगत होतो, पैसे खाऊ नका ! वाईट वागू नका ! तुमच्या या वागण्याचे परिणाम तुम्हालाच भोगावे लागतील परंतु तुम्ही कोणीच माझे ऐकले नाही.''

एकदा गौतमला स्वप्न पडले. स्वप्नामध्ये गौतम शिर्डीला गेला. श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले. श्रीसाईबाबा म्हणाले, ''तुझी आध्यात्मिक प्रगती चांगली होत आहे.''

एकदा ध्यानामध्ये आपण अरण्यात उभे आहोत असे दिसले. उंच झाडांच्या पानांमध्ये सोनेरी सूर्यकिरणे सर्वत्र पसरलेली दिसत होती. एका मोठ्या आसनावर अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थ बसलेले होते. हळूहळू आसनासहित श्रीस्वामी समर्थ हवेत तरंगू लागले. गौतमकडे पाहून त्यांनी गौतमला आशीर्वाद दिला व उंच उंच आकाशात निघून गेले.

डॉ. मेघल (टोरोंटो-कॅनडा) हिने आपले बरेच अनुभव आम्हाला कळविले आहेत, त्यातील काही निवडक अनुभव पुढे देत आहे.

१९८० च्या सुमारास श्रीस्वामी दत्तावधूत एका अरण्यामध्ये साधना करत होते. मेघलचे शिक्षक मेघलला व काही विद्यार्थीनींना बरोबर घेऊन या अरण्यात फिरावयास गेले होते. सुमारे १३-१४ किलोमीटर चालल्याकारणाने शिक्षक व मुली सगळेच दमले होते. थोडी विश्रांती घेण्यासाठी व पाणी पिण्यासाठी म्हणून सगळे श्रीस्वामीजींच्या झोपडीमध्ये गेले, अशा प्रकारे वयाच्या दहाव्या वर्षी मेघलला स्वामीजींचे प्रथम दर्शन झाले.

मेघलला स्वामीजी म्हणाले, ''तुझी आध्यात्मात खूप प्रगती होईल, तू रोज ध्यान करत जा !''

मेघलने, ''आम्ही घरातील सर्व गायत्री मंत्राचा जप करतो,'' असे सांगितले. यावर श्रीस्वामीजींनी, ''गायत्री मंत्राचा जप पण करा, व थोडे थोडे सोऽहम् ध्यान व देवीच्या स्तोत्रांचे पठण करत जा !'' असे सांगितले.

मेघलने मुंबईला परत आल्यावर स्वामीजींनी जे सांगितले ते आपली बहीण डॉ. अल्पा व मला सांगितले. आम्हांला खूप आनंद झाला.

श्रीस्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे डॉ. अल्पा व डॉ. मेघल ध्यान करू लागल्या व त्यांना असंख्य अनुभव आले, त्यातील काही अनुभव पुढे देत आहे.

मेघलला ध्यानामध्ये नेहमी गणपती व भगवान् श्रीकृष्णाचे दर्शन होत असे. तसेच अधून-मधून गायत्री देवीही दर्शन देत असे. पुष्कळवेळा देव-देवता तिच्याशी संभाषण करीत.

मेघलला एकदा ध्यानामध्ये खूप मोठी शिडी दिसली. ही शिडी

जेथे मेघल बसली होती तेथून आकाशापर्यंत गेली होती. ध्यानामध्ये मेघल त्या शिडीवरून आकाशापर्यंत गेली. शिडी आणखी वर गेलेली होती.  मेघल वर चढतच राहिली. तिला चढतांना काहीही त्रास होत नव्हता. आकाश आता खूप खाली राहिले होते. पुढे तिला अत्यंत अद्वितीय, सुंदर असा स्वर्ग लोक दिसला. असंख्य देव-देवतांची दर्शने झाली, तेथेच तिला गायत्री देवीही दिसली. गायत्री देवी म्हणाली - ''जो कोणी श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचेल व त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न करेल त्याला स्वर्गाचा मार्ग मिळेल !''

मेघलने ही हकिकत मला सांगितली. हे ऐकून मला खूपच आनंद झाला. त्याकाळी म्हणजे १९८१ साली श्रीस्वामीजींनी एकही पुस्तक लिहिलेले नव्हते. या ध्यानातील अनुभवाचा खुलासा विचारण्यासाठी मी, मेघल व अल्पा या दोघींना घेऊन श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ अरण्यात गेले. चौदा किलोमीटर पायवाटेने चालत गेल्यावर श्रीस्वामीजींची झोपडी लागली. आजूबाजूला आणखी ३-४ झोपड्या होत्या. एका झोपडीत आम्ही मुक्काम केला. श्रीस्वामीजींना भेटल्यावर श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''तुम्हाला जन्मतःच षोडषीत्रिपुरसुंदरी स्टेज प्राप्त आहे. पुढील स्टेजेस् प्राप्त करण्यासाठी तुमचा जन्म झालेला आहे. याशिवाय तुमच्या हातून खूप मोठे ईश्वरी कार्य होणार आहे. जसजसे ईश्वरी कार्य तुमच्या हातून घडत जाईल तसतशा तुम्हाला आध्यात्मातील वरच्या वरच्या स्टेजेस् मिळत जातील. हा तुमचा शेवटचा जन्म आहे.''

आम्ही श्रीस्वामीजींना मेघलच्या ध्यानातील अनुभवाविषयी सांगितले, तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले, ''मी पुस्तके लिहिणार आहे परंतु त्याची योग्य वेळ यायची आहे.'' तेव्हा मी श्रीस्वामीजींना म्हटले,

''तुम्ही लिहा, मी प्रकाशित करीन !'' श्रीस्वामीजींनी डॉ. अल्पाला ''ध्यान करत जा ! व गायत्री मंत्राचा जप कर,'' असे सांगितले.

आम्ही मुंबईत परत आलो. तद्नंतर एकदा डॉ. अल्पा ध्यान करत बसली असतांना तिच्यासमोर श्रीगायत्रीदेवी प्रकट झाली. हा भास असेल, असे समजून अल्पाने डोळे उघडले. परंतु श्रीगायत्रीदेवी तिच्यासमोर हवेमध्ये अधांतरी बसली होती.

श्रीगायत्रीदेवी अल्पाला म्हणाली,

''मला श्रीस्वामीजींनी पाठविले आहे'' असे म्हणून मार्गदर्शनपर दोन-तीन वाक्ये बोलली व हळूहळू हवेत अदृश्य झाली. या अनुभवाने आमचा तिघींचाही उत्साह वाढला व आम्ही ध्यान करू लागलो.

आम्ही तेव्हा घाटकोपरला राहत होतो. एकदा घरात मी एकटीच होते,काही कामानिमित्त या खोलीतून त्या खोलीत फिरत होते, थोड्या वेळाने माझ्या लक्षात आले की घरभर हळद व कुंकवाची पावले उमटली आहेत. कोणाच्यातरी हातून घरात हळदकुंकू सांडले असेल व त्यावर पावले पडल्याने पावले दिसत असावीत असे वाटले. म्हणून काम करणाऱ्या ज्योत्स्ना नांवाच्या मुलीला सर्व फरशी स्वच्छ करावयास सांगितले. थोड्या वेळाने पुन्हा तोच प्रकार, सगळीकडे हळद कुंकवाची पावले उठलेली दिसली, तेव्हा ज्योत्स्ना मला म्हणाली,

''ताई, अहो, तुमच्याच पावलातून हळदकुंकू निघत आहे.'' ज्योत्स्नाने असे सांगितल्यानंतर मी परमेश्वराची व श्रीस्वामीजींची प्रार्थना केली, लगेच तो प्रकार थांबला.

या घटनेनंतर सुमारे वर्षभराने माझ्याकडे काम करणारी मुलगी ज्योत्स्ना हिला देवीचे दर्शन झाले व मलाही ध्यानात अनेक देवी-देवता व ऋषींची दर्शने झाली. श्रीदुर्गादेवीने बऱ्याच वेळा दर्शन दिले.

अल्पा व मेघल यांनाही ध्यानामध्ये देव-देवता व ऋषी यांची दर्शने झाली. परंतु विस्तारभयास्तव फक्त एक दोन अनुभव सांगून हे लिखाण आवरते.

अल्पाला ध्यानाचे असंख्य अनुभव आले. ध्यानामध्ये तिला हिमालयातील सिद्धाश्रम, सिद्धाश्रमात राहणाऱ्या सिद्ध योगिनी, ऋषी यांची दर्शने झाली. याशिवाय तिला माणसाच्या मागे असलेले तेजोवलयही दिसत असे. ती डॉक्टर झाली व नंतर तिचे लग्न झाले.

मेघलला ध्यानामध्ये अनेक दिव्य दर्शने होत असत. तिलाही अनेक सिद्ध ऋषींची दर्शने घडली आहेत. तसेच सूक्ष्मदेहाने ती दिव्यलोकातून भ्रमण करून येत असे. अनेकवेळा तिच्यासमोर देव-देवता साक्षात् प्रकट होत, तिच्याबरोबर बोलत व पुन्हा अदृश्य होत.

मी, अल्पा व मेघल पुन्हा अरण्यात श्रीस्वामीजींच्या दर्शनाला गेलो. मी श्रीस्वामीजींना हळदकुंकवाच्या प्रकाराबद्दल सांगितले, तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले -

''औदुंबराच्या झाडाखाली बसा व देवीसूक्ताचे पाठ करा. मी देवीसूक्ताचे पाठ करायला सुरुवात केल्याबरोबर, आकाशातून कुंकवाचा वर्षाव माझ्यावर होऊ लागला. सर्व शरीर कुंकवाने भरून गेले. मी प्रार्थना केली, असे प्रकार पुन्हा घडू नयेत. पुनःश्च आम्ही श्रीस्वामीजींशी बोलत असतांना मेघल श्रीस्वामीजींना म्हणाली, मी आईबरोबर गुजरातला जाणार आहे व तेथून आम्ही श्रीनाथजींच्या

दर्शनाला जाणार आहोत. तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले,''तू श्रीनाथजीला जा ! तुला खूप दिव्य अनुभव येतील!''

मेघल श्रीनाथजीला जाण्यासाठी आपल्या आईबरोबर प्रथम बडोद्याला मावशीकडे गेली. त्या रात्री झोपण्यापूर्वी ध्यान करत असतांना तिला भगवान् श्रीकृष्णाचे दर्शन झाले. या दर्शनाने तिला ध्यानामध्ये अतिशय आनंद झाला. ध्यानामध्ये बांसरीचे सूर ऐकू आले व ''श्याम पिया मोरी रंग दे चुनरिया'' हे गाणे ऐकू आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मेघल, आई व मावशी यांच्याबरोबर श्रीनाथजीला गेली. श्रीनाथजी या देवासमोर उभे राहिल्यानंतर मेघलचे भान हरपले. जेव्हा ती जागृत झाली, तेव्हा तिचा सर्व देह निळा झाला. तिच्या बरोबर तिची आई व मावशी होत्या. त्या दोघींनाही या घटनेचे आश्चर्य वाटले. संपूर्ण देह निळ्या रंगाचा झाला. जणूकाही कोणीतरी निळा रंग पाण्यात भिजवून तो संपूर्ण शरीराला लावला आहे, असे वाटू लागले. मेघलची मावशी म्हणाली, -''आपण डॉक्टरकडे जाऊ या का? कदाचित तुझ्या शरीरात प्राणवायु पुरेसा जात नसेल म्हणून तुझा देह निळा पडला असेल,'' यावर मेघल म्हणाली, ''मी स्वतः डॉक्टर आहे देह निळा पडला आहे, त्याचे कारण फक्त दैवी आहे, माझ्या शरीरात कुठलाही बिघाड झालेला नाही.'' तीन-चार तासाने तो सर्व रंग अंगात जिरून गेला. कालांतराने मेघल M.B.B.S झाली, तिचे लग्न झाले व ती कॅनडाला निघून गेली.

डॉ. अल्पाला मुलगा झाला त्याचे नांव पार्थ. पार्थला, तो दोन वर्षाचा असल्यापासून देवी-देवता दिसू लागल्या. थोडा मोठा झाल्यावर अल्पाने पार्थला ध्यान करण्यास शिकविले. ध्यानामध्ये त्याला गणपती व मारूतीचे दर्शन होत असे. पुष्कळवेळा मारूती त्याला विविध

लोकातून फिरवून आणत असे. पार्थला आध्यात्मातले बरेचसे ज्ञान देव-देवता देतात. आजही त्याची प्रगती सुरु आहे.

डॉ. मेघललाही मुलगा झाला. त्याचे नांव निखिल. निखिल तीन वर्षांचा झाल्यानंतर मेघलने त्याला ध्यान करावयास शिकविले. तत्पूर्वी दोन वर्षांचा असतांनाच त्याला दररोज जप करण्यास शिकविले होते. मेघल एकदा श्रीस्वामीजींच्या फोटोकडे पाहत जप करत होती. अचानक श्रीस्वामीजींच्या फोटोतून गणपती बाहेर आला, निखिलच्या जवळ जाऊन त्याच्या डोक्यावरून त्याने हात फिरविला व पुनःश्च श्रीस्वामीजींच्या फोटोत गणपतीने प्रवेश केला. निखिल बेडवर झोपलेला होता. मेघल हा सर्वप्रकार उघड्या डोळ्याने पाहत होती. सुमारे तासाभराने निखिल उठला व मेघलला म्हणाला आज गणपती बाप्पा माझ्या स्वप्नात आला होता.

एकदा निखिल खूप आजारी होता. मेघल स्वतः डॉक्टर असूनही कॅनडामधील चाईल्ड स्पेशालिस्टची ट्रीटमेंट निखिलला सुरू केली होती. पंधरा दिवस झाले, परंतु ताप कमी होईना. शेवटी तिने मला मुंबईला फोन केला, मी म्हटले, ''मेघल काळजी करू नकोस ! तुझ्यावर परमेश्वराची खूप कृपा आहे, तू फक्त प्रार्थना कर, निखिलला नक्की बरे वाटेल !''

एक तासाने मेघलचा परत फोन आला, मेघल म्हणाली, ''दीदी खूपच मोठा चमत्कार झाला. तुम्हाला फोनवर आवाज ऐकू येत असेल. निखिल ठणठणीत बरा झाला, तो आता खेळतोय, घरात इकडे तिकडे धावतोय व जोरजोराने ओरडून आपला आनंद व्यक्त करतोय. तुम्हाला फोनवर आवाज ऐकू येत असेलच. दीदी मी स्वतः

डॉक्टर आहे, निखिल चार वर्षांचा आहे व उगाच रिस्क नको म्हणून मी चाईल्ड स्पेशालिस्टची औषधे, गेली पंधरा दिवस त्याला देत आहे परंतु एक टक्कासुद्धा त्याला बरे वाटले नव्हते. प्रार्थना केली व दहा मिनिटात तो इतका ठणठणीत बरा झाला की, आता तो फक्त उड्या मारतोय, आमचा एम.बी.बी.एस. चा सगळा अभ्यास मला फुकट गेल्यासारखा वाटत आहे.''

मी म्हटले, ''निखिलला नेहमीच देव-देवता दिसतात त्याला काही दिसले का ? विचारून बघ !'' निखिलचा आरडा ओरडा व खेळणे मला फोनवर ऐकू येतच होते. मेघलने निखिलला हाक मारली. त्याला जवळ घेतले व विचारले -''थोड्या वेळापूर्वी तू जेव्हा झोपला होतास तेव्हा तुला काही स्वप्न वगैरे पडले का ?''

निखिल म्हणाला, ''हो ! मला स्वप्न पडले, स्वप्नामध्ये मी आकाश पाहिले सर्वत्र आकाशच दिसत होते, बाकी काहीच नव्हते. अचानक दूरून श्रीस्वामीजी माझ्याकडे येत आहेत, असे मला दिसले श्रीस्वामीजी आकाशातून अधांतरी माझ्याकडे येत होते. त्यांच्या हातात पृथ्वीचा गोल होता. पृथ्वीला त्यांनी आकाशात सोडून दिले व ते माझ्याजवळ आले. माझ्या डोक्यावर त्यांनी हात ठेवला व म्हणाले, ''निखिल तू ठणठणीत बरा झाला आहेस ! आता उठ! आणि भरपूर खेळ!'' मेघलला एवढे सांगून निखिल पुन्हा जोरजोराने उड्या मारत खेळू लागला.

वयाच्या पाचव्या वर्षी निखिलला कुंडलिनी जागृतिचा अनुभव आला.

तो आपल्या आईला सांगू लागला,''ध्यानाला बसले की

पाठीच्या मणक्यातून काहीतरी सरकत सरकत वर जाते.''

निखिलची कुंडलिनी शक्ती जागृत झाली आहे, हे मेघलच्या लक्षात आले तिने मला फोन करून सर्व हकिकत सांगितली. मी तिला सांगितले, ''निखिलचे वय लहान आहे, सध्या काही काळ त्याला ध्यान बंद करावयास सांग व फक्त नामस्मरण, जप करत राहू दे !'' निखिल सध्या (२००६) दहा वर्षांचा असून गेली तीन वर्षे तो पुनःश्च ध्यान करीत आहे.

१९८७ साली श्रीस्वामीजी ज्या अरण्यात राहत होते ते सोडून दुसरीकडे निघून गेले. त्यांनी लोकांना भेटण्याचे बंद केले.

एकान्तवासात राहून त्यांनी पुस्तके लिहिण्यास सुरुवात केली. पुस्तके लिहून ते माझ्याकडे पाठवू लागले. हळूहळू पुस्तके प्रकाशित होऊ लागली. मी प्रकाशित झालेली पुस्तके मेघलला पाठविली.

निखिलला फक्त इंग्लिश भाषा येते. त्याने श्रीस्वामीजींची पुस्तके पाहिली व तो मेघलला म्हणाला, ''मॉम, ही पुस्तके खूप डिव्हाइन आहेत, या पुस्तकातून सोनेरी रंगाचा प्रकाश बाहेर पडत आहे!'' मेघलने जेव्हा पुस्तके वाचली तेव्हा तिलाही खूप दिव्य अनुभव आले. अनेक देवी-देवतांची दर्शने झाली. हिमालयातील योग्यांनी तिला आशीर्वाद दिले. प्रत्येक पुस्तकाचा मेघलला खूप वेगवेगळा अनुभव आला. त्यातील फक्त मोजकेच एक-दोन अनुभव सांगून हा विषय आटोपता घेते.

एकदा तिला ध्यानामध्ये अत्युच्च स्वर्गलोकाचे दर्शन झाले. तेथे असंख्य देवी-देवता आपआपल्या कार्यामध्ये निमग्न होत्या. या लोकाच्याही पलिकडे गेल्यानंतर अनेक ऋषी तिला बसलेले दिसले. ती

जेथे जेथे गेली तेथे तेथे तिला श्रीस्वामीजींनी लिहिलेली पुस्तके त्या त्या लोकात सुरक्षित ठेवलेली दिसून आली. सर्वात शेवटी तिला एक ऋषी दिसले तेव्हा ते म्हणाले, ''श्रीस्वामी दत्तावधूतांनी स्वर्गीय ज्ञान पृथ्वीतलावर नेले आहे. या पुस्तकांमध्ये जे सांगितले आहे त्यातील थोडेसे जरी आचरण केले, तरी मानवांचा उध्दार होईल. पृथ्वीतलावरील मानवांना आज या ग्रंथांची किंमत जरी फारशी कळत नसली, तरी तीस-चाळीस वर्षांनंतर ही पुस्तके पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेली असतील.''

श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके प्रकाशित करायला लागल्यापासून मला स्वतःला अतिशय आध्यात्मिक आनंद मिळाला. वातावरणातील निरनिराळ्या स्तरातील दिव्य आत्म्यांनी व देव-देवतांनी मार्गदर्शनही केले.

असेच एकदा अत्युच्च स्वर्गलोकातील एका दिव्य आत्म्याने प्रकट होऊन दर्शन दिले व सांगितले,''तू जे काही कार्य करीत आहेस, ते कार्य किती दिव्य व भव्य आहे, याची तुला अजून कल्पना आलेली नाही. तुझे हे कार्य हजारो वर्षे पृथ्वीतलावरील जनतेला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार आहे !''

तू जी पुस्तके प्रकाशित करतेस त्या सर्वांचे आकाशिक रेकॉर्ड होत असून स्वर्गलोकातील प्रत्येक स्तरामध्ये ॲस्ट्रल बुक फॉर्ममध्ये ही पुस्तके वाचली जात आहेत.

अदृश्य सृष्टीतील आत्मे काय सांगतात, याविषयी आपण काहीच कोणाला पुरावा देऊ शकत नाही, परंतु श्रीस्वामीजींची पुस्तके हिन्दू , मुस्लीम, पारशी व ख्रिश्चन श्रद्धेने वाचतात एवढे मात्र खरे !

समीना नांवाची एक मुस्लीम मुलगी अतिशय श्रद्धेने श्री स्वामीजींची पुस्तके वाचते. कुठलीही अडचण अथवा समस्या निर्माण झाल्यास ती सरळ श्रीस्वामीजींच्या पुस्तकाचे वाचन करायला सुरुवात करते. पुस्तकाचे पारायण पूर्ण होण्याच्या आत तिची समस्या सुटलेली असते. तिचा नवरा अमजद हा नेहमी हिन्दू लोकांना पुस्तके वाटतो. या त्याच्या सेवेचा त्याला खूप चांगला अनुभव आला. त्याचा अनुभव मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग ६ पान १८६ ते १८८ मध्ये दिलेला आहे. या शिवाय श्रीस्वामीजींच्या पुस्तकावरील श्रद्धेचे त्याला अनेक अनुभव आहेत.

मानसीला आध्यात्माची अतिशय आवड ! एका मैत्रिणीने तिला सांगितले तुला जर आध्यात्माचे खरे खुरे ज्ञान हवे असेल तर तू श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाच !

मानसीने श्रीस्वामीजींनी लिहिलेली सर्व पुस्तके विकत घेतली व वाचली. पुस्तकात सांगितल्याप्रमाणे तिने ध्यान धारणा सुरू केली. या साधनेने तिला खूप चांगले अनुभव आले. नंतर ती अमेरिकेला गेली. तेथेही आपले कोणीतरी सतत संरक्षण करत आहे असा अनुभव तिला आला. ध्यानामध्ये तिला नेहमी गणपतीचे दर्शन होत असे. ध्यानामध्ये प्रगती झाल्यानंतर तिला ध्यानामध्ये ग्रह, नक्षत्र व तारे दिसू लागले.

एकदा अमेरिकेने नव्या ग्रहमालिकेचा शोध लावला अशी बातमी तिने टी.व्ही. वर ऐकली. ही ग्रहमालिका कशी असेल असे विचार तिच्या मनात आले. तद्नंतर ध्यान करतांना तिला सर्वत्र आकाश, आकाश दिसू लागले. ग्रहगोल, नक्षत्र दिसू लागले. या सर्वाला पार करून अतिशय वेगाने ती पुढे जात होती. शेवटी एके

ठिकाणी ती थांबली. आपले स्वरूप आकाशापेक्षाही विशाल झाले आहे असा अनुभव तिला आला. नजरेच्या एका टप्प्यामध्ये एक नवीन ग्रहमाला दिसत होती. तिच्या कानामध्ये शब्द ऐकू आले, ''तुला जी नवीन ग्रहमाला पहावयाची आहे ना, ती बघ! हीच ती नवीन ग्रहमाला.'' असे म्हणून त्या ग्रहमालेची खगोलशास्त्रीय माहिती तिला देण्यात आली. विशेष म्हणजे ही सर्व माहिती तिला इंग्लिश मधून देण्यात येत होती. त्या नवीन ग्रहमालेची सर्व माहिती सांगून झाल्यानंतर तिला असे सांगण्यात आले की योग्यवेळी आवश्यक ते ज्ञान पृथ्वीतलावर पाठविण्यात येते.

ध्यानातून उठल्यानंतर मानसीला परमानंद होत होता. परंतु तिला एका गोष्टीचे आश्चर्य वाटत होते की ध्यानामध्ये आपल्याला जी खगोल शास्त्रीय माहिती दिली गेली ही इंग्लिशमध्ये का दिली गेली. दोन दिवसानंतर तिला याचे उत्तर मिळाले.

दोन दिवसानंतर तिला एक मॅगेझीन वाचावयास मिळाले. या मॅगेझीनमध्ये नवीन ग्रहमालेचा जो शोध लागला, त्याची सर्व माहिती होती. विशेष म्हणजे ही माहिती शब्दशः तिला जे ध्यानात सांगितले गेले तशीच्या तशी होती. ध्यानामध्ये जे इंग्लिश शब्द वापरले होते तेच इंग्लिश शब्द मॅगेझीनमध्ये दिलेल्या माहितीत होते.

मानसीचा हा अनुभव जेव्हा मला कळला तेव्हा, या अनुभवावर चिंतन करत ध्यान करीत असतांना मला माझ्याच अंतरंगातून पुढील प्रमाणे संदेश ऐकू आला.

''प्रत्येक माणसाचा आत्मा विश्वाकार असतो. सर्व ग्रह, सर्व नक्षत्रे, सर्व ग्रहमाला, आकाशगंगा या विश्वाकार आत्म्याच्या पोटात

सामावलेल्या असतात. माणसाची जाणीव जेव्हा या महाशून्याशी एकरूप होते तेव्हा त्याला चिदाकाशाचे दर्शन किंवा महाशून्याचा अनुभव असे म्हणतात.''

'' जेव्हा महाशून्याचा अनुभव येतो, तेव्हा एकाचवेळी दाही दिशांचे दिसू लागते. कुठलीही गोष्ट दूर आहे, असे वाटत नाही. या अवस्थेमध्ये सूर्यसुद्धा आपल्या जवळ असतो व सूर्याच्या पलिकडचेही आपल्या जवळ असते. कारण आपण प्राणवायुपेक्षाही सूक्ष्म झालेले असतो, शून्य झालेले असतो.''

येथे असा अनुभव येतो की, श्वासाच्या रूपाने 'मी' सर्व प्राणिमात्रांमध्ये भरून राहिलेला आहे. सारे विश्व माझ्यात सामावलेले आहे; व मी साऱ्या विश्वात सामावलेला आहे असा अनुभव क्षणभर येणे म्हणजे **'आत्मानुभव!'** व असा अनुभव सतत येणे म्हणजे **'सिद्धावस्था!'**

पृथ्वीतलावर आत्तापर्यंत जितके साधू-संत होऊन गेले त्या सर्वांनी 'परोपकार करा !' असे सांगितले आहे. कारण परोपकार करणे म्हणजे, स्वतःवरच उपकार करणे किंवा शेतात सत्कर्माचे बीज पेरणे. जेव्हा एखादा मनुष्य परपीडा करतो, दुसऱ्याचे नुकसान करतो, दुसऱ्याची हत्या करतो तेव्हा, अप्रत्यक्षरित्या तो स्वतःचेच नुकसान करत असतो, स्वतःचेच वाईट करत असतो, स्वतःचीच हत्या करत असतो कारण हे सर्व विश्व एकाच तत्त्वाने भरलेले आहे. म्हणून म्हणतात,''परोपकार हेच पुण्य ! व परपीडा किंवा दुसऱ्याला सतावणे हेच पाप !''

सर्व माणसांच्या रूपाने, सर्व सजीव-निर्जीवांच्या रूपाने,

चराचराच्या रूपाने, सूर्य, चंद्र, आकाशगंगा, ग्रह-नक्षत्रांच्या रूपाने 'मी' च नटलेला असून सर्व माझ्यात आहे व 'मी' सर्वात आहे.'मी' च प्राणशक्ती आहे, 'मी'च चैतन्यशक्ती आहे असा अनुभव येणे, म्हणजे खरे '**आध्यात्म!**' हेच खरे खुरे '**आत्मज्ञान**' हीच खरी खुरी '**सिद्धावस्था !**'

प्रकाशकाचे परिशिष्ट अपेक्षेपेक्षा जास्तच मोठे झाले. श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके हजारो लोकांचे कल्याण करत आहेत. अदृश्य सृष्टीतून फार मोठे ईश्वरी कार्य होत आहे. आम्ही सगळे निमित्त आहोत.

**सौ. वनिता दीक्षित.**

ॐ **वनिता बुक्स**ॐ

**वनिता बुक्स**

# जीवनाची दिशा बदलणारे स्वामी दत्तावधूतांचे अमूल्य ग्रंथ

- **अगम्य वाणी (जागतिक भविष्य)** : सन १९९८ ते ३०००
- **आत्मसिद्धी**
- **भारतीय गूढविद्या :** गूढविद्येविषयी दुर्मिळ माहिती देणारा संग्राह्य ग्रंथ.या ग्रंथात अनेक साधना कशा कराव्यात याची माहिती दिलेली आहे. याशिवाय योगातील रहस्यमय भाग प्रथमच प्रकाशित करण्यात आला आहे.
- **मानवी जीवनातील गूढ रहस्ये (भाग १ ते ७)** : हे ग्रंथ वाचल्यानंतर मानवी जीवन हे गूढ शक्तींनी कसे भरलेले व भारलेले आहे याचे ज्ञान होते. अदृश्य सृष्टीची माहिती देणारे मराठीतील पहिलेच पुस्तक.
- **अमरत्वाकडे वाटचाल :** जीवनाची दिशा बदलणारी एका योग्याची ३० प्रवचने.
- **जीवन मुक्तीचा मार्ग** : ज्यांना खरोखर आध्यात्माची आवड आहे, ज्यांचे प्रारब्ध शुद्ध आहे, ज्यांचे मन स्वच्छ आहे, अशा लोकांना आध्यात्मात प्रगती करून देण्यास हे पुस्तक बरीच मदत करेल.
- **श्री दत्त - दुर्गा संवाद** : साधकांच्या मनातील शंभरहून अधिक प्रश्नांची उत्तरे देणारा ग्रंथ.
- **ईश्वरभक्तीचे अनुभव** : श्री स्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या व पुस्तके वाचून लोकांना आलेले अनुभव.
- **विहंगम मार्ग** : ईश्वर मानव कसा झाला व मानवाने पुनश्च ईश्वर होण्यासाठी काय करावे हे सांगणारा अनमोल ग्रंथ.
- **श्री स्वामी दत्तावधूत या सिद्धयोग्याच्या सहवासात : भाग १ व २**

## श्री स्वामी दत्तावधूत यांचे प्रासादिक ओवीबद्ध ग्रंथ

- **श्री दुर्गा सप्तशती :**
  मूळ संस्कृत ग्रंथाचे प्राकृत ओवीबद्ध रूपांतर.
- **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र :**
  श्री गुरुचरित्राइतकेच प्रासादिक व स्त्रियांनाही वाचता येईल असा ग्रंथ
  **श्री दत्तलीलामृत :** श्री दत्तांच्या अनेक अवतारांच्या कथा.
  **श्री सिद्धलीलामृत :** हिमालयातील सिद्धयोग्यांच्या कथा
- **श्री स्वामी समर्थ सप्तशती :**
  श्री स्वामींच्या जीवनावर आधारित ओवीबद्ध ग्रंथ
- **श्री दत्त गीता :**
  दत्त देवाची महती सांगणारा ग्रंथ.
- **श्री दुर्गा त्रिशती :**
  देवीसूक्त, नारायणीस्तुती व श्री दुर्गास्तुतीसह

**ॐ वनिता बुक्स**


बी २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था

(पानवाला चाळ), डॉ. एस. एस. राव मार्ग, लालबाग,

मुंबई - ४०० ०१२. दूरध्वनी - ०२२-२४१८७३३९.

प्रकाशमय लोक

अंधःकारमय लोक



**महाशून्य लोक**

हा परब्रह्माचा प्रान्त असून येथे निर्गुण, निराकार अवस्था प्राप्त होते. सिद्धावस्था प्राप्त होते.

**शून्य लोक**

येथे ब्रह्मज्ञान होते, आत्मज्ञान होते. जीवनमुक्त अवस्था प्राप्त होते.

**शिव-शक्ती**

परमेश्वराचा प्रान्त येथून सुरू होतो. येथे अनेक दैवीशक्ती प्राप्त होतात. निळ्या आकाशाचा प्रान्त सुरू होतो. हा प्रकाशमय मार्ग.

**सूर्याचा प्रान्त**

उच्च कोटीचा देवतालोक. विष्णू, महालक्ष्मी, सूर्य यांचा प्रान्त.

**देवतांचा प्रदेश**

प्रकाशमय लोकाची सुरुवात गणपती, ब्रह्मा, सरस्वतीचा प्रान्त.

**अर्धदेवता लोक**

क्षुद्र देवता व अर्ध देवता यांचा लोक.


**पिशाच्च लोक**

येथे पिशाच्चे राहतात,
येथील अधिपती वेताळ, भैरव.

**भयानक अंधःकारमय लोक**

तळपायापासून गुडघ्यापर्यंत भयानक अंधःकारमय लोक, येथे राक्षस लोकाची सेंटर्स आहेत. अघोरी विद्या, चेटूक विद्या यांची सेंटर्स आहेत. या भयानक लोकात माणसाची जाणीव गेल्यास लाखो वर्षे सुटका नसते. येथे सैतानाचे साम्राज्य असते.

# विराट पुरुष



प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाचे युग. याकाळात दिव्य देहधारी लोक पृथ्वीवर राहतात.
योग्यांचे युग, ज्ञानाचे युग, योगसाधनांचे युग.
सात्त्विक देवी-देवतांचे पूजन व ध्यानमार्गाचा प्रसार.
प्रकाशयुगाची सुरुवात
सात्त्विकतेसाठी धडपडणारे मन, अंधःकारमय युगाचा अंत.
देवी-देवतांचे युग, पुराण व महाकाव्यांचे युग.
काळ्या विद्यांचे युग, राक्षसी शक्तींचे युग.
भयानक अंधःकारमय युग.